म. ग्रं. सं. ठाणें
विषय — चरित्र
सं. नं.

चरित्र भाग ७ वा.

संतशिरोमणि

# श्रीएकनाथ महाराज यांचें चरित्र.

( आख्यायिका, काव्यनिरीक्षण व उत्कृष्ट वेंचे. )



लेखक

जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर.

प्रकाशक,

केशव भिकाजी ढवळे, बुकसेलर,
ठाकुरद्वार-मुंबई, नं. ४.

सन १९२५.

किंमत १२ आणे.

# रा. आजगांवकर यांच्या महाराष्ट्र कवि चरित्राविषयीं विद्वानांचे अभिप्राय.

" निरनिराळ्या उपलब्ध साधनांची तारतम्यानें छाननी करून कवीचें संगतवार चरित्र लिहिणें, त्याचे ग्रंथांतील निवडक वेंचे देणें व कवीच्या काव्यांचें परीक्षण करून त्याची मराठी वाङ्मयांतील जागा मुक्रर करणें हें काम मोठ्या मेहनतीचें, मार्मिकतेचें व रसिकतेचें असून तें रा. आजगांवकर यांनीं योग्य रीतीनें चालविलें आहे यांत संशय नाहीं. महाराष्ट्र कवींच्या चरित्रांचें व काव्यांचें अशा मार्मिक व संकलित रीतीनें समालोचन करण्याचा हा मराठी भाषेंतील पहिलाच प्रयत्न आहे. "

**कै. लोकमान्य टिळक.**

" रा. आजगांवकर यांची सहृदयता, शोधकपणा व वाचनबाहुल्य यांची सदर ग्रंथावरून चांगली कल्पना होते. हा......कविरत्नाचा हार आजगांवकरानीं महाराष्ट्र शारदेच्या गळ्यांत प्रेमानें, भक्तीनें व आदरानें घातला आहे, तो निरंतर तिच्या गळ्यांत चमकत राहील अशी खात्री वाटते. सत्कविता कशा पद्धतीनें वाचायला पाहिजे हें या ग्रंथावरून लोकांस चांगलें समजेल. आजगांवकरांची भाषा साधी, प्रेमळ व प्रसंगविशेषीं खोंचदार अशी आहे. "

**ह. भ. प. लक्ष्मणराव पांगारकर.**

" महाराष्ट्र कविचरित्र हा ग्रंथ चांगला झाला आहे. पुष्कळ शोध करून तुम्हीं जें काय लिहिलें आहे तें फार वाचनीय आणि विचारणीय आहे. तुमचा प्रयत्न फार स्तुत्य आहे, त्यांत तुम्हांस त्या कवींच्या प्रसादानें व परमेश्वर कृपेनें यश यावें असें मीं मनापासून इच्छितों. "

**कै. विनायक कोंडदेव ओक.**

## सार्थ श्रीदासबोध.

किंमत ४ रुपये.

लेखक—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

---

## समर्थांचें सामर्थ्य—

किंवा

## श्रीरामदास स्वामींचा लीलानुग्रह.

किंमत २॥ रुपये.

लेखक—कृष्णाजी नारायण आठल्ये.

---

## सार्थ श्रीमनाचे श्लोक.

किंमत ०६ आणे.

---

## श्रीतुकाराम बोवा.

किंमत ०८ आणे.

John Ct

# महाराष्ट्र कवि चरित्र भाग ७ वा.

Fr-4-349

## महाराष्ट्र संतशिरोमणि

# श्रीएकनाथ महाराज यांचें चरित्र.

( आख्यायिका, काव्यनिरीक्षण व उत्कृष्ट वेंचे. )

जो भानुदासकुळभूषण । प्रतिष्ठानवासी परिपूर्ण ।
त्या एकनाथें ग्रंथ संपूर्ण । बहुसाल कथियेले ॥

ठाकुरदास बावा.

२७२६
अ. क्र.
REFBK-0002726

लेखक
जगन्नाथ रघुनाथ आजगावकर.

प्रकाशक,
केशव भिकाजी ढवळे, बुकसेलर,
ठाकुरद्वार–मुंबई, नं. ४.

ज्येष्ठ, शके १८४६, सन १९२५

किंमत ११ आणे.

मुद्रक—चिंतामण सखाराम देवळे, मुंबईवैभव प्रेस, सँडहर्स्ट रोड,
सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीज् बिल्डिंग्ज्, गिरगांव, मुंबई.

प्रकाशकः—केशव भिकाजी ढवळे, बुकसेलर,
ठाकुरद्वार, मुंबई, नंबर ४

( सर्व हक प्रकाशकाचे स्वाधीन )

# प्रस्तावना.

> जड मूढ जे कां अज्ञान । त्यांसी तारावयालागीं पूर्ण ।
> श्रीएकनाथ नामाभिधान । प्रगट जाण जालेंसे ॥
>
> श्रीधर.

संतशिरोमणि श्रीएकनाथ महाराज पैठणकर यांचें साधुचरित्र गेल्या तीनशें वर्षांत अनेक लेखकांनीं अनेक परींनीं गायिलें आहे. रसाल आणि सुवासिक पुष्पावर मधुमत्त मधुकरांचे थवे जसे तुटून पडावे, तद्वत् या परमभागवताच्या अत्यंत मधुर, नितांत प्रेमळ आणि अतिशयित रसाळ अशा चरितामृतपानार्थ किती तरी प्राचीन आणि अर्वाचीन लेखक अहमहमिकेनें पुढें सरसावले आहेत. केशव नामक एका नाथ-परंपरेंतील भाविक आणि प्रेमळ पुरुषानें शके १६८२ सालीं 'श्रीएकनाथचरित्र' नामक एक ३१ अध्यायांचा ओवीबद्ध ग्रंथ लिहिलेला असून, संतचरित्रकार महीपति बावा ताहराबादकर यांनींही आपल्या भक्तलीलामृतादि ग्रंथांत नाथचरित्र विस्तारें-करून वर्णिलें आहे. महीपतींनी आपल्या भक्तविजयांत थोडीशी नाथकथा पहिल्यानें दिली होती, त्यानंतर केशवकृत 'एकनाथचरित्र' हा ग्रंथ त्यांच्या अवलोकनांत आल्यावर त्यांतील बहुतेक सर्व कथा, व स्वतः त्यांना मिळालेली कांहीं अधिक माहिती व आख्यायिका यांच्या आधारानें, आपल्या 'भक्तलीलामृत' ग्रंथांत पुनः सविस्तर नाथचरित्र त्यांनीं वर्णिलें आहे. शिवाय, मुक्तेश्वर, कृष्ण-दयार्णव वगैरे कांहीं जुन्या कवींच्या ग्रंथांत प्रसंगोपात्त नाथचरित्रांतील कांहीं गोष्टींचा उल्लेख येऊन गेलेला आहे.

अर्वाचीन कालीं म्हणजे मुद्रणकलेचें आगमन या देशांत झाल्यापासून कांहीं अर्वाचीन विद्वानांनीं एकनाथचरित्रलेखनाच्या कामीं पुष्कळ परिश्रम केलेले आहेत. जुनें कविचरित्र व भारतवर्षीय अर्वाचीन कोश या ग्रंथांत एकनाथ-चरित्रविषयक अल्प माहिती दिलेली आढळते. त्यानंतर रा. सहस्रबुद्धे नामक गृहस्थांनीं एकनाथांचं गद्यात्मक चरित्र लिहून प्रसिद्ध केलें व सुमारें २५।३० वर्षें, अर्वाचीन मराठी वाङ्मयांत, नाथचरित्रावर तोच ग्रंथ बहुतांशीं प्रमाणभूत मानला जात असे. त्यानंतर, सुमारें १५ वर्षांपूर्वीं माझे मित्र हरिभक्ति-परायण लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए. यानींही, कांहीं नवीन माहितीची भर घालून एक नाथचरित्र लिहून प्रसिद्ध केलें व लेखकाच्या प्रेमळ भाषासरणीमुळें तें बरेंच लोकप्रियही झालें आहे. मग अशा स्थितींत, हें एक नवीन एकनाथचरित्र लिहिण्याचें प्रयोजन काय होतें, असा प्रश्न सहजच कोणीही विचारील. या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, वरील दोन्ही चरित्रग्रंथ उत्तम आहेत खरे, परंतु ते असावे तितके विस्तृत नाहींत व नाथचरित्रविषयक सर्व उपलब्ध माहितीचा त्यांत समावेश झालेला नाहीं. आणि ही उणीव यथाशक्ति भरून काढावी या उद्देशानें हें चरित्र मी लिहिलें आहे. इंग्रजी भाषेंतील चरित्रग्रंथांची संख्या पाहिली म्हणजे एकाच मराठी कवीचे अनेक चरित्रग्रंथ झाल्याबद्दल कोणासही विषाद वाटणार नाहीं. शिवाय कवींची एक नवीन परंपरा ( school ) स्थापन करणाऱ्या एकनाथस्वामीच्या चरित्रावर आणि कवितेवर, निरनिराळ्या लेखकांनीं निरनिराळ्या दृष्टींनीं आणि निरनिराळ्या प्रकारांनीं लिहिलेले जितके ग्रंथ होतील तितके थोडेच आहेत, आणि हीच गोष्ट लक्ष्यांत घेऊन प्रस्तुत नाथचरित्रलेखनाचा यथाशक्ति प्रयत्न मी केला आहे. या ग्रंथांत, परंपरेनें आलेल्या नाथचरित्रांतील बहुतेक सर्व कथा, दंतकथा व अलौकिक चमत्कार यांचा समावेश तर मी केलाच आहे; शिवाय नाथांनीं लिहिलेल्या एकंदर कवितेचें विस्तृत निरी-क्षण केलें असून, त्यांच्या ग्रंथांतले पुष्कळ सुरस उतारेही **विद्यार्थ्यांच्या सोयी-साठीं** मुद्दाम दिले आहेत. आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या नाथचरित्रांशीं या ग्रंथाची तुलना करून पाहिल्यास, पुष्कळ नवीन माहिती व वादग्रस्त मुद्द्यांची थोडीबहुत चर्चा यांत आलेली आहे, असें सूक्ष्मदृष्टि वाचकांस आढळून आल्याशिवाय राहणार नाहीं. उदाहरणार्थ, एकनाथ महाराजांचा प्रसिद्ध आणि प्रचंड ग्रंथ जो ‘ भावार्थ रामायण ’ तो निरनिराळ्या तीन कवींनीं लिहिलेला आहे, हें आजपयत किती लोकांस माहीत होतें ? नाथमहाराज समाधिस्थ झाल्यावर कित्येक वर्षांनीं दुसऱ्या

कांहीं सत्पुरुषांस त्यांनीं दृष्टांत दिले ही गोष्ट आजपर्यंत कोणी ऐकली आहे ? तर अशा कित्येक नवीन गोष्टी प्रस्तुत चरित्रग्रंथांत वाचकांस पहिल्यानेंच वाचावयास मिळतील.

आतां प्रकृत ग्रंथ लिहिण्याचे कामीं ज्या ज्या प्राचीन व अर्वाचीन ग्रंथांचा उपयोग झाला त्या सर्वांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून हा प्रास्ताविक लेख पुरा करूं. केशवकृत ज्या ओवीबद्ध नाथचरित्राचा पूर्वी उल्लेख केला आहे त्याचा मुख्य आधार या ग्रंथास असून, महीपतींनीं दिलेल्या माहितीचाही पूर्ण उपयोग केला आहे. केशव यानीं आपला ग्रंथ शके १६८२ * सालीं लिहिला असें रा. पांगारकर म्हणतात, तें जर खरें असेल तर सदर ग्रंथ, महीपतिकृत संतचरित्रविषयक प्रसिद्ध चार ग्रंथांपूर्वीं लिहिला गेला होता हें उघड दिसतें. केशव व महीपति यांच्या ग्रंथांशिवाय, रा. पांगारकरकृत नाथचरित्र, पुणें येथील भारत–इतिहास–संशोधक मंडळाचीं पुस्तकें व रा. भावे यांचें महाराष्ट्र सारस्वत यांचाही बराच उपयोग झाला, याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

शेवटीं, या ग्रंथाला **बडोदें दरबाराकडून दीडशें रुपयांची मदत** मिळाली हें येथें कृतज्ञतापूर्वक नमूद करून व माझे मित्र रा. **केशव भिकाजी ढवळे बुकसेलर,** यांनीं हा ग्रंथ सुंदर रीतीनें छापून प्रसिद्ध केला याबद्दल त्यांचे आभार मानून ही प्रस्तावना पूर्ण करितों.

मुंबई
ता २०।५।२५

संतसेवक
**जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर.**

---

* के. तुकाराम तात्या यांनीं प्रसिद्ध केलेल्या एकनाथी गाथ्याच्या आरंभीं, हें केशवकृत नाथचरित्र छापलें आहे. त्याचे शेवटीं, **शके १७१४** परिधावी नाम संवत्सरे उत्तरायणे माघ शुक्ल १२ इंदुवासरे क्षेत्र पंचवटी श्रीसीतारामचरणसान्निधाने संपूर्णम्, असा लेखनस्थलकालोल्लेख आहे, तो सदर चरित्र ज्या मूळ पोथीवरून छापलें त्या पोथीच्या लेखकानें केलेला उल्लेख असावा असें वाटतें.

# अनुक्रमणिका.


| | पृष्ठ. |
|---|---|
| **प्रकरण पहिलें**:—भानुदासचरित्र–नाथजन्म. | १ |
| **प्रकरण दुसरें**:—जनार्दनस्वामिदर्शन–गुरूपदेश. | १९ |
| **प्रकरण तिसरें**:—तीर्थयात्रा–ग्रंथरचनारंभ–विवाह. | ३१ |
| **प्रकरण चौथें**:—अवतारचरित्र–श्रीखंड्याची कथा. | ४२ |
| **प्रकरण पांचवें**:—ज्ञानदेवसमाधिजीर्णोद्धार–ज्ञानेश्वरीसंशोधन. | ६५ |
| **प्रकरण सहावें**:—काशीयात्रा–नाथभागवतविजय–दासोपंत. | ८३ |
| **प्रकरण सातवें**:—हरिपंडित–म्हातारीचें सहस्रभोजन–गावबा–नाथनिर्याण. | १०४ |
| **प्रकरण आठवें**:—नाथवाङ्मयावलोकन | ११९ |
| **प्रकरण नववें**:—नाथांचा वंशविस्तार. | १७३ |
| **प्रकरण दहावें**:—नाथांचे समकालीन कवि. | १८० |
| **प्रकरण अकरावें**:—एकाजनार्दनाचा जयजयकार. | १८३ |

# श्रीएकनाथ महाराज यांचें चरित्र.

रा. क्र. २६२६

## प्रकरण पहिलें.

### कुलवृत्त, भानुदास, नाथजन्म.

**नमिला शमिलस्थिरप्रद शांतिजलधि एकनाथ तो भावें ।**
**शोभावें ज्याचें यश विश्वीं ज्या देववृंद लोभावें ॥**

सन्मणिमाला, मोरोपंत.

आमचा हा परमप्रिय आर्यावर्त देश सृष्टीच्या आरंभापासून परमार्थप्रवण आहे. चार्वाकासारखे क्वचित् चमकणारे जडवादी सोडून दिले तर आमच्या देशांत जडवादाचें स्तोम कोणीही कधीं फारसें माजविलेलें आमच्या इतिहासास ठाऊक नाहीं. सनातन वेदधर्म, जैनधर्म, बौद्धधर्म इत्यादि धर्मांची जननी ही भरतभूमीच होय. विदेही जनक, भीष्माचार्य, भगवान् श्रीकृष्ण आणि गौतमबुद्ध यांसारखे राजपुरुषही गंभीर धर्मचर्चा करीत असल्याचा देखावा याच देशांत दृष्टीस पडतो. मानववंशाच्या बाल्यावस्थेंत देखील, आमच्या ऋषींनीं रानावनांत राहून आणि कंदमुळें सेवून, सृष्टीच्या आदिकारणाची चर्चा पहिल्यानें ऋग्वेदांत सुरू केली व तिचें परिणत स्वरूप उपनिषदें, ब्रह्मसूत्र, गीता, भागवत, योगवासिष्ठ इत्यादि प्राचीन व पंचदशीसारख्या अर्वाचीन ग्रंथांत क्रमशः प्रगल्भ होत आलेलें दृष्टीस पडतें. त्यांतल्या त्यांत या गहन विषयाची चर्चा आमच्या या महाराष्ट्र देशांतल्या साधुसंतांनीं गेल्या सहाशें वर्षांत जेवढी व जशी केली आहे, तेवढी व तशी हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही प्रांतांतील साधुसंतांनीं केलेली नाहीं. उत्तरहिंदुस्थान ह्मणजे सगुणोपासनेचें आगर; अयोध्या, मथुरा, काशी, प्रयाग, हरिद्वार, बद्रीकेदार वगैरे तीर्थस्थानें व मूर्तिपूजेचीं प्रमुख ठिकाणें तिकडे असल्यामुळें अध्यात्मापेक्षां—वेदांतापेक्षां—भक्तीचेंच माहात्म्य त्या प्रांतांत अधिक वाढलें. सूरदास, तुलसीदास, मिराबाई वगैरे तत्रस्थ संतांची कविता जरी

अत्यंत प्रतिभाशाली आणि कमालीची प्रेमळ आहे, तरी, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, एकनाथी भागवत, यथार्थदीपिका, सिद्धांतसंहिता, निगमसार, वेदेश्वरी शिवगीता, दासबोध यांच्यासारखे अध्यात्म आणि भक्ति यांचा समन्वय करणारे अपूर्व ग्रंथ उपरिनिर्दिष्ट कवींनीं फारसे लिहिलेले नाहींत. गुजराथेंतही हाच प्रकार दृष्टीस पडतो आणि दक्षिणहिंदुस्थान व बंगाल या देशांतही ज्ञानेश्वरीच्या तोडीचे ग्रंथ निर्माण झालेले नाहींत. आमच्या ज्ञानदेवांचा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ ह्मणजे जगांतल्या एकंदर वाङ्मयांतली एक अपूर्व आणि अतुल चीज आहे, तिची बरोबरी दुसरा कोणताही ग्रंथ करूं शकेल असें माझ्या अल्पबुद्धीस वाटत नाहीं. या ज्ञानेश्वरीनें महाराष्ट्रांत जे शेंकडों प्रतिभाशाली संतकवि निर्माण केले त्यांतल्या प्रमुखांत एकनाथ महाराजांची गणना होते. ‘ ज्ञान्याचा एका ’ हें वचन भागवत सांप्रदायी लोकांत प्रसिद्धच आहे. अशा या ‘ शांतिजलधि ’ एकनाथ स्वामीचें अल्प चरित्र लिहून तें महाराष्ट्रास सादर करण्याचा सुयोग त्यांच्याच कृपेनें आज प्राप्त झाला आहे.

गेल्या सातशें वर्षांत, महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं जरी निरनिराळे संत होऊन गेले, तरी प्रतिष्ठान उर्फ पैठण या स्थलाकडेच, या बाबतींतला अग्रपूजेचा मान जातो. कारण, पैठणच्या पुण्यभूमींत आजवर जसें संतांचें पीक आलें तसें दुसऱ्या कोणत्याही भूमींत आलें नाहीं. निवृत्तिज्ञानदेवादि भावंडें, भानुदास, एकनाथ, कृष्ण-दयार्णव, अमृतराय, शिवदिनकेसरी इत्यादि संतांचा पैठणाशीं कांहीं ना कांहीं संबंध आलेला आहे. अशा या पैठणक्षेत्रीं, नाथकुलांतले पहिले प्रसिद्ध पुरुष श्रीभानुदास हे शालिवाहन शकाच्या चौदाव्या व पंधराव्या शतकांत होऊन गेले. भानुदासांविषयीं एकनाथ महाराजांस केवढा अभिमान आणि किती धन्यता वाटत असे, हें त्यांच्या पुढील उद्गारांवरून व्यक्त होतें:—

**पूर्वीं भानुकृपा सौरस । पितामहपिता भानुदास ।**
**त्यापासोनी हा वंश । जनार्दनप्रिय ॥**

श्रीशुकाष्टक टीका.

**वंदूं भानुदास आतां । जो कां पितामहाचा पिता ।**
**ज्याचेनि वंश भगवंता । जाला सर्वथा प्रियकर ॥ १३० ॥**
**ज्यानें बाळपणीं आकळिला भानु । स्वयें जाहला चिद्भानु ।**
**जिंतोनि मानाभिमानु । भगवत्पावनु स्वयें जाला ॥ १३१ ॥**

**जयाची पदबंधप्राप्ति । पाहों आली श्रीविठ्ठलमूर्ति ।**
**कानीं कुंडलें जगज्ज्योति । करितां रातीं देखिला ॥ १३२ ॥**
**तया भानुदासाचा चक्रपाणी । तयाचाही सुत सुलक्षणी ।**
**तया सूर्य नाम ठेवूनि । निजीं निज होऊनि भानुदास ठेला ॥१३३॥**
**तया सूर्यप्रभा प्रतापकिरणीं । मातें प्रसविली रुक्मिणी ।**
**ह्मणोनि रखुमाई जननी । आह्मां लागुनी साचची ॥ १३४ ॥**
**हे ग्रंथारंभकाळा । वंदिली पूर्वजमाळा ।**
**धन्य निजभाग्याची लीळा । आलों वैष्णवकुळा जन्मोनी ॥१३५॥**

एकनाथी भागवत, अध्याय १ ला.

इतर संतांनींही, भानुदासांचा उल्लेख, आपापल्या कवितेंत स्तुतिपूर्ण शब्दांनीं केलेला आढळतो. पंत आपल्या सन्मणिमालेंत ह्मणतातः—

**झाले वंद्य शतमखा ते गेले शरण भानुदासा जे ।**
**याशीं साम्य पहातां न उदारा रत्नसानुदा साजे ॥**

भानुदासांचा काल, भारतवर्षीय अर्वाचीन कोशकर्ते, काव्यसंग्रहकर्ते, व रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं शके १४३६ हा दिला आहे. भानुदासांचें चरित्र संतचरित्रकार महीपति यांनीं आपल्या 'भक्तविजय' व 'भक्तलीलामृत' ग्रंथांत साकल्येंकरून वर्णिलें आहे.

भानुदास हा सूर्याचा अवतार होय अशी भाविक जनांची समजूत आहे. पैठण येथें एक सूर्योपासक ब्राह्मण रहात असे, त्याच्या पत्नीच्या उदरीं भानुदास जन्मले. महीपतीनीं भक्तलीलामृताच्या अठराव्या अध्यायांत, ज्ञानदेव, नामदेवादि संत भानुदासांचे समकालीन होते व अनागोंदीच्या रामराजानें नेलेली पंढरपुरच्या विठ्ठलाची मूर्ति भानुदासांनीं परत आणली असें लिहिलें आहे. परंतु नाथांचे पणजे भानुदास हे नाथांपूर्वीं तीनशें वर्षें होऊन गेलेल्या ज्ञानदेवादि संतांच्या कालीं विद्यमान असतील, हें शक्य दिसत नाहीं. यास्तव, शके १४३६ हा जो अर्वाचीन शोधकांनीं भानुदासांचा काल दिला आहे, तोच अधिक विश्वसनीय मानण्यास हरकत नाहीं.

भानुदासांवर त्यांच्या आईबापांची फार प्रीति होती. भानुदासांचा व्रतबंध झाल्यावर, एके दिवशीं कांहीं कारणानें त्यांचे वडील त्यांना रागें भरले. त्यामुळें खिन्न होऊन भानुदास घरांतून निघाले व एका देवालयांत जाऊन बसले.

हें देवालय भुईंत असल्यामुळें लोकांस फारसें माहीत नव्हतें. देवालयांत श्रीसूर्य–नारायणाची पुरातन मूर्ति होती, तिला नमस्कार करून भानुदासांनीं तिची फार स्तुति केली, तेणेंकरून प्रसन्न झालेल्या सूर्यनारायणानें मनुष्यरूपानें प्रगट होऊन भानुदासांस दूध पाजिलें; व सांगितलें कीं, ' तूं सर्वकाळ भगवंताचें स्मरण करीत बैस; तुजवर कांहीं संकट आलें, तर तें मी निवारण करीन. '

इकडे सात दिवस भानुदासांचे तीर्थरूप त्यांचा शोध करीत फिरत होते; मुलाच्या वियोगानें ते अतिशय दुःखी झाले होत. पुढें एके दिवशीं भानुदास देवळांतून सहज बाहेर आले असतां, ते एका ब्राह्मणाच्या दृष्टीस पडले. ब्राह्मणानें त्यांस हांक मारिली पण तिकडे लक्ष न देतां ते देवळांत शिरले. मग त्या ब्राह्मणानें ही हकीकत भानुदासांच्या तीर्थरूपांस कळविली. त्यांनीं पुष्कळ लोकांसह देवळांत जाऊन पाहिलें तों तेथें सगळा काळोख दृष्टीस पडला. मग दिवट्या पाजळून ती सगळी मंडळी आंत गेली. तेथें सूर्यनारायणाची मूर्ति होती, तिच्या पायांवर आपलें मस्तक ठेवून भानुदास निजले होते. त्यांच्या आईबापांनीं त्यांस जागृत करून पोटाशीं धरिलें, व ' जेवणाची व्यवस्था कोणीं ठेविली ?' असें विचारलें. भानुदास ह्मणाले ' एक मोठा तेजस्वी ब्राह्मण येथें येऊन मला दूध पाजितो. ' हा तेजस्वी ब्राह्मण सूर्यनारायण असावा अशा समजुतीनें सगळे लोक तेव्हांपासून त्यांस ' भानुदास ' या नांवानें संबोधूं लागले.

भानुदासांस त्यांच्या आईबापांनीं घरीं नेलें व त्यांस पुन्हां कधींही कठोर शब्द न बोलण्याचा निश्चय केला. पुढें एक चांगलीशी मुलगी पाहून, तिच्याशीं त्यांनीं भानुदासांचें लग्न करून दिलें. कांहीं दिवसांनीं आईबाप मरण पावले तरी, भानु-दासांचें चित्त हरिभजनावरून ढळलें नाहीं. त्यांस मुलेंबाळें झालीं होतीं, त्यांस धड अन्नवस्त्रही मिळेना, मग दागिन्यांची गोष्ट तर लांबच राहिली. या दुःस्थितीबद्दल त्यांच्या पत्नीस फार वाईट वाटे, पण ती बिचारी काय करणार ? मग कांहीं लोक भानुदासांस ह्मणाले, ' तुझे आईबाप जिवंत होते तोंपर्यंत तुझें पालनपोषण त्यांनीं केलें; पण आतां तुझीं बायकापोरें उपास काढतात त्यांची काळजी तुला घेतली पाहिजे. आह्मीं तुला शंभर रुपयांचें कापड देतों त्याचा व्यापार करून त्यांत जो नफा राहील त्याजवर तुला आपल्या कुटुंबाचा चरितार्थ सहज चालवितां येईल. ' भानुदासांनीं ही गोष्ट कबूल केली व लोकांनीं दिलेल्या कापडाचा ते व्यापार करूं लागले. त्यांनीं सचोटीनें व्यापार केल्यामुळें त्यांस गिऱ्हाईक चांगलें मिळालें व

बराच फायदा होऊं लागला. भानुदासांचा हा उत्कर्ष इतर व्यापाऱ्यांस सहन झाला नाहीं.

एके दिवशीं सगळे व्यापारी बाजारास गेले, त्यांत भानुदासही होते. अस्तमान झाल्यावर भानुदास कीर्तनास गेले, व इतर व्यापारी देवळांत निजले. भानुदासांचें नुकसान करण्यास ही संधि चांगली आहे असें पाहून व्यापाऱ्यांनीं त्यांचें घोडें सोडून दिलें व कापडाचें दिंड एका खांचेंत लपवून ठेविलें. पण भक्तांची काळजी ईश्वर घेतो. तो त्या ठिकाणीं विप्रवेषानें प्रगट होऊन, भानुदासांचा घोडा धरून बसला. इतक्यांत निजलेल्या व्यापाऱ्यांवर चोरांनीं हल्ला केला व त्यांस हाणमार करून, त्यांचाच सगळा माल लुटून नेला.

कीर्तन संपल्यावर भानुदास बिऱ्हाडीं येण्यास निघाले असतां वाटेंत आपला घोडा धरून एक ब्राह्मण बसला आहे, असें त्यांनीं पाहिलें. भानुदासांस पाहतांच ब्राह्मण निघून गेला. भानुदास घोडा घेऊन देवळांत आल्यावर व्यापाऱ्यांनीं सर्व हकीकत त्यांस सांगितली. तेव्हां, ज्या धंद्यामुळें देवास श्रम झाले, तो धंदाच करावयाचा नाहीं, अशा निश्चयानें भानुदासांनीं आपलें सगळें कापड व्यापाऱ्यांस वांटून दिलें व आपलें पुढील आयुष्य त्यांनीं हरिभजनांत घालविलें. ते दर आषाढी कार्तिकी एकादशीस नियमानें पंढरपुरास जात असत.

त्या वेळीं विद्यानगर येथें जो राजा* राज्य करीत होता तो एकदां स्वारीवर निघाला असतां पंढरीस आला. तेथील श्रीविठ्ठलमूर्ति पाहून तो इतका संतुष्ट झाला कीं, ती मूर्ति विद्यानगरास न्यावी असें त्यास वाटलें. मग पंढरीनाथाची आज्ञा मिळविण्यासाठीं तो सात दिवस उपाशी बसला. तेव्हां पंढरिनाथानें त्यास स्वप्नांत दृष्टांत दिला कीं, “ पुंडलिकाची भक्ति पाहून मी या ठिकाणीं वास्तव्य केलें आहे व येथून हालणार नाहीं असें पुंडलिकास वचन दिलें आहे.

* या राजाचें नांव महीपतीनीं, ‘ भक्तविजय ’ व ‘ भक्तलीलामृत ’ या दोन्ही ग्रंथांत ‘ रामराजा ’ असें दिलें आहे, व त्यांनीं दिलेल्या भानुदासांच्या कालाशीं हें नांव जुळतें. परंतु शके १४३६ हा भानुदासांचा काल विश्वसनीय मानल्यास त्या कालीं विद्यानगर येथें कोणता राजा राज्य करीत होता, हें समजण्यास मार्ग नाहीं. कदाचित् ज्ञानेश्वरकालीन रामदेवरावाचा ‘ रामराजा ’ या नांवाचा नातू त्या वेळीं राज्य करीत असेल. रा. पांगारकर यांनीं आपल्या एकनाथचरित्रांत पंढरपुरची विठ्ठलमूर्ति विद्यानगरास नेणाऱ्या या राजाचें नांव ‘ कृष्णराय ’ दिलें आहे. परंतु तें कशाच्या आधारानें, याचा खुलासा त्यांनीं केलेला नाहीं.

येथें नित्य अनेक हरिभक्त माझ्या भेटीस येत असतात व त्यांच्या सहवासांत मी माझा काल मोठ्या आनंदांत घालवितों. परंतु आतां तूं मला विद्यानगरास घेऊन जाऊं इच्छितोस, तर एका अटीवर तुजबरोबर येण्यास मी तयार आहें. अट एवढीच कीं, ब्राह्मणांनीं शुचिर्भूत होऊन सोंवळ्यानें मला उचलावें व वाटेंत कोठेंही मला खालीं ठेवूं नये." हें स्वप्न पाहून राजास मोठा आनंद झाला. त्यानें आपल्या प्रधानास बोलावून, पांडुरंगानें आपली मूर्ति विद्यानगरास नेण्याची आज्ञा दिल्याचें त्यास कळविलें व देवानें घातलेली अट कोणत्या रीतीनें पाळतां येईल या विषयीं चौकशी केली. तेव्हां प्रधानानें सांगितलें कीं, त्यासंबंधानें आपण कांहीं काळजी करूं नये. आपल्या राज्यांत पुष्कळ ब्राह्मण आहेत त्यांस चांगली दक्षिणा देऊन, वाटेवर ठिक-ठिकाणीं उभे करूं व त्यांच्याकडून पाडुरंगमूर्ति, खालीं ठेवूं न देतां, विद्यानगरास नेऊं." मग पंढरपुरापासून विद्यानगरापर्यंतच्या रस्त्यावर जे जे गांव होते, त्या त्या गांवच्या ब्राह्मणांस पत्रें पाठवून, ठरलेल्या वेळीं, त्या त्या ठिकाणीं हजर राहण्याची आज्ञा केली व वाटेंत अन्नोदकाचीही उत्तम प्रकारें व्यवस्था करण्यांत आली. देवकार्य आहे हें जाणून, गांवोगांवचे ब्राह्मणही मोठ्या आनंदानें राजास साहाय्य करण्यास निघाले. याप्रमाणें सर्व तयारी झाल्यावर, राजा पांडुरंगमूर्तीसमोर हात जोडून उभा राहिला व प्रार्थना करिता झाला कीं, " भगवन्, आतां आमच्याबरोबर चलावें." मग, राजाज्ञेनें ब्राह्मणांनीं मूर्ति उचलली व विद्यानगराकडे चालविली. बडव्यांनीं व पंढरींतील इतर लोकांनीं राजास, मूर्ति न नेण्याविषयीं परोपरीनें विनविलें, परंतु सत्तेच्या जोरावर कोणासही न जुमानतां तो मूर्ति घेऊन चालला. पंढरपुरांतून पांडुरंगमूर्ति बाहेर जातांच, तें नगर प्राणहीन शरीराप्रमाणें निस्तेज दिसूं लागलें.

इकडे राजाची स्वारी मजल दरमजल करीत, विठ्ठलमूर्तिसह विद्यानगरास येऊन दाखल झाली. राजाचा आनंद गगनांत मावेना. महीपति म्हणतातः—

**" मेळवूनियां वैष्णव वीर । कीर्तन करीतसे नृपवर ।**
**दिंड्या पताकांचे भार । मंगळतुरें लाविले ॥ ९४ ॥**
**पूजा अभिषेक करूनि प्रीतीं। सिंहासनीं स्थापित पांडुरंगमूर्ती।**
**महाउत्सव करीत भूपति । आनंद चित्तीं न समाये ॥ ९५ ॥**
**वस्त्रें भूषणें देऊनि फार । रायें गौरविले वैष्णव वीर ।**
**द्रव्यदक्षिणा वांटोनियां थोर । सुखी द्विजवर ते केले ॥ ९६ ॥**

**रत्नजडित अलंकार । अमूल्य वस्त्रें मुक्ताहार ।**
**लेवोनि पूजिला रुक्मिणीवर । हर्षें अंतर कोंदलें ॥ १७ ॥**

अशा थाटामाटानें विद्यानगरांत पांडुरंगमूर्तीची स्थापना झाल्यावर, एके दिवशीं पांडुरंगानें राजास स्वप्नांत येऊन सांगितलें कीं, " राजा, तुझ्या आग्रहावरून, पंढपुर सोडून, मी तुझ्या या राजधानींत येऊन राहिलों आहें. तरी, आपल्या हातून कांहीं अन्याय होऊं देऊं नकोस. न्यायानें राज्य चालीव. तुझ्या हातून जरी यत्किंचित् अन्याय झाला तरी त्या क्षणीं मी येथून निघून जाईन. विशेषतः मला अत्यंत प्रिय असे जे माझे प्रेमळ भक्त, त्यांचा जर तुझ्याकडून विनाकारण छळ झाला तर त्या घटकेस मी पंढरपुरचा रस्ता धरीन. " राजा जागा झाल्यावर, या स्वप्नाबद्दल त्याला भय वाटलें; व भगवंतानें घातलेल्या निर्बंधाचें अतिक्रमण आपल्या हातून होऊं नये याविषयीं तो फार दक्षता बाळगूं लागला.

रोज प्रातःकाळीं पुजारी देवाची पूजाअर्च्या करीत असत, त्या वेळीं राजा दर्शनास व आरतीस येत असे. मूर्तीवर अनेक बहुमूल्य अलंकार राजानें घातले होते. त्यामुळें, चोर, हे दागिने एखादे वेळीं चोरून नेतील कीं काय अशी त्यास काळजी वाटत असे. म्हणून देवघरास कड्याकुलुपें घालून व पहारे ठेवून त्यानें आपल्या मतें अगदीं पक्का बंदोबस्त केला होता. राजा देवळांत हजर असेल त्याच वेळीं नागरिकांस दर्शनाची परवानगी असे. महीपति म्हणतातः—

**षोडशोपचारें करोनि जाण । राजा करितसे नित्य पूजन ।**
**घृतपाचित पक्वान्नें । त्रिकाळ अर्पण होतसे ॥**
**भोंवते कापूरदीपक । सर्वदा जळती सम्यक ।**
**पुष्पें कस्तूरी सुवासिक । उपचार अनेक वोळंगती ॥**

अशा प्रकारचा थाट चालू असतांही, खरा भक्तिभाव आणि शुद्ध प्रेम यांच्या अभावीं पांडुरंगास विद्यानगरांतील वास्तव्य कंटाळवाणें होऊं लागलें. पंढरींतील संतांच्या प्रेमाची आठवण होऊन, पुनः आपण कधीं पंढरीस जाऊं असा त्यास ध्यास लागून राहिला.

इकडे पंढरीस आषाढी एकादशीच्या यात्रेस हजारों संत जमा झाले, परंतु पांडुरंगमूर्तीच्या अभावीं, सगळी पंढरी त्यांना दैन्यवाणी दिसूं लागली. तेव्हां, कोणी तरी विद्यानगरास जाऊन पांडुरंगास परत पंढरीस आणावें, अशी सूचना एका संतानें केली. परंतु, विद्यानगरच्या राजानें कडीकपाटांत

ठेवलेल्या पांडुरंगमूर्तीस घेऊन येणें ही कांहीं सोपी गोष्ट नव्हती. तेव्हां असली बिकट कामगिरी पतकरण्यास एकाएकीं कोण तयार होतो ? कांहीं वारकरी तर असा वेदांत सांगूं लागले कीं देव सर्व चराचरांत भरलेला आहे, तसा तो आपल्यापाशींही आहेच; तेव्हां त्यास आणण्याचें प्रयोजनच काय ? अशा अनेकांनीं अनेक सबबी सांगितल्या. शेवटीं, संतशिरोमणि भानुदास पुढें होऊन ह्मणाले, ' तुमची आज्ञा असेल तर आतांच विद्यानगरास जाऊन श्रीपांडुरंगमूर्ति मी घेऊन येतों. तुह्मी सगळे येथें निश्चिंत रहा. ' इतकें बोलून व हृदयांत पांडुरंगचिंतन करून, भानुदासांनीं विद्यानगराची वाट धरली. वाटेंत अयाचित वृत्तीनें राहून त्यांनीं आपला निर्वाह चालविला. अशा रीतीनें मजल दरमजल करीत कांहीं दिवसांनीं ते विद्यानगरास जाऊन पोंचले; व राजानें विठ्ठलमूर्ति कोठें ठेवली आहे अशी कांहीं नागरिकांकडे त्यांनीं चौकशी केली. परंतु राजभयानें कोणीच त्यांच्या प्रश्नाचें उत्तर देईना. शेवटीं कोणी एक सत्पुरुष त्यांस भेटला, त्यानें मात्र विठ्ठलमूर्तीविषयींची सर्व माहिती खुलासेवार रीतीनें त्यांस सांगितली. ती ऐकल्यावर, रात्रौ शेजारतीनंतर, राजवाड्यांत जाऊन पांडुरंगमूर्तीचें दर्शन घेण्याचें त्यांनीं ठरविलें. रात्रौ राजा देवळांत येऊन, देवाची शेजारती झाल्यावर, सगळ्या दारांस कुलपें ठोकून व नेहमींप्रमाणें पक्का बंदोबस्त करून आपल्या महालीं गेला. सर्वत्र शांतता झाल्यावर भानुदास मंदिरापाशीं येऊन थडकले. बाहेर कांहीं पुजारी होते ते गाढ झोंपीं गेलेले होते; अर्थात् त्यांच्यासंबंधानें भानुदासांस फारशी भीति वाटली नाहीं, परंतु बाहेरून सर्व दारांस कुलुपें लावलेलीं पाहून, आंत आपला प्रवेश कसा होतो हा विचार मनांत येऊन ते थोडेसे सचिंत झाले. इतक्यांत असा चमत्कार झाला कीं, सगळीं कुलुपें आपोआप गळून पडलीं. तो प्रकार पाहून भानुदासांस मोठा आनंद झाला. ते घाईघाईनें आंत गेले तों ' समचरणसरोजं सांद्रनीलांबुदाभं ' अशी ती परममनोहर विठ्ठलमूर्ति समोर उभी असलेली पाहतांच त्यांच्या प्रेमास भरतें येऊन ते अगदीं रोमांचित झाले. परंतु बाह्यतः क्रोधाचा मोठा आविर्भाव आणून ते देवास म्हणाले, " पांडुरंगा, भक्तकार्यकल्पद्रुम हें तुझें ब्रीद व्यर्थ आहे. तुझ्या झोंपडीपुढें मी असाच निरंतर उभा राहीन असें वचन तूं पुंडलिकास दिलेंस, त्याची देखील तुला आठवण राहिली नाहीं ! या सुंदर राजमंदिरांत मूल्यवान् वस्त्राभरणें धारण करून बंदिवानाप्रमाणें राहण्यांत तुला सुख वाटतें काय ?

## अभंग.

चंद्रभागेतीरीं उभा विटेवरी । विठो राज्य करी पंढरिये ॥ १ ॥
ऋद्धि सिद्धि वोळंगती परिवार । न लाहाती अवसर ब्रह्मादिकां ॥२॥
सांडुनी इतुकें येथें बीजे केलें । कवणें चाळविलें कानडिया ॥ ३ ॥
शंख भेरी मृदंग वाजती काहळा । उपवड राउळा होत असे ॥ ४ ॥
चापेलमार्जन सुगंधचर्चन । भिंवरा चंदनपाट वाहे ॥ ५ ॥
रंभा तिलोत्तमा उर्वशी मेनिका । कामिनी अनेका येती सर्वे ॥ ६ ॥
कनकाचे पर्येळीं रत्नाचे दीपक । सुंदर श्रीमुख वोवाळिती ॥ ७ ॥
रखुमाई आई ते जाहली उदास । पुंडलीका कैसें पडिलें मौन ॥ ८ ॥
भक्त भागवत सकळ पारुषले । निःशब्दचि ठेले तुजवीण ॥ ९ ॥
धन्य पंढरपुर विश्वाचें माहेर । धन्य भीमातीर वाळुवंट ॥ १० ॥
भानुदास म्हणे चालें आम्हासवें । वाचाऋण देवें आठवावें ॥ ११ ॥

अशा रीतीनें भानुदासांनीं देवास परोपरीनें आळविलें तेव्हां देवही सद्गदित होऊन त्यानें भानुदासांस प्रेमालिंगन देऊन म्हटलें, " अरे, मी एक दुर्दैवानें येथें येऊन य बंदिखान्यांत पडलों. पण तुह्मी सर्व संतांनीं माझी वास्तपुस्त कांहींच केली नाहीं हें कसें ? आतां तरी तूं मला सोडून जाऊं नकोस. " इतकें बोलून पांडुरंगानें भानुदासांस प्रसाद दिला व आपल्या गळ्यांतला तुलसीहार त्यांच्या गळ्यांत घातला. परंतु सुदैवानें ह्मणा किंवा दुर्दैवान ह्मणा, त्या तुलसीहाराबरोबरच देवाच्या कंठांतला रत्नहारही चुकून भानुदासांच्या गळ्यांत येऊन पडला ! भानुदासांस मात्र या गोष्टीची दादही नव्हती, ते तसेच आपल्या बिऱ्हाडीं निघून गेले. ते जातांच पांडुरंगानें मंदिराच्या सर्व दारांस पूर्ववत् कड्याकुलुपें लावून पूर्ण बंदोबस्त केला. पहांट होतांच कांकडआरतीसाठीं राजा मंदिरांत आला. आरतीच्या वेळीं मूर्तीकडे पाहतांच, मूर्तीच्या गळ्यांतला रत्नहार नाहींसा झालेला आहे असें त्यास आढळून आलें. रत्नहार चोरून नेणाऱ्या मनुष्यास शोधून पकडून आणण्याचा हुकूम त्यानें आपल्या नोकरांस फर्माविला. चोराचा शोध लावण्यास नोकर चारी दिशांस धांवले. ते नदीच्या वाळवंटांत गेले असतां, तेथें विठ्ठलस्मरण करीत बसलेले भानुदास त्यांच्या दृष्टीस पडले. त्यांच्या गळ्यांत तो रत्नहार पाहतांच, हाच तो लुच्चा चोर असें म्हणून त्यांनीं त्यांस ताबडतोब गिरफदार करून राजाकडे नेलें. मुद्देमालासह पकडलेल्या

चोराचा न्याय कसला करावयाचा ? भानुदासांस सुळीं देण्याचा हुकूम झाला. त्याप्रमाणें, नोकरांनीं, त्यांच्या माथ्यावर शेंदूर घालून व खांद्यावर शूल देऊन, त्यांस स्मशानाकडे चालविलें. हा सगळा प्रकार पाहूनं भानुदासांस मोठें आश्चर्य वाटलें. ते मनांत म्हणाले, ' पांडुरंगा, माझी वाट लावण्याची ही त्वां खाशी युक्ति काढली ! तुला पंढरीस नेण्यासाठीं मी येथें आलों असतां, मला न कळत, आपल्या गळ्यांतला रत्नहार माझ्या गळ्यांत घालून, मला सुळावर चढविण्याची ही तुझी युक्ति मोठी सुंदर यांत संशय नाहीं. परंतु असल्या शिक्षेस हा भानुदास भीक घालीत नाहीं हें लक्ष्यांत ठेव. " या प्रसंगीं भानुदासांनीं म्हटलेला खालील अभंग प्रसिद्ध आहेः—

**जैं आकाश कडकडों पाहे । ब्रह्मगोळ भंगा जाये ।**
**वडवानळ त्रिभुवन खाये तैं मी तुझीच वास पाहें गा विठोबा ॥ १ ॥**
**न करीं आणिकांचा पांगिला। नामधारक तुझाचि अंकिला ॥ ध्रु० ॥**
**सप्तहि समुद्र समरस होती । जैं हे विरुनी जाय क्षिती ।**
**पंचभूतें प्रळय पावती । तरि मी तुझाचि सांगाती गा विठोबा ॥ २ ॥**
**भलतैसें जड पडो भारी । नामा न टळों निर्धारीं ।**
**जैशी पतिव्रता प्राणेश्वरीं । भानुदास ह्मणे अवधारीं गा विठोबा ॥३॥**

अशा प्रकारचे, भानुदासांच्या तोंडचे अत्यंत निर्वाणीचे शब्द बाहेर पडतांच, त्यांच्या खांद्यावरील शूलास पल्लव फुटले ! सुळाचा पुष्पफलयुक्त सुंदर वृक्ष बनला. तो चमत्कार पाहतांच राजदूत धांवतच राजापाशीं गेले आणि ती विलक्षण हकीकत त्यांनीं राजास सांगितली. ती ऐकतांच राजा दचकला. आपल्या हातून फार मोठ्या सत्पुरुषाचा छल झाला हें मनांत येतांच त्यास फार वाईट वाटलें व त्याच पावलीं तो भानुदासांच्या दर्शनास निघाला. इकडे भानुदास समाधिस्थितींत स्वस्थ उभे होते. त्यांचें सगळें लय भगवंताकडे लागलें होतें. त्यांस पाहतांच, राजानें त्यांस साष्टांग नमस्कार घातला, व ह्मटलें, " महाराज, आपण मोठे हरिभक्त आहांत. आपली योग्यता न जाणतां म्यां पामरानें आपला मोठाच अपराध केला आहे. " हे शब्द ऐकतांच भानुदासांनीं नेत्र उघडले तों आपल्या खांद्यावरील शूलाचा वृक्ष झालेला त्यांच्या दृष्टीस पडला. एकंदर प्रकार लक्ष्यांत येतांच ते अत्यंत सद्गदित होऊन पांडुरंगाचें स्मरण करूं लागले. राजानें त्यांस हातीं धरून विठ्ठलमंदिरांत नेलें तों विठ्ठलमूर्ति म्लानमुख झालेली असून, ती अश्रु ढाळीत आहे

असें राजानें पाहिलें. त्यानें देवापुढें साष्टांग नमस्कार घालून देवाची प्रार्थना केली, " हे पांडुरंगा, तुझ्या भक्ताचा माझ्या हातून छल घडला आहे खरा. मी मोठा अपराधी आहें. " पांडुरंगानें त्यास म्हटलें. " राजा, आतां तूं माझें रूप आठवन या आपल्या राजधानींत सुखानें वास्तव्य कर. मी आतां भानुदासाबरोबर पंढरीस जातों. यापुढें आग्रहानें मला येथेंच ठेवून घेण्याचा तूं प्रयत्न करसील, तर त्याच परिणाम चांगला होणार नाहीं. " हें ऐकतांच राजा स्वस्थ राहिला. मग भानुदास देवास म्हणाले, " पंढरिनाथा, तुझी ही इतकी जड मूर्ति मी एकटा पंढरीस कशी नेऊं ? मजपाशीं काय नोकर चाकर आहेत ? " भानुदासांचें हें भाषण ऐकतांच विठ्ठलमूर्ति इतकी लहान झाली कीं भानुदासांनीं तिला आपल्या संबळींत सहज ठेवून दिलें ! तो चमत्कार पाहतांच राजा अगदीं दिङ्मूढ होऊन गेला. मग भानुदासांनीं राजाचा निरोप घेऊन पंढरीची वाट धरली. आतां लवकरच सर्व संतांच्या भेटी होतील या आनंदाच्या भरांत मार्गक्रमण करीत ते लवकरच पंढरपुरीं येऊन दाखल झाले. तेथें पद्मतीर्थावर त्यांनीं आंघोळ केली व धोत्रें धुऊन वाळत घातलीं. नंतर संबळीपाशीं येऊन पाहतात, तों विठ्ठलमूर्ति पूर्ववत् मोठी झालेली त्यांच्या दृष्टीस पडली. मग देवानें त्यांस सांगितलें, " अरे, माझे अनेक भक्त आज कित्येक दिवस गरुडपारीं माझी वाट पहात आहेत. त्यांस मी आलों आहें ह्मणून सांग; ह्मणजे ते मला सामोरे येतील. " हें ऐकतांच भानुदासांस मोठा आनंद झाला. ते तसेच उठून विठ्ठलमंदिरांत गेले व तेथें जमलेल्या संतमंडळीस भगवंताच्या आगमनाचें वृत्त त्यांनीं कळविलें. मग काय विचारतां ? मृदंगावर थाप बसून, वीण्याच्या सुस्वर आवाजांत ' जय जय राम कृष्ण हरि " चा घोष सुरू झाला. हजारों लोकांच्या समुदायासह संतमंडळी, पांडुरंगमूर्तीस घेऊन जाण्यासाठीं पद्मतीर्थावर आली. महीपति वर्णितातः—

**शिबिका घेऊनि सत्वर । सकळ चालिले सामोरे ।**
**दिंड्यापताकांचे भार । मंगळ तुरें वाजती ॥ १९० ॥**
**वैष्णव करिती हरिकीर्तन । गाती नाचती प्रीती करून ।**
**क्षेत्रवासी सकळ जन । थोर लहान चालिले ॥ १९१ ॥**
**म्हणती भानुदासाचा उपकार । आम्ही फेडावा कोठवर ।**
**धन्य हा निधडा वैष्णव वीर । सारंगधर आणिला ॥ १९२ ॥**

सर्व मंडळी पद्मतीर्थावर येऊन दाखल होतांच भानुदासांनीं, इतरांच्या मदतीनें विठ्ठलमूर्ति उचलून पालखींत ठेवली. सर्व संतांनीं जयजयकार करून बुक्का उधळला.

मग पालखीची मिरवणूक निघाली ती चंद्रभागेवर येऊन थांबली. तेथें मूर्तीस चंद्रभागेचें स्नान घातल्यावर पुनः पालखीची मिरवणूक निघाली ती देवळांत आली. नंतर शुभ मुहूर्तावर मूर्तीची स्थापना करण्यांत आली. तेव्हां पांडुरंगानें भानुदासांस ह्मटलें:—

**न फिटेचि तुझा उपकार। दृष्टीसि दाविलें पंढरपुर॥**
**मी तुझे वंशीं अवतार। घेईन साचार निश्चितीं॥**

याप्रमाणें, भानुदासांनीं, विद्यानगरच्या राजानें आपल्या सत्तेच्या जोरावर नेलेली विठ्ठलमूर्ति, पंढरपुरास परत आणली; आणि तत्कालीन संतमंडळाच्या अग्रस्थानीं आपलें नांव दाखल केलें. महीपतीनीं हें भानुदासचरित्र, पहिल्यानें भक्तविजयांत व दुसऱ्यांदा भक्तलीलामृतांत, असें दोन वेळां दोन ठिकाणीं वर्णिलें आहे. परंतु या दोन्ही ठिकाणच्या हकीकतींत थोडासा फरक आहे. भक्तलीलामृतांत दिलेली हकीकत अशी आहे कीं, विद्यानगरचा राजा फिरतीवर निघाला असतां पंढरपुरास आला. तेव्हां तेथील विठ्ठलमूर्ति पाहून अशी सुंदर मूर्ति आपल्या राजधानींत असावी असें त्यास वाटलें व पंढरपुरांतील नागरिकांच्या व संतमहंताच्या विनवणीस भीक न घालतां त्यानें ती मूर्ति बलात्कारानें विद्यानगरास नेली. भक्तविजयांत याहून थोडेंसें निराळें वर्णन आहे तें असें:—पंढरपुरचा एक गृहस्थ चरितार्थसंपादनासाठीं फिरत असतां विद्यानगरास गेला. तेथें त्या वेळीं जो राजा+ राज्य करीत होता त्याची त्यानें भेट घेतली. राजानें त्याचा चांगला आदरसत्कार करून, त्याच्या आगमनाचें कारण विचारलें. गृहस्थ ह्मणाला, 'मी पंढरपुरचा राहिवासी; आपली कीर्ति ऐकून येथें आलों.' तेव्हां राजानें त्यास सांगितलें कीं, 'मी स्नान करून देवीची पूजा केल्यावर, तुह्मांस काय द्यावयाचें तें देईन.' मग राजानें स्नान केलें व त्या गृहस्थास घेऊन तो देवीच्या देवळांत गेला. तेथें, देवीची षोडशोपचारें पूजा करून प्रसाद वांटल्यावर राजा गृहस्थास ह्मणाला, 'या राजाईसारखें त्रिभुवनांत दुसरें दैवत नाहीं. तुमच्या पंढरीच्या पांडुरंगाचाही असा इतमाम नसेल. पांडुरंगाचे सगळे भक्त भिकारी, त्यांजकडून त्यास काय मिळणार?' राजाचें हें भाषण ऐकून त्या गृहस्थास मोठा संताप आला. तो म्हणाला, 'राजा, तूं अद्याप पंढरपुर पाहिलें नाहींस. तें नगर स्वतः विश्वकर्म्यानें सुवर्ण आणि रत्नें यांनीं शृंगारलेलें आहे. तुझ्या या देवीचं वैभव त्याच्या पासंगासही पुरणार नाहीं. ही तुझी देवी तर रात्रंदिवस आमच्या

+ या राजाचें नांव महीपतीनीं 'रामराजा' असें आपल्या दोन्ही ग्रंथांत दिलें आहे.

पांडुरंगाच्या देवळांत झाडलोट करीत असते.' आपल्या उपास्य दैवताची ही निंदा ऐकून अत्यंत क्रोधायमान झालेला राजा त्या गृहस्थास ह्मणाला, 'राजाईची निंदा करतोस काय ? ठीक आहे. पंढरपुर ही सुवर्णनगरी आहे आणि ती विश्वकर्म्यानें निर्माण केलेली आहे, असल्या अवास्तव गप्पा मारण्याचा काय परिणाम होतो, हें तुला आतांच दाखवितों.' गृहस्थानें राजास विनंति केली कीं, 'स्वतः पंढरपुरास जाऊन माझ्या विधानाची सत्यता प्रत्यक्ष पहावी.' 'ठीक आहे' असें ह्मणून राजा पंढरपुरीं जाण्यास निघाला. इकडे त्या गृहस्थानें पांडुरंगाची प्रार्थना केली कीं, 'हे भगवंता, तुझ्या ऐश्वर्याचें राजापाशीं मी यथार्थ वर्णन केलें आहे. आतां माझी लाज राखून, माझ्या वचनाची सत्यता राजाच्या अनुभवास आणून देण्यास तूंच समर्थ आहेस.'

आपल्याविषयींच्या अभिमानाच्या भरांत आपल्या ऐश्वर्याचें राजापाशीं अतिशयोक्तिपूर्ण वर्णन करणाऱ्या गृहस्थावर असत्यतेचा आरोप येऊन त्यास शिक्षा होऊं नये ह्मणून पांडुरंगानें लक्ष्मीरूप रुक्मिणीच्या साहाय्यानें सगळें पंढरपुर एका क्षणांत सुवर्णमय करून टाकलें.

इकडे, विद्यानगरचा राजा जसजसा पंढरपुरानजीक येत चालला, तसतसा त्या गृहस्थास, त्यानें केलेल्या वर्णनाची तो पुनः पुनः आठवण करूं लागला. शेवटीं पंढरपुर दिसूं लागलें, त्यांतील इमारतींचीं तीं रत्नखचित सुवर्णशिखरें दृष्टीस पडतांच राजाचे डोळे दिपून गेले. तो त्या गृहस्थास म्हणाला, "तूं वर्णन केल्याप्रमाणें पंढरीचें वैभव मोठें आहे यांत संशय नाहीं." विचारा ब्राम्हण भगवंतानें आपली लाज राखिली म्हणून, सद्गदित होत्साता मोठ्या भक्तीनें त्याचे गुणानुवाद गाऊं लागला यापुढील कथाभाग भक्तलीलामृतांतील कथाभागाप्रमाणेंच आहे. दोन्ही कथाभागांत हें जें थोडेंसें अंतर आहे, त्याचें कारण, महीपतींनीं भानुदासांची गोष्ट निरनिराळ्या लोकांच्या तोंडून जशी ऐकली तशी ती आपल्या दोन ग्रंथांत निरनिराळ्या रीतींनीं नमूद करून ठेवली. असो.

महीपतींनीं वर्णिलेलें भानुदासचरित्र असें हें चमत्कारमय आहे आणि याच चमत्कारमय चरित्रावर, प्रसिद्ध लेखक रा. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं आपल्या 'संत भानुदास' नाटकाची उभारणी केली आहे. असल्या चमत्कारांवर विश्वास ठेवण्यास जे तयार नसतील त्यांनीं या चरित्रापासून, "विद्यानगरच्या तत्कालीन राजानें पंढरपुरची पांडुरंगमूर्ति बलात्कारानें विद्यानगरास नेली होती, ती भानुदास नामक एक विठ्ठलभक्तानें पंढरपुरास परत आणली," येवढें निर्भेळ ऐतिहासिक

सत्य निर्णित करण्यास हरकत नाहीं. पंढरपुरच्या पांडुरंगावर अज्ञातवासांत राहण्याचा असलाच प्रसंग पुनः एकदां आला होता तो दिल्लीपति औरंगजेबाच्या कारकीर्दींत होय. दक्षिणेंत आल्यावर त्यानें जेव्हां मूर्तिभंजनाचा सपाटा चालविला तेव्हां पंढरीच्या विठ्ठलमूर्तीवर तो प्रसंग येऊं नये ह्मणून प्रल्हाद वडवे नामक सत्पुरुषानें ती मूर्ति आपल्या घरीं नेऊन बळदांत लपवून ठेवली, आणि ह्मणून आज तिचें दर्शन सर्वांस होत आहे. नाहींतर सोरटीसोमनाथाची गिझनीच्या महमुदानें जी अवस्था केली तीच 'पापी औरंग्यानें' आमच्या पांडुरंगाची केली असती ! अस्तु.

भानुदासांचे समकालीन संत कोण कोण होते वगैरे माहिती मिळण्यास कांहींच विश्वसनीय साधन उपलब्ध नाहीं. त्याचप्रमाणें भानुदासांनीं एकंदर कविता किती लिहिली, त्यांनीं एखादा मोठा ग्रंथ लिहिला होता कीं काय, त्यांनीं कोठें व कधीं समाधि घेतली इत्यादि माहिती समजण्यासही कांहीं मार्ग नाहीं. श्रीएकनाथ महाराजांच्या गाथ्यांत भानुदासांचे थोडेसे अभंग दिले आहेत, त्यांवरून ते मोठे प्रेमळ आणि अधिकारी संत होते, येवढी गोष्ट मात्र निर्विवादपणें लक्ष्यांत आल्याशिवाय रहात नाहीं. त्यांचे एकदोन अभंग पूर्वीं दिलेच आहेत. नमुन्यासाठीं आणखी पांच सुंदर अभंग येथें उतरून घेतों:—

( १ )

**परदेशींची वस्तु पंढरीस आली । ते दैवें फावली पुंडलीका ॥ १ ॥**
**देतां घेतां लाभ बहुतांसि झाला । विसांवा जोडला पांडुरंग ॥ २ ॥**
**न करितां सायास वस्तुचि आयती । वैष्णवीं बहुतीं वेंटाळिली ॥ ३ ॥**
**"भानुदास' स्वामी कृपेचा सागरु । विठ्ठल कल्पतरु वोळला आम्हां४**

( २ )

**न मागतां कांहीं न करितां सेवा । आलासी गा देवा पंढरिये॥ १ ॥**
**तूं गा मायबाप विश्वासी तारक । तुवां पुंडलीक सुखी केला ॥ २ ॥**
**चारितां गोधनें आलासी बा पायीं। पुंडलीक कांहीं न बोलेचि ॥ ३ ॥**
**चिन्मयाचा दीप साक्षित्वासी आला । "भानुदास"त्याला नाम जालें४**

( ३ )

**अवघ्या सोडियल्या मोटा । आजिचा दहिंकाला गोमटा ॥ १ ॥**
**द्या रे द्या र दहींभात । आज्ञा देतो पंढरिनाथ ॥ २ ॥**

मुद्रा घेऊनियां करीं । पेंदा वांटितो शिदोरी ॥ ३ ॥
" भानुदास " गीतीं गात । प्रसाद देतो पंढरिनाथ ॥ ४ ॥

( ४ )

गुढीयेसी सांगूं आले । कंस चाणूर मर्दिले ॥ १ ॥
हर्षे नाचताती भोजें । जिंकियेलें यादवराजें ॥ २ ॥
गुढी आली वृंदावना । मथुरा दिली उग्रसेना ॥ ३ ॥
जाला त्रिभुवनीं उल्हास । ललित गाये " भानुदास " ॥ ४ ॥

( ५ )

ऐसियासी कृपा करावी त्वरित । पुरवीं मनोरथ सर्व माझे ॥ १ ॥
काकुळती कवणा येऊं तुजवीण । दुःख निवारण कोण करी ॥ २ ॥
त्रैलोक्य पालन करिसी सर्व काळ । त्याहुनी आगळें हेंचि काय॥३॥
तुझिया पायांचा मजला आधार । केंवी तूं निष्ठुर जाहलासी ॥ ४ ॥
आमुचे अन्याय न धरावे चित्तीं । सर्व कृपामूर्ति पोटीं घालीं॥५॥
कर्म धर्म माझें उत्तम आचरण । न पाहें पावन करीं मज ॥ ६ ॥
" भानुदास " म्हणे कृपेचें पोसणें । परी नारायणें सांभाळावें॥७॥

या अभंगांची भाषा फारशी जुनी दिसत नाहीं, तरी भानुदासांच्या दुसऱ्या कांहीं अभंगांत, ' दादुला, ' ' वाईये, ' ' सुलभु, ' ' वल्लभु, ' ' पांगिला ' वगैरे जुने शब्द आढळतात. परंतु एक गोष्ट येथें लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं, गाथ्यांत, भानुदासकृत ह्मणून छापलेले सर्वच अभंग भानुदासांचे नाहींत; कारण, इतर जुन्या कवींप्रमाणें घुसडाघुसडीचा थोडाबहुत प्रसाद भानुदासांसही मिळाला आहे. उदाहरणार्थः—

( १ )

रायें कंठमाळ देवासी घातली । देवें ती दिधली भानुदासा ॥ १ ॥
कोणी नेली माळ करिती त्याचा शोध। देखिली प्रसिद्ध याचे गळां॥२॥
राजदूतीं नेला ह्मणती गा हा चोर । रायानें विचार नाहीं केला॥३॥
शूळीं द्यावयासी " भानुदास " नेला । त्यानें आठविला पांडुरंग॥ ४ ॥

( २ )

कोरडिया काष्ठीं अंकुर फुटले । येणें येथें झालें विठोबाचें ॥ १ ॥
समर्थाचा आम्हीं धरिला आधार । तरीच सत्वर आला येथें ॥ २ ॥
माझिये संकटीं आलासि धाउनी । "भानुदास" चरणीं लागतसे ॥ ३॥

हे अभंग निखालस भानुदासांचे आहेत असें समजणें चुकीचें होईल. शिवाय त्यांच कांहीं हिंदी अभंगही गाथ्यांत दिले आहेत. नमुना पहाः—

**मोहन मेरो रे साइया ॥ ध्रु. ॥**
**जमुनाके तट धेनु चरावत । राखत है गैय्या ॥ १ ॥**
**मोरपत्र शिरिं छत्र सुहावे । गोपी धरत बहिया ॥ २ ॥**
**"भानुदास" प्रभु भगनतको वत्सल । करत छत्र छाइया ॥ ३ ॥**

तुलसीदास, सूरदास या प्रसिद्ध हिंदी कवींप्रमाणें भानुदास या नांवाचा एखादा हिंदी कवि उत्तरहिंदुस्थानांत होऊन गेलेला असून, गाथ्यांत, पैठणकर भानुदासांच्या नांवावर छापलेलीं हीं हिंदी पद्यें या हिंदुस्थानी भानुदासाचींच असावींत असें मला वाटतें.

अशा या परम भागवत भानुदासांच्या कुलांत एकनाथ महाराजांसारख्या अवतारी पुरुषानें जन्म घ्यावा यांत आश्चर्य नाहीं. भानुदासांचा पुत्र चक्रपाणि हांही मोठा हरिभक्त होता. चक्रपाणीचा मुलगा सूर्यनारायण हा जन्म पावल्यावर त्याचें नांव ' सूर्यनारायण ' ठेवून, भानुदास समाधिस्थ झाले, असें खुद्द एकनाथानींच लिहिलें आहे. ही गोष्ट शके १४३५ च्या सुमारास झाली असावी असा कांहीं लेखकांचा तर्क आहे. त्यानंतर शके १४५० च्या सुमारास, पैठण येथें, सूर्यनारायणाची पत्नी रुक्मिणी हिच्या उदरीं श्रीएकनाथ महाराज जन्म पावले. एकनाथासारख्या थोर पुरुषाची जन्मतिथि तर राहोच, पण जन्मशक देखील कोणास नक्की सांगतां येऊं नये ही केवढ्या सखेदाश्चर्याची गोष्ट ? ' केशव ' नामक लेखकानें ३१ अध्यायांचें नाथचरित्र लिहिलें आहे. त्यांत देखील या मुद्द्याची चर्चा किंवा उल्लेख नाहीं. अर्थात् ह्या ग्रंथाच्या आधारानें लिहिण्यांत आलेल्या अनेक अर्वाचीन नाथचरित्रांत नाथांचा जन्मशक कोठून सांपडणार ? आडांत नाहीं तें पोहऱ्यांत कसें येईल ? नाथांच्या जन्मकालविषयीं जी काय माहिती सांपडते ती ग्रेवढीच कीं त्यांचा जन्म मूळनक्षत्रीं झाला. आणि ही माहिती तरी नाथानींच स्वतः एका अभंगांत दिली आहेः—

**मुळीच्या मुळीं एका जन्मला ।**
**मायबापें थोर धाक घेतला ॥ १ ॥**
**कैसें मूळ नक्षत्र आलें कपाळा ।**
**स्वयें लागलों दोहींच्या निर्मूळा ॥ २ ॥**

**शांति करितां अवघ्यांची शांति ।**
**मुळीं लागोनियां लाविली ख्याति ॥ ३ ॥**
**एका जनार्दनीं मुळींच्या गोठी ।**
**मायसकट सगळा बापचि घोंटी ॥ ४ ॥**

या अभंगाचा अर्थ स्पष्टच आहे. नाथ म्हणतात, "मी मुळाच्या मुळावर जन्म पावलों, तेव्हां मूळ नक्षत्रावर जन्मलेलें हें मूल आपलें निर्मूळ केल्याशिवाय राहणार नाहीं, अशी भीति आईबापांस पडली. हें मूळ नक्षत्र माझ्या कपाळीं कोठून आलें ? यामुळें आई आणि बाप यांचें निर्मूळ होण्यास मी कारण झालों. नक्षत्रानें आपला गुण दाखवूं नये म्हणून त्याची शांति केली, पण त्यामुळें शांति न होतां, आईबापांची मात्र शांति झाली ! कुळाचें निर्मूलन करून मी मोठी ख्याती मिळविली !" या अभंगाचा अध्यात्मपर अर्थही लावतां येण्यासारखा आहे, परंतु वरील माहिती त्यामुळें खोटी ठरणार नाहीं. कै. तुकाराम तात्या यांनीं प्रसिद्ध केलेल्या एकनाथी गाथ्यांत वरील अभंग सांपडत नाहीं, परंतु जवळजवळ त्याच अर्थाचा दुसरा अभंग सांपडतो तो असाः—

**मूळनक्षत्रीं लागला मुळा । घोंट भरियेला देह जन्मकाळा ॥ १ ॥**
**मुळीं काय कामा येसी खोटा । पोषण कटकटा घाला वेगीं ॥ २ ॥**
**मुळीं लागोनियां केली पैं शांति । नांवारूपा नये बुडविली जाति ॥३॥**
**माया म्हणे मज नव्हे लहाना । एका जनार्दनीं केला पोषणा ॥ ४ ॥**

एकनाथ हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. त्यांच्या पूर्वीच्या बऱ्याच पिढ्या पैठण येथें होऊन गेल्या असल्या पाहिजेत. परंतु नाथांचे प्रपितामह भानुदास यांनीं अनागोंदीच्या राजानें नेलेली पांडुरंगमूर्ति आपल्या भक्तिबलाच्या जोरावर परत आणल्यामुळें त्यांच्यापासूनच या कुलाचें नांव विशेष प्रसिद्धीस आलें. 'शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते' या भगवद्वचनाप्रमाणें, भानुदासांसारख्या भगवद्भक्ताच्या पुण्यशील कुलांत एकनाथांसारखा योगभ्रष्ट महात्मा जन्म पावला हें यथायोग्यच झालें.

आपल्यापूर्वीं होऊन गेलेले कवि म्हणून निवृत्ति, ज्ञानेश्वर, नामदेव आणि चांगा वटेश्वर या चारच कवींचा उल्लेख नाथांनीं आपल्या ग्रंथांत केला आहे. असो.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, मूळनक्षत्रावर जन्मलेल्या एकनाथांचे आईबाप, त्यांच्या जन्मानंतर अल्पावकाशांतच मरण पावले व त्यांचें पालनपोषण त्यांचे पितामह

चक्रपाणि यांनीं केलें. भानुदासांच्या कुलांत आपल्या मागें हा एकुलता एक मुलगा राहिला म्हणून चक्रपाणी यांनीं त्याचें नांव ' एक्या ' ऊर्फ एकनाथ ठेविलें. एकनाथ अगदीं बाळपणापासूनच मोठे सात्विक, श्रद्धाशील व तैलबुद्धि असले पाहिजेत असें त्यांच्या पुढील चरित्रावरून व ग्रंथरचनेवरून दिसतें. ईश्वरभजनाकडे त्यांची प्रवृत्ति लहानपणापासूनच होती. वयाच्या सहाव्या वर्षीं त्यांची मुंज झाली व तत्कालीन शिक्षणपद्धतीप्रमाणें, संस्कृत भाषा, नित्य नैमित्तिक ब्रह्मकर्म वगैरे विषयांचें शिक्षण त्यांस मिळालें. योगभ्रष्ट पुरुषाचा पुनर्जन्म झाला ह्मणजे पूर्व जन्मसंस्कारानें तो आपोआपच मोठा *तैलबुद्धि निपजतो. श्रीमज्जगद्गुरु आद्य शंकराचार्य, ज्ञानदेव इत्यादि अलौकिक पुरुषांच्या चरित्रांवरून या सिद्धांताची सत्यता प्रतीत होते. यूरोप व अमेरिका खंडांतील कित्येक बालपंडितांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांतल्या एकानें तर आपल्या वयाच्या चौथ्या पांचव्या वर्षीं लॅटिन आणि ग्रीक भाषेंत इतकें नैपुण्य दाखविलें कीं त्याच्या अवलोकनानें मोठमोठे भाषापंडित थक्क होऊन गेले. मद्रासेकडील एक दोन मुलांनीं गणितासारख्या रूक्ष आणि गहन विषयांत केवढें विलक्षण प्रावीण्य दाखविलें, तें बहुतेकांस ठाऊक असेलच. तर अशा प्रकारचे हे चमत्कार पूर्वजन्मसंस्कारामुळेंच होत असले पाहिजेत यांत संशय नाहीं व पूर्वजन्म मानल्याशिवाय असल्या कोड्यांचा उलगडा होणें शक्य नाहीं. असो.

नाथांचें शिक्षण पुरें झाल्यावर, आपणास ब्रह्मज्ञान करून देणारा सद्गुरु कोठें व केव्हां भेटेल, अशी विवंचना त्यांस लागली असतां " देवगिरी ( दौलताबाद ) येथें जनार्दनस्वामी नामक सत्पुरुष आहेत, त्यांजकडे जाऊन त्यांचा अनुग्रह घे " असा त्यांस दृष्टांत झाला. कदाचित्, जनार्दन स्वामीची कीर्ति कर्णोपकर्णीं त्यांनीं ऐकलीही असेल. जनार्दनस्वामींचें दर्शन घेऊन त्यांजपाशीं अनुग्रह मागण्याचा नाथांचा निश्चय होतांच, एके दिवशीं, आजा आजी यांस न सांगतांच ते पैठणहून निघाले व थोड्याच दिवसांनीं देवगिरीस जनार्दनस्वामीपाशीं येऊन दाखल झाले. हे जनार्दनस्वामी कोण होते, त्यांचा अधिकार काय होता, वगैरे हकीकत पुढील प्रकरणांत सांगूं.

---

* तैशी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां ।
बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥ ४५३ ॥
तये सिद्ध प्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वतें दुभे ।
मग सकळ शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ॥ ४५५ ॥

ज्ञानेश्वरी, अध्याय ६ वा.

# प्रकरण दुसरें.

## जनार्दनस्वामी-दत्तदर्शन-गुरूपदेश.

**ॐ नमोजी जनार्दना । नाहीं भवाभवभावना ।**
**न देखोनी मींतूंपणा । नमन श्रीगुरुचरणा सद्गुरुराया ॥१॥**

नाथभागवतांतली ही पहिलीच ओवी आहे. ग्रंथारभीं श्रीगणेशस्तवन करण्याचा बहुतेक सर्व जुन्या कवींचा परिपाठ आहे. परंतु नाथमहाराजानीं पहिलें वंदन सद्गुरु श्रीजनार्दनस्वामींस केलें आहे. यावरून नाथांची अलोट गुरुभक्ति तर व्यक्त होत आहेच, परंतु नाथांसारखा शिष्य तयार करणाऱ्या जनार्दनस्वामीचीही योग्यता त्यामुळें व्यक्त झाल्याशिवाय रहात नाहीं. जनार्दनस्वामीच्या वेळीं बहुतेक सगळा महाराष्ट्र यवनांनीं व्यापला होता. त्या यवनाची चाकरी करूनही, जनार्दनस्वामींनीं महाराष्ट्रधर्मांचें निशाण देवगिरीच्या किल्ल्यावर फडकावलें आणि नाथांसारखे सच्छिष्य निर्माण करून, तसल्या त्या तमोमय कालांत, स्वधर्माचा दीप भावी पिढ्यांसाठीं प्रज्वलित करून ठेवला. जनार्दनस्वामीच्या कर्तबगारीची यथार्थ कल्पना महाराष्ट्रास अद्याप झालेली नाहीं.

जनार्दन स्वामी हे मूळचे चाळीसगांवचे देशपांडे. हे ऋग्वेदी आश्वलायन सूत्री देशस्थ ब्राह्मण. यांचा जन्म शके १४२६ फाल्गुन वद्य ६ या दिवशीं झाला असें रा. पांगारकर यांनीं आपल्या पुस्तकांत लिहिलें आहे, पण त्यास आधार काय याचा खुलासा त्यांनीं केलेला नाहीं. जनार्दनस्वामी हे तत्कालीन यवन पादशहातीचे दौलताबाद येथील मुख्याधिकारी होते. हे जरी मोठे राजकारणी पुरुष होते तरी साधु या नात्यानेंच त्या प्रांतीं त्यांची विशेष प्रसिद्धि होती. हे श्रीदत्ताचे उपासक होते व दत्ताच्या सगुणरूपाचें साक्षात् दर्शन त्यांस होत असे अशी आख्यायिका आहे. सरकारी नोकरीचा काल वजा जातां, जनार्दनस्वामींचा बहुतेक वेळ, स्नानसंध्या, दत्तोपासना व समाधिधारण यांत जात असे. "यांच्या समाधीची जागा एकांत स्थलीं नियमित झाली असून तिकडे मनुष्य फिरकावयाचें नाहीं असा बंदोबस्त होता." तात्पर्य, जनार्दन स्वामी हे विदेही जनकाप्रमाणें देही असून विदेही

होते असें म्हटल्यास चालेल. त्यांच्या सान्निध्यामुळें देवगड ऊर्फ दौलताबादच्या किल्ल्यास पुण्यक्षेत्राचें स्वरूप प्राप्त झालें होतें. श्रीदत्तात्रेयांनीं जनार्दनस्वामीवर अनुग्रह करून त्यांस कृतार्थ केलें ह्या प्रसंगाचें वर्णन एकनाथांनीं आपल्या भागवताच्या ९ व्या अध्यायांत पुढील प्रमाणें केलें आहे:—

दत्तात्रेयशिष्यपरंपरा । सहस्रार्जुन यदु दुसरा ।
तेणें जनार्दनु तिसरा । शिष्य केला खरा कलियुगीं ॥
गुरुप्राप्तीलागीं सर्वथा । थोर जनार्दनासी चिंता ।
विसरला तीन्ही अवस्था । सद्गुरु चिंतितां चिंतनीं ॥
देवो भावाचा भोक्ता । दृढ जाणोनि अवस्था ।
येणें जाहलें श्रीदत्ता । तेणें हात माथां ठेविला ॥
हात ठेवितांचि तत्काळ । बोधू आकळिला सकळ ।
मिथ्या प्रपंचाचें मूळ । स्वरूप केवळ स्वबोधें ॥
कर्म करूनि अकर्ता । तोचि अकर्तात्मबोध जाहला देता ।
देहीं असोनि विदेहता । तेही तत्वता आकळिली ॥
गृहाश्रमु न सांडितां । कर्मरेखा नोलांडितां ।
निजव्यापारीं वर्ततां । बोधू सर्वथा न मैळे ॥
तो बोधू आकळतां मना । मन मुकलें मनपणा ।
अवस्था नावरेचि जनार्दना । मूर्च्छापन्न पडियेला ॥
त्यासी सावध करुनि तत्वतां । म्हणे प्रेम आहे सत्वावस्था ।
तेही गिळोनि सर्वथा । होईं वर्तता निजबोधें ॥
पूजाविधि करोनियां । जंव जनार्दनु लागला पायां ।
तंव अदृश्य जाहला दत्तात्रेया । योगमायेचेनि योगें ॥

वरील ओव्यांतील ‘ गृहाश्रमु न सांडितां ’ या शब्दांवरून जनार्दनस्वामी गृहस्थाश्रमी होत हें उघड दिसतें. तरी त्यांचा वंश दौलताबादच्या बाजूस अद्याप आहे कीं काय, याचा शोध झाला पाहिजे. जनार्दनस्वामींची समाधि दौलताबाद येथील किल्ल्यावर एका बिकट जागीं असून, तेथें जातांना गुडघाभर पाण्यांतून जावें लागतें. जनार्दनस्वामी यांची कवि ह्मणून जरी फारशी प्रसिद्धि नाहीं तरी

त्यांचे कांहीं अभंग कोठें कोठें छापलेले आढळतात. शिवाय भारत–इतिहास–संशोधक मंडळाच्या त्रैमासिकाच्या पहिल्या वर्षाच्या २।३ या जोड अंकांच्या ९१ व्या पृष्ठावर जनार्दनस्वामीकृत गीतेचा उल्लेख आहे.

एकनाथांशिवाय, जनी जनार्दन व रामा जनार्दन या नांवाचे जनार्दनस्वामींचे आणखी दोन शिष्य असावेत असें वाटतें. असो.

अशा या जनार्दनस्वामीकडे नाथमहाराज अनुग्रहार्थ गेले, हें वृत्त मागील प्रकरणीं सांगितलेंच आहे. पहिल्या भेटीच्या वेळीं, नाथांसारख्या विरक्त आणि वैराग्यसंपन्न बालभागवतास पाहून, जनार्दनस्वामींस, ध्रुवप्रल्हादादि पुराणप्रसिद्ध बालभागवतांची आठवण होऊन, सानंद कौतुक वाटलें असेल यांत संशय नाहीं. त्यांनीं नाथांस मोठ्या प्रेमानें जवळ ठेवून घेतलें. बाळपणापासूनच नाथमहाराजांस हरिभक्तीचा छंद किती होता त्याचें सुंदर वर्णन महीपतींनीं आपल्या ग्रंथांत केलें आहेः—

**बाळपणींचे खेळ निश्चितीं। एकनाथासि नावडती।**
**गोटे मांडोनि देव करितीं। पुष्पें वाहती त्यांलागीं ॥ १७ ॥**
**खांद्यावरी पळी घेवोनि जाणा। त्याचा करितसे ब्रह्मवीणा।**
**बोबड्या शब्दंकरोनि जाणा। वैकुंठराणा आळवीत ॥ १८ ॥**
**कोणी हरिदास गाती कीर्तनीं। त्यांचे शब्द ऐकोनि कानीं।**
**तेंच ह्मणतसे पडताळुनी। सप्रेम होऊनि नाचत ॥ १९ ॥**
**देखोनि तयाचा आर्षभाव। खड्यामध्येंच प्रगटे देव।**
**भक्तीचा भुकेला रमाधव। वस्तीसि ठाव तो केला ॥ २० ॥**
**रामकृष्ण हरि गोविंदा। अच्युतानंत आनंदकंदा।**
**हीं नामें उच्चारित सदा। श्रीगोविंदा जगद्गुरु ॥ २१ ॥**
**काडुक घेऊनियां करीं। जीर्ण वस्त्राची पताका करी।**
**ते खांद्यावरी घेऊनि सत्वरी। ह्मणे पंढरीसि सत्वरी मी जातों२२**

अशा स्थितींत, जनार्दनस्वामीसारख्या सद्गुरूच्या सान्निध्यांत, नाथांची परमार्थप्रवणता दिवसेंदिवस वाढतच गेली असली पाहिजे. जनार्दनपंतांची सेवा त्यांनीं इतक्या मनोभावानें केली कीं, अर्वाचीन कालांत तिला दुसरी तोड सांपडणार नाहीं. सद्गुरु हाच परब्रह्म परमेश्वर असें समजून त्यांनीं त्याची सेवा केली. नाथ हे असामान्य कोटींतले आहेत, हें जनार्दनस्वामींनीं पूर्वीच ताडलें होतें. हळूहळू नाथांचें बाल्य

संपून ते तारुण्यावस्थेंत प्रवेश करूं लागले. पुढें एके दिवशीं जनार्दनस्वामी त्यांस ह्मणाले, “ एकनाथ, आपल्या घरच्या मंडळीस सोडून तूं जर येथेंच राहूं लागलास, तर त्या मंडळीची वाट काय ? ” नाथानीं उत्तर दिलें, “माझे आईबाप पूर्वीच मरण पावले. घरीं आजा आजी आहेत. त्यांना टाकून मी इकडे आलों. पण आपल्या सेवेपेक्षां मला काय अधिक आहे ? ” ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव या ग्रंथांचें पारायण जनार्दनस्वामी नित्य नियमानें करीत असत, तें नाथांनीं मोठ्या भक्तीनें श्रवण करावें. एके दिवशीं सकाळींच देवगिरीवर परचक्र आल्याची बातमी उठली. बादशहाच्या कोण्या शत्रूनें, बऱ्याच मोठ्या फौजेसह दौलताबादेवर हल्ला केला. तेव्हां जनार्दनस्वामीस ती वार्ता कळविण्यासाठीं राजदूत त्यांच्या घरीं आले. जनार्दनस्वामी स्नानसंध्या करून ध्यानस्थ बसले होते. त्यांचा ध्यानभंग व्हावा हें योग्य नव्हे या विचारानें, नाथांनीं त्यांचे कपडे आपल्या अंगावर घातले व त्यांचीं शस्त्रें स्वतः धारण करून, पालखींत बसून, राजदूतांसह ते पादशहाकडे गेले. नाथांनीं त्या वेळीं जनार्दनस्वामींचें रूप धारण केलें होतें असें महीपतीनीं वर्णिलें आहे. जनार्दनरूपधारी नाथांस, किल्ल्यावर परचक्र आल्याची हकीकत पादशहानें सांगितली, तेव्हां ते म्हणाले, “ खाविंद, आपल्या पायांच्या पुण्याईनें शत्रूचा अल्पावकाशांत मी पराभव करीन. ” इतकें बोलून आपल्या पक्षाच्या सैनिकांस घेऊन रणवाद्यें वाजवीत ते शत्रूवर चालून गेले. शत्रुसैन्याच्या मानानें नाथांचें सैन्य अगदीं कमी होतें. परंतु असा चमत्कार झाला कीं तें सैन्य शत्रूस फार मोठें दिसूं लागलें. बराच वेळ मोठी निकराची लढाई झाल्यावर शत्रूनें मागें पाय घेतला व साम करण्यासाठीं, आपला दिवाण नाथांकडे शिष्टाईस पाठवून आम्ही तुमच्या नगरांत येऊन तुमच्या यजमानाची भेट घेण्यास तयार आहों असें त्यांस कळविलें. नाथांनीं त्या दिवाणाची सन्मानपूर्वक भेट घेतली; व शत्रूस नगरांत नेऊन आपल्या यजमानाकडून त्यास वस्त्रें भूषणें देववून त्याचा गौरव केला. अशा रीतीनें ही छोटी लढाई संपल्यावर, नाथ आपलें पूर्व स्वरूप धारण करून जनार्दनस्वामीच्या घरीं आले. नगराबाहेर झालेल्या युद्धाची बातमी त्या घटकेपर्यंत जनार्दनस्वामीस नव्हती. आपलें नित्यकर्म आटोपून व जेवण करून, ते जेव्हां नेहमीप्रमाणें दरबारांत गेले. तेव्हां बादशहानें त्यांना उत्थापन देऊन आपल्याजवळ बसविलें, व ह्मटलें, “ आपण होतां म्हणून आजचें संकट टळलें. लहानशा सैन्याच्या मदतीनें मोठ्या शत्रुसैन्याचा पराभव आपण केला, हा आपला पराक्रम अभिनंदनीय आहे. ” दरबारास आलेल्या

इतर लोकांनीं देखील याच गोष्टीचा अनुवाद केला. पातशहानें मानाचीं बहुमोल वस्त्रें आणवून तीं जनार्दनस्वामीस बहाल केलीं. भाट स्वामींचीं स्तुतिस्तोत्रें मुक्तकंठानें गाऊं लागले. हा सगळा प्रकार पाहून अरेबियन नाइट्स मधील 'झोंपीं गेलेला जागा झाला' या गोष्टींतल्या अबूहुसेनाप्रमाणें जनार्दनस्वामी अगदीं आश्चर्यचकित होऊन गेले. ते आपल्या मनांत ह्मणाले, मी तर घरीं नेहमीप्रमाणें ध्यानस्थ होतों, तेवढ्या वेळांत परचक्र येऊन त्याचें निवारणही झालें आणि तें निवारण मी केलें असें ह्मणून बादशहा व लोक माझें अभिनंदन करीत आहेत. यावरून माझ्या ध्यानस्थपणास विक्षेप होऊं नये ह्मणून, लीलावतारी एकनाथानेंच माझें रूप धारण करून हा चमत्कार केला असावा यांत संशय नाहीं. परंतु मनांत आलेली ही गोष्ट दरबारांत न बोलतां, कांहीं वेळानें ते आपल्या घरीं आले व नाथांस मोठ्या प्रेमानें भेटले. पाठीवरून हात फिरवून ते त्यांस म्हणाले, " तूं खरा गुरुभक्त आहेस यांत संशय नाहीं. तूं आज जो चमत्कार करून दाखविलास तो जरी दुसऱ्या कोणास समजला नाहीं, तरी तो माझ्या लक्ष्यांत येऊन चुकला आहे. " नाथ गहिंवरून म्हणाले, " हा सगळा आपल्या कृपेचा खेळ आहे. "

यानंतर कांहीं दिवसांनीं, जनार्दनस्वामींनीं नाथांस सांगितलें कीं, तूं दफ्तरांत जो हिशोब लिहून ठेवला आहेस, तो एकदां मला आणून दाखीव. 'आज्ञा' असें ह्मणून नाथांनीं एकांतीं जाऊन, लिहून ठेवलेल्या हिशोबाचा ताळा पाहिला, तों त्यांत एका अधेल्याची चूक झाली असल्याचें त्यांस आढळून आलें. त्यामुळें ते थोडेसे चिंताक्रांत झाले. मग रात्रौ, घरांतील सर्व मंडळी निजल्यावर, दिव्यांत तेल घालून, ते एकांतीं हिशोबाच्या वह्या तपासीत बसले. अडीच प्रहर झाल्यावर ती अधेल्याची चुकी त्यांच्या लक्ष्यांत आली. तेव्हां त्यांस जो आनंद झाला त्याच्या भरांत त्यांनीं हास्य करून टाळी वाजविली ! जनार्दनस्वामी जागेच होते. त्यांनीं तो हास्यध्वनी व टाळीचा आवाज ऐकतांच ते नाथांसमोर येऊन उभे राहिले व नाथांस म्हणाले, " अरे, येवढा कसला आनंद तुला झाला आहे ? " नाथांनीं उत्तर दिलें, " महाराज, हिशोबांत एका अधेल्याची चुकी झाली होती, ती सांपडली. त्या आनंदाच्या भरांत मी सहज टाळी वाजविली. " हें ऐकतांच स्वामी म्हणाले, " असेंच जर तुझें लक्ष्य भगवंताकडे लागेल तर त्यामुळें तुला जो ब्रह्मानंद होईल, त्यापुढें असल्या क्षुद्र आनंदाची किंमत नाहीं. "

दिवसेंदिवस नाथांची गुरुभक्ति वाढत चालली. जनार्दनस्वामीचा शौचकूप

नित्य स्वहस्तानें स्वच्छ करून तेथें रांगोळी घालण्याचा क्रम त्यांनीं सुरू केला. यामुळें, त्यांच्या गुरुभक्तीची उत्कटता जरी स्वामीच्या निदर्शनास आली तरी त्यांना तो प्रकार आवडला नाहीं. इतकेंच नव्हे तर नाथांसारख्या अधिकारी पुरुषाकडून अतःपर सेवा करून घ्यावयाची नाहीं असें त्यांनीं ठरविलें; व आपले गुरु श्रीदत्तात्रेय यांची व नाथांची भेट करविण्याचाही विचार त्यांचे मनांत आला. प्रत्येक शुक्रवारीं जनार्दन स्वामीच्या कचेरीस सुट्टी मिळे, म्हणून, एका शुक्रवारीं नाथांस दत्तात्रेयांकडे घेऊन जाण्याचा त्यांनीं बेत केला. त्या प्रांतांतील एका पहाडाच्या शिखरावर एक मोठें रमणीय स्थल आहे. तेथें एक सरोवर असून त्याचें पाणी अगदीं स्वच्छ आहे. हें स्थळ अगदीं दुर्गम असल्यामुळें, तेथें लोकांची फारशी रहदारी नसे. महीपति म्हणतातः—

**पुष्पीं फळीं शोभायमान । वृक्ष लागले असती सघन ।**
**देखतां विश्रांति पावे मन । न जावें उठोन हें वाटे ॥**
**तये प्रांतीं धुंडितां सकळ । ऐसें रमणीय नसेचि स्थळ ।**
**स्वच्छ निर्मळ पाहतां जळ । विश्रांति तत्काळ होय जीवा ॥**

ह्या सुंदर स्थलाचा नामनिर्देश महीपतींनीं केला नाहीं परंतु त्यांनीं केलेल्या वर्णनावरून हें स्थल स्वतः त्यांनीं पाहिलें असावें असें वाटतें. मोगलाईंत मातापुर हें देवीचें प्रसिद्ध स्थल असून तेथें श्रीदत्तात्रेयाचाही संचार होत असतो अशी प्रसिद्धि आहे. महीपतींनीं वर्णिलेलें हें स्थल कदाचित् मातापुरच् असेल तर कोण जाणे. असो. या स्थलीं श्रीदत्तात्रेयांचें आगमन होत असून, एखाद्या पुण्यपुरुषानें तेथें अनुष्ठान केलें असतां त्यास महाराजांचें दर्शन होतें, असेंही महीपतींनीं म्हटलें आहे. दर शुक्रवारीं, त्या पहाडावर जाण्याचा जनार्दनस्वामींचा क्रम असे. तेथें जाऊन तेथील सरोवरांत स्नान केल्यावर त्यांनीं सहस्र पार्थिव लिंगें करावीं व नंतर दत्तात्रेयांनीं त्यांस दर्शन द्यावें, असा क्रम कित्येक वर्षे चालू होता. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें एका शुक्रवारीं, जनार्दनस्वामींनीं नाथांस आपल्याबरोबर पहाडावर येण्याची आज्ञा केली. आज आपणास श्रीदत्तात्रेयदर्शन होणार या विचारानें नाथांस जो आनंद झाला त्याचें वर्णन करणें शक्य नाहीं. आपलें चंबू गवाळें काखेस मारून गुरुजींबरोबर पर्वतावर जाण्यास ते निघाले. कांहीं वेळानें ते दोघेही पहाडाच्या शिखरावर येऊन पोहोंचतांच जनार्दनस्वामी नाथांस म्हणाले, ‘ या ठिकाणीं श्रीदत्त महाराजांचें आगमन होत असतें. ते मायेच्या योगानें, निरनि-

राळ्या विचित्र वेषांनीं येत असतात. तरी त्यांचा तो वेष पाहून, तूं आपल्या मनांत कांहीं विकल्प येऊं देऊं नकोस.' इतकें बोलून, स्वामींनीं सरोवरांत स्नान करून संध्यातर्पण वगैरे केलें व नंतर सहस्र पार्थिव लिंगें करण्यास प्रारंभ केला. एकनाथांनीं त्यांस मृत्तिका आणून द्यावी व त्यांनीं लिंगें करावीं, असा क्रम चालतां चालतां, लिंगसंख्या पुरी झाल्यावर, स्वामींनीं लिंगांची पूजा केली. लिंगविसर्जन केल्यावर, जनार्दनस्वामींनीं श्रीदत्तात्रेयांचें ध्यान केलें, तोंच मलंगवेषानें महाराज तेथें प्रगट झाले:—

**चर्में सर्वांग वेष्टिलें जाण। विशाळ आरक्त दिसती नयन।**
**स्वहस्तें तसबी फिरवून। करिती ध्यान निर्गुणाचें॥**

असें त्यांचें वर्णन महीपतीनीं केलें आहे. महाराजांबरोबर त्यांची कामधेनु कुत्रीच्या रूपानें आली होती. महाराज प्रगट होतांच, जनार्दनस्वामींनीं त्यांस मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें. नंतर ते दोघेही, आत्मज्ञानाच्या गोष्टी बोलत बसले. त्यांचा तो प्रेमसंवाद, नाथ अगदीं लक्ष्यपूर्वक ऐकत होते. कांहीं वेळानें, श्रीदत्तात्रेयांनीं एक मृत्तिकापात्र काढून तें जनार्दनस्वामीच्या हातीं दिलें व जवळच बसलेल्या कुत्रीचें दूध काढून आणण्यास त्यांस सांगितलें. त्याप्रमाणें स्वामींनीं तें भांडें भरून कुत्रीचें दूध आणिलें. मग दत्तात्रेयांनीं वाळलेले भाकरीचे तुकडे त्या दुधांत घालून चुरले व जनार्दनस्वामीस आपल्याबरोबर भोजनास बोलाविलें. स्वामी मोठ्या आनंदानें महाराजांपाशीं जाऊन बसले. एकाच पात्रांत दोघांचेंही भोजन झालें. नंतर तें मृत्तिकापात्र, सरोवरावर जाऊन धुऊन आणण्यास त्यांनीं नाथांस सांगितलें. आज्ञेप्रमाणें पात्र घेऊन नाथ सरोवराकडे जाण्यास निघाले. जातांना वाटेंत त्यांच्या मनांत असा विचार आला कीं, हा महाप्रसाद सुदैवानें आपणास प्राप्त झाला आहे, तो आपण सेवन करावा. सद्गुरूच्या उच्छिष्टापेक्षां गंगाजल देखील अधिक पवित्र नाहीं. असा विचार करून तें पात्र नाथांनीं आपल्या तोंडास लाविलें. जनार्दनस्वामी हा प्रकार दुरून पहात होते. शिष्याची पूर्ण मनःशुद्धि व निर्विकल्पता झालेली पाहून त्यांनीं श्रीदत्तात्रेयांस विनंति केली कीं, 'महाराज, या आपल्या एकनिष्ठ सेवकास आपण आपल्या वास्तविक स्वरूपांत आतां दर्शन द्यावें. आपण या वेळीं मलंगवेष धारण केलेला असल्यामुळें एकनाथानें आपणास वंदन केलें नाहीं.' यावर श्रीदत्तात्रेय म्हणाले, "अरे, हा सामान्य मनुष्य नाहीं. विश्वाचा उद्धार करण्यासाठीं हा साक्षात् श्रीविठ्ठल अवतरला आहे. याचें कीर्तन ऐकून असंख्य जडमूढांचा उद्धार होईल

आणि हा उत्तम प्रकारची कविता करील. वेदशास्त्रांचें मथित जें श्रीमद्भागवत त्याचें रहस्य हा प्राकृतांत विशद करील. त्याचप्रमाणें वाल्मीकिकृत संस्कृत रामायणावर हा सुरस प्राकृत ग्रंथरचना करील; आणि याच्या कवितेच्या परिशीलनानें वाचकास साक्षात्कार होईल." इतकें बोलून महाराजांनीं मलंगवेष टाकून, तात्काल आपलें मूलस्वरूप धारण केलें व जवळ कुत्री बसली होती तीही लागलीच कामधेनु झाली. मग त्यांनीं एकनाथांस हाक मारून जवळ बोलाविलें. " काषायवस्त्रं करदंडधारिणं । कमण्डलुं पद्म करेण शंखं । चक्रं गदाभूषितभूषणाढ्यं " असें तें सुंदर गुरुरूप दृष्टीस पडतांच नाथानीं त्यांजपुढें साष्टांग नमस्कार घातला. महाराजांनीं षड्भुजा पसरून नाथांस मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें. इतका प्रकार होतांच श्रीदत्तात्रेय अंतर्धान पावले. अशा रीतीनें, श्रीजनार्दनस्वामीच्या कृपेनें नाथमहाराजांस साक्षात् दत्तात्रेय-दर्शन घडलें. नाथांस झालेल्या दत्तदर्शनाची महीपतींनीं दिलेली ही हकीकत आहे, परंतु कांहीं लोकांकडून हीच कथा थोडीशी निराळ्या रीतीनें सांगण्यांत येते, ती अशीः–एकनाथांस दत्तदर्शन करविण्यासाठीं जनार्दनस्वामी त्यांस आज पहाडावर घेऊन जाणार आहेत, ही बातमी कर्णोपकर्णी गांवांतल्या कुटाळांस व भटांभिक्षुकांस समजतांच तेही त्यांच्या मागून पहाडावर गेले. तेथें दत्तमहाराजांची स्वारी यवन-वेषानें पूर्वीच प्रगट झाली होती. एक यवनस्त्रीही त्यांजबरोबर होती. शिवाय, एक मोठें मृत्तिकापत्र त्या स्त्रीनें चुलीवर ठेवलें होतें व त्यांत ती कांहीं तरी शिजवीत होती. तिनें एका टोपलींत कांहीं कोंबडीं ठेवलीं होती व एक मोठा बोकड जवळच बांधून ठेवला होता. तो एकसारखा ओरडत होता. जनार्दनस्वामी, एकनाथ व ती कुटाळ मंडळी पहाडावर येऊन पोंचतांच, जनार्दन-स्वामीनीं त्या यवनास आलिंगिलेलें पाहून, भटांभिक्षुकांस मोठें आश्चर्य वाटलें. हा स्वतःस मोठा शुचिर्भूत व साधु म्हणविणारा ब्राह्मण दर शुक्रवारीं येथें येऊन या यवनाकडचें अन्न ग्रहण करतो व या भोळ्या एकनाथासही आज त्यानें इकडे वाटविण्यासाठींच आणलें असलें पाहिजे, असा विचार त्यांच्या मनांत येऊन, जना-र्दनस्वामीच्या या धर्मलंडपणाविषयीं त्यांस मोठा तिरस्कार वाटला; व गांवांत गेल्यावर, स्वामीच्या या भ्रष्टतेचा स्फोट करून त्यांस बहिष्कार घालण्याचाही त्यांनीं निश्चय केला. तरी पण, पुढें आणखी काय काय मौज होते हें पाहण्यासाठीं ते तेथेंच बसून राहिले. इतक्यांत ती यवनस्त्री यवनवेषधारी दत्तात्रेयांपाशीं जाऊन त्यांस म्हणाली, "देखो ये हंडी कैसी फुरफुरती है." महाराजांनीं म्हटलें " क्या,

हंडीकी भरती अभीतक नहीं होगई? अच्छा, अबी ए मुरगी काटकर डालो." हें ऐकतांच त्या बाईनें दहापांच कोंबडीं कापून त्या मडक्यांत टाकलीं. पण त्यामुळें मडकी अधिकच फुरफुरूं लागली. पुनः त्या स्त्रीनें महाराजांपाशीं जाऊन तसेंच भाषण केलें. तेव्हां ते ह्मणाले, "अच्छा, अबी बकरा काटकर डालो." तात्काल त्या स्त्रीनें त्या बोकडाचें डोकें धडापासून वेगळें केलें व कातडें काढून, सगळें मांस त्या मडक्यांत टाकलें." पण मडकें अधिकच फुरफुरूं लागलें. तेव्हां महाराजांनीं, तेथें जमलेल्या त्या ब्राम्हणमंडळाकडे बोट दाखवून त्या स्त्रीस सांगितलें, "अबी ये बह्मन् काटकर डालो." महाराजांचे हे शब्द ऐकतांच ती यवनस्त्री एक मोठा सुरा हातांत घेऊन ब्राम्हणांच्या मागें लागली. तो प्रकार पाहून, ब्राह्मणांनीं वाट फुटेल तिकडे पलायन सुरू केलें, त्यांना पळतां भुई थोडी झाली. नाथही पळण्याच्या बेतांत होते, पण जनार्दनस्वामींनीं त्यांचा हात धरून त्यांस बसवून ठेवलें. ब्राम्हणांची उपाधि नाहींशी होतांच, एका क्षणांत ती यवनी, तें मडकें वगैरे सर्व अदृश्य होऊन, श्रीदत्तमहाराज आपल्या मूळ त्रिमूर्तिवेषानें प्रकट झाले व नाथांस त्यांनीं दर्शन दिलें. असो.

नंतर कांहीं दिवसांनीं जनार्दनस्वामींनीं नाथांस गुरूपदेश दिला. ते त्यांस म्हणाले, "मनुष्यास आत्मज्ञान झालें तरी त्यानें सगुण हरिभजन सोडूं नये." जनार्दनस्वामीच्या या सगुणभक्तिविषयक उपदेशाचा ठसा नाथांच्या सर्व चरित्रावर पूर्णपणें उमटलेला दिसतो. उपदेश दिल्यावर स्वामींनीं नाथांस सांगितलें कीं, "देवगिरीनजीकच सुलभ या नांवाचा एक डोंगर आहे, त्यावर सूर्यकुंड नामक तीर्थ आहे. तेथें जे साधक जन अनुष्ठान करितात त्यांना साक्षात्कार झाल्याशिवाय राहात नाहीं. तरी तूं त्या ठिकाणीं जाऊन सूर्यकुंडांत स्नान कर आणि महाविष्णु जो पांडुरंग त्याचें निश्चल मनानें ध्यान करीत बैस. ध्यानस्थ असतांना कोणाशीं भाषण करूं नकोस. जी खाद्य वस्तु अनायासानें पुढें येईल ती भक्षण करून रहा. माझी आठवण करूं नकोस; मी तुझ्या जवळच आहें असें समजून निश्चिंत रहा. अशा रीतीनें वर्तत असतां, जेव्हां कांहीं अपूर्व गोष्ट तुझ्या दृष्टीस पडेल, तेव्हां पुनः तूं मजकडे ये." ही गुर्वाज्ञा शिरसावंद्य मानून नाथ सुलभ पर्वतावर गेले. तें अत्यंत रमणीय स्थळ पाहून त्यांना मोठा आनंद झाला. जनार्दनस्वामीच्या आज्ञेप्रमाणें सूर्यकुंडांत स्नान करून ते अनुष्ठानास बसले. त्यांची मनोभूमिका अगोदरच तयार झालेली असल्यामुळें, अल्पावकाशांतच भगवंताची श्यामसुंदर चतुर्भुज मूर्ति त्यांच्या हृदयाकाशांत प्रगट झाली. त्या परम तेजस्वी मूर्तीच्या अवलोकनानें

नाथांची वृत्ति इतकी तदाकार झाली कीं, त्यांचें देहभान हरपलें. इतक्यांत, जवळच एक मोठा भुजंग होता, तो मोठ्या त्वेषानें, त्यांना दंश करण्यासाठीं त्यांच्या अंगावर धांवून गेला. परंतु चमत्कार असा झाला कीं, नाथांचा अंगस्पर्श होतांच त्याची दुर्बुद्धि साफ नाहींशी होऊन, उलट, नाथांस सूर्यकिरणांचा ताप होऊं नये म्हणून, त्यानें आपली फणा त्यांच्या मस्तकावर, छत्रीप्रमाणें उभारली. कांहीं वेळानें नाथांनीं ध्यान विसर्जन करून, आपलें अंग किंचित् हालविलें, तेव्हां आपलें सान्निध्य त्यांस कळूं नये ह्मणून, तो भुजंग तेथून तात्काळ निघाला आणि आपल्या बिळांत शिरला. नाथांस यांतलें कांहींच ठाऊक नव्हतें.

त्या सुलभ पर्वताच्या पायथ्याशीं एक भिकार खेडें होतें, तेथें एक शेतकरी रहात असे, तो मोठा विष्णुभक्त होता. तो पूर्वजन्मींचा योगभ्रष्ट, या जन्मीं शूद्रकुळांत जन्म पावला होता, तरी त्याचें आचरण शुद्ध होतें. त्याची पत्नीही मोठी पतिव्रता असून, साधुसंतांच्या सेवेंत ती नेहमीं दक्ष असे. कोणी क्षुधातुर मनुष्य दाराशीं आला तर त्यांनीं आदरपूर्वक त्याला अन्न द्यावें. खोटें भाषण कधीं करूं नये. नित्य हरिभजन मोठ्या प्रेमानें करावें. अशा रीतीनें तें दांपत्य मोठ्या सात्विक वृत्तीनें आपला आयुष्क्रम चालवीत होतें. त्या शेतकऱ्यानें डोंगराच्या पायथ्याशीं शेत पेरलें होतें व एके दिवशीं तो तेथें राखण करीत बसला होता. नाथ प्रत्यहीं डोंगरावर अनुष्ठानास जातात हें पाहून, त्यानें चांगलें तापलेलें दूध बरोबर घेतलें व तें नाथांस देण्यासाठीं तो डोंगरावर गेला. नाथ ध्यान विसर्जन करून स्वस्थ बसले होते. त्यांजपुढें दंडवत घालून शेतकरी त्यांस ह्मणाला, " महाराज, हें दूध मी मुद्दाम आपणासाठीं तापवून आणलें आहे, तरी हें आपण प्यावें. " त्याचा सद्भाव पाहून, ' श्रीकृष्ण भोक्ता ' असें ह्मणून नाथांनीं तें दूध मोठ्या आवडीनें प्राशन केलें. तेव्हांपासून, नाथांस रोज दूध आणून देण्याचा क्रम त्यानें सुरू केला. महीपति ह्मणतातः—

**जरी पूर्वपुण्या असेल ठेवा । तरीच संताची घडेल सेवा ।**
**तयाचा आभार पडतसे देवा । सोडवी भवार्णवापासोनी ॥**

त्या शेतकऱ्याचा भाग्योदय व्हावयाचा होता म्हणूनच संतसेवेकडे त्याच्या मनाची प्रवृत्ति झाली होती. एके दिवशीं त्याची बायको मध्यरात्रीं उठून दळण दळीत बसली. दळतांना ईश्वराचे गुणानुवाद ती गात होती. कांहीं वेळानें दळण संपल्यावर चंद्रोदय होऊन चांदणें पडलें, तेव्हां पहांट झाली असें समजून ती गाईचें दूध काढण्यास दुग्धपात्र घेऊन गोठ्यांत गेली मौज अशी झाली कीं, ती नेहमींची दूध

काढण्याची वेळ नसतांही, दूध पुष्कळच अधिक निघालें. मग त्यांतलें कांहीं दूध नाथांसाठीं दुसऱ्या पात्रांत घालून तें तिनें तापवून ठेविलें व स्वतः स्नानवगैरे करून स्वयंपाकास लागली. इतक्यांत कोठें सूर्योदय झाला. तेव्हां तिच्या लक्षांत आलें कीं, आज आपण फारच लवकर उठलों. नंतर तें दूध व नवऱ्याचें जेवण घेऊन ती शेतावर गेली. तिला पाहतांच शेतकरी म्हणाला, "मला भूक लागली नाहीं. तूं आज अगदीं सकाळींच जेवण घेऊन कां आलीस?" चांदण्यामुळें उजाडलें असें समजून मीं लवकर स्वयंपाक केला व तो निवेल म्हणून लवकर इकडे घेऊन आलें, असें तिनें सांगितलें. तो म्हणाला, डोंगरावरील तपस्वीबुवांस दूध नेऊन दिल्याशिवाय अन्नग्रहण करावयाचें नाहीं हा माझा नेम तुला ठाऊक आहे. तरी हें दूध घेऊन मीं डोंगरावर जातों व नंतर येऊन जेवण करीन. इतकें बोलून व दूध घेऊन तो डोंगरावर गेला. तेथें जाऊन पाहतो, तों नाथ समाधिस्थितींत असून, एका मोठ्या भुजंगानें त्यांच्या अंगास विळखे घालून त्यांच्या मस्तकावर आपली फणा उभारली आहे, असा भयानक देखावा त्याच्या दृष्टीस पडला. आतां हा भुजंग नाथांस दंश केल्याशिवाय राहणार नाहीं हा विचार मनांत येतांच त्याला मोठी चिंता उत्पन्न झाली; व भुजंगापासून नाथांचें रक्षण करण्यास आपण असमर्थ आहों, हेंही त्याच्या लक्ष्यांत येऊन चुकलें. मग त्यानें पांडुरंगाचा धांवा सुरू केला. तो ह्मणाला, "देवा, या कालसर्पापासून तूंच आतां या सत्पुरुषाचें रक्षण कर." सर्पानें भिऊन पळून जावें ह्मणून त्यानें मोठमोठ्यानें आरोळ्या ठोकल्या, पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां "ब्राह्मण मेला रे मेला !" असें तो मोठमोठ्यानें ओरडूं लागला, पण त्या निर्जन प्रदेशांत त्याचें ओरडणें ऐकतो कोण ? शेवटीं त्यानें शंखध्वनि केला. त्या कोलाहलानें नाथमहाराज जागृत होऊन त्यांनीं थोडीशी चळवळ केली त्याबरोबर तो भुजंग पळून गेला. नाथांनीं नेत्र उघडले, तों समोर तो शेतकरी असलेला त्यांच्या दृष्टीस पडला. भुजंगभयानें तो थरथर कांपत होता. तूं एवढी आरडाओरड कां केलीस असें नाथांनीं त्यास विचारलें तेव्हां पुढें येऊन, त्यांस नमस्कार करून तो म्हणाला, "महाराज, एका मोठ्या भुजंगानें आपल्या शरीरास विळखे घातले होते. तें पाहून मी अत्यंत भयभीत होऊन शंखध्वनि केला, तो ऐकून आपण जागृत होऊन अंग हालविलें व त्यामुळें तो भुजंग पळून गेला. आपल्यावर पांडुरंगाची कृपा म्हणूनच आपण आज वांचलां, नाहीं तर प्रसंग मोठा बिकट होता." यावर नाथांनीं एक अभंग म्हटला असें महीपतीनीं लिहिलें असून पुढील अभंग आपल्या भक्तलीलामृतांत उद्धृत केला आहेः—

**आम्हा डंखूं आला काळ । तोचि जाहला कृपाळ ॥ १ ॥**
**भली वोळखी झाली आतां । चित्त मिनलेंसे चित्ता ॥ २ ॥**
**देहीं फिटला देहभावो । तेथें काळाचि झाला वावो ॥ ३ ॥**
**एका*जनार्दनाचे पायीं । जिण्यामरण्या सौरस नाहीं ॥ ४ ॥**

शेतकऱ्यानें सांगितलेली गोष्ट ऐकून ईश्वरी लीलेचें नाथांस मोठें आश्चर्य वाटलें. लागलीच त्यांची वृत्ति तदाकार होऊन भगवंताची त्यांनीं मनःपूर्वक प्रार्थना केली. एकनाथांसारख्या निस्सीम भक्ताची हांक ऐकल्यावर देवाच्या आगमनास काय उशीर ? ती श्यामसुंदर चतुर्भुज मूर्ति नाथांसमोर तात्काळ प्रगट झाली. नाथांनीं डोळे उघडून पाहिलें, तों तें सांवळें परब्रह्म आपल्या पुढें उभें आहे. त्यांनीं प्रेमभरानें भगवच्चरणीं मिठी घातली आणि मानसोपचारांनीं प्रभूची पूजा केली. ही देवभक्ताची भेट त्या कृषीवलानें प्रत्यक्ष पाहिली. आपण आज धन्य झालों असें त्यास वाटलें. इतक्यांत नाथांचा निरोप घेऊन भगवान् अंतर्धान पावले. तेव्हां त्या शेतकऱ्यानें नाथांस दंडवत घालून म्हटलें, " महाराज, आपल्या संगतीच्या योगानें मला आज भगवंताचें साक्षात् दर्शन झालें. येरवीं मजसारख्या हीनयाति अनधिकारी मनुष्यास ही गोष्ट कधीं साध्य झाली नसती. " मग त्यानें तें दुग्धपात्र मोठ्या प्रेमानें नाथांसमोर ठेविलें व त्यांनींही त्यांतलें दूध मोठ्या आवडीनें प्राशन केलें. नंतर नाथांस वंदन करून तो शूद्र आपल्या घरीं गेला व डोंगरावर पाहिलेला सर्व वृत्तांत आपल्या पत्नीस त्यानें निवेदन केला.

इकडे डोंगरावर उन्हाचा ताप टाळण्यासाठीं नाथ एका वटवृक्षाखालीं बसले होते. विचार करितां करितां, ' पर्वतावर कांहीं तरी अपूर्व गोष्ट तुझ्या अवलोकनांत आली म्हणजे तूं परत मजकडे ये ' या जनार्दनस्वामीच्या आज्ञेची त्यांस आठवण झाली. आज आपणास सगुण साक्षात्कार झाला, याहून आणखी अपूर्व गोष्ट ती कोणती ? तेव्हां आतां परत सद्गुरुदर्शनास जावें, या विचारानें नाथ देवगिरीस जनार्दनस्वामीकडे गेले व त्यांस त्यांनीं साष्टांग नमस्कार घातला. नाथांच्या मुखाकडे पाहतांच स्वामींनीं तात्काळ ताडलें कीं याला साक्षात्कार झालेला आहे. मग त्यांच्या आज्ञेवरून, पर्वतावर घडलेली सर्व हकीकत नाथानीं त्यांस सांगितली व शेवटीं म्हटलें, " आपल्या कृपेनें, अप्राप्य वस्तु मला प्राप्त झाली आहे. "

---

१. ह्या चरणाचा पाठ, तुकाराम तात्यानीं छापलेल्या एकनाथी गाथ्यांत असा आहेः—
**एका जनार्दना भेटी । येणें जाणें खुंटली गोष्टी ॥**

# प्रकरण तिसरें.

## नाथांची तीर्थयात्रा–ग्रंथरचनारंभ–विवाह.

एके दिवशीं जनार्दनस्वामी नाथांस म्हणाले, " एकदां नासिक पंचवटीस जाऊन यावें, असें पुष्कळ दिवस माझ्या मनांत आहे. तर तिकडे जाण्याची तयारी करा. " मग एक दिवस ठरवून व प्रवासाची सर्व सामग्री बरोबर घेऊन, त्या दिवशीं ही गुरुशिष्यांची जोडी अश्वारूढ होऊन तीर्थयात्रेस निघाली. वाटेंत एखादें रमणीय स्थळ आढळलें कीं तेथें मुक्काम करावा, असा क्रम त्यांनीं ठेवला होता. कांहीं दिवसांनीं ही मंडळी एका गांवांत येऊन पोंचली, तेथें चंद्रभट नामक एक ब्राह्मण मोठा हरिभक्त होता, त्याच्या घरीं त्यांनीं मुक्काम केला. रात्रौ फलाहार झाल्यावर चंद्रभटानीं पोथी सोडली आणि चतुःश्लोकी भागवताचें उत्कृष्ट विवरण केलें. महीपति म्हणतातः—

**मग एकनाथ आणि जनार्दन । तया समीप बैसती येऊन ।**
**म्हणती धन्य आजिचा सुदिन । जाहलें दर्शन संतांचें ॥**
**प्रेमळ श्रोते सर्वज्ञ निपुण । मिळतां उल्हासे त्याचें मन ।**
**अर्थ सांगतसे प्रांजळ करून । ऐकतांचि मन वेधतसे ॥**
**अनुभवाच्या गोष्टी सांगत । कंठ होतसे सद्गदित ।**
**प्रेमें नेत्रीं अश्रु वाहत । विदेह स्थिति तिघांची ॥**
**मजला वाटतसे साचार । कीं ब्रह्मा विष्णु महेश्वर ।**
**तिन्ही मिळाले एकत्र । तैसा विचार तो झाला ॥**

चंद्रभटांचा प्रेमळपणा आणि साधुशील पाहून, अशा पुरुषाचा सहवास आपणास नित्य घडेल तर किती चांगलें होईल असें जनार्दनस्वामी व नाथ या उभयतांस वाटलें. दुसरे दिवशीं पहांटे ते गुरुशिष्य प्रवासास निघणार तों चंद्रभटानीं त्यांस विनंति केली कीं, आजचा दिवस येथें मुक्काम करून माझा आश्रम पवित्र करावा. स्वामीनीं ही त्यांची विनंति मान्य केली. नंतर स्नानसंध्या, भोजनादि नित्य–कर्म आटोपल्यावर, चंद्रभटानीं स्वामींस म्हटलें, " महाराज, आपल्या

सहवासाचा लाभ घडावा अशी माझी इच्छा आहे. ” स्वामीनीं सांगितलें, “ आमचेंही मनोगत तसेंच आहे. ” हें ऐकून चंद्रभटांस मोठा आनंद झाला. दुसरे दिवशीं पहांटे, ते तिघेही प्रवासास निघाले. कांहीं दिवसांनीं ते पंचवटीस आले. तेथें यथास्थित तीर्थविधि केल्यावर श्रीरामचंद्राचें त्यांनीं दर्शन घेतलें. सर्व मंडळी परत बिऱ्हाडीं आल्यावर, जनार्दनस्वामी नाथांस ह्मणाले, “ नाथ, चंद्रभटजीनीं हें चतुःश्लोकी भागवत बरोबर आणलें आहे. त्यावर तुम्ही प्राकृत टीका करावी अशी माझी इच्छा आहे. तरी या ठिकाणीं आपण आहोंत तोंपर्यंत, तेवढी टीका तुह्मी लिहून काढा. ” ही गुर्वाज्ञा ऐकून नाथांस मोठा आनंद झाला. त्यांनीं त्याच दिवशीं टीकारचनेस प्रारंभ करून थोड्याच दिवसांत ग्रंथ लिहून पुरा केला व तो स्वामीस दाखविला. स्वामीस ती रचना फार आवडली व चंद्रभट तर नित्य तिचें पारायण करूं लागले. भागवताच्या एकादशस्कंधाची टीका पुढें पांडुरंग तुझ्या मुखानें वदवील असेंही स्वामीनीं नाथांस सांगितलें. चंद्रभट स्वतः मोठे विद्वान् असून कर्म, उपासना आणि ज्ञान या तीन्ही मार्गांत त्यांची चांगली गति होती, तथापि, चतुःश्लोकी भागवतावरील नाथांची टीका त्यांस फार आवडली व त्या टीकेंत नाथांनीं प्रगट केललें अगाध अध्यात्मज्ञान पाहून, ही हरिहरांची जोडी गुरूशिष्यरूपानें जगदुद्धारार्थ अवतरली आहे, असें त्यांस वाटलें. टीका पुरी झाल्यावर, ते तिघेही पंचवटीहून निघून त्र्यंबकेश्वरीं गेले व तेथील तीर्थविधि आटोपल्यावर, जनार्दनस्वामी परत देवगिरीस आले. संतसमागमामुळें चंद्रभट संसाराविषयीं अगदीं उदासीन झाले होते; म्हणून तेही स्वामीबरोबर देवगिरीस गेले तेथें जनार्दनस्वामी व एकनाथ यांच्या सान्निध्यांत कांहीं दिवस राहिल्यावर त्यांस विदेहस्थिति प्राप्त होऊन ते मोठे साधु झाले व पुढें ‘ चांदबोधला ’ या नांवानें ते प्रसिद्धीस आले असें महीपतीनीं लिहिलें आहे. ‘ चांदबोधला ’ या नांवाचे एक सत्पुरुष महाराष्ट्रांत पूर्वीं होऊन गेले आहेत खरे व श्रीगोंदें येथील, रामदास तुकारामादिकांचे समकालीन साधु ‘ शेखमहमद ’ हे या चांदबोधल्यांचे शिष्य होत. परंतु, जनार्दनस्वामी व एकनाथ यांजबरोबर प्रवास करणारे चंद्रभट तेच हे ‘ चांदबोधले, ’ या गोष्टीस महीपतींच्या या लेखाशिवाय दुसरा आधार नाहीं. असो. पुढें या चांदबोधल्यानीं देवगिरी येथेंच समाधि घेतली. या समाधीस यवनाचा उपसर्ग होऊं नये म्हणून जनार्दनस्वामीनीं तिच्यावरचें बांधकाम मुद्दाम मुसलमानाच्या कबरींसारखें करविलें व त्यामुळें मुसलमानही संतुष्ट झाले. “ देवगिरीवर हें स्थान अद्याप असून, तेथें पुष्कळ चमत्कार

घडतात, " असें महीपतीनीं लिहिलें आहे. हल्लीं या समाधीची स्थिति कशी आहे हें मुद्दाम तेथें जाऊन समक्ष पाहिल्याशिवाय समजणार नाहीं हें उघडच आहे. अनेक संशोधकांनीं, पुणें येथील इतिहास-संशोधक मंडळाच्या निरनिराळ्या वर्षांच्या अहवालांत आपापलें संशोधनवृत्त छापलें आहे, त्यांत देवगिरीचें व जनार्दनस्वामीच्या समाधीचें वर्णन आढळतें, परंतु चांदबोधले यांच्या समाधीचा उल्लेख त्यांत कोठें आढळला नाहीं, आणि याचें कारण, 'चांदबोधले' नामक सत्पुरुषाची समाधि देवगिरी-वर आहे, हें या संशोधकांस माहीत नसावें, हें होय.

एकनाथचरित्रकार केशव यांनीं नाथांच्या तीर्थयात्रेची जी हकीकत आपल्या ग्रंथांत दिली आहे, ती महीपतींनीं दिलेल्या वरील माहितीहून थोडीशी निराळी आहे. केशव लिहितातः-" एकनाथांस समाधियोग साध्य झाल्यावर जनार्दनस्वामींनीं विचार केला कीं, आतां याचें गडावरचें काम संपलें. याला आतां तीर्थयात्रेस पाठवावें म्हणजे अनेक संतमहंतांच्या गांठी पडून, पुढें हा भागवतधर्माचा मोठा प्रवर्तक होईल. त्याप्रमाणें स्वामींनीं नाथांस तीर्थयात्रेस जाण्याची आज्ञा केली व आपण नासिक-त्र्यंबकेश्वरापर्यंत बरोबर येण्याचें कबूल केलें. तेथें गेल्यावर पंचवटींत नाथांनीं गुर्वाज्ञेनें चतुःश्लोकी भागवतावर मराठी टीका* रचिली. त्र्यंबकेश्वरीं गेल्यावर, तेथें निवृत्तिनाथांची समाधि आहे, तिचें दर्शन घेतल्यावर नाथमहाराजांनीं कांहीं अभंग लिहिले, त्यांत पुढील अभंग आहेतः—

**धन्य धन्य निवृत्तिदेवा। काय महिमा वर्णावा॥ १ ॥**
**शिव अवतार तूंचि धरुन। केलें त्रैलोक्य पावन॥ २ ॥**
**समाधि त्र्यंबक-शिखरीं। मागें शोभे ब्रह्मगिरी॥ ३ ॥**
**निवृत्तिनाथाचे चरणीं। शरण एका जनार्दनीं॥ ४ ॥**

**( २ )**

**समाधि निवृत्ति म्हणतां। हरे संसाराची व्यथा॥ १ ॥**
**दृष्टी पाहतां निवृत्तिनाथ। काळभय नाहीं तेथ॥ २ ॥**
**समाधि पाहतांचि डोळां। काय सांगूं तो सोहळा॥ ३ ॥**
**एका जनार्दनीं शरण। समाधि पाहतांचि जाण॥ ४ ॥**

* एकनाथस्वामींचा हा पहिला मोठा ग्रंथ होय. या वेळीं नाथ तारुण्याच्या अगदीं भरांत असतांहि, हा त्यांचा ग्रंथ एखाद्या पोक्त वयाच्या अनुभवी मनुष्यास साजेल असा गंभीर आणि भारदस्त उतरला आहे. याविषयीं अधिक विवेचन यथाप्रसंग पुढें येईल.

( ३ )

धन्य आजी डोळां । स्वामी निवृत्ति देखिला ॥ १ ॥
कुशावर्ती करूं स्नान । घेऊं निवृत्तिदर्शन ॥ २ ॥
प्रदक्षिणा ब्रह्मगिरी । चौऱ्याशींची चुकली फेरी ॥ ३ ॥
गंगाद्वारीं स्नान करितां । हरे जन्ममरणव्यथा ॥ ४ ॥
ऐसीं तीन अक्षरें । एका जनार्दनीं स्मरे ॥ ५ ॥

( ४ )

आजी धन्य दिन झाला । स्वामी निवृत्ति भेटला ॥ १ ॥
जन्म जरा मरण व्याधि । अवघी तुटली उपाधि ॥ २ ॥
मन इंद्रियांसहित । पायीं जडलेंसे चित्त ॥ ३ ॥
समूळ अहंकार गेला । निवृत्तिनाथ पाहतां डोळां ॥ ४ ॥
एका विनवी जनार्दन । निवृत्ति नामें झालों पावन ॥ ५ ॥

निवृत्तिनाथांवर एकनाथांचे हे एकंदर २२ अभंग आहेत व ते निवृत्तिनाथांच्या समाधीपाशीं बसूनच लिहिलेले दिसतात. असेच त्यांचे ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई यांच्या स्तुतिपर अभंग आहेत. या चारी भावंडांविषयीं नाथांस जें निरतिशय प्रेम वाटत असे त्याचें प्रतिबिंब या सर्व अभंगांत स्पष्ट उमटलें आहे. निवृत्ति, ज्ञानदेव व सोपान यांच्या नुसत्या समाधिदर्शनानें त्या त्या सत्पुरुषाच्या प्रत्यक्ष दर्शनाचा आनंद नाथांस झालेला दिसतो. असो. नाथचरित्रकार केशव यांच्या लिहिण्याप्रमाणें, एकटे जनार्दनस्वामी, नाथांचा निरोप घेऊन त्र्यंबकेश्वराहून मागें परतले व नाथ उत्तर-हिंदुस्थानांत गेले.

इकडे पैठण येथें, एकनाथांचा वृद्ध आजा व आजी हीं नाथ लहानपणींच देवगिरीस गेल्यापासून, त्यांच्या विरहानें अत्यंत व्याकुल होऊन राहिलीं होतीं. नाथ कोणत्या ठिकाणीं गेले हेंदेखील त्यांस समजणें अशक्य होतें. आरंभीं बरेच दिवस त्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं चौकशी केली, परंतु नाथांचा पत्ता त्यांस लागला नाहीं. आजाआजीस न कळवितां नाथ एकाएकीं देवगिरीस निघून गेले ही त्यांच्या हातून मोठी चुकीच झाली होती यांत संशय नाहीं, कारण आपण अमुक ठिकाणीं जाणार येवढें जरी नाथांनीं त्यांस कळविलें असतें, तरी त्यांची पुष्कळशी काळजी दूर झाली असती. परंतु बालबुद्धीमुळें नाथांच्या लक्ष्यांत ती गोष्ट आली नाहीं व

त्यामुळें, ज्या आजाआजीनें बालपणापासून त्यांचें संगोपन केलें, त्यांना वृद्धपणीं त्यांचें विरहदुःख भोगावें लागलें. आतां " नारायणीं घडे जेणें अंतराय। हो कां बापमाय त्यजावे ते " या तुकारामबुवांच्या दंडकाधारें नाथांच्या या वर्तनाचें समर्थन करणें शक्य आहे, परंतु त्यामुळें सहृदय मनुष्याचें समाधान होणार नाहीं. असो. नाथ पैठणाहून एकाएकीं निघून गेल्यावर, गांवांतील लोक नानाप्रकारचे कुतर्क करूं लागले. कोणी ह्मणाले, " या थेरड्यानें आणि थेरडीनें पोरास मारलेंबिरलें असेल, म्हणूनच तो पळून गेला. अहो, आजाआजीनें मुलाचे कितीहि लाड केले, तरी त्याला आई-बापांची सर येणार आहे का ? " याच्या उलट दुसरे कांहीं ह्मणाले, " अहो तें पोर मूळचेंच पांढऱ्या पायांचें. जन्मलें तेव्हां आईबाप मेले आणि घरांत अठरा विश्वे दारिद्रय आलें. त्यांत आणखी, या आजाआजीनें त्याचे इतके लाड केले कीं त्यामुळें पोर अगदींच शेंफारून गेलें. " असो.

एके दिवशीं नाथांचे पितामह चक्रपाणि यांस कोणी अशी माहिती दिली कीं, गांवांतल्या एका पुराणिकाचे घरीं नाथ पुराणश्रवणास जात असत, तो पुराणिक हल्लीं कोठें दिसत नाहीं. यावरून, एकनाथास बरोबर घेऊन तो कोठें तरी पळून गेला असला पाहिजे यांत संशय नाहीं. हें ऐकतांच, चक्रपाणीनीं त्या पुराणिकाच्या घरीं जाऊन चौकशी केली. तेव्हां घरच्या माणसांनीं असें सांगितलें कीं, पुराणिकबुवा लष्कराबरोबर गेले येवढें आम्हांस ठाऊक आहे. परंतु जातेवेळीं एकनाथास त्यांनीं बरोबर नेलें कीं काय हें आम्हांस माहीत नाहीं. यावरून, पुराणिकानेंच एकनाथांस नेलें अशा समजुतीनें तो पुराणिक परत येईपर्यंत वाट पाहण्याचें चक्रपाणीनीं ठरविलें. दरम्यान, पुराणिकाच्या घरच्या माणसांनीं पुराणिकास पत्र लिहिलें कीं, " चक्रपाणीचा नातू एकनाथ तुमचें पुराण ऐकण्यास येत असे. तो हल्लीं नाहींसा झाला आहे. त्याला तुम्हीं शिष्य करून बरोबर नेलें असा चक्रपाणीचा व इतर लोकांचा तुमच्यावर आरोप आहे. तरी तो मुलगा तुमच्या बरोबर असल्यास त्यास ताबडतोब इकडे पाठवून यावें. नसल्यास तसें कळवावें. " पत्र वाचतांच, आपल्यावर हा निष्कारण आरोप आलेला पाहून पुराणिकास वाईट वाटलें. देवगिरीस जाण्यापूर्वी, आपण देवगिरी येथें जनार्दनस्वामीकडे जाणार असें नाथ एकदां त्या पुराणिकापाशीं बोलले होते. त्याची त्याला आतां आठवण झाली. तो लागलीच निघून देवगिरीस आला व जनार्दनपंतांची भेट घेऊन त्यांजपाशीं त्यानें एकनाथाची चौकशी केली. जनार्दनपंत म्हणाले, " तो इतके दिवस येथें होता खरा, परंतु हल्लीं तो

तीर्थाटनास गेला आहे. " व तशा अर्थाचें पत्र लिहून तें त्यांनीं पुराणिकास दिलें. पुराणिकानें पैठणास येऊन चक्रपाणीस इत्थंभूत हकीकत सांगितली व तें जनार्दनस्वामीचें पत्रही त्यांस दाखविलें. शेवटीं, नातवाचा शोध लागला ह्मणून चक्रपाणीस व त्यांच्या पत्नीस परमावधीचा आनंद झाला. पुराणिक त्यांस म्हणाला, " इतक्याहि उप्पर माझा विश्वास तुम्हास वाटत नसल्यास, तुम्हीं स्वतः एकदां देवगिरीस जाऊन जनार्दनस्वामीस भेटा आणि आपली खात्री करून घ्या. " त्याप्रमाणें चक्रपाणी पत्नीसह देवगिरीस गेले व जनार्दनस्वामीस भेटले. स्वामीनीं त्यांचें चांगलें आदरातिथ्य केलें. नंतर ते त्यांस म्हणाले, " विश्वाचा उद्धार करण्यासाठीं श्रीविष्णूनें नाथरूपानें तुमच्या पवित्र कुळांत अवतार घेतला आहे. तुमचा वंश धन्य म्हणून त्यांत नाथासारख्या भागवतानें जन्म घेतला. तो तुम्हाला आपला नातू वाटतो, पण तो साक्षात् भगवदंश आहे. त्याचें भावी चरित्र तुम्ही पहाल तेव्हां याविषयीं तुमची खात्री होईल. हल्लीं नाथ तीर्थयात्रेस गेला आहे, तो पांच सहा महिन्यांनीं सुखरूपपणें परत येईल. तुम्हीं त्याजविषयीं कांहीं काळजी करूं नका. " जनार्दनस्वामीचें हें भाषण ऐकून त्या वृद्ध जोडप्याचें समाधान झालें. नंतर, देवगिरी येथें एक महिना राहून चक्रपाणि परत पैठणास आले. उत्तरमानसादि तीर्थें करून नाथ पैठणास आल्यावर त्यांस देण्यासाठीं जनार्दनस्वामीनीं स्वदस्तुरचें एक पत्र चक्रपाणीपाशीं देऊन ठेवलें.

इकडे उत्तरहिंदुस्थानांत नाथांनीं अनेक तीर्थयात्रा केल्या. पयोष्णी, तापी, नर्मदा इत्यादि नद्यांचें दर्शन घेऊन व स्नान करून ते उज्जयिनीस गेले. तेथें महाकाळेश्वराचें त्यांनीं दर्शन घेतलें. पुढें, श्रीकृष्णाच्या पदस्पर्शानें पुनीत झालेलीं मथुरा, गोकुळ, वृंदावन इत्यादि स्थळें त्यांनीं पाहिलीं. तेथील प्रेमळ वैष्णवांच्या सहवासांत त्यांनीं कांहीं दिवस घालविले. नंतर वाराणशीस जाऊन व मणिकर्णिकेचें स्नान करून श्रीकाशीविश्वेश्वराचें त्यांनीं दर्शन घेतलें. काशींत पांच रात्री राहून, पुढें ते प्रयागास आले. तेथें त्रिवेणीसंगमावर स्नान करून क्षेत्रदेवतेचें त्यांनीं दर्शन घेतलें. नंतर गया, अयोध्या, बद्रीनाथ, पुष्कर, द्वारका इत्यादि उत्तरतीर्थें करून, नाथ दक्षिणेंत यावयास निघाले. येतांना वाटेंत, प्रसिद्ध गुर्जर हरिभक्त नरसी मेहता यांचें वास्तव्यस्थान जें जुनागड शहर तें पहाण्यास नाथ चुकले नाहींत. डाकोर येथें जाऊन श्रीरणछोडजीचेंहि दर्शन त्यांनीं घेतलें. थोड्या दिवसांनीं नाथ दक्षिणेंत गोदातीरीं पैठण येथें येऊन दाखल झाले. तेथें पिंपळेश्वरीं त्यांनीं मुक्काम केला. मध्यान्हकालीं

पैठणांत जावें आणि तेथें यदृच्छेनें जें भिक्षान्न मिळेल त्यावर निर्वाह करावा असा क्रम त्यांनीं चालविला.

इकडे नाथांच्या दीर्घ विरहानें शोकाकुल होऊन राहिलेला त्यांचा आजा व आजी यांनीं त्यांस एके दिवशीं गांवांत फिरतांना पाहिलें, तेव्हां त्यांस हा आपला नातूच असावा अशी शंका येऊन त्यांनीं त्यांचें मुख निरखून पाहिलें व हा आपला एक्याच आहे अशी खात्री होतांच तीं स्फुंदस्फुंदून रडूं लागलीं. नाथांचे चरित्रकार केशवदास यांनीं ह्या हृदयद्रावक प्रसंगाचें वर्णन पुढील ओंव्यांत फार चांगलें केलें आहेः—

**म्हणती बापा एकनाथा । कां न बोलसी आतां ।**
**कठोर केलें निजचित्ता । माया तत्त्वता सांडिली ॥**
**आम्हां वृद्ध अनाथांसी । दुःखीं टाकूनि तूं गेलासी ।**
**आजी दैवें सांपडलासी । कां रुसलासी विसांविया ॥**

परंतु नाथांची वृत्ति इतकी निर्मोह झालेली होती कीं, आजाआजीच्या या करुण वाणीचा त्यांच्या मनावर बिलकुल परिणाम झाला नाहीं. मग, जनार्दनस्वामींचें नांव घेऊन, त्यांजकडून आलेलें पत्र आजोबांनीं नातवाच्या हातीं दिलें. तेव्हां त्या पत्रांतील गुरुहस्ताक्षर पाहतांच तें पत्र नाथांनीं मस्तकीं धारण केलें. " आजाआजीची मर्जी संभाळून तुम्हीं यापुढें येथेंच रहावें " अशी आज्ञा जनार्दनस्वामींनीं नाथांस त्या पत्रांत केली होती. ह्या गुर्वाज्ञेस मान देऊन, नाथांनीं आजाआजीच्या चरणांवर मस्तक ठेविलें, परंतु ज्या जागीं तें पत्र त्यांच्या हातीं पडलें ती जागा सोडून जाण्यास ते तयार होईनात. तेथेंच ते सहजसमाधिस्थितींत मौन धारण करून बसले. केशवदास म्हणतातः—

**संपवूनि तीर्थाटण । तेथेंचि बैसला धरूनि मौन ।**
**अंगीं ऐश्वर्याचें लक्षण । न डळमळी मन सर्वथा ॥**
**द्वंद्वबाधा शीत उष्ण । न बाधी तया भूक तहान ।**
**सहजसमाधि लक्षण । हें पूर्णपण तयाचें ॥**

नाथांची ही संसारविमुख उदासीन वृत्ति पाहून त्यांच्या आजा-आजीस वाईट वाटलें. " आमचें नशीव तर फुटकेंच, पण हा तरी चांगला कर्तासवरता होऊन संसार चालवील अशी आम्हास आशा होती, पण दुर्दैवानें तीहि निष्फल ठरली. याचें लक्षण पहावें तें कांहीं चमत्कारिकच दिसतें. आतां पुढें याचें होणार तरी कसें ?"

अशा विवंचनेंत तीं पडलीं. गांवांतल्या लोकांसही नाथांची ही विदेही स्थिति पाहून मोठें नवल वाटलें. " आजा–आजीची सेवा करून येथेंच रहा " ही जनार्दन स्वामींनीं पत्रांत दिलेली आज्ञा शिरसा वंद्य मानून नाथ 'तेथेंच' वसून राहिले! मग लोकांनीं, शीतोष्णनिवारणार्थ तेथेंच एक लहानसा आश्रम त्यांस बांधून दिला व त्यांच्या अन्नोदकाची तेथेंच व्यवस्था केली. त्या ठिकाणीं नाथमहाराज कांहीं दिवस मौन धारण करून राहिले. त्यांच्या दर्शनास शेंकडों लोक नित्य येऊं लागले. हळूहळू आश्रमास वाड्याचें स्वरूप देण्यांत आलें. आजा–आजीही त्या ठिकाणीं येऊन राहिलीं. इतके दिवस लोकांची श्रद्धा पाहून, नाथांनीं मौन सोडलें व लोकोद्धारार्थ ते कीर्तन करूं लागले. पहिलें कीर्तन एकादशीस झालें. भगवंत ब्राह्मणवेषानें ध्रुपद धरण्यास मागें उभे होते. केशवदास म्हणतातः––

**अंगें नाथाचें कीर्तन । त्यावरी साहित्य करी कृष्ण ।**
**तेथील ऐकतां श्रवण । समाधि संपूर्ण श्रोतियां ॥**

पुढें श्रावण महिना आला. कृष्णजयंतीच्या दिवशीं मोठा उत्सव होऊन नाथांचें कीर्तन झालें. नाथांच्या साधुत्वाची व निरूपणशैलीची कीर्ति गांवोगांव पसरत चालली. नाथांनीं सुरू केलेल्या या लोकसंग्रहाची वार्ता देवगिरी येथें जनार्दनस्वामींच्या कानावर गेली. आपला प्रियशिष्य आपल्या आज्ञेप्रमाणें देशांत भक्तिमार्गाचा प्रसार करीत आहे हें ऐकून त्यांस मोठा आनंद झाला व शिष्यभेटीची उत्कंठा उत्पन्न झाली. पैठण येथें जाऊन तेथें चाललेला प्रकार समक्ष अवलोकन करावा या हेतूनें स्वामी दौलताबादेहून, कृष्णजयंतीच्या उत्सवार्थ पुष्कळ साहित्य बरोबर घेऊन, पैठणास जाण्यास निघाले. तेथें आल्यावर, ते नाथांच्या वाड्यापाशीं आले, तेव्हां त्यांना काय दिसलें? केशव सांगतातः—

**हातीं त्रिशूळ लखलखीत । श्रीदत्तात्रेय मूर्तिमंत ।**
**स्वयें काष्ठधर होत । द्वार संरक्षीत नाथाचें ॥**

मूर्तिमंत दत्तमहाराज हातीं दंड घेऊन नाथद्वाराचें संरक्षण करीत आहेत असें जनार्दनस्वामींनीं पाहिलें. भगवंतास साष्टांग नमस्कार घालून व सद्गदित होऊन, साश्रु नयनांनीं, हात जोडून ते उभे राहिले. श्रीदत्तरायांनीं स्वामीस पोटाशीं धरून त्यांचें समाधान केलें व एकनाथांची अधिकारकीर्ति स्वामीस त्यांनीं स्वमुखानें सांगितली; व म्हटलें, " हा एकनाथ सामान्य पुरुष नसून, भगवंताचा पूर्णावतार

आहे, आणि धर्मसंस्थापनोद्देशानें हा मानवरूपानें मृत्युलोकीं अवतरला आहे. ” इतकें बोलून श्रीदत्तात्रेयांनीं सामान्य माणसाचें रूप धारण केलें आणि जनार्दन-स्वामीचें आगमन त्यांनीं नाथमहाराजांस कळविलें. ‘ जनार्दन स्वामी आले ’ एवढे शब्द कानीं पडतांच एकनाथांस परमावधीचा आनंद होऊन ते धांवतच गेले आणि प्रेमभरानें गुरुमाउलीच्या चरणावर त्यांनीं लोटांगण घातलें. स्वामींनीं नाथांस उचलून आलिंगिलें आणि “ धन्य धन्य ” ह्मणून त्यांचें अभिनंदन केलें. नंतर नाथांनीं स्वामीस वाड्यांत नेऊन आसनावर बसविलें व सविस्तर वृत्तांत त्यांस निवेदन केला. कृष्णजयंतीच्या उत्सवाची सर्व तयारी पूर्वीं झालीच होती, त्यांत आणखी स्वामीच्या आगमनाची भर पडल्यामुळें, नाथांस मोठी कृतकृत्यता वाटली. नंतर स्वामींची आज्ञा घेऊन नवरात्राचीं कीर्तनें त्यानीं सुरू केलीं. जनार्दनस्वामीस आसनावर बसवून, नाथांनीं स्वतः कीर्तन करावें आणि कीर्तनांत भक्तीचा उत्कर्ष करणारीं पद्यें ह्मणून, कृष्णचरित्रावर निरूपण करावें असा क्रम चालू होता. केशवदास ह्मणतातः—

**ज्याचें यश गाईजे कीर्तनीं । तो स्वयें आपण चक्रपाणी ।**
**श्रीनाथाचें ध्रुपद धरोनी । साहित्यालागुनी उभा राहे ॥**

ज्या श्रीकृष्णाचें यश नाथ कीर्तनांत गात होते, तो श्रीकृष्ण स्वतः ब्राह्मणवेषानें नाथांच्या मागें उभा राहून आणि टाळ वाजवून ध्रुपद धरीत होता ! अशा त्या कीर्तनांत रंगदेवता कशी मूर्तिमंत उभी राहत असेल हें काय सांगावयास पाहिजे ? धन्य ते वक्ते आणि त्याहून धन्य ते श्रोते ! जनार्दनस्वामींनीं विनोदानें नाथांस प्रश्न केला, “नाथ, तुमच्या मागें उभा राहून ध्रुपद धरणारा हा ब्राह्मण मोठा कुशल दिसतो. हा राहणारा कोंठला ? असा गुणी मनुष्य मी आजवर पाहिला नाहीं. याचें मधुर गायन ऐकून समाधिसुखाचासुद्धां कंटाळा येईल. असें हें रत्न कोणत्या गांवचें, याचें नामाभिधान काय, वगैरे चौकशी तुम्हीं अद्याप केली नाहीं काय ? ” हें ऐकून नाथांनीं त्या ब्राह्मणास गोड शब्दांनीं त्याचें वृत्त पुसलें. तेव्हां तो ह्मणाला; “ मी अनाथ आहें. माझी कायमची वस्ती अशी कोठेंच नाहीं. निस्पृह वृत्तीनें फिरत फिरत सहज येथें आलों व येथील आचारविचार पाहून मला संतोष वाटल्यामुळें येथेंच मुकाम केला. कीर्तनांत हरिदासाच्या मागें उभें राहून ध्रुपद धरण्याची व गायन करण्याची मला मोठी हौस. मी जातीचा ब्राह्मण असून, मला ‘ विठ्ठल ’ म्हणतात. आपल्या समागमांत राहून हरिकीर्तनाचा लाभ घ्यावा, येवढ्याच उद्देशानें

मी येथें राहिलों आहें. " हा वृत्तांत ऐकून जनार्दनस्वामी नाथांस म्हणाले, " तुमची साथ करावयास भगवंतानेंच याला पाठविलें आहे. " असो. या प्रकारें, हा जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या थाटानें पार पडल्यावर, जनार्दनस्वामींनीं परत दौलताबादेस जाण्याचा आपला विचार प्रदर्शित केला, तेव्हां नाथांच्या वृद्ध आजा–आजीनें, हात जोडून त्यांस विनंति केली कीं, " महाराज, आपल्या एक्याचें लग्न झालेलें डोळ्यांनीं पहावें इतकीच आतां आमची इच्छा उरली आहे. परंतु आपल्या आज्ञेशिवाय तो लग्न करण्यास कबूल होणार नाहीं. तरी आपण कृपा करून, त्यास दोन उपदेशाचे शब्द सांगून त्याचें मन वळवावें. " हें भाषण ऐकून जनार्दनस्वामीस त्या वृद्ध दांपत्याची दया आली व त्यांची इच्छा पूर्ण करावी या उद्देशानें, नाथांस जवळ बोलावून, त्यांजपाशीं त्यांनीं युक्तीनें हळूच लग्नाची गोष्ट काढली. ते ह्मणाले, " नाथ, तुह्मांस जर येथें रहावयाचें असेल तर यथाविधि लग्न करून, गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला पाहिजे. अविवाहित स्थितींत राहून परमार्थ संपादन करणें अयोग्य आहे असें नाहीं, परंतु लौकिक आचारविचार जर पाळले नाहींत, तर विनाकारण लोकनिंदेचे शिंतोडे आपल्या अंगावर उडतील, याचाहि विचार केला पाहिजे. शिवाय, तुमच्या वडील मंडळीचीहि, तुह्मी लग्न करावें अशी फार इच्छा आहे. " यावर, यदृच्छेनें जें काय व्हावयाचें असेल तें होईल, असा विचार करून नाथ स्तब्ध राहिले:—

> " होणार न चुके प्रमाणीं । यालागीं नाथ राहिला मौनी ।
> जैसें ठेवील चक्रपाणी । काय हानि त्यामाजी ॥
> देहाच्या माथां प्रारब्ध । देह तंव स्वप्न प्रसिद्ध ।
> तेथिंचा हर्षविषाद । मज संबंध काय याचा ॥

अशा स्थितींत, सद्गुरूच्या आज्ञावचनाची तरी अवज्ञा कां करावी ? या विचारानें नाथ स्तब्ध राहिले. तेव्हां मौन हीच संमति असें जाणून जनार्दनस्वामी संतुष्ट झाले व देवगिरीस जाण्यास नाथांपाशीं त्यांनीं निरोप मागितला. ते नाथांस म्हणाले, " तुमचें वैराग्य, प्रेमळ हरिभक्ति आणि लोकसंग्रहबुद्धि पाहून मला मोठें समाधान वाटलें. यापुढेंहि हाच क्रम चालू ठेवावा आणि परमार्थ वाढवावा. " नाथांनीं स्वामींच्या पायांवर मस्तक ठेवून इतकेंच मागणें मागितलें कीं, " हा सगळा आपल्या कृपेचा खेळ आहे. आतां यापुढें मला आपलें वियोगदुःख कधींहि न होवो."

नंतर जनार्दनस्वामी, सर्व मंडळीचा प्रेमानें निरोप घेऊन दौलताबादेस गेले. इकडे पैठणांत, नाथांची परमार्थसंपन्नता पाहून सर्व लोक म्हणूं लागले कीं—

**याचिया ऐसा परमार्थ। कोठेंही नसेल हा अर्थ।**
**धन्य धन्य हे समर्थ। चरित्र अद्भुत पैं याचें॥**

अशा प्रकारें कांहीं दिवस गेले असतां, नाथांच्या लग्नाच्या गोष्टी पुनः सुरू झाल्या. एक सदाचारी ब्राह्मण होता त्याची कन्या उपवर झाली होती. तिला योग्य पति कसा मिळेल या विवंचनेंत तो असतां एके रात्रीं त्याला स्वप्नांत अशी आज्ञा झाली कीं, पैठण येथें एकनाथ हे महाभगवद्भक्त राहत आहेत त्यांस कन्या देऊन लग्न करावें. त्याप्रमाणें पैठणास येऊन त्या ब्राह्मणानें नाथांचें दर्शन घेतलें. तेव्हां त्याला असें वाटलें कीं आपल्या कन्येस जर हा पति मिळेल तर तिच्या भाग्यास पारावार नाहीं. नंतर, नाथांच्या वडील मंडळीस भेटून त्यानें त्यांस, मुलगी पदरांत घ्या, अशी नम्रपणें विनंति केली. मंडळीनेंहि फारसे आढेवेढे न घेतां, वधूवरांचें घटित जुळतें असें पाहून, लग्नास रुकार दिला. उभय पक्षीं लग्नाची तयारी सुरू झाली. नाथांच्या आजाआजीनें निरनिराळ्या गांवीं असलेल्या आपल्या नातेवाईकांस व इष्टमित्रांस आमंत्रणपत्रिका पाठविल्या. त्यांत, विजापूरच्या बाजूस उद्धव नामक एक गृहस्थ मोठे सज्जन होते ते सहकुटुंब पैठणास आले व नाथांस साष्टांग वंदन करून म्हणाले, "नाथ, भानुदासांच्या वंशांत जन्म घेऊन तुह्मीं आपलें व आपल्या कुलाचें सार्थक्य केलें." असो. पुढें योग्य मुहूर्तावर नाथांचें लग्न मोठ्या थाटानें झालें. विवाहोत्सव पार पडल्यावर, उद्धवानें आपल्या कुटुंबांतील सर्व मंडळीस आपल्या गांवीं पाठविलें व स्वतः नाथांची सेवा करण्यासाठीं तो पैठण येथें नाथांचे घरीं राहिला. नाथांची नवपरिणीत पत्नी मोठी सुशील होती. तिचें नांव 'गिरिजाबाई' असें ठेवण्यांत आलें.

# प्रकरण चौथें.

## अवतारचरित्र—जनार्दनसमाधि—श्रीखंड्याख्यान—भागवतरचना.

कालांतरानें, नाथांचे आजोबा चक्रपाणि व त्यांची पत्नी हीं वार्धक्यानें मरण पावलीं; व प्रपंचाचा भार नाथांच्या शिरावर पडला. परंतु परमार्थाकडे त्यांनीं दुर्लक्ष्य केलें नाहीं. नित्य हरिनामगजर, कथाकीर्तन, अध्यात्मविवेचन, ग्रंथलेखन इत्यादि प्रकार चालूच होते. नाथसेवेंत उद्धव नेहमीं दक्ष असे. नाथांचे प्रपितामह भानुदास यांची नित्यपूजेची छोटीशी विठ्ठलमूर्ति होती, तिचेंच नित्यपूजन नाथ करीत असत. नाथ बालपणापासून येवढे परमार्थसंपन्न, परंतु त्यांचा गृहस्थाश्रमदेखील अगदीं कित्ता घेण्यासारखा होता. "**भूतांची दया हें भांडवल संतां**" ह्या सदुक्तीची यथार्थता नाथांच्या ठायीं अगदीं पूर्णत्वानें झाली होती. आपल्या घरीं त्यांनीं सदावर्त ठेवलें असून, आल्यागेल्या अतिथिअभ्यागताची सर्व व्यवस्था ते अगदीं घरच्याप्रमाणें ठेवीत असत. परंतु, मौज ही कीं, घरांत काय आहे काय नाहीं, याची चौकशी त्यांनीं कधींच केली नाहीं. ती सर्व व्यवस्था उद्धव पहात असे. रात्रीच्या एकांत वेळीं त्यानें नाथांपाशीं बसावें आणि गोड व नम्र शब्दांनीं परमार्थाच्या गोष्टी त्यांस पुसाव्या. अशा रीतीनें इकडे नाथांचा हा प्रपंच-परमार्थ, उद्धवाच्या व्यवस्थेनें आणि गिरिजाबाईच्या सहकारितेनें यथासांग चालू असतां, दौलतावादेस जनार्दनस्वामी समाधिस्थ झाल्याची वार्ता, अकस्मात्, एके दिवशीं नाथांच्या कानावर आली. परंतु, जन्ममृत्यूच्या कोड्याचा त्यांस पूर्ण उलगडा झालेला असल्यामुळें, गुरुदेवतेच्या समाधीची वार्ता ऐकून, ते बिलकुल शोकविव्हल झाले नाहींत. केशवदास म्हणतातः—

**जनार्दनाची सर्वगतता । संपूर्ण प्रतीत श्रीनाथा ।**
**शोकमोहादि वियोगवार्ता । नाहीं सर्वथा किमपिही ॥**

नाथांनीं उद्धवास सांगितलें कीं, षष्ठीच्या महोत्सवाचें सर्व साहित्य तयार ठेव. तेव्हां उद्धवानें त्यांस विचारलें कीं. "महाराज, षष्ठीस कोणता उत्सव व्हावयाचा आहे ?" नाथ

म्हणाले, " फाल्गुन वद्य षष्ठी ही जनार्दस्वामीची जन्मतिथि असून, श्रीदत्तात्रेयदर्शनहि त्यांस याच दिवशीं झालें. मी देवगिरीस जाऊन पहिल्यानें त्यांचें दर्शन घेतलें त्या दिवशीं हीच षष्ठी होती. जनार्दनस्वामीनीं शेवटीं समाधि घेतली ती याच षष्ठीस. अशीं हीं चार पर्वें या एकाच तिथीस येत असून, पांचवें * पर्वहि पुढें याच तिथीस येणार आहे, हें अनुभवानें तुला कळेल. तर, असें ह्या फाल्गुन वद्य षष्ठीचें आमच्या उभयतांच्या चरित्रांत मोठें महत्व असल्यामुळें, त्या दिवशीं मोठा उत्सव करण्याचें मी योजिलें आहे. तर, सर्व साहित्याची सिद्धता कर. " " आज्ञा " म्हणून उद्धव उत्सवाच्या तयारीस लागला व षष्ठीपर्यंत सर्व सामग्री त्यानें मिळविली. पुढें षष्ठीचा दिवस येऊन ठेपला. त्या दिवशीं नाथांच्या वाड्यांत मोठा उत्सव झाला. केशवदास म्हणतातः—

**" आडकाठी भोजनासी । कोणासी नसे ते दिवशीं ।**
**यज्ञोपवीत मात्र सर्वांसी । आंवतिलें द्विजांसी समस्तां ॥**
**टाळवीणा मृदंग भेरी । दिंडी आणोनि गंगातीरीं ।**
**नामस्मरण गिरागजरीं । मिळोनि नरनारी करिताती ॥**
**मध्यान्हपर्यंत गजर । कीर्तनाचा महाथोर ।**
**वैष्णव मेळवूनि समग्र । हर्षेनिर्भर गाताती ॥**

या उत्सवाच्या खर्चासाठीं उद्धवानें नाथांच्या नांवचा कर्जरोखा लिहून देऊन सातशें रुपये कर्ज काढलें होतें. पुढें कर्जरोख्याची मुदत भरली तेव्हां उद्धवानें सावकारास सांगितलें कीं " आज मजपाशीं पैसे नाहींत. जेव्हां हातांत रक्कम येईल तेव्हां तुझें कर्ज मीं चुकतें करीन. " सावकारानें विचार केला, यांच्या घरीं रोज अन्नसंतर्पण चालू आहे, अशा स्थितींत यांच्या हातीं आलेला पैसा शिल्लक कसा राहणार ? म्हणून त्यानें नाथमहाराजांचीच समक्ष भेट घेऊन त्यांजपाशीं पैशाची गोष्ट काढली; इतकेंच नव्हे, तर, पैसे दिल्यावांचून आपण अन्नग्रहण करूं नये अशी नाथमहाराजांस शपथ घालून तो आपल्या घरीं गेला. नाथांनीं ही शपथ मोठ्या आनंदानें पाळली. त्यांनीं व गिरिजाबाईनें, दोघांनींहि अन्न वर्ज्य केलें. परंतु आपल्या नित्यधर्मकर्मांत त्यांनीं बिलकुल खंड पडूं दिला नाहीं. केशवदास म्हणतातः—

* हें पांचवें पर्व म्हणजे खुद्द नाथमहाराजांचें निर्याण होय. फाल्गुन वद्य षष्ठीसच नाथांनीं समाधि घेतली व ही नाथषष्ठी महाराष्ट्रांत प्रसिद्धच आहे.

उद्धव आणि गिरिजाबाई । त्याच रीती स्वनिश्चयीं ।
सुखें विचरती स्वगेहीं । उपोषित तेव्हां तशींच ॥
शांति क्षमाधैर्यस्थिति । त्याहीवरी उत्कर्ष भक्ति ।
द्वंद्वसहिष्णुता सहनशक्ति । भूषणें शोभती नाथासी ॥
अंगीं ऐश्वर्याचें बळ । परि निज चित्तीं जो निर्मळ ।
क्षुधेतृषेची हळहळ । नाहीं निर्मळ निजरूपा ॥

अशा रीतीनें पहिला दिवस संपून रात्र झाली; तेव्हां भगवंतानें उद्धववेषानें सावकाराच्या घरीं जाऊन त्यास हांक मारली. मध्यरात्रीचा सुमार होता. सावकार दार उघडून बाहेर आला व पाहतो तों उद्धव भट बाहेर उभा ! सावकार उद्धवास म्हणाला, "भटजी, अशा अपरात्रीं आपलें काय काम आहे ?" देव म्हणाले "तुमच्या कर्जाची रक्कम व्याजासह घेऊन आलों आहें. ती ताव्यांत घ्या आणि आमचा कर्जरोखा परत द्या." सावकार म्हणाला, "अशा रात्रीच्या वेळीं हे येवढे रुपये मी कसे पारखून घेऊं ? शिवाय, हिशोबाच्या वह्या दुकानांत आहेत व कारकूनहि जवळ नाहीं." उद्धववेषधारी भगवंतानीं उत्तर दिलें, "पैसे आणले असतां ते घेण्याची तुमची तयारी नाहीं. मग नाथमहाराजांस शपथ घालून विनाकारण उपोषण करावयास कां लावलें ?" 'नाथांस अहोरात्र उपोषण घडलें' येवढे शब्द कानीं पडतांच सावकाराचें अंतःकरण कळवळलें. त्यानें लागलीच दिवा लावला आणि स्वतः दुकान उघडून वह्या तपासून, हिशोबाप्रमाणें रक्कम मोजून घेतली. वहींत निघालेली बाकी आणि ब्राम्हणानें आणलेली रक्कम यांचा अगदीं तंतोतंत मेळ पडलेला पाहून, त्या द्रव्यलोभी सावकारासदेखील थोडेसें आश्चर्य वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. मग त्यानें दिलेला रोखा घेऊन भगवंतानें तो नाथांच्या नित्यपाठाच्या *पोथींत ठेवून दिला ! इकडे सावकाराच्या मनास, नाथांसारख्या थोर भगवद्भक्तास उपोषण घडलें, याबद्दल मोठी तळमळ लागून राहिली. त्या रात्रीं त्यास झोंप कशी ती मुळींच लागली नाहीं. पहांटे सूर्योदय होतांच, तो पहिल्यानें नाथांच्या वाड्यांत गेला आणि नाथचरणावर मस्तक ठेवून, "महाराज, मी मोठा अपराधी आहें" असें म्हणून खेद करूं लागला. नाथांनीं त्याचें अनेक प्रकारीं समाधान केलें. ते म्हणाले, "शेटजी, तुम्हास इतकें वाईट वाटण्याचें बिलकुल कारण नाहीं. व्यवहारदृष्ट्या जसें वागावयास

* हाच चमत्कार, प्रसिद्ध संत दामाजी व नरसी मेहता यांच्याहि चरित्रांत वर्णिलेला आढळतो.

पाहिजे तसेंच तुम्ही वागलां. यांत तुमची कांहीं चुकी नसून, सगळा दोष आमच्याकडे आहे. दुसऱ्याचा ऋणी हा मुतक्यासारखा आहे असें शास्त्रदेखील म्हणतें. तेव्हां, तुम्ही आतां कांहीं खेद न करितां खुशाल आपल्या घरीं जा. आमच्या हातून तुमचें कर्ज फिटेल तेव्हां आम्ही आमच्या उपोषणाचें पारणें फेडूं." हें ऐकतांच सावकार थोडासा चकित होऊन उद्धवापाशीं गेला आणि त्यास म्हणाला, 'भटजी, तुम्ही गेल्या रात्रीं माझी रक्कम सव्याज चुकती केली ही गोष्ट नाथमहाराजांस माहीत नाहीं असें दिसतें. तरी ही हकीकत तुम्ही त्यांस कळवा म्हणजे ते अन्नग्रहण करतील." उद्धव म्हणला, "मी तुमची रक्कम दिली नसतां, दिली म्हणून नाथांस खोटेंच कसें सांगूं?" हें ऐकतांच सावकारास वेड लागल्यासारखें झालें. अत्यंत आश्चर्यचकित होऊन तो म्हणाला, "भटजी, हें काय बोलतां? गेल्या रात्रीं, तुम्ही माझे घरीं येऊन व मी निद्रित असतां मला हाक मारून उठवून माझी रकम दिली व मी तुमचा कर्जरोखा तुह्मांस परत दिला. असें असतां, जणूं काय आपणास यांतलें कांहीं माहीत नाहीं अशा तऱ्हेनें तुम्ही बोलतां, याचा अर्थ काय? तरी आतां हें पांघरलेलें वेड सोडून द्या आणि माझ्या अपराधाची मला क्षमा करा." सावकाराची ही विलक्षण मनःस्थिति पाहून उद्धवासहि मोठें आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, "शेटजी, तुम्ही जें काय बोलतां त्याचा मला अर्थच समजत नाहीं." इतकें म्हणून तो नाथांपाशीं गेला व हात जोडून उभा राहिला. नाथ नित्यपाठाची पोथी वाचीत बसले होते. पोथीचें पान उलटतांच कर्जरोखा त्यांच्या दृष्टीस पडला. तो हातीं घेऊन पाहतांच, तात्काळ त्यांच्या लक्ष्यांत येऊन चुकलें कीं, भगवंताशिवाय दुसऱ्याकडून हें कृत्य घडलेलें नाहीं. संधि पाहून उद्धव नाथांबरोबर बोलण्याचा उपक्रम करणार तोंच नाथांनीं कर्जरोखा त्याच्या हातीं दिला! येवढा चमत्कार घडला तरी नाथांस हर्ष किंवा विषाद कांहींच वाटत नसून, त्यांची सहजावस्था कायम आहे हें पाहून उद्धवाच्या तोंडून धन्यतेचे उद्गार निघाले. वस्तुस्थिति लक्ष्यांत येतांच सावकार नाथांच्या पायांवर लोळण घेऊन त्यांची क्षमा मागूं लागला. नाथानींहि त्याचें समाधान करून त्यास घरीं पाठविलें.

अशा रीतीनें, बारा वर्षेंपर्यंत कथाकीर्तनाचा उत्कर्ष पैठणांत नाथांच्या घरीं रात्रंदिवस चालत होता.

विठ्ठल या नांवाचा एक ब्राह्मण नाथांच्या घरीं राहून, कीर्तनाचे वेळीं ध्रुपद धरीत असे असा उल्लेख पूर्वी आला आहे. त्या ब्राह्मणाची कथा अशी आहेः—

एके दिवशीं नाथांपाशीं एक ब्राम्हण येऊन म्हणाला, "महाराज, मी तुमच्या साधुत्वाची कीर्ति ऐकून आपल्या सेवेसाठीं मुद्दाम आलों आहें. माझ्या चरितार्थापुरतें अन्नोदक मला मिळालें म्हणजे झालें. मग मी आपली सेवाकरीत येथेंच जन्मभर राहीन. माझें पाळण्यांतलें नांव ' कृष्ण ' असून, लोक मला ' श्रीखंड्या ' या नांवानें हांक मारतात. आपण जर मला कृपा करून आश्रय द्याल तर आपण सांगाल तें काम मी करीन." नाथ म्हणाले, ' ठीक आहे, तूं आमच्या घरीं खुशाल रहा. ' नाथांच्या घरीं ब्राह्मणवेषानें भगवान् श्रीकृष्ण बारा वर्षें राहिले होते अशी जी दंतकथा आहे, तींत वर्णिलेला ' श्रीखंड्या ' ब्राह्मण तो हाच होय. ह्याविषयीं पुढील आर्या प्रसिद्धच आहे:—

**श्रीएकनाथसदनीं माधवजी सर्व काम हें करितो ।**
**स्वकरें चंदन घांसी, गंगेचें पाणि कावडी भरितो ॥**

हा श्रीखंड्या नाथांचे घरीं, कावडीनें गंगेचें पाणी आणून घरांतले रांजण भरणें, गंध उगाळणें, सडासंमार्जन करणें, उष्ट्या पत्रावळी काढणें, धोत्रें धुणें वगैरे कामें करीत असे. अशा रीतीनें नाथगृहीं सेवा करण्यांत त्यानें बारा वर्षें घालविलीं. मध्यंतरीं, कोणी एक तपस्वी ब्राम्हण द्वारका येथें भगवद्दर्शनाचा हेतु मनांत धरून अनुष्ठान करीत होता. बारा वर्षें पूर्ण झाल्यावर त्याला स्वप्नांत असा दृष्टांत झाला कीं, " गोदातीरीं प्रतिष्ठान नामक नगर आहे, तेथें एकनाथांचे घरीं, त्याची सेवा करीत मी राहिलों आहें. लोक मला ' श्रीखंड्या ' असें म्हणतात. तरी, तूं तेथें जा, म्हणजे तुला माझें दर्शन होईल." त्याप्रमाणें तो तपस्वी ब्राम्हण द्वारकेहून निघून पैठणास गोदातीरीं आला व आधीं एकनाथांचें दर्शन घेऊन मग स्नान करूं, असें म्हणून गोदेस नमस्कार करून, तो शहरांत जाण्यास निघणार तोंच, गंगेवर पाणी भरण्यास आलेल्या श्रीखंड्यानें त्यास पाहिलें; व आपल्या दर्शनार्थ हा आला आहे हें जाणून, तो घाईघाईनें आपली कावड खांद्यावर घेऊन नाथगृहीं गेला व देवघरांत जाऊन गंध उगाळीत बसला. थोड्या वेळानें तो ब्राह्मण नाथांच्या वाड्यांत आला. त्यास पाहतांच नाथांनीं त्याचें मनोगत जाणून, त्यास सन्मानपूर्वक आसनावर बसविलें व ' आपल्या भेटीचा उद्देश काय ? ' असें नम्रतापूर्वक विचारलें. ब्राम्हणानें द्वारकेस झालेल्या दृष्टांताचा वृत्तांत नाथांस सांगून " मला आधीं कृष्णदर्शन करवा " अशी विनंति केली. नाथ हांसून म्हणाले, " अहो, कृष्ण सर्वत्रच भरला आहे. कृष्णाशिवाय रिकामी जागाच नाहीं. विश्वव्यापक कृष्णच आहे, असें

म्हणें याचेंच नांव कृष्णदर्शन !" ब्राह्मण म्हणाला, 'महाराज, हें ब्रह्मज्ञान मलाहि ठाऊक आहे, पण त्यानें माझें समाधान होत नाहीं. तरी, आपल्या घरीं 'कृष्ण श्रीखंड्या' या नांवाचा जो मनुष्य आहे, त्याला आणवून त्याचें मला दर्शन करवा." इतकें बोलून व नाथांचे पाय धरून, तो ब्राम्हण अश्रुमोचन करूं लागला. परमदयाशील नाथमहाराजांनीं उद्धवास हाक मारून म्हटलें, 'उद्धवा जा, श्रीखंड्यास इकडे घेऊन ये.' नाथांचे हे शब्द कानीं पडतांच, देवघरांत गंध उगाळीत बसलेल्या श्रीखंड्यानें तत्काळ श्यामसुंदर चतुर्भुज श्रीकृष्णरूप धारण केलें व तो देवगृहाच्या दारावर येऊन उभा राहिला. तें भगवंताचें परममनोहर ध्यान पाहून तो ब्राम्हण अत्यंत समाधान पावला. साष्टांग वंदन करून व हात जोडून तो म्हणाला, "देवाधिदेवा श्रीकृष्णा, आज माझ्या तपश्चर्येचें सार्थक्य झालें." देव नाथांस म्हणाले, "तुमच्या सहवासांत मी एक तप सुखांत घालविलें. आतां मला द्वारकेस जाण्यास आज्ञा असावी. मी तीन वेळां, निरनिराळ्या तीन रूपांनीं, तीन तपें तुमच्या घरीं राहून तुमची सेवा केली, तरी आपल्या सेवेची माझी आवड अद्याप कमी झाली नाहीं." नाथ म्हणाले, 'भगवंता तुझ्याशिवाय ह्या देहाचा चालक कोण आहे ? तूं हृदयस्थ होऊन रात्रंदिवस आमचें परिपालन करीत असतोस.' येवढें ऐकतांच भगवन्मूर्ति तेथल्या तेथें अदृश्य झाली. नाथांनीं त्या तपस्वी ब्राह्मणाचे पाय धरले व म्हटलें "महाराज, आज तुमच्या कृपेनें भगवंताचें प्रत्यक्ष दर्शन आम्हास घडलें." ब्राम्हण म्हणाला, "नाथमहाराज, हें सर्व आपल्याच कृपेचें फळ आहे, इतकेंच नव्हे तर आपण स्वतःच परब्रम्हमूर्ति आहांत हें आज माझ्या पूर्ण निदर्शनास आलें."

"श्रीखंड्या—आख्यान" या नांवाचें ८७ ओव्यांचें एक प्रकरण प्रसिद्ध आहे. त्याच्या शेवटीं पुढील ओंव्या आहेतः—

**एका जनार्दनीं स्वार्थ। मुक्तेश्वराचा मुख्य परमार्थ।**
**धरूनि मूळचें सूत्र। लीळा विश्वंभर म्हणविलें॥**
**मुक्तेश्वरीं कथिली कथा। वदतां धरूनि भावार्था।**
**ते पावती पुण्य पुरुषार्था। यशस्वी होती तिहीं लोकीं॥**

\+ \+ \+ \+ \+

**चरित्र देखोनि मुक्तेश्वर। बोलिले देवभक्ताचा विचार।**
**सर्वहि लीला विश्वंभर। त्याचा पार तो जाणे॥**

या ओंव्यांवरून, स्पष्टपणें कोणताच अर्थबोध होत नाहीं. शिवाय ही रचनाहि मुक्तेश्वरांची दिसत नाहीं. यावरून, मुक्तेश्वरांनीं सांगितलेली श्रीखंड्याची कथा, स्वतःचा नाम निर्देश न करितां, एखाद्या भाविक मनुष्यानें, या प्रकरणांत ग्रथित करून ठेविली असावी असें दिसतें. ह्या प्रकरणांत वर्णिलेली श्रीखंड्याची कथा थोडक्यांत अशी आहेः– एकनाथमहाराजांनीं पैठण येथें सदावर्त ठेवलें होतें. त्या कामीं त्यांस साहाय्य करावें म्हणून, भगवान् श्रीकृष्ण ब्राम्हणवेषानें त्यांच्या घरीं गेले आणि त्यांस म्हणाले, " महाराज, आपल्या दर्शनानें मला फार आनंद झाला. कांहीं दिवस आपल्या सन्निध राहून आपली सेवा करावी या उद्देशानें मी आलों आहें. मला वेतन वगैरे कांहीं नको. निर्वाहापुरतें अन्न व वस्त्रें मला मिळालीं म्हणजे झालें. " नाथांनीं त्यास विचारलें, " तुम्ही आलांत कोठून आणि तुमचें नांव काय ? " ब्राह्मणानें उत्तर दिलें. " मी द्वारकेहून आलों. माझें नांव कृष्ण. " नाथ म्हणाले, " ठीक आहे. तुम्हास वाटेल तितके दिवस तुम्ही खुशाल आमचे घरीं रहा. " ' आज्ञा ' म्हणून ब्राह्मण नाथांच्या सेवेस लागला. कावडीनें गंगेचें पाणी आणून घरांतले रांजण भरावे, नाथांस पूजासाहित्य तयार करून द्यावें, नाथ पूजेस बसले म्हणजे समोर हात जोडून उभें रहावें, अशी सेवा त्या ब्राह्मणानें बारा वर्षें केली. दरम्यान कोणी एक तपस्वी ब्राह्मण द्वारका येथें खडतर तपश्चर्या करीत होता, त्यास दृष्टांत झाला कीं, " तूं पैठण येथें एकनाथाचे घरीं जा. तेथें श्रीखंड्या हें नांव धारण करून मी रहात आहें. " त्याप्रमाणें तो ब्राह्मण पैठणास नाथांचे घरीं येऊन श्रीखंड्याची चौकशी करूं लागला. तेव्हां नाथांनीं श्रीखंड्यास बोलावून आणण्यास आपल्या शिष्यांस सांगितलें. परंतु त्याचा कोठें पत्ता लागेना. तो केव्हांच अदृश्य झाला होता. नाथांनीं मोठ्या प्रेमळवाणीनें त्याचा बराच वेळ धांवा केल्यावर, तो देवघरांतून अकस्मात् बाहेर आला. त्याचे दोन्ही हात गंधानें माखलेले होते. ब्राह्मणानें श्रीखंड्याचें दर्शन मोठ्या प्रेमानें घेतलें. नाथांस तर समाधिच लागली. नंतर श्रीखंड्या नाथांस म्हणाला, " महाराज, आपल्या घरीं मी बारा वर्षें राहिलों व आणखी कांहीं वर्षें रहावें अशी माझी इच्छा होती, परंतु या तपस्वी ब्राह्मणानें माझें खरें स्वरूप मला प्रगट करावयास लावलें; त्यामुळें, अतःपर येथें राहण्यांत आतां मौज नाहीं. " इतकें बोलून तो तेथल्या तेथें अदृश्य झाला

वरील कथेंत आणि केशव व महीपति यांनीं दिलेल्या कथेंत म्हणण्यासारखा फरक नाहीं, हें वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. असो.

महीपति म्हणतात, " पुढें, उद्धवास परमार्थोपदेश करण्याच्या निमित्तानें नाथांनीं आपलें भागवत लिहिण्यास प्रारंभ केला असतां, अदृश्य झालेला श्रीखंड्या दुसऱ्याच एका ब्राह्मणाचा वेष धारण करून नाथांपाशीं आला आणि वंदन करून म्हणाला, महाराज, माझें नांव केशव. आपल्या मुखानें भागवत श्रवण करावें या उद्देशानें मी आलों आहें. " ठीक आहे " असें म्हणून नाथांनीं त्यास आपल्या घरीं ठेवून घेतलें. नाथ भागवत लिहूं लागले म्हणजे उद्धव आणि केशव हे त्यांजपाशीं बसून भक्तिपूर्वक ग्रंथश्रवण करीत असत; व केशव तर, ग्रंथरचनेंत कोठें एखादें शंकास्थान आढळलें कीं, नाथांस प्रश्न विचारून अर्थाचें स्पष्ट विशदीकरण करून घेत असे. भगवंतानें नाथांच्या घरीं एकंदर ३६ वर्षें वास्तव्य केलें असें महीपति सांगतात. पहिलीं बारा वर्षें ध्रुपद धरणारा विठ्ठल, दुसरीं बारा वर्षें गंध उगाळून पाणी भरणारा श्रीखंड्या व तिसरीं बारा वर्षें भागवतश्रोता केशव, अशीं एकंदर ३६ वर्षें निरनिराळ्या तीन नांवांनीं भगवान् श्रीकृष्ण नाथांच्या घरीं राहिले, असा महीपतींच्या लिहिण्याचा आशय आहे. मुक्तेश्वर, अमृतराय, आत्माराम रामदासी, निळोबा वगैरे अनेक संतकवींनीं ह्या श्रीखंड्याच्या कथेचा उल्लेख केलेला असून खुद्द नाथमहाराजांनींही स्वतःच्या कवितेंत, कांहीं ठिकाणीं व्यंग्यार्थानें व कांहीं ठिकाणीं प्रत्यक्ष रीतीनें ही गोष्ट ध्वनित केली आहे. उदाहरणार्थ पुढील अभंग पहाः—

**तुह्मी करूनियां सेवा । वाढविलें मज नांवा ॥ १ ॥**
**ऐसा कृपाळु उदार । पांडुरंगा तूं निर्धार ॥ २ ॥**
**नानापरी उपचार । नित्य पुरवा अपार ॥ ३ ॥**
**उतराई नोहे देखा । म्हणे जनार्दन एका ॥ ४ ॥**

नाथांनीं सर्व लोकांस भोळा भक्तिमार्ग दाखवून, त्यांची प्रवृत्ति परमार्थाकडे वळविल्यामुळें, भिक्षुकीवर प्रपंच चालविणाऱ्या कर्मठ ब्राम्हणाची प्राप्ति कमी होऊं लागली. पुढील ओंव्यांत केशवदासांनीं ह्या ब्रम्हकोपाचें वर्णन फार चांगलें केलें आहेः—

**द्विज म्हणती हा एकनाथ । कोठुन प्रगटला येथ ।**
**याचेनि योगें लोक समस्त । भगवद्भक्त पैं जाले ॥**
**प्रपंचरीति सांडिली बहुतीं । विचरती आत्मस्थिति ।**
**आमुच्या गोष्टी न मानिती । लोकीं प्रवृत्ति बुडाली ॥**

घरोघरीं भक्ति उत्कर्ष । रामनामाचा थोर घोष ।
कीर्तनाचा अति उल्हास । विषयीं उदास बहु जाले ॥
एकनाथ दिसे भला । परि येणें संसार बुडविला ।
निवृत्तिपर गृहस्थाला । करूं लागला निजछंदें ॥
आयुःकाम पुत्रकाम । तेणें व्रताचा संभ्रम ।
जालिया आमुचा योगक्षेम । चाले तो नेमचि राहिला ॥
कैंचा कोठील एकनाथ । उगाचि आला पैं येथ ।
भोळे मूर्ख लोक समस्त । मोहिले देख पैं यानें ॥

भक्तिमार्गीय संत आणि कर्मठ भटभिक्षुक यांचें हें भांडण फार जुन्या काळापासून चालत आलें आहे. ज्ञानदेव, तुकाराम इत्यादि सर्व प्रमुख संतांचा छल भटभिक्षुकांनीं अगदीं मनापासून केला आहे. अशा स्थितींत, एकनाथांनीं, ज्ञानदेवांनंतरच्या तनिशें वर्षांत लुप्तप्राय होत चाललेल्या भक्तिमार्गास पुनः चालन दिलेलें पाहून, तत्कालीन कर्मठ ब्राह्मणाच्या तळपायाची आग मस्तकास जावी यांत कांहीं आश्चर्य नाहीं. पूर्वयुगांतल्या तपोनिष्ठ ब्राह्मणांसारखे हे कलियुगांतले ब्राह्मण जर शापादपि शरादपि असते तर त्यांनीं एकाच शापानें या सगळ्या संतमंडळीचें भस्म करून टाकलें असतें. परंतु तसल्या दैवी सामर्थ्याच्या अभावीं, सामान्य प्राकृत माणसाप्रमाणें, नुसत्या छळवादाचा अवलंब या ब्राह्मणब्रुवांस करावा लागला. पैठणांतले हे नाथद्वेष्टे भटजी तेथील चावडीवर जमा होऊन नाथांचा नक्षा कसा उतरावा आणि लोकांत त्यांची नाचक्की कशी करावी, यासंबंधाचीं खलबत करूं लागले.

'अहो धोंडभट्ट कोंडभट्ट । वेगीं यावें शामभट्ट ।
पाचारून गणेशभट्ट । विचार निकट करा म्हणती ॥
तुमचे आमचे यजमान । केवळ अज्ञान होऊन ।
संसारसोय सोडून । महाराष्ट्र पुराण ऐकती ॥
स्नानसंध्येची अधिक आस्था । जाली त्यांची हे अवस्था ।
सांडून तुमची संस्था । कर्म अन्यथा मांडिलें ॥
नेणों तया एकनाथें । चेटक काय केलें यांतें ।
रात्रंदिवस त्याचे मतें । नुसत्या नामातें घोंकिती ॥
आम्ही वेदशास्त्रसंपन्न । आम्हा न पुसती यजमान ।
सर्वस्वें एकनाथास मानून । रामकृष्ण म्हणोन नाचती ॥

२५०२६

**सांडूनियां लोकलाज । कीर्तनीं नाचती निर्लज्ज ।**
**किती सांगावें हें चोज । कांहीं उमज धरितीच ना ॥**
**डोळेझांक करितां आतां । प्रवृत्तिमार्ग बुडेल तत्त्वतां ।**
**यालागीं करून ऐक्यता । याचि पंथा मोडावें ॥**

मग या ब्राह्मणांनीं कोणता उपाय योजला ? बहिष्कार हें जें कर्मठांचें अमोघ अस्त्र तें त्यांनीं पहिल्यानें नाथांवर फेंकलें ! कांहीं सयुक्तिक कारण न दाखवितां नाथांच्या घरीं भोजनास जाण्याचें त्यांनीं बंद केलें. उद्धवभटास त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, " एकनाथाच्या घरीं अन्नग्रहण करावयाचें नाहीं असें आम्हीं ठरविलें आहे. " उद्धवानें ती गोष्ट नाथांस कळविली, तेव्हां नाथ म्हणाले, " ज्या गोष्टीनें ब्राह्मण संतुष्ट होतील ती गोष्ट करण्यास मी तयार आहें. " परंतु एवढ्या आश्वासनानें भूदेवांचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं निर्दयपणानें नाथांचा अधिकच छळ सुरू केला. गांवांत कोणी परके ब्राह्मण आले म्हणजे यांनीं त्यांस नाथांचें घर दाखवून सांगावें कीं, " एकनाथ मोठा दाता आहे. तुम्हीं त्याच्या घरीं जा, म्हणजे तो तुमची योग्य बरदास्त ठेवील. " अशा रीतीनें वेळीं अवेळीं नाथांचें सत्वपरीक्षण करावयास याचकांचे मेळे त्यांच्या घरीं पाठविण्यांत येऊं लागले. एके दिवशीं रात्रौ पैठणांत इतका पाऊस पडला कीं जिकडे तिकडे जलमय होऊन गेलें. घरांतलीं लांकडें भिजल्यामुळें तीं कांहीं केल्या पेट घेईनात व त्यामुळें, घरांत धान्य असतांही, लोकांस उपोषणाचा प्रसंग आला. अशा वेळीं, ऐन मध्यरात्रीं नाथांच्या घरीं चार ब्राह्मण अतिथि म्हणून पैठणांतील भूदेवांनीं पाठविले ! नाथ निद्रित असतांना ह्या ब्राह्मणांनीं, त्यांच्या नांवानें बाहेरून हांका मारण्याचा सपाटा चालविला तेव्हां नाथांनीं उद्धवास उठवून बाहेर कोण हांका मारीत आहे, याची चौकशी करण्यास सांगितलें. उद्धवानें दरवाजा उघडतांच ते चौघे ब्राह्मण आंत येऊन म्हणाले, "आम्हीं भुकेनें अगदीं व्याकुळ झालों आहोंत. कृपा करून आमच्या भोजनाची व्यवस्था करा. " ब्राम्हणांचें तें कळवळ्याचें भाषण ऐकतांच नाथांचें कोमल अंतःकरण दयार्द्र झालें. ते उद्धवास म्हणाले, " उद्धवा, यांच्या भोजनाची व्यवस्था केलीच पाहिजे. " उद्धव म्हणाला, " महाराज, घरांत धान्य भरपूर आहे. परंतु लांकडें ओलीं असल्यामुळें विस्तव पेटणें अशक्य आहे. " नाथ म्हणाले, " येवढेंच ना ? आपल्या घराला लांकडें काय थोडीं आहेत ? परंतु कडिपाटाचीं लांकडें काढण्यास वेळ लागेल, याकरितां, हा माझा पलंग आहे, याच्या लांकडांचा जळणाकडे उपयोग

करूं. " इतकें बोलून, नाथांनीं पलंगाचे खूर व पट्या काढून उद्धवाचे स्वाधीन केल्या व थोड्याच अवकाशांत अन्न तयार करून ब्राह्मणांस यथेच्छ भोजन दिलें! ढेंकर देत दत ब्राह्मणांनीं नाथांचें फार गौरव केलें. अशा प्रकारें पैठणच्या भटा-भिक्षुकांनीं नाथांचें सत्त्व पाहण्याची जरी अगदीं शिकस्त केली, तरी त्या ' शांति-जलधि ' एकनाथाच्या मनःसिंधूवर क्रोधाची किंवा उद्विग्नतेची एखादी लहानशी लहरी देखील उठली नाहीं ! " सर्वभूतीं भगवद्भाव " ठेवणाऱ्या त्या परम भागवताच्या या सहनशीलतेस पुराणप्रसिद्ध प्रल्हादाशिवाय, दुसऱ्या व्यक्तीची तोड सांपडणें कठीण आहे. असो.

पुढें नाथांच्या वडिलांची मृत्युतिथि जवळ आली. श्राद्धाच्या दिवशीं नाथांनीं आपल्या पुरोहितास आमंत्रण करून, घरांत पाकनिष्पत्ति करविली व स्वतः पुराणास प्रारंभ केला. उद्धव व केशव ( श्रीखंड्या ) हे श्रोते निरनिराळे प्रश्न नाथांस विचारीत होते व नाथ त्यांचें शंकासमाधान करीत होते. पुराणसमाप्ति होतांच, नाथांच्या पायांवर मस्तक ठेवून सर्व श्रोते आपापल्या घरीं निघून गेले. पाकसिद्धि होतांच उद्धवानें पुरोहितास बोलावून आणलें व नाथ श्राद्धकर्म संपादावयास बसले. इतर ब्राह्मण मंडळी गोदेवर स्नानास गेली. इतक्यांत, ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर हे तीन देव मलंगवेषानें नाथांपाशीं येऊन ह्मणाले, " महाराज, आम्ही फार भुकेलेले आहोंत. तुमची दातृत्वकीर्ति श्रवण करून येथें आलों आहोंत. तरी आमच्या जेवणाची लवकर व्यवस्था करावी. " हा ब्राह्मण आणि तो मलंग असला भेदभाव नाथांच्या ठायीं मुळींच नव्हता. त्यांनीं तात्काळ पात्रें मांडून मलंगांस जेवण घातलें. आकंठ जेऊन तृप्त झाल्यावर त्रिमूर्तींनीं दत्तरूपानें नाथांस दर्शन दिलें. नाथांनीं भगवंताच्या चरणांवर मस्तक ठेविलें. लागलीच पुनः मलंगरूप धारण करून देव चालते झाले. ते वाड्यांतून आंगणांत येतात तोंच गोदेवर स्नानास गेलेले ब्राह्मण तेथें आले ! त्यांस पाहून, मलंग ढेंकर देत देत, आपल्या भाषेंत नाथांस आशीर्वाद देऊं लागले. हें पाहतांच, ब्राह्मणांच्या अंगाचा अगदीं तिळपापड झाला. ते क्रोधानें ह्मणाले, " नाथाच्या घरचें श्राद्ध पूर्ण झालें. त्याचे सगळे पितर अगदीं तृप्त होऊन गेले. आतां येथें आमचें काय प्रयोजन आहे ? " मग ते नाथांस उद्देशून म्हणाले, " नाथा, तुझी धन्य आहे ! ब्राह्मणांच्या ऐवजीं श्राद्धांत म्लेच्छांस भोजन घालून तूं आपल्या पूर्वजांचा उद्धार केलास यांत संशय नाहीं ! " नाथ शांतपणें म्हणाले, " महाराज, असे रागावूं नका. भुकेनें व्याकुळ झालेले यवन

माझ्या दारीं आलेले पाहून मला त्यांची दया आली आणि मी त्यांस भोजन दिलें. मी सगळें घर पुनः सारवितों आणि पुनः पाकसिद्धि करवितों. आपण जेवल्याशिवाय जाऊं नये. मज गरिबावर येवढी कृपा अवश्य करावी." पण येवढ्यानें ब्राह्मणाचें समाधान झालें नाहीं. ते म्हणाले, "तुमच्या घरीं असा भ्रष्टाकार होतो. आम्ही येथें अन्नग्रहण कसें करावें ?" नाथांच्या पुरोहितास ते म्हणाले, "तुमचे यजमान मोठे धार्मिक दिसतात. त्यांनीं श्राद्धासाठीं म्लेच्छांस बोलावून त्यांस भोजन दिलें !" इतकें बोलून, ब्राह्मणांनीं गांवच्या धर्माधिकाऱ्यास बोलावून आणलें व नाथांवर कडकडीत बहिष्कार घालण्याचा विचार चालविला. तेव्हां नाथांचा उपाध्याय नाथांस म्हणाला, "हा ब्रम्हवृंद तुमच्यावर बहिष्कार घालण्याच्या विचारांत आहे, तरी त्यांची प्रार्थना करून, अपराधाची क्षमा मागा." तेव्हां नाथांनीं हात जोडून ब्राह्मणांस विनंति केली कीं, "माझ्याहातून जर कांहीं चुकी झाली असेल तर त्याबद्दल आपण मला कृपा करून क्षमा करा व येवढी श्राद्धवेळा कशी तरी संभाळून घ्या." परंतु ब्राह्मणांचा क्रोधानल अधिकच भडकत चालला. ते नाथांस उपहासपूर्वक म्हणाले, "तुमचें पुण्य येवढें अगाध आहे कीं त्याच्या योगानें तुमचे स्वर्गस्थ पितर देखील खालीं येऊन जेवतील. तेव्हां तुम्हीं त्यांनांच जेऊं घाला. आमच्याकडून हें श्राद्धकार्य होणार नाहीं." नाथांनीं शांतपणें उत्तर दिलें, "तुम्हां ब्राह्मणांच्या वचनाचा असा विलक्षण महिमा आहे कीं, तुमच्या शब्दानें पाषाणांत देखील देव प्रगट होतो. तेव्हां, तुमच्या म्हणण्याप्रमाणें माझे स्वर्गस्थ पितर खालीं येऊन जेवतील यांत काय आश्चर्य ? तुह्मी प्रत्यक्ष भूदेव; तुमच्या आज्ञेनें घडून येणार नाहीं अशी कोणती गोष्ट आहे ?" नाथांनीं ब्राह्मणांच्या गौरवार्थ केलेलें हें भाषण त्यांस कुचेष्टेचें वाटलें. ते आपसांत बोलूं लागले, "याला जर येवढी घमेंड आहे तर आणू द्या ना याला आपल्या पितरांना स्वर्गातून !" मग त्यांनीं नाथांस स्वच्छ सांगितलें कीं, "तुमचे पूर्वज जेव्हां स्वर्गातून येथें येतील तेव्हांच आम्हीं तुमच्या घरीं अन्नग्रहण करूं." नुसत्या विनवणीनें ब्राह्मणाची समजूत पडणार नाहीं, अशी खात्री होतांच नाथांनीं त्यांस वंदन केलें व तीन पाट मांडवून, आपल्या तीन मृत पूर्वजांचें आवाहन केलें. तेव्हां पुढें काय झालें ? केशवदास सांगतातः—

**गगनपंथें तीन्ही मूर्ति । येऊन स्वस्थानीं बैसती ।**
**पाहतांचि ब्राह्मण समस्तीं । माना हालविती ते काळीं ॥**

गळां विराजत ब्रह्मसूत्रें । शुद्ध नेसोनियां धोत्रें ।
हातीं सुवर्णाचीं पवित्रें । मुखीं वेदमंत्र पढताती ॥
तेजस्वी देदीप्यमान । ब्रह्मस्थिति परिपूर्ण ।
नाथें करूनि वंदन । सुखसंपन्न निजस्थिति ॥

नाथांनीं केलेली ही अद्भुत करणी पाहून पैठणचे भूदेव आश्चर्यमूढ होऊन आ वासून बसले ! त्याच पैठणांत, त्यापूर्वीं तीनशें वर्षें, तेथल्याच ब्राह्मणांनीं ज्ञानदेवादि भावंडांचा असाच छल केला असतां, ज्ञानेश्वरांनीं जेव्हां रेड्याच्या मुखानें वेद वदविले तेव्हां तो चमत्कार पाहून त्या ब्राह्मणाचीहि अशीच स्थिति झाली होती. इतिहासाची पुनरावृत्ति होते ह्मणतात ती ही अशी; आणि असें होण्याचें मुख्य कारण, इतिहासापासून जो धडा शिकावयास पाहिजे तो खुषीनें शिकण्याची मनुष्याकडून होणारी टाळाटाळ हें होय. असो.

ब्राह्मण अगदीं शांत होऊन तटस्थ बसलेले पाहून नाथ त्यांस ह्मणाले, " अहो भूदेव हो, त्रिभुवनांत तुमची योग्यता मोठी आहे. तुमच्या इच्छेनें स्वर्गस्थ पितरदेखील येथें आले. तरी आतां कृपा करा, आणि माझा अपराध पोटांत घालून भोजनास उठा." ब्राह्मणांचा सगळा अभिमान अगदीं गळून गेला होता. कांहीं एक प्रत्युत्तर न देतां त्यांतल्या ज्या ब्राह्मणांस श्राद्धार्थ आमंत्रण दिलें होतें ते गुपचूप उठून पाटावर जाऊन बसले व ग्रामाधिकारी वगैरे इतर ब्राह्मण आपापल्या घरीं जाऊन विचारार्णवांत गटंगळ्या खाऊं लागले. त्यांना वाटलें, " आतां धिःकार असो आमच्या जिण्याला ! नाथानें आमचा अगदीं पुरा नक्षा उतरला. आतां आम्हां वेदमूर्तीचें या भूमंडळावर महत्त्व आणि वर्चस्व तें काय राहिलें ? वेदकर्मापेक्षां नुसत्या भक्तीनें आणि भजनानें जर मनुष्याच्या अंगीं असें अलौकिक सामर्थ्य येऊं लागलें तर यापुढें वेदपठणावर निर्वाह चालविणाऱ्या कर्मठ भिक्षुकांचा निभाव लागणें कठीण आहे. " परंतु, अशा प्रकारच्या स्वार्थमूलक विचारसरणीबरोबरच, नाथांची पारमार्थिक योग्यता आपल्याहून पुष्कळच अधिक आहे, ही गोष्टही ब्राह्मणांच्या लक्ष्यांत येऊन, नाथांविषयीं धन्यतेचे उद्गार त्यांच्या मुखांतून बाहेर पडल्याशिवाय राहिले नाहींत. मात्र ही त्यांची सात्विक वृत्ति क्षणिकच होती. कारण, नाथांचा उत्कर्ष पैठणांतल्या ब्राह्मणांस मनापासून कधींच आवडला नाहीं; व नाथांचा छल करण्याची एकही संधि त्यांनीं फुकट घालविली नाहीं.

पैठण येथें, त्याच वेळीं, *कृष्णदास नामक एक देवी–उपासक ब्राह्मण रहात असे. त्यानें रामायणाच्या युद्धकाण्डावर ओवीबद्ध प्राकृत रचना चालविली होती. एकनाथ कविता करतो, त्यास चिडविण्यास हा प्रतिस्पर्धी चांगला आहे, या विचारानें ब्राह्मण नाथांपाशीं जाऊन, त्यांस खिजविण्याच्या उद्देशानें म्हणाले, "आपल्या पैठणांत तो कृष्णदास आहे, तो कविता काय उत्तम करितो ! तो मोठा ज्ञानी असून, त्याची वाणीहि अपूर्व आहे." ही आपल्या एका समकालीन कवीची स्तुति ऐकून, 'भिक्षुको भिक्षुकान् दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते' या न्यायानें एकनाथांस थोडा तरी विषाद वाटेल अशा आशेनें ब्राह्मण त्यांच्या तोंडाकडे पाहात राहिले. पण शेवटीं त्यांची अगदींच निराशा झाली ! कारण, ब्राम्हणांचें भाषण ऐकून नाथांच्या मनांत कोणताही विकार उत्पन्न झाला नाहीं. उलट, आपल्याप्रमाणें दुसरा एक लेखक, संस्कृतांतील रामकथा मराठी वाचकांसाठीं प्राकृतांत लिहीत आहे, हें ऐकून त्यांस आनंदच वाटला असेल. पुढें, असा चमत्कार घडला कीं, ह्या कृष्णदासांस, आपला प्रयाणकाल सन्निध आला असून, आपल्या हातून युद्धकांड पुरें होत नाहीं, असें दिसून आलें. तेव्हां, ते आपली अपूर्ण पोथी काखेस मारून नाथांपाशीं आले. त्यांस समोर येतांना पाहून नाथही आपल्या आसनावरू उठून त्यांस सामोरे गेले. ह्या दोन प्रेमळ संतकवींच्या ह्या भेटीचें पर्यवसान प्रेमालिंगनांत झालें हें सांगावयास नकोच. नाथांनीं कृष्णदासांचा आदरसत्कार करून त्यांस आपल्या शेजारीं बसवून घेतलें व आगमनाचें कारण विचारलें. तेव्हां, आपली युद्धकांडाची अपुरी पोथी नाथांपुढें ठेवून कृष्णदास म्हणाले. 'महाराज, माझा मृत्युकाल जवळ आला आहे. म्हणून येवढा हा ग्रंथ माझ्या पश्चात् आपण पुरा करावा इतकीच विनंति आहे.' नाथांनीं पोथी जवळ घेऊन तिच्यांतल्या कांहीं ओंव्या वाचून पाहिल्या. तेव्हां, त्यांतील 'वक्तृत्व, कल्पनाचातुर्य, सुभाषितें, दृष्टांत' वगैरे पाहून त्यांस मोठा आनंद झाला. मग ते कृष्णदासांस म्हणाले, "तुमचा ग्रंथ चांगला आहे. हा आपल्या काव्यगुणांनीं निःसंशय लोक-

* कृष्णदास मुद्गल नामक कवीचें युद्धकांड प्रसिद्ध असून, त्याच्या ओंव्या सुमारें १०००० आहेत. नाथचरित्रकार केशव यांनीं फक्त 'कृष्णदास' येवढेंच म्हटलें आहे; आडनांव दिलेलें नाहीं. परन्तु नाथ व हा कृष्णदास मुद्गल हे समकालीन असून, कृष्णदास मुद्गलाचें युद्धकांडही उपलब्ध असल्यामुळें. वरील कथेंतला कृष्णदास हाच असला पाहिजे यांत संशय नाहीं याची कविता बरीच चित्तवेधक असून, एका कालीं याचें युद्धकांड महाराष्ट्रांत फार प्रसिद्ध आाणि लोकप्रिय होतें.

प्रिय होईल; आणि हा तुमचा तुम्हीच पुरा करावा हें उत्तम. " कृष्णदास म्हणाले, ' महाराज, मी आतां फार थोड्या दिवसांचा सोबती असल्यामुळें, माझ्या हातून ग्रंथ पुरा होणें शक्य नाहीं. ' नाथांनीं विचारलें, " ग्रंथ पूर्ण करावयास तुम्हास किती दिवस लागतील ? " कृष्णदासांनीं सांगितलें, ' अकरा दिवस. ' नाथ ह्मणाले ' अकरा दिवस पुरे झाल्याशिवाय मृत्यु येतां कामा नये असा मनाचा निर्धार करून ग्रंथलेखन सुरू करा. ' कृष्णदास ह्मणाले, ' मृत्यूचा निरोध करण्याचें सामर्थ्य माझ्या दुर्बळाच्या अंगांत कोठलें ? आपण कृपा करून काळास तशी आज्ञा कराल तर आपल्या आज्ञेनें उल्लंघन त्याच्याकडून होणार नाहीं. ' तेव्हां नाथांनीं त्यांस आश्वासन देऊन, आपल्याच वाड्यांत बसून ग्रंथ पुरा करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें कृष्णदासांनीं ग्रंथ पुढें लिहिण्यास सुरुवात केली. कांहीं वेळानें त्यांचा मृत्युकाल सन्निध येतांच ते अगदीं विव्हल झाले. तेव्हां नाथांनीं आपला वरद हस्त त्यांच्या अंगावरून फिरविला. नाथांच्या इच्छाशक्तीपुढें मृत्यूस माघार घ्यावी लागली. मृत्युवेळा टळतांच, कृष्णदास सावध होऊन आसनावर बसले. नाथांचें हें अलौकिक सामर्थ्य पाहून ते आश्चर्यचकित झाले. कृष्णदासांस मृत्युमुखां-तून नाथांनीं सोडविलें ही वातमी हां हां म्हणतां पैठणभर पसरली, तेव्हां भटांचें धाबें धडाडलें. " टाळकुट्याच्या अंगीं येवढें सामर्थ्य ! अं ? " असें म्हणून, पुढें बाराव्या दिवशीं कृष्णदास खरोखरच मरतो कीं काय, याची वाट पहात बसण्याचें त्यांनीं ठरविलें. पुढें अकरा दिवसांत कृष्णदासांनीं आपला ग्रंथ लिहून पुरा केला व मोठ्या आनंदानें तो नाथांपुढें ठेवून ते त्यांस म्हणाले, " महाराज, स्वतःच्या हातून ग्रंथ पुरा व्हावा, अशी जी माझी इच्छा ती आपल्या कृपेनें पूर्ण झाली. आतां, आपला कृपाहस्त माझ्या मस्तकीं ठेवून, आपण स्वर्गलोकीं माझी रवानगी करावी. " इतकें बोलून त्यांनीं नाथांपुढें लोटांगण घातलें. नाथांनीं आपली इच्छा-शक्ति आवरून धरितांच, मृत्यूच्या कोणत्याही वेदना न होतां, कृष्णदास पंचत्व पावले. आतां पुढें काय करावें, अशी विवंचना विप्रमंडळांत सुरू झाली.

नाथांच्या चरित्रांतली आणखी एक गोष्ट अशीच विलक्षण आणि चिंतनीय आहे. ही गोष्ट म्हटली ह्मणजे, निरनिराळ्या पांच ग्रंथकारांस त्यांच्या कृपेनें, आशी-र्वादानें किंवा सामर्थ्यानें ग्रंथरचनास्फूर्ति झाली ही होय. नाथांच्या कृपेनें आपलें युद्धकांड पुरें करण्यास कृष्णदास मुद्गल समर्थ झाले, हा कथाभाग वर आलाच आहे. याशिवाय, नाथांचे नातू मुक्तेश्वर हे जन्मतः मुके

असतां, नाथकृपेनें त्यांस वाचा फुटली अशी कथा प्रसिद्ध आहे. नाथांचे एक शिष्य गावबा हे अपंडित असतां, आपल्या भावार्थरामायणाचा उर्वरित भाग पुरा करण्याचें सामर्थ्य नाथांनीं त्यांस दिलें. त्याचप्रमाणें, प्रसिद्ध ' हरिवरदा ' ग्रंथाचे कर्ते श्रीमत्कृष्णदयार्णव यांस सदर ग्रंथ लिहिण्याची स्फूर्ति नाथांनीं दिलेल्या दृष्टांतामुळेंच झाली, हेंही खुद्द दयार्णवस्वामीनींच ' हरिवरदा ' ग्रंथांत नमूद केलें आहे. याशिवाय, पेशवाईच्या अखेरीस पुण्याच्या बाजूस होऊन गेलेले ठाकुरदास बाबा यांनींही, एकनाथमहाराजांच्या कृपेनेंच आपणास कवित्वस्फूर्ति झाली असा स्पष्ट उल्लेख आपल्या कवितेंत केला आहे. परंतु, यासंबंधानें विशेष विवेचन यथावकाश पुढें करूं.

कर्नाटकांतील एका गांवांत कोणी एक व्यापारी होता त्यानें श्रीविठ्ठलाची एक सुंदर प्रतिमा तयार करवन ती आपल्या घरीं आणली; व ती प्रतिमा आपल्या घरांत स्थापन करून तिचें नित्य पूजन अर्चन करावें या उद्देशानें, प्रतिमेची प्राणप्रतिष्ठा करण्याचा मुहूर्त मुकर करून, प्रतिष्ठासमारंभाच्या साहित्याची जमवाजमव तो करूं लागला. तों एके रात्रीं स्वप्नांत त्यास असा दृष्टांत झाला कीं, " माझी स्थापना तूं येथें करूं नकोस. गोदातीरीं पैठण शहरांत एकनाथ नामक सत्पुरुष राहतो, त्यास ही मूर्ति तूं अर्पण कर. माझी स्थापना तेथेंच व्हावी अशी माझी इच्छा आहे, आणि या इच्छेविरुद्ध आग्रहानें माझी स्थापना जर तूं येथेंच करशील तर परिणाम चांगला होणार नाहीं. " असें स्वप्न होतांच, तो व्यापारी खडबडून जागा झाला व साशंक होत्साता स्वप्नाचा विचार करूं लागला. पुढें प्रातःकाळ होतांच, त्यानें गांवच्या पुरोहितादि विप्रमंडळीस बोलावन आणलें व दृष्टांताची हकीकत त्यांस कळविली. त्या सर्वांनीं, पूर्ण विचारान्तीं असें ठरविलें कीं, सावकारानें, एकाग्र चित्त करून, आणखी दोन दिवस वाट पहावी व तेवढ्या अवधींत जर पुनः असेंच स्वप्न पडलें तर पुढें काय करावयाचें हें मागाहून ठरवूं. हा विचार सावकारास पसंत पडला व त्याप्रमाणें आणखी दोन दिवस वाट पाहण्याचें त्यानें ठरविलें. तों दुसरे व तिसरे दिवशीं रात्रौ पुनः तेंच स्वप्न त्यास पडलें. पुनः गांवांतील प्रमुख लोकांस बोलावून, स्वप्नाची द्विवार पुनरावृत्ति झाल्याचें त्यानें त्यांस कळविलें. तेव्हां सर्वानुमतें, असा निर्णय देण्यांत आला कीं, " भगवंतानें स्वप्नांत केलेली आज्ञा शिरसावंद्य मानून त्याप्रमाणें करावें. " मग सावकार मूर्ति बरोबर घेऊन नाथांकडे जाण्यास निघाला व लवकरच पैठणास गोदातीरीं येऊन पोंचला. तेथें तो माध्यान्हकालीं स्नानसंध्यादि नित्यकर्म करीत असतां, कोणी एक श्रीमंत व्यापारी पैठणांत आला आहे,

ही वार्ता गांवांतील ब्राह्मणांच्या कर्णपथावर जाऊन आदळली. मग काय विचारतां? आपापल्या घरच्या वह्या घेऊन ब्राह्मण गोदाकांठीं धांवत सुटले व त्या सावकाराच्या पूर्वजांचीं नांवें आपापल्या वहींत शोधण्यासाठीं वह्यांचीं पानें उलगडूं लागले. सावकाराच्या पूर्वजांचीं नांवें आपल्या वहींत सांपडावीं व तो आपला यजमान ठरावा ही प्रत्येकाची इच्छा! तों, त्या सावकारानें ब्राह्मणास विचारलें, " येथें एकनाथ या नांवाचे गृहस्थ आहेत ते कोठें राहतात? त्यांची भेट घेण्यासाठीं मी मुद्दाम येथें आलों आहें. " येवढें विचारून, आपणास पडलेल्या स्वप्नाची सविस्तर हकीकत त्यांस त्यानें सांगितली. ती ऐकतांच नाथांविषयींचें ब्राम्हणांचें वैषम्य पुनः जागृत झालें. ते आपसांत बोलूं लागले, " अरे, या एकनाथाचें स्तोम दिवसेंदिवस फारच वाढत चाललें, वरें का. कर्नाटकासारख्या दूरदूरच्या प्रांतांतील लोकसुद्धां त्याच्या दर्शनास येऊं लागले! " परंतु, शेवटीं द्रव्यतृष्णेनें द्वेषावर मात केली व जो तो ब्राम्हण, सावकाराकडून दक्षिणा उपटण्यासाठीं, "एकनाथ महाराज आमचे यजमान." असें बिनदिक्कत त्यास सांगूं लागला. सावकारानेंही ब्राह्मणांचें मनोगत जाणून, सर्वांस यथाशक्ति दक्षिणा देऊन वाटेस लाविलें व स्वतः एकनाथांच्या घरीं जाण्यास निघाला. तेथें जातांच नाथांची शांत मूर्ति अवलोकन करून त्यास मोठा आनंद झाला. नाथ आपल्या आसनावर बसले होते त्यांनीं जेव्हां ह्या गृहस्थास पाहिलें, तेव्हां तो कोणत्या उद्देशानें आला आहे हें त्यांनीं तात्काळ जाणिलें व आसनावरून उठून त्याचा सत्कार केला. सावकारानें आपला आगमनहेतु त्यांस सविस्तर सांगितला. तो म्हणाला, ' श्रीपांडुरंगाची मूर्ति घरांत ठेवून तिची नित्य पूजा अर्चा करावी या हेतूनें, मोठ्या आवडीनें मी एक सुंदर प्रतिमा तयार करविली व चांगला मुहूर्त पाहून मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याचा दिवस मुक्रर करून, समारंभाच्या तयारीस लागलों, तों लागोपाठ तीन रात्रीं मला असा दृष्टांत झाला कीं, पैठण येथें महा भगवद्भक्त एकनाथ हे वास्तव्य करीत आहेत, त्यांस ही मूर्ति नेऊन अर्पण करावी व स्वतः मीही पैठणास जाऊन आपलें दर्शन घ्यावें, व येथेंच मोठ्या समारंभानें मूर्तीची प्रतिष्ठापना करावी. ' इतकें बोलून सावकारानें ती श्रीपांडुरंगमूर्ति नाथांपुढें ठेविली व नाथांनीं ती उचलून आपल्या मस्तकीं धारण केली. मूर्तीचें तें मनोहर ध्यान पाहून नाथांस मोठें समाधान वाटलें. उद्धवानें जेव्हां ती मूर्ति पाहिली तेव्हां तो तर अगदीं वेडावून गेला. पुढें, प्रतिष्ठापनोत्सवाचा दिवस ठरवून समारंभाची जय्यत तयारी उद्धवानें केल्यावर, ठरलेल्या दिवशीं, उपाध्यायादि ब्राह्मणांस बोलावून, त्यांजकडून, नाथांनीं स्वतःच्या

देखरेखी खालीं मूर्तीस अभिषेक वगैरे यथाशास्त्र करविला. भोजनसमारंभाचा थाट तर अपूर्वच होता. मूर्तीस नैवेद्य दाखविण्याच्या वेळीं नाथ स्वतः आपल्या हातावर लोण्याचा गोळा घेऊन मूर्तीपाशीं गेले आणि भगवंतास ह्मणाले. " देवा, हा येवढा नैवेद्य भक्षण करून आपलें देवत्व प्रगट करा. हें स्थळ आपणास पसंत पडलें ह्मणून आपण येथवर आलां तरी येवढें लोणी भक्षण करून, आम्हा प्राकृत जनांस आपली लीला दाखवावी. " आपल्या प्रेमळ भक्ताची ही लडिवाळपणाची प्रार्थना ऐकून, त्या पांडुरंगमूर्तीनें हास्यवदनानें, आपली जीभ बाहेर काढून, नाथांच्या करतलावरील लोणी मोठ्या आवडीनें चाखलें ! तो चमत्कार पाहतांच, भटांसुद्धां सर्व प्रेक्षक अगदीं तटस्थ झाले; व सर्वांनीं ' पुंडलीक वरदे हरिविठ्ठल ' या नामाचा येवढ्या मोठ्यानें गजर केला कीं, त्याच्या प्रतिध्वनीनें सभोंवतालचें वातावरण दुमदुमून गेलें ! भोजनसमारंभ आटोपल्यावर रात्रौ नाथांनीं स्वतः कीर्तन केलें. तो सर्व सुखसोहळा पाहून त्या सावकारास वाटलें कीं, नाथां-सारख्या भगवद्भक्ताचें दर्शन होण्याचा व कीर्तन ऐकण्याचा योग आज आपणास आला, यामुळें आपण धन्य झालों. मग तो अत्यंत विनयपूर्वक नाथांस ह्मणाला " महाराज, या पांडुरंगमूर्तीसारखीच रुक्मिणीचीही एक सुंदर मूर्ति मी तयार करवितों व तिजबरोबर या पांडुरंगमूर्तीचें आपण लग्न करूं. आपण वरपक्षाचीं मंडळी व आमचा वधूपक्ष. रुक्मिणीची मूर्ति तयार होतांच आम्ही लग्नाची सगळी तयारी करून आपणास वर्दी देऊं. मग आपण वरासह आमच्या गांवीं यावें." हीं योजना नाथांस पसंत पडली. ते म्हणाले, ' भगवंताची तशीच इच्छा असेल म्हणून आपणास अशी प्रेरणा झाली. तरी तुम्ही आपल्या गांवीं जाऊन, मूर्ति तयार कर-वून विवाहाची सगळी तयारी करा. तुमचा निरोप येतांच आम्ही निघतों. ' सावकार संतुष्ट होऊन, नाथांचा निरोप घेऊन आपल्या गांवीं गेला. जातेवेळीं, नाथांस त्यानें विनंति केली कीं आपल्या सर्व परिवारासह आपण लग्नास यावें. जो खर्च लागेल तो आम्ही करूं. असें म्हणून, वाटखर्चासाठीं बरीच मोठी रकम त्यानें उद्धवापाशीं दिली. आपल्या गांवीं पोंचल्यावर, अल्पावधींतच त्यानें एक सुंदर रुक्मिणीची प्रतिमा तयार कराविली व विवाहाची सर्व सामग्री सिद्ध केली. वरपक्षाच्या आदरातिथ्याची उत्कृष्ट तयारी त्यानें केली होती. इकडे पैठणांत, नाथांच्या आज्ञेवरून उद्धवानें, पुष्कळ भोळे भाविक व आंधळे, पांगळे, वेडे, दरिद्री वगैरे लोक वऱ्हाडी जमविले. त्या लोकांस चांगलीं वस्त्राभरणें घालून गाड्यांत बसविलें; व हें प्रचंड वऱ्हाड

वधूपक्षाच्या गांवीं जाण्यास पैठणाहून निघालें. वरमूर्ति पालखींत घालून चालविली होती. हें वऱ्हाड जेव्हां पैठणांतून जाऊं लागलें तेव्हां, शहरांतील नरनारींचा समुदाय, 'देव नवरा होऊन लग्नास निघाला!' असें मोठ्या कौतुकानें बोलत, तटस्थ होऊन तो देखावा पहात होता. नाथांची पत्नी गिरिजाबाई ही मुख्य वऱ्हाडीण रथांत वसून चालली होती. पुढें मंगल वाद्यें वाजत होतीं व निशाणें फडकत होतीं. वाटेंत, वऱ्हाडी मंडळी मधून मधून हरिनामाचा गजर करीत होती. वरपक्षाची मंडळी आपल्या गांवानजीक आल्याचें वर्तमान त्या सावकारास कळतांच, तोही आपल्या ग्रामस्थ जनांसह, वाजत गाजत पुढें आला; व नाथमूर्ति दृष्टीस पडतांच त्यांच्या पायांवर त्यानें डोकें ठेविलें. नाथदर्शनानें गांवांतील सर्व लोकांस मोठी धन्यता वाटली. पुढें पांडुरंग–रुक्मिणीविवाहाचा जो अपूर्व थाट उडाला, त्याचें अवलोकन रसिक, सहृदय आणि प्रेमळ वाचकांनीं आपल्या कल्पनेनेंच करावें, हें चांगलें. विवाहोत्सव झाल्यावर, मंडळीच्या विनंतीस मान देऊन नाथांनीं कीर्तन केलें. नंतर परत पैठणास जाण्यासाठीं, त्या सावकाराचा त्यांनीं निरोप मागितला. परंतु, पूर्वपुण्याईनें घरीं आलेल्या नाथांस निरोप देणें त्याच्या जीवावर आलें. त्याचे डोळे पाण्यानें भरून आले; "जा" हा शब्द त्याच्या तोंडून निघेना. शेवटीं, मोठ्या मुष्किलीनें त्याची एकदांची समजूत करून व गांवांतील इतर लोकांचा प्रेमानें निरोप घेऊन, वधूवरांसह, नाथ परत पैठणास आले त्यांस गांवांत नेण्याकरितां, गांवांतील भाविक लोक वेशीवर आले होते. स्त्रिया आरत्या घेऊन उभ्या होत्या; त्यांनीं वधूवरांस मोठ्या प्रेमानें ओवाळलें. पुढें सर्व मंडळी नाथांच्या वाड्यांत आली. तेथें लग्नविधीनिमित्त मोठा भोजनसमारंभ झाला. दोन्ही मूर्तींची नाथगृहीं स्थापना करण्यांत आली. अशा रीतीनें, विठ्ठल–रुक्मिणीचा आपल्या घरांत प्रवेश झालेला पाहून, आपणास पंढरपुरच्या यात्रेस जाण्याची पांडुरंगानें ही सूचनाच दिली आहे, असें नाथांस वाटलें. मग नाथ उद्धवास म्हणाले, "मीं पंढरीस जावें अशी पांडुरंगाची इच्छा दिसते; म्हणून आतां पंढरीस जाण्याचा माझा विचार आहे. माझ्या गैरहजिरींत येथील सर्व व्यवस्था तूं ठेव." 'आज्ञा' म्हणून उद्धवानें, नाथांच्या पंढरीच्या यात्रेची तयारी चालविली. उत्तम मुहूर्त पाहून, अनुयायी मंडळीसह दिंड्या पताका फडकावीत, टाळमृदंगाच्या घोषांत नाथ पंढरीस जाण्यास निघाले. ज्या ज्या ठिकाणीं मुक्काम होई तेथें तेथें

नाथांचें कीर्तन होत असे. घरीं पैठणास, नाथांच्या नित्यक्रमाप्रमाणें, पूजन, अर्चन, भजन, कीर्तन वगैरे प्रकार उद्धवानें यथास्थित चालविले होते. इकडे, पंढरपुरांत पांडुरंगानें आपल्या भक्तमंडळीस दृष्टांत देऊन सुचविलें कीं प्रतिष्ठानचा महाभागवत भानुदासकुलतिलक श्रीएकनाथ माझ्या भेटीसाठीं पंढरीस येत आहे. तरी तुम्ही सर्व संतजन हरिकीर्तन करीत नगरद्वारीं जाऊन, अत्यंत सन्मानपूर्वक त्यास इकडे घेऊन या; आणि येत्या चतुर्दशीस महाद्वारीं त्याचें कीर्तन होऊं द्या. सर्व संत हर्षभरित होत्साते महाद्वारीं येतात तों नगरासमीप होत असलेला प्रंचड वाद्यगजर त्यांच्या कानीं पडला; व चंद्रभागेच्या पैलतीरीं भजनाचा घोष होत आहे, हें ऐकतांच, ‘ एकनाथ आले ’ अशी एकच आरोळी होऊन नाथांच्या स्वागतार्थ संत आणि नागरिक यांचा प्रचंड समुदाय चंद्रभागेच्या वाळवंटाकडे आनंदातिरेकानें धांवत सुटला. नाथांचा जयजयकार करीत, मंडळीनें त्यांना नौकेंतून सपरिवार नगरांत नेलें. सगळ्या संतांनीं नाथांस दंडवत घातले व नाथांनीं सर्व संतांच्या चरणांवर मस्तक ठेविलें. भजन करीत करीत सर्व मंडळी श्रीपांडुरंगाच्या देवालयांत आली. गरुडपारीं नाथांनीं द्वादश साष्टांग नमस्कार घातले. गाभाऱ्यांत जाऊन नाथांनीं श्रीविठ्ठलमूर्तीचें दर्शन घेतांच त्यांची वृत्ति तदाकार झाली. प्रेमळ भक्त आणि भक्ताभिमानी देव यांच्या त्या भेटीचा सोहळा वर्णन करण्यास आमच्या सारख्या अभक्तांची क्षुद्र लेखणी कशी समर्थ होणार ? असो.

देवदर्शनविधि झाल्यावर, मंडळीनें नाथांस त्यांच्या बिऱ्हाडीं नेऊन पोंचविलें. तेथें सर्व प्रकारची आवश्यक सामग्री अगदीं जय्यत तयार ठेवण्यांत आली होती. स्नानसंध्या व संतांसह पंक्तिभोजन झाल्यावर, विठ्ठलाज्ञेप्रमाणें, चतुर्दशीस कीर्तन करण्याची विनंति संतमंडळीनें नाथांस केली; व पांडुरंगाची तशी आज्ञा झाल्याचेंही कळविलें. त्याचप्रमाणें, पंढरपुरची विठ्ठलमूर्ति पूर्वी विद्यानगरच्या राजानें आपल्या राजधानीस नेली होती, ती नाथांचे प्रपितामह भानुदास यांनीं परत पंढरीस आणली, हा सविस्तर कथाभागही संतांनीं एकनाथांस सांगितला व ‘ तुमच्या प्रपितामहानीं विद्यानगराहून जी मूर्ति आणली तीच ही येथें विटेवर उभी आहे व या मूर्तीपुढें आपलें कीर्तन व्हावें हें युक्तच आहे,’ असेही उद्गार त्यांनीं काढले. परंतु भक्तिमार्गाचा प्रसार करण्यासाठींच ज्यांचा अवतार, त्या नाथांस इतक्या आग्रहाची काय जरुरी ? ते मोठ्या आनंदानें कीर्तनास उभे राहिले. नाथचरित्रकार केशव ह्मणतातः—

सर्वांसी देऊन सन्मान । गरुडपारीं येऊन ।
चतुर्दशीतें कीर्तन । नाथें आपण पैं केलें ॥
संत महानुभाव श्रोते । श्रवणीं एकाग्र चित्तें ।
तटस्थ होऊनि सुखातें । ब्रह्मानंदातें अनुभाविती ॥
ब्रह्मरूप काया कीर्तनीं । महिमान शोभे ऐसी वाणी ।
ऐकोनियां संतजनीं । चोज मनीं करिताती ॥
नवल वक्तृत्वाची थोरी । चित्तासी येऊनि समाधि वरी ।
सुखसमुद्राची लहरी । निघती वरीं शब्दरत्नें ॥

अशा रीतीनें पंढरीची यात्रा पुरी झाल्यावर, बरोबरच्या मंडळीसह नाथ परत पैठणास गेले.

पैठणांत एक संन्यासी राहत असे, त्याची अशी चाल होती कीं, भेटलेल्या मनुष्यास लोटांगण घालावयाचें. त्यामुळें लोक त्यास 'दंडवत' म्हणत असत. त्याचें बाह्य वर्तन एखाद्या पिसाटासारखें असे व लोकही त्याची अंतःस्थिति न ओळखतां त्यास वेडाच समजत असत. या 'दंडवत' संन्याशाची नाथांच्या ठायीं फार प्रीति असून, तो प्रत्येक दिवशीं नियमानें नाथदर्शनास येत असे व लहर लागेल तेव्हां पुराणश्रवणासही बसत असे. एके दिवशीं तो संन्यासी गोदेवर स्नानास गेला असतां, आपल्या नियमाप्रमाणें, दृष्टीस पडेल त्या प्राण्यास लोटांगण घालूं लागला. तेव्हां त्याची थट्टा करावी या उद्देशानें, भटांनीं, तेथें एक मेलेलें गाढव पडलें होतें तें त्यास दाखवून त्यास लोटांगण घालण्यास सांगितलें. संन्याशानें आपल्या नित्यनियमाप्रमाणें त्या गाढवासही लोटांगण घातलें. तेव्हां ब्राह्मण त्यास म्हणाले, 'ह्या मेलेल्या गाढवास लोटांगण घालून काय उपयोग ? त्यापेक्षां, तुमच्या अंगांत सामर्थ्य असेल तर ह्या गाढवास जीवंत करा आणि मग लोटांगण घाला.' ब्राह्मणांच्या कुचेष्टाबुद्धीकडे लक्ष्य न देतां संन्याशानें तें गाढवाचें प्रेत आपल्या हातानें थोपटलें, तोंच असा चमत्कार झाला कीं, तें गाढव खरोखरच जीवंत झालें. आश्चर्यचकित होत्साते ब्राह्मणांचे थवेच्या थवे नाथगृहीं धांवत जाऊन त्यांनीं ही हकीगत नाथांस कळविली. "या कलिकालांत अशा गोष्टी करणें योग्य नाहीं," असें म्हणून नाथ गोदातीरीं आले तों त्या संन्याशाच्या सभोंवताला लोकांची गर्दी झालेली असून, त्याच्या दैवी सामर्थ्याची लोक चर्चा करीत आहेत, असें त्यांस दिसलें. तेव्हां ते म्हणाले, "झाला हा प्रकार चांगला झाला नाहीं. कारण,

याचा परिणाम आतां असा होईल कीं, ज्यांच्या घरचीं माणसें यापुढें मरतील ते सगळे याजपाशीं येऊन, आमचें माणूस उठवा म्हणून धरणें धरून बसतील; इतकेंच नव्हे तर, याच्या अंगीं अशी विलक्षण शक्ति असल्यामुळें, एखादे वेळीं हा आपणास त्रासदायक होईल, या विचारानें यवन राज्यकर्ते यास कदाचित् बंदींत देखील नेऊन घालतील." इतकें बोलून नाथांनीं त्या संन्याशास हातीं धरून बाजूस नेलें व म्हटलें "आतां तुम्हीं या देहीं, या वेषानें, या लोकीं राहणें धोक्याचें आहे" संन्याशी म्हणाला, "ठीक आहे. मी आतां याच घटकेस समाधि घेतों." नाथांसही हा विचार पसंत पडला. मग त्यांनीं कामाठी लोकांस बोलावून, गोदातीरीं संन्याशाच्या समाधीची तयारी केली व संन्याशानें, नाथांच्या देखत, समाधिस्थ होऊन देहत्याग केला. पण, यामुळें दुसरेंच एक विघ्न उपस्थित झालें. नाथांचा छळ करण्यास ब्राम्हणांस हें एक आयतेंच साधन मिळालें. ते मोठ्या क्रोधानें नाथास म्हणाले, "मृत प्राण्यास जीवंत करण्याचें सामर्थ्य या संन्याशाच्या अंगीं असतां तुम्ही त्याला समाधि दिली, ती कोणत्या शास्त्राच्या आधारानें ? या कृत्याला तुम्ही जर योग्य शास्त्राधार दाखविला नाहीं तर तुमच्या हातून ही हत्या घडली, असें समजून आम्ही तुमच्यावर बहिष्कार घालूं." ब्राम्हणांस हात जोडून नाथ म्हणाले, "तुम्ही समर्थ ब्राह्मण, तुमच्यापुढें माझा दीनदुबळ्याचा कसा पाड लागणार ? मी शास्त्र पाहिलें नाहीं किंवा ऐकलेंही नाहीं तेव्हां मी तुम्हास शास्त्राधार कोठून दाखवूं ? पण, या कृत्यामुळें मी पतित झालों, असें जर तुम्हास वाटत असले, तर मला पावन करण्याचें सामर्थ्य तुमच्या चरणतीर्थांत आहे." परंतु या नम्रपणाच्या भाषणानें ब्राम्हणांचा क्रोधानल शांत झाला नाहीं, उलट नाथांचा शांतपणा पाहून त्यांना अधिकच चेव आला. ते म्हणाले, असल्या शब्दपांडित्यानें आमचें समाधान होणार नाहीं. तुमच्या हातून आतांच जें पातक घडलें त्याचें निरसन अगोदर झालें पाहिजे. नाथचरित्रकार केशव सांगतात:—

**छळछळूनि बोलती वचन । केव्हढें याचें धैर्य पूर्ण ।**
**परमहंसासी पुरून । निश्चित आपण बैसला ॥**
**वेदशास्त्रीं नसतां गति । उगेंचि वर्तावें उद्धतीं ।**
**वाढवूनियां महंति । नाडिलें निश्चिती जगातें ॥**
**नुसत्या नामाचा पाठ । सांगोनि करविला बोभाट ।**
**लोक केले रे कर्मभ्रष्ट । ब्राह्मण्य स्पष्ट बुडविलें ॥**

**एक म्हणती अहो ऐका । परमहंस पुरितां आवांका ।**
**उपजला जैं विवेका । तुमचा निका पुरुषार्थ ॥**
**ऐसें तुमचें पूर्णपण । तरी आतां दावा हें करून ।**
**पाषाणनंदीकडून । करावें भक्षण कडवाडें ॥**

येवढेंच बोलून ब्राह्मण थांबले नाहींत तर त्याच ठिकाणीं पूर्वी रेड्याच्या तोंडून ज्ञानेश्वरानीं वेद बोलविले होते या गोष्टीचीही आठवण नाथांस त्यांनीं करून दिली व ह्मटलें, ज्ञानदेवांप्रमाणेंच तुमचेंही ज्ञान खरें जर असेल तर या पाषाणाच्या नंदीकडून तुम्ही गवत खाववून दाखवा. इतकें बोलून, ब्राह्मणांनीं एक कडब्याची पेंढी नाथांपुढें आणून ठेविली ! नाथांचा अगदीं निरुपाय झाला. कडब्याची पेंढी हातीं घेऊन ते नंदीपाशीं गेले आणि म्हणाले, ‘तुझ्याकडून ही कडब्याची पेंढी मी खाववावी अशी या भूदेवांची आज्ञा आहे, तेव्हां या आज्ञेस तूं मान दिला पाहिजेस.” नाथांच्या तोंडचे येवढे शब्द कानीं पडतांच त्या पाषाणाच्या नंदीनें जीभ बाहेर काढून कडबा भक्षण केला ! परातीसारखीं तोंडें करून ब्राह्मण हा प्रकार पहात होते. कडबा खाऊन झाल्यावर नंदी चालत गेला व गोदेच्या डोहांत त्यानें उडी घेतली ! ब्राह्मणांनीं नाथांवर उगारलेलें बहिष्कारशस्त्र निमूटपणें मागें घेतलें.

# प्रकरण पांचवें.

## ज्ञानदेव-समाधि-जीर्णोद्धार, ज्ञानेश्वरीसंशोधन.

पुढें कांहीं दिवसांनीं, श्रीज्ञानदेवमहाराजांचें अवतारचरित्र ज्या ठिकाणीं पूर्ण झालें, तें आळंदी क्षेत्र एकदां डोळ्यांनीं पहावें, अशी उत्कंठा नाथांच्या मनांत उत्पन्न झाली. ज्ञानदेवमहाराजांचा 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ नाथांच्या वाचनांत आल्या-वर, असा अत्यंत प्रतिभासंपन्न अलौकिक ग्रंथ लिहिणाऱ्या थोर पुरुषाच्या समा-धीचें दर्शन घेण्याची इच्छा नाथांसारख्या सत्पुरुषास व्हावी हें अगदीं साहजिक होतें. एके दिवशीं, पुष्कळ संतमंडळीसह नाथ पैठणाहून निघून, कांहीं दिवसांनीं आळंदीनजीक इंद्रायणीतीरीं आले तेव्हां तो उध्वस्त प्रदेश पाहून व अरण्यांतल्या भयंकर श्वापदांचे भीषण शब्द ऐकून बरोबरची मंडळी पुढें जाण्यास कचरूं लागली. तेव्हां नाथांनीं त्यांस धीर देऊन तेथेंच नदीकांठीं मुक्काम करण्यास सांगितलें व स्वतः ज्ञानेश्वरांच्या समाधीचा शोध लावण्यासाठीं ते अरण्यांत शिरले. तेथें फिरतां फिरतां थोड्याच वेळांत एक सुंदर अजान वृक्ष त्यांच्या दृष्टीस पडला. ज्ञानदेवांच्या समाधीपाशीं अजान वृक्ष आहे असें त्यांनीं पूर्वीं ऐकलें होतें, त्यामुळें, हा अजान वृक्ष पाहतांच, महाराजांची समाधि येथें जवळच कोठें तरी असली पाहिजे, असें वाटून त्यांस मोठा आनंद झाला. परंतु, त्या अजान वृक्षाच्या शेजारीं आणखी अनेक वृक्ष व वारुळें असल्यामुळें, समाधीची जागा कोणती याचा पत्ता सहज लागण्यासारखा नव्हता. शोधतां शोधतां रात्र होऊन काळोख पडूं लागला, तरी नाथ आपल्या उद्दिष्ट कार्यांत इतके गढून गेले होते कीं, बाह्य सृष्टींत झालेल्या या फेरफाराची त्यांस दादही नव्हती. ते तेथेंच एका जागीं विचारमग्न होऊन बसले असतां, श्रीज्ञानेश्वरांनीं प्रगट होऊन त्यांस दर्शन दिलें. नाथांनीं महाराजांचें वंदन करून प्रार्थना केली कीं, 'आपल्या समाधीचें मुख्य स्थान पाहण्याची मला मोठी उत्कंठा लागून राहिली आहे; परंतु पुष्कळ शोध केला तरी तें ठिकाण सांपडत नाहीं.' ज्ञानदेवांनीं नाथांस हातीं धरून, आपल्या समाधीपाशीं नेलें व सांगितलें कीं, "माझी समाधि अस्तित्वांत आहे कीं नाहीं,

याविषयीं लोकांच्या मनांत विकल्प राहूं नये म्हणून या स्थानाची दुरुस्ती करावी. त्याचप्रमाणें या अजानवृक्षाची मुळी माझ्या मस्तकाजवळ आली आहे, ती काढून टाकावी. शिवाय, नेवासें येथें मी श्रीमद्भगवद्गीतेवर मराठी भाष्य केलें, तें गेल्या तीनशें वर्षांत झालेल्या पाठांतरांमुळें फार विकृत झालें आहे, तरी त्या ग्रंथाचेंही संशोधन करून, शुद्ध प्रत तयार करावी " ज्ञानदेव आणी एकनाथ यांचा हा 'सुखसंवाद' तीन दिवस आणि तीन रात्री चालला होता. इकडे, नाथ अरण्यांत शिरले ते अद्याप परत येत नाहींत असें पाहून बरोबरची मंडळी चिंताक्रांत झाली. शिवाय, त्या अरण्यांत त्यांस अन्नही मिळेना, त्यामुळें त्यांचे फारच हाल झाले. नाथचरित्रकार केशव ह्मणतात, खुद्द ज्ञानदेव, त्या वेळीं, वाण्याचें रूप धारण करून, तेथें गेले आणि लहानशी राहुटी उभारून तींत दुकान मांडून बसले. आकाशाकडे तोंडें करून, हवा खात बसलेली नाथांबरोबरची मंडळी हें अकस्मात् उघडलेलें दुकान पाहतांच, तेथें येऊन वाण्यास म्हणाली, " या ओसाड अरण्यांत येऊन दुकान घालण्याचा विचार तुह्मांस कसा सुचला ? " वाणी ह्मणाला, "वरीच यात्रा जमलेली पाहून, येथें आपल्या मालाची चांगली विक्री होईल, या विचारानें मी येथें आलों. " हें ऐकून त्या बुभुक्षितांस मोठा आनंद झाला व पैसे देऊन आपल्या जरूरीचे पदार्थ विकत घेण्यास ते पुढें सरसावले. तेव्हां वाणी त्यांस ह्मणाला, "येथें जितके दिवस तुह्मास रहावें लागेल, तितके दिवस, रोज जी जी सामग्री लागेल ती ती नेत जा, आणि तुमचा प्रमुख परत आल्यावर, एकदम हिशोब करून मग पैसे द्या. कारण, मी नेहमीं याच पद्धतीनें व्यापार करीत असतों. " मंडळीनें तें कबूल केलें. त्याप्रमाणें तीन दिवस ज्ञानोबा वाण्याचा आणि यात्रेकरू मंडळीचा व्यवहार चालला होता. सर्व मंडळीस नाथदर्शनाची मोठी उत्कंठा लागून राहिली होती. चौथ्या दिवशीं नाथ अरण्यांतून परत आपल्या मंडळीपाशीं आले. त्यांस तीन दिवस उपोषण घडलें होतें, यासाठीं, मंडळीनें त्यांजकडून स्नान करवून, त्यांच्या भोजनाची तयारी केली. जेवतांना, नाथांस एकानें विचारलें कीं, ज्ञानेश्वरमहाराजांची समाधि आपणास सांपडली काय ? नाथ म्हणाले, " सांपडली. परंतु वृक्षाची मुळी महाराजांच्या कंठास जाऊन भिडली आहे, ती अगोदर काढली पाहिजे. तरी तुम्हीही मजबरोबर तिकडे या. " मग भोजन झाल्यावर, सर्व मंडळी अरण्यांत समाधीपाशीं गेली व कुदळी घेऊन समाधीच्या सभोंवतालची जमीन खणूं लागली. खणतां खणतां महाराजांच्या कंठास लागलेली

मुळी सांपडली. ती मुळी युक्तीनें काढीत असतां, ज्ञानेश्वरांची तेजःपुंज मस्तकाकृति सर्वांच्या दृष्टीस पडली. गळ्याजवळची मुळी काढल्यावर, ज्ञानदेवनामाचा सर्वांनीं जयजयकार केला. पुढें, मंडळीनें समाधीचा जीर्णोद्धार करून व सभोंवतालची झाडी तोडून, आच्छादलेला मार्ग मोकळा केला. त्यामुळें, भाविकांस ज्ञानेश्वरसमाधिदर्शन सुलभ झालें. त्या अरण्यांत इंद्रायणीतीरीं या यात्रेकरू लोकांचा सात दिवस मुक्काम होता व तेवढ्या वेळांत त्यांस जें सामान लागलें तें सगळें त्या वाण्यानें पुरविलें. सातवे दिवशीं, समाधीचें शेवटचें दर्शन घेऊन, वाण्याचा हिशोव करून त्याचे पैसे चुकते करावे म्हणून मंडळी नदीतीरीं आली. पण वाणी कोठें दृष्टीस पडेना. तो कधींच अदृश्य झाला होता. मंडळीनें ही हकीगत नाथांस कळविली. तेव्हां ते म्हणाले, " परमेश्वराची लीला विचित्र आहे. तुम्ही भाग्यवान् आणि सदाचारी म्हणून हा प्रकार घडला. आतां, वाण्याचीं जीं भांडीकुंडीं तुमच्यापाशीं असतील, तीं समाधीपाशीं नेऊन ठेवा." मंडळीनें त्याप्रमाणें केलें व हरिनामाचा गजर करीत, नाथांसह सर्व मंडळी परत पैठणास आली. तेथें नाथांनीं, ज्ञानदेवमहाराजांच्या आज्ञेप्रमाणें, ज्ञानेश्वरी ग्रंथाचें संशोधन करून त्याची शुद्ध प्रत तयार केली. एकनाथांनीं, इद्रायणीकांठच्या अरण्यांत लुप्तप्राय झालेल्या ज्ञानेश्वरसमाधीचा शोध लावला ही हकीकत त्या प्रांताच्या अधिकाऱ्यास समजतांच त्यानें आळंदी येथें लोकांकडून वस्ती करविली व तेथें एका ग्रामाधिकाऱ्याची नेमणूक केली. एकनाथचरित्रकार केशव यांनीं दिलेली ही शेवटची माहिती जर खरी असेल तर तें एक मोठें आश्चर्यच मानलें पाहिजे. कारण, एकनाथ महाराजांच्या कालीं, महाराष्ट्रावर यवनाची सत्ता होती व त्यामुळें, आळंदी क्षेत्राची वस्ती करविणारा हा अधिकारीही, वहुतकरून यवनच असला पाहिजे. हा तर्क जर वरोबर असेल तर, हिंदुधर्माविषयीं त्यानें दाखविलेली ही सहिष्णुता अत्यंत स्तुत्य होय यांत संशय नाहीं. असो.

आळंदी येथें जाऊन, ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचें मुद्दाम दर्शन घेण्याची इच्छा नाथांस झाली, याचें कारण, महाराजांचा ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचून, त्यांच्या विषयीं नाथांच्या मनांत उत्पन्न झालेली पूज्यबुद्धि होय. ज्ञानेश्वरीसारखा अलौकिक ग्रंथ तीनशें वर्षांपूर्वीं ज्या महापुरुषानें लिहिला, त्याचें समाधिस्थान कोठें आहे हें देखील तत्कालीन लोकांस माहीत नसलेलें पाहून त्यांस सखेदाश्चर्य वाटलें व इंद्रायणीच्या तीरीं पुणें प्रांतीं हें समाधीचें ठिकाण कोठें तरी आहे, ह्या कर्णोपकर्णीं चालत आलेल्या दंतकथेच्या आधारावर पैठणापासून आळंदीपर्यंतचा

प्रवास करून व अरण्यांत पूर्ण विस्मृत होऊन राहिलेल्या ज्ञानेश्वरसमाधीचा शोध लावून, त्या स्थलाचा त्यांनीं जीर्णोद्धार केला. एका साधुकवीनें, आपल्यापूर्वी शेंकडों वर्षें होऊन गेलेल्या दुसऱ्या एका साधुकवीच्या समाधीविषयीं व ग्रंथाविषयीं दाखविलेली ही आस्था व कळकळ, महाराष्ट्रांत किंवा महाराष्ट्र वाङ्मयांत जरी केवळ अपूर्व नसली तरी मोठी कौतुकास्पद, अभिमानजनक आणि अनुकरणीय आहे यांत संशय नाहीं. 'ज्ञान्याचा एका' ही थोर पदवी नाथांस मिळाली ती याच कारणामुळें. असो.

ज्ञानेश्वरीच्या अनेक हस्तलिखित प्रती मिळवून व तुलनात्मक दृष्टीनें त्या सर्वांचें संशोधन करून अर्थदृष्ट्या मूळचे खरे पाठ मुक्कर केल्यावर, त्या ग्रंथावर पुराण सांगण्यास नाथांनीं प्रारंभ केला. ज्ञानेश्वरीसारखा अलौकिक ग्रंथ आणि त्याचा अर्थ विशद करून सांगणारा नाथांसारखा स्वानुभवी वक्ता, अशी जोडी जमल्यावर श्रोत्यांच्या भाग्यास काय पारावार ? नाथमहाराजांनीं ज्ञानेश्वरी ग्रंथावर पुष्कळच परिश्रम केले होते हें त्यांच्या स्वतःच्या ग्रंथांतील अनेक स्थलांवरून दाखवितां येण्यासारखें आहे. असो.

केशव या नांवाचा जो ब्राह्मण भागवतश्रवणनिमित्तानें नाथांच्या घरीं बारा वर्षें राहिला होता, त्यानें एके दिवशीं नाथांस विनंति केली कीं, ' महाराज, आज एक तप आपल्या समागमांत घालवून मी सुखसंपन्न झालों, तरी आतां मला स्वदेशीं जाण्यास आज्ञा असावी. ' नाथांनीं ही त्याची विनंति मान्य करून त्यास रजा दिली. उद्धव नाथांच्या सेवेंत नेहमीं दक्ष असे. त्याच्या नाथभक्तीचें वर्णन नाथचरित्रकारांनीं येणेंप्रमाणें केलें आहेः—

" श्रीनाथसंगें उद्धव । भक्तीचा पुतळाचि स्वयमेव ।
नित्य नूतन बोधानुभव । भोगी सद्भाव वाढवूनि ॥
सर्व साहित्य करितां सेवा । अधिकचि उल्हास वाटे जीवा ।
धन्य धन्य त्याचिया भावा । अवतार लाघवा पाहतसे ॥
नाथ–आसनासन्मुख । बैसोनि भोगी श्रवणसुख ।
ते काळींचा आनंद देख । भोक्ता एक उद्धवचि ॥
माध्यान्हीं संतर्पणसमयीं । सेवेसी सादर ठायीं ठायीं ।
ब्राम्हण पूजासाहित्यही । स्वहस्तेंचि पाहीं करावें ॥

**कीर्तनकाळीं अनुदिनीं । उभा राहे ध्रुपद धरोनी ।**
**नाथकृत प्रबंध गाणीं । स्वर देऊनि गातसे ॥**
**पाठ प्रबंध इतिहास । नाथवाणीचा अतिसौरस ।**
**आठवूनि अहर्निश । कीर्तनीं उल्हास गावया ॥**
**श्रीनाथकृपासत्पात्र । सांठवण उद्धवचि स्वतंत्र ।**
**भक्तिज्ञान वैराग्यपर । आचार पवित्र तो एक ॥**

एकदरींत उद्धवाची नाथांविषयींची ही भक्तिप्रेमबुद्धि मोठी वर्णनीय आणि उभयतां गुरुशिष्यांस ' परस्परो भूषणभूष्यभावः ' या कव्युक्तीप्रमाणें अत्यंत भूषणावह होती यांत संशय नाहीं. प्राचीन कालीं गुरुशिष्यांचा संबंध कसा जिव्हाळ्याचा असे हें असल्या उदाहरणांवरून समजतें. एकनाथ महाराजांनीं गृहत्याग करून वनवास पतकरला नव्हता म्हणूनच केवळ त्यांस प्रापंचिक म्हणावयाचें; वस्तुतः संसारांत असूनही संसारापासून ते अलिप्तच होते; आणि कोणताही पूर्णज्ञानी पुरुष संसाराशीं कधीं समरस होऊं शकेल, ही गोष्ट केवळ अशक्य होय. अशा स्थितींत, उद्धवासारखा कार्यैकनिष्ठ शिष्य नाथांजवळ होता म्हणूनच त्यांचा प्रपंच परमार्थपोषक झाला, नाहीं तर, तुकारामबुवांच्या संसाराची जी स्थिति, तीच नाथांच्या संसाराचीही झाल्याशिवाय राहिली नसती. अस्तु.

कोणी एक अंतर्निष्ठ ज्ञानी अनामिक पैठण शहरच्या एका कोंपऱ्यांत त्या वेळीं राहात असे. एके दिवशीं, नाथांची भेट घ्यावी अशी इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न झाल्यामुळें, नाथ गोदेवर स्नानास येतांच, त्यांस दंडवत करून तो त्यांच्या सन्निध आला. नाथांनींही त्याचें मनोगत जाणून, त्याच्याशीं भाषण सुरू केलें. इकडे, नाथ महाराज एका महाराबरोबर बोलत आहेत ही बातमी ब्राह्मणांस कळतांच, ते तेथें आले व नाथांस म्हणाले, " या अनामिकाबरोबर तुम्ही अध्यात्मज्ञानाच्या गोष्टी बोलत आहांत, हें तुमचें वर्तन धर्मबाह्य आहे. " नाथांनीं उत्तर दिलें, " भूदेव हो ! याची आकृति तुमच्या आमच्यासारखीच नाहीं का ? मग याला अनामिक कां ह्मणावयाचें ? अनामिकपणाचीं कोणतीं लक्षणें याच्या ठायीं तुम्हास दिसतात ? " हें ऐकतांच ब्राह्मण अत्यंत क्रोधायमान होत्साते ह्मणाले, "आग लागो या असल्या ज्ञानाला आणि धिक्कार असो तुमच्या ज्ञातेपणाला ! या धडधडीत भ्रष्टाकराचें समर्थन करण्यास तुह्मास दिक्कत कशी वाटत नाहीं ? हें

तुमचें ज्ञान तुम्हालाच लखलाभ होवो, आम्हांस तें नको. ” क्रोधायमान झालेल्या कर्मठ ब्राह्मणांचें समाधान नुसत्या युक्तिवादानें होणें शक्य नाहीं असें पाहून नाथ त्यांस नम्रतापूर्वक ह्मणाले, “ माझ्या हातून हा अपराध घडला खरा पण त्याबद्दल आपण मला आतां क्षमा केली पाहिजे. ” असें ह्मणून सर्व ब्राह्मणांस त्यांनीं साष्टांग नमस्कार घातला. नाथांची ही नम्रता पाहून ब्राह्मणही क्षणभर चकित झाले. ते आपसांत बोलूं लागले, “ अनामिकाशीं भाषण करून जरी यानें धर्मविरुद्ध वर्तन केलें आहे, तरी आह्मां ब्राह्मणांविषयींची याची आदरबुद्धि कायम आहे. तरी, याच्या हातून घडलेल्या दोषाबद्दल याला कांहीं तरी प्रायश्चित्त देऊन पावन करून घेतलें पाहिजे. ” मग ब्राह्मण नाथांस ह्मणाले, “ तुह्मी आतां सचैल स्नान करा; आणि आह्मी तुम्हांस पंचगव्य देतों तें प्राशन करून पावन व्हा. ” नाथांनीं त्याप्रमाणें मोठ्या आनंदानें केलें.

इकडे, त्या अनामिकास, नाथांशीं झालेल्या संवादामुळें मोठा हर्ष होऊन, त्यानें तीं हकीकत आपल्या भार्येस सांगितली. तेव्हां ती म्हणाली, “ आमच्यासारख्या नीच जातीयांस सत्पुरुषसेवेचा लाभ कोठून होणार ? एकनाथमहाराजांस घरीं आणून त्यांचें भक्तिपुरस्सर पूजन करावें, अशी मला फार उत्कंठा आहे. परंतु त्या उच्च वर्णाच्या ब्राम्हणास आपल्या घरीं कसें येतां येईल ? ” असें म्हणून ती अनामिक-पत्नी रडूं लागली. तेव्हां तिचा पति तिला म्हणाला, “ तूं कांहीं खेद करूं नकोस. नाथमहाराजांच्या मनांत उच्चनीच भाव बिलकुल नाहीं, अशी माझी खात्री आहे. आपण त्यांना आमंत्रण केल्यास ते आपल्या घरीं खचित येतील. तर, तूं भोजनाची सर्व सिद्धता कर. ” पतीचें हें आश्वासन ऐकून तिला फार संतोष झाला व तिनें मोठ्या प्रेमानें आणि आस्थेनें स्वयंपाक करून, नाथांस बोलावून आणण्यास आपल्या भ्रतारास सांगितलें. तेव्हां तो नाथांकडे जाऊन निःशंकपणें त्यांस म्हणाला, “महाराज, आज आमच्या घरीं आपण भोजनास यावें, अशी आमची फार इच्छा आहे. ” नाथ सर्वांदेखत म्हणाले, “ अवश्य येऊं. ” नाथांचें हें उत्तर ऐकून ब्राह्मणांस व इतरांसही मोठें आश्चर्य वाटलें व ते आपापसांत कुजबुजूं लागले. परंतु, त्या अना-मिकाचा हर्ष गगनांत मावेना. तो धांवतच आपल्या घरीं गेला व नाथ येत आहेत हें आनंदाचें वर्तमान आपल्या पत्नीस कळवून, व सर्व पूजासाहित्य तयार ठेवून नाथांची वाट पहात बसला.

इकडे ब्रम्हमंडळांत मोठा कोलाहल माजून राहिला. अनामिकाबरोबर नुसतें भषाण

केल्यावद्दल नाथांस ज्यांनीं प्रायश्चित्त दिलें, त्यांस, अनामिकाच्या घरचें अन्नग्रहण म्हणजे धर्मभ्रष्टतेचा अगदीं कडेलोट वाटावा यांत आश्चर्य नाहीं. त्यांनीं एक सभा भरवून, असा ठराव केला कीं, आज अंत्यजाच्या घरीं नाथ अन्नग्रहण करीत असतां, त्यांस हातोहात पकडून त्यांची पुरी फजीती करावयाची. मग या ठरावाची अंमल-बजावणी तावडतोव सुरू झाली. नाथांच्या वाड्यापासून त्या अंत्यजाच्या घरापर्यंत, वाटेवर ठिकठिकाणीं ब्राह्मण उभे करण्यांत आले ! परंतु, नाथ त्या अनामिकाच्या घरीं जाऊन पाटावर बसेपर्यंत या गोष्टीचा बोभाटा होऊं द्यावयाचा नाहीं अशी पूर्ण खबरदारी घेण्यांत आली होती. इकडे नाथ आपल्या घरीं स्नानसंध्यादि नित्यकर्म सारून, स्वस्थ बसले असतां, तो अनामिक पुनः त्यांजकडे येऊन, हात जोडून म्हणाला, " महाराज, जेवणाची वेळ झाली. आतां उठावें. " नाथांनीं त्यास सांगि-तलें, "तूं आपल्या घरीं जाऊन पात्रें मांड; ब्राम्हणाचें तीर्थ घेऊन मी लवकरच येतों." त्याप्रमाणें तो अनामिक आपल्या घरीं निघून गेला. ब्राम्हणांचे गुप्त हेर हा सगळा संवाद कान देऊन ऐकत होते. त्यांनीं हें वर्तमान अखिल ब्रम्हवृंदास कळवितांच भ्रष्टतेच्या पुराव्यासह नाथांस पकडण्यासाठीं ते अगदीं सज्ज होऊन राहिले. तो अना-मिक आपल्या घरीं जाऊन पोंचला तोंच त्याच्या मागोमाग नाथही तेथें गेले. त्यांस पाहतांच, त्या दांपत्यास जो निरतिशय आनंद झाला त्याची वाचकांनीं नुसती कल्पनाच करावी. त्या अंत्यजानें नाथांस पाटावर बसवून त्यांची यथासांग पूजा केली व त्यांच्या गळ्यांत फुलांच्या माळा घातल्या. अंत्यजपत्नीनें एका विस्तीर्ण ताटांत अन्न वाढ-ण्यास सुरुवात केली. हा सगळा प्रकार ब्राम्हणांनीं चोरून पाहिला व तें वर्तमान नाथांच्या शेजारीं राहणाऱ्या इतर ब्राम्हणांस कळविण्यासाठीं ते मोठ्या उत्कंठेनें धांवत सुटले. नाथ अंत्यजाच्या घरीं पाटावर बसून भोजन करण्यास प्रवृत्त झाले आहेत हे त्यांच्या तोंडचे शब्द ऐकतांच, अल्पावकाशांतच, शेंकडों ब्राम्हण, अंत्यजगृहास वेढा देऊन, मुद्देमालासह नाथांस पकडण्याच्या उद्देशानें, महारवाड्याकडे जाण्यास निघाले. वाटेंत नाथांचा वाडा लागला तेव्हां तिकडे त्यांनीं हळूच डोकावून पाहिलें तों नाथ वाड्यांत बसले आहेत असें त्यांस दिसलें. तेव्हां अधिकच आश्चर्यचकित होत्साते ते अंत्यजगृहीं आले तों तेथें पाटावर बसून नाथ अंत्यजानें केलेली पूजा ग्रहण करीत आहेत असा देखावा त्यांच्या दृष्टीस पडला. आपल्या डोळ्यांस कांहीं भ्रम तर झाला नाहीं ना, अशी शंका त्यांस उत्पन्न होऊन ते पुनः घाईघाईनें नाथगृहीं आले तों तेथें नाथ पूर्ववत् स्वस्थ बसलेले त्यांच्या दृष्टीस पडले. तरी

देखील नाथांच्या अलौकिक सामर्थ्याविषयीं त्यांची खात्री होईना. नाथचरित्रकार केशव म्हणतात:—

**तेथें पाहती जैसा । येथेंही तोचि तैसा ।**
**वारंवार धांवतां क्लेशा । क्षीण मानसाप्रती तयां ॥**
**प्रातःकाळापासून । तीन प्रहरपर्यंत जाण ।**
**धावंतां कष्टले ब्राम्हण । हिंपुटी होऊन बैसले ॥**
**सारिखें स्वरूप दोहीं स्थळीं । ब्राम्हणीं पाहिलें सकळीं ।**
**श्रमी होऊन ते वेळीं । कर कपाळीं पीटिती ॥**

आणि सत्पुरुषाच्या छलाचें पर्यवसान शेवटीं स्वतःच्या मस्तकताडनांतच व्हावें यांत आश्चर्यही नाहीं; कारण काळ्या दगडाच्या भिंतीवर एखाद्यानें जरी कितीही जोरानें आपलें डोकें आपटलें तरी भिंतीचा एकही दगड न हालतां, आपटणाराच्या डोक्याच्याच चिंधड्या उडावयाच्या हें अगदीं ठरल्यासारखें आहे. पैठणच्या ब्राह्मणाची अशीच स्थिति झाली. दोन्ही ठिकाणीं नाथांस पुनः पुनः सारखें तीन तास पाहून त्यांना अगदीं वेड लागण्याचा प्रसंग येऊन ठेपला. ते आपसांत या चमत्काराची उपपत्ति लावूं लागले. नाथांस सावरी विद्या येत असल्यामुळें त्यांनीं हा नजरबंदीचा प्रयोग चालविला आहे असें आपलें मत एका ब्राह्मणानें मोठ्या गंभीरपणानें सांगितलें. दुसरा म्हणाला, 'छट्, कोठली आली आहे सावरी विद्या ! एकनाथानें एखादा आग्यावेताळ प्रसन्न करून घेतला असेल, त्याच्या ह्या सगळ्या भूतचेष्टा आहेत." अशा रीतीनें, अनेकांनीं, आपापल्या मगदुराप्रमाणें, अनेक प्रकारचे तर्क कुतर्क लढविले, परंतु, विश्वांतील भूतमात्राचा सूत्रधार जो परमेश्वर त्याच्या कृपेनें प्राप्त झालेल्या अलौकिक सामर्थ्याचे हे खेळ असतील ही कल्पना मात्र एकासही सुचली नाहीं.

इकडे, त्या अंत्यजानें व त्याच्या पत्नीनें नाथांस प्रेमानें आग्रह करून, पोटभर जेवावयास वाढलें; आणि, ' आम्हां अनाथ दुर्बलांच्या घरची मीठभाकर खाऊन आपण आज आम्हास धन्य केलें ' असें म्हणून त्यांजविषयींची आपली कृतज्ञता व्यक्त केली. त्यांचा शुद्ध भाव पाहून नाथ त्यांस म्हणाले, ' तुमचा जन्म जरी अनामिकांच्या कुलांत झालेला आहे तरी तुम्ही आपल्या सदाचरणानें आणि हरिभक्तीनें स्वतःचा उद्धार केला आहे. '

वरील प्रकार इकडे घडत होता, त्याच वेळीं नाथ आपल्या वाड्यांत देवपूजा

करण्यांत गुंतले होते ! अशा प्रकारचें अलौकिक सामर्थ्य अंगीं असल्यामुळेंच, तत्कालीन महाकर्मठ ब्राम्हणांच्या प्रतिकारास न जुमानतां, आपणास योग्य वाटली ती सुधारणा, स्वतःच्या व्यक्तीपुरती, अमलांत आणणें नाथमहाराजांस सुलभ झालें. ‘ विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ’ हा वैष्णवधर्मांचा दंडक अक्षरशः पाळण्याची ज्याची महत्त्वाकांक्षा असेल त्यानें प्रथमतः सर्व जग ‘विष्णुमय’ पाहिलें पाहिजे आणि तसें तें नाथमहाराजानीं पाहिलें होतें, इतकेंच वरील कथेवरून सिद्ध होतें. येरवीं, ज्या नाथ महाराजांस ज्ञानेश्वरांचा अवतार समजतात त्यांजकडून,

**‘ अहो शूद्राचिया घरीं आघवीं । पक्वान्नें आहाति बरवीं ।**
**तीं द्विजें केविं सेवावीं । दुर्बळ जरी जाहला ॥**

ह्या ज्ञानेश्वरींतील उपमेविरुद्ध, बुद्धिपुरस्सर आचरण खात्रीनें घडलें नसतें. द्विजकोटीहून पुष्कळ पटीनीं श्रेष्ठ अशी जी परमहंस कोटी तींत एकदां प्रविष्ट झाल्यावर विशिष्ट-ज्ञातिविषयक निर्बंधांस कोण विचारतो ? वरील ओवीचे कर्ते खुद्द ज्ञानदेव आणि नामदेवादि तत्कालीन इतर उच्चवर्णीय संत हे चोखामेळ्यासारख्या अनामिकाच्या घरीं उघड उघड अन्नग्रहण करीत होते असें जर महीपतींसारख्या ब्राह्मण लेखकांनीं आपल्या ग्रंथांत स्पष्ट लिहून ठेवलें आहे तर या गोष्टीच्या सत्यतेविषयीं शंका घेण्याचें कांहीं कारण नाहीं. रेड्याच्या तोंडून वेद बोलविण्याचें ज्यांचें सामर्थ्य त्यांस अना-मिकाच्या घरीं अन्नग्रहण करण्याचाही अधिकार असावा यांत आश्चर्य तें काय ? असो.

कोणा एका भाविक मनुष्यास दैवयोगानें परीस सांपडला. तेव्हां त्याच्या योगानें त्यास मोठें भाग्य प्राप्त झाल. ह्या भाग्याचा त्यानें कित्येक वर्षें उपभोग घेतला. परंतु पुढें दुर्दैवानें त्याची भार्या व पुत्र मरण पावले व त्यामुळें तो अत्यंत शोकाकुल झाला. त्याचें संपत्तीनें भरलेलें घर त्याला स्मशानवत् वाटूं लागलें. शेवटीं मनास समाधान प्राप्त व्हावें म्हणून त्यानें काशीयात्रेस जाण्याचा बेत केला. परंतु जवळचा परीस कोणापाशीं ठेवावा, याविषयीं त्याला मोठी काळजी उत्पन्न झाली; कारण त्याच्या ओळखीच्या लोकांत, विश्वास ठेवण्यास सर्वस्वी लायक असा एकही मनुष्य आढळेना. शेवटीं शुद्धचरित आणि अत्यंत वैराग्यसंपन्न अशी नाथांची दैवी मूर्ति त्याच्या डोळ्यांपुढें उभी राहून, आपला परीस नाथांपाशीं ठेवला असतां त्यास बिलकुल धोका नाहीं अशी त्यास खात्री वाटली. म्हणून तो, आपला परीस बरोबर

घेऊन रात्रौ नाथांच्या कीर्तनास आला व कीर्तन संपून श्रोतेजन आपापल्या घरीं गेल्यावर, नाथांस एकटे गांठून, आपला काशीयात्रेस जाण्याचा विचार त्यांस त्यानें नम्रतापूर्वक कळविला, व यात्रेहून परत येईपर्यंत आपला परीस ठेवून घेण्याची विनंतिही केली. आपल्या द्रव्याचा व्यय तीर्थयात्रेसारख्या सत्कार्यार्थ करण्याचा हा तुमचा विचार फार चांगला आहे असें म्हणून, नाथांनीं त्याचा परीस आपल्यापाशीं ठेवून घेण्याचें कबूल केलें. नाथांनीं दिलेलें आश्वासन ऐकून त्या गृहस्थास मोठा आनंद झाला व आपल्या जवळचा परीस नाथांच्या हातीं देऊन तो आपल्या घरीं जाण्यास निघाला. तेव्हां त्यास थांबवून नाथ म्हणाले, " अहो, हा तर शुद्ध पाषाण दिसतो. " गृहस्थ म्हणाला, ' महाराज, बाह्यतः हा पाषाण दिसतो खरा, पण वस्तुतः हा परीस आहे. लोखंडास ह्याचा स्पर्श झाला असतां त्याचें तात्काळ सोनें होतें. अशी याचे अंगीं विलक्षण शक्ति आहे. तरी, ही गोष्ट आपण कोठें प्रगट करूं नये. ' आपल्या हातीं असलेला पाषाण परीस असून, त्याचे अंगीं लोखंडाचें सोनें करण्याचें सामर्थ्य आहे, हें ऐकतांच कोणत्याही सामान्य संसारी मनुष्यानें आश्चर्यानें आ वासला असता, परंतु नाथांसारख्या निरुपचार संतोषी पुरुषाच्या मनावर त्याचा काय परिणाम होणार ? " ठीक आहे " असें म्हणून नाथांनीं तो परीस आपल्या घरांतल्या देव्हाऱ्याखालीं ठेवला व त्या गृहस्थास निरोप दिला.

पुढें, उत्तरेकडच्या सर्व यात्रा करून तो गृहस्थ एक वर्षानें परत पैठणास आला. त्यापूर्वीं, नाथांस त्या परिसाची विस्मृति होऊन, देवपूजेच्या निर्माल्याबरोबर गोदेच्या पात्रांत त्याला कधींच जलसमाधि मिळाली होती. पैठणास आल्यावर त्या गृहस्थानें यात्राविधान वगैरे केलें व परीस मागून घेण्याच्या उद्देशानें तो नाथदर्शनास आला. नाथांस त्यानें साष्टांग नमस्कार घातला व त्यांनींही उठून त्याला आलिंगिलें. आपणास पाहतांच, नाथ आपला परीस आणून देतील अशा समजुतीनें त्यानें बराच वेळ वाट पाहिली. परंतु जेव्हां तसें कांहीं लक्षण दिसेना, तेव्हां आज पहिलाच दिवस आहे; उद्यां आपला परीस नाथ खचीत परत देतील असा विचार करून, कांहीं न बोलतां तो परत गेला. परंतु त्याचें मन अत्यंत उद्विग्न झालें होतें. त्या सबंध रात्रींत त्याला कांहीं झोंप लागली नाहीं. एकदां सूर्योदय होतो केव्हां आणि नाथांपाशीं जाऊन आपला परीस आपण मागून घेतों केव्हां, असें त्याला झालें होतें. दुसरे दिवशीं सकाळींच उठून तो नाथदर्शनास

गेला. नाथांनीं त्याजबरोबर यात्रेसंबंधीं अनेक गोष्टी केल्या, परंतु परीसाचा उल्लेख त्यांच्या भाषणांत शेवटपर्यंत निघाला नाहीं. तेव्हां, आतां भीड सोडून आपणच परीसाची गोष्ट काढावी असा विचार करून, तो म्हणाला, ' महाराज, आपल्या कृपेनें माझी तीर्थयात्रा यथास्थित रीतीनें पार पडली. आतां, माझा परीस कृपा करून आपण परत द्यावा. ' त्या घटकेपर्यंत नाथांस परिसाचें बिलकुल स्मरण नव्हतें; अर्थातच, त्या गृहस्थानें परिसाची गोष्ट काढतांच ते थोडेसे चपापले. ' तो परीस मी कोठें ठेवला होता हें तुम्हास आठवतें काय ? ' असें त्या गृहस्थास त्यांनीं विचारलें. तेव्हां तो म्हणाला कीं, मी आपल्या हातांत परीस दिला व तो आपण देवघरांत नेऊन ठेवला, इतकें मला आठवतें. नाथ देवघरांत गेले व तेथील कानाकोंपरा त्यांनीं धुंडाळला, पण परिसाचा पत्ता लागेना. तो गृहस्थही मोठ्या आशाळभूतपणानें नाथांबरोबर परिसाचा शोध करीत होता. शेवटीं, परीस हरवला अशी जेव्हां त्याची खात्री झाली तेव्हां तो खालीं मान घालून स्फुंदस्फुदून रडूं लागला. पूर्ण वैराग्यशील नाथमहाराज आपल्या परिसाचा अभिलाष करणार नाहींत अशा विश्वासानें तो आपण त्यांच्या स्वाधीन केला आणि अखेर फसलों, असें त्यास वाटलें. नाथांनीं आपल्या परिसाचा अपहार केला असून, विस्मरण झाल्याचें ढोंग करून, आतां परीस शोधण्याची खोटीच बतावणी ते करीत आहेत, अशी त्याची समजूत झाली. परीस हरवल्याबद्दल नाथांस बिलकुल चिंता वाटली नाहीं, परंतु त्या गृहस्थाची मनःस्थिति जाणून ते त्यास म्हणाले, " आणखी दुसरीकडे शोध करून तुमचा परीस मी तुम्हास खचित देईन. " पण या आश्वासनानें त्या गृहस्थाचें समाधान झालें नाहीं. नाथ स्नानार्थ गंगेवर जाण्यास निघाले तेव्हां तोही त्यांजबरोबर निघाला. त्याची ती केंविलवाणी स्थिति पाहून, नाथांनीं पाण्यांत बुडी मारली आणि नदींतले कांहीं दगड हातीं घेऊन ते वर आले; व ते दगड त्या गृहस्थापुढें धरून त्यास म्हणाले " यांतला तुमचा परीस कोणता तो निवडून घ्या. " गृहस्थानें लोखंडाचे तुकडे खिशांत घालून नेले होते, ते बाहेर काढून, नाथांच्या ओंजळींतल्या एकेका दगडास त्यानें लावून पाहिले तों प्रत्येक दगडास लोखंडाचा स्पर्श होतांच त्याचें सोनें होऊं लागलें ! नाथांच्या हातांतले सगळेच पाषाण परीस आहेत हें पाहून, त्यांतला कोणता परीस आपण घ्यावा हें त्याला समजेना. मग त्या द्रव्यलोभी गृहस्थानें असें ठरविलें कीं, सगळेच परीस आपण घ्यावे. इतक्यांत नाथ त्यास म्हणाले, " माझ्या स्नानास विलंब होतो, तरी आपला परीस तुम्ही लवकर

ओळखून घ्या. विनाकारण खोटी करूं नका. ” तेव्हां सगळे-परीस घेण्याचा विचार रहित करून त्यानें चटकन् त्यांतला एकच परीस उचलून खिशांत टाकला. झालेला प्रकार पाहून, तो अगदीं आश्चर्यचकित होऊन गेला होता. नाथांनीं केलेल्या या चमत्काराची त्यानें अशी उपपत्ति लावली कीं, घरांत परीस ठेवला तर तो कोणी तरी चोरून नेईल ह्मणून नाथांनीं तो नदींत आणून ठेवला असावा. पण, मग त्याच्या डोक्यांत असा प्रश्न उभा राहिला कीं, आपण नाथांपाशीं एकच परीस दिला होता, मग इतके परीस त्यांनीं कोठून आणले ? पण या प्रश्नाचा आणखी विचार न करितां, ‘चला, आपलें काम झालें ’ असें ह्मणून, नाथांस नमस्कार करून तो आपल्या घरीं गेला.

दगडाचा परीस केल्याचा हा चमत्कार नामदेवचरित्रांतही सांपडतो. परिसा भागवतांचा परीस नामदेवांनीं चंद्रभागेंत टाकला होता. परंतु, त्यासाठीं परिसा भागवतानीं त्रागा केल्यामुळें, नामदेवांनीं चंद्रभागेंत बुडी मारून, नाथांप्रमाणेंच पुष्कळ पाषाण वर आणले व ते सगळे परीस आहेत असें आढळून येतांच, परिसा भागवत हे नामदेवांचे शिष्य होऊन, पुढें मोठे साधु झाले, अशी कथा प्रसिद्ध आहे. दामाजीपंतांसाठीं पांडुरंगानें महाराचा वेष धारण केला, या कथेचा प्रतिध्वनि दासोपंतांच्या चरित्रांतही उमटलेला दिसतो. तात्पर्य काय कीं, एकाच प्रकारचा चमत्कार अनेक संतांनीं केल्याचें वर्णन बहुतेक जुन्या ग्रंथांतून आढळतें. अशा स्थितींत, त्यांतलें अस्सल कोणतें आणि नक्कल कोणती, किंवा कोणतेंच अस्सल नाहीं, हें सांगणें फार कठीण आहे. शिवाय, दुसरें असें कीं, लोखंडाचें सोनें करणारी परिसासारखी एखादी वस्तु खरोखरच आहे कीं काय, निदान होती कीं काय, यासंबंधानेंही खात्रीलायक पुरावा मुळींच उपलब्ध नसल्यामुळें, या बाबतींत लोकांची नेहमीं साशंक वृत्ति असते. तेव्हां, असले चमत्कार खरोखरच घडले होते कीं हा नुसता कविकल्पनेचा खेळ आहे, हें तरी निश्चयपूर्वक कसें सांगतां येणार ? अस्तु.

एकनाथ महाराजांचा रोजचा कार्यक्रम बहुतेक ठरल्यासारखा असून, सकाळपासून रात्रौ निजेपर्यंत, हा कार्यक्रम अगदीं आंखल्यासारखा पार पडत असे. पतकरलेला गृहस्थाश्रम, अलिप्तपणें चालवून, सामान्य जनांस सुलभ असा सगुण हरिभजनमार्ग प्रसृत करावयाचा हें त्यांच्या आयुष्याचें ध्येय होतें; एरवीं, व्यक्तिशः ते स्वतः, ‘ झालि संध्या संदेह माझा गेला ’ ह्या पद्यांत त्यांनींच सांगितल्याप्रमाणें, अत्यंत पूर्णावस्थेस पोंचले होते. ‘ तुका म्हणे आतां । उरलों उपकारा पुरता ’ असें तुका-

रामबुवानींही म्हटलें आहे. स्वतःचा उद्धार झालेला असला, तरी आपल्या डोळ्यांदेखत दुसरे शेंकडों जीव भवसागरांत गटंगळ्या खात असून, बुडण्याच्या पंथास लागलेले आहेत हा करुणाजनक देखावा पाहून संतांचें निसर्गकोमल हृदय विरघळून जातें व त्यामुळें स्वतःचें शेष आयुष्य ते परोपकारार्थ खर्च करीत असतात. नाथचरित्रकारांनीं नाथांचा नित्यक्रम येणेंप्रमाणें वर्णिला आहेः—

सदावर्त संतर्पण । नित्य ब्राह्मण भोजन ।
षोडशोपचारें करून । यथोक्त भोजन सन्मानें ॥
नित्य हें अनुष्ठान । प्रातःकाळीं करूनि स्नान ।
नित्यनेम सारून । पुराण पठन प्रिय सदा ॥
माध्यान्हीं गंगातीरीं । ब्रह्मयज्ञादि सर्व करी ।
ब्राह्मणपूजा तदनंतरी । ब्रह्मभाव अंतरीं बोध ठसा ॥
ब्राह्मण तीर्थप्राशन । केलियावरी आपण ।
करावें युक्त भोजन । तीन प्रहर वर्तन यापरी ॥
त्यानंतरें निजासनीं । बैसोनियां समाधानीं ।
ग्रंथटीका काव्य वदनीं । स्रवे वाणी अमृतवृष्टि ।
सध्याकाळीं संध्या वंदन । करूनि करावें हरिकीर्तन ।
एवं नित्य अनुष्ठान । जगदोद्धारण जगहिता ॥
आरती जालिया पाहीं । शेषरात्र उरलियाही ।
आसनींच कांहीं बाहीं । निद्रेसीहि मान दीजे ॥
पंचपंच उषःकाल । एकांत भजनवेळ ।
होतांचि प्रातःकाळ । सारी निर्मळ स्नानातें ।
अहोरात्र परमार्थ । आचरे लोकसंग्रहार्थ ।
ऐसा श्रीनाथ समर्थ । क्षणहि व्यर्थ जावां नेदी ॥

एके दिवशीं रात्रौ, वाड्यांत नाथांचें कीर्तन सुरू असतां, जमल्यास संधि साधून चोरी करावी या उद्देशानें कांहीं चोर बाहेर दबा धरून बसले होते. मध्यरात्रीं कीर्तन संपल्यावर, वाड्यांतील सर्व मंडळी झोंपीं जातांच, चोरांनीं हळूच अंतर्गृहांत प्रवेश केला. परंतु, चमत्कार असा झाला कीं त्यांची दृष्टि एकदम नष्ट होऊन त्यांस कांहीं दिसेनासें झालें. चोरीचा हेतु सफल होण्याचें बाजूस राहून उलट

अंधत्व आलेलें पाहतांच त्यांची पांचावर धारण बसली व नाथांसारख्या सत्पुरुषाच्या घरीं चोरी करण्यासाठीं आपण आलों म्हणून देवानें आपणास ही शिक्षा केली हें लक्ष्यांत येऊन त्यांस मोठा पश्चात्ताप झाला. तत्क्षणीं त्यांची गेलेली दृष्टि परत येऊन, समोर नाथांची ध्यानस्थ मूर्ति त्यांच्या दृष्टीस पडली. त्यांनीं नाथांचे पाय धरून, त्यांजपाशीं आपला अपराध कबूल केला. नाथांस त्यांची दया येऊन ते त्यांस म्हणाले, " बाबांनों, येवढ्या रात्रीं मजकडे येऊन, माझी क्षमा मागण्यासारखा असा तुम्ही अपराध तरी काय केला आहे ? " चोरांनीं आपली सविस्तर हकीकत नाथांस सांगितली. ते म्हणाले, ' महाराज,

" आमुची जीविकावृत्ति चोरी । तोचि भाव धरूनि अंतरीं ।
स्वामीच्या आश्रमा आल्यावरी । जाली हे परी ऐकिजे ॥
चोरीसाठीं गृहाआंत । जातां नेत्र अंध होत ।
कांहींच न दिसे तेथ । तेव्हां जालें चित्त कासावीस ॥
लीला देखोनि ऐसी । विवेक उपजला मनासीं ।
पश्चात्ताप चित्तासी । म्हणोनि आम्हासी हे दशा ॥
पश्चात्तापासि कारण । होतांचि पाहिलें फिरोन ।
तंव पाहिलें स्वामिदर्शन । पाहते नयन पैं जाले ॥
तुझें रूप देखतां डोळां । चोरीचा आला कंटाळा ।
तिकडील सांडून चाळा ॥ चरणकमळा वंदिलें ॥
आपुल्या कर्माची लाज । धरूनि शरण आलों तुज ।
आमुच्या उद्धाराचें काज । तुझे चरणरज वंदावे ॥
आम्ही अधम निंद्य वृत्ति । कैंचा विवेक आमुचे मती ।
तुझिया दर्शनें उपरति । जालों निश्चितीं कृतार्थ ॥

आपल्या घरीं द्रव्योद्देशानें आलेले हे चोर अशा रीतीनें विमुख होऊन परत जाणार हा विचार कोमलहृदयाच्या नाथमहाराजांस फार दुःखदायक वाटला. त्यांनीं त्या चोरांस आपल्या भांडारगृहांत नेऊन तेथील सर्व वस्तु त्यांस दाखविल्या व " ह्यांतील वाटतील त्या वस्तु तुम्ही खुशाल घेऊन जा. त्यामुळें मला संतोष होईल. तुम्ही येथून विन्मुख होऊन परत जावें हें मला मुळींच आवडणार नाहीं, " असें सांगितलें. नाथांचें हें भाषण ऐकून चोरांस अधिकच पश्चात्ताप झाला. ते ह्मणाले, " महाराज,

तुमच्या क्षणैक समागमानें आम्ही पूर्ण निष्काम झालों. आतां आमच्या मस्तकीं आपला वरद हस्त ठेवून, आम्हां पामरांचा आपण उद्धार करावा." नाथ म्हणाले, 'ठीक आहे. तुम्ही अन्नप्रसाद घ्या आणि मग स्वस्थानीं गमन करा. चोरी करणें हा जो तुमचा कुलाचार आणि आश्रमधर्म, त्याला, तुम्ही येथून विन्मुख होऊन परत जावें हें अनुचित आहे. याकरितां, निदान आमच्या घरीं तुम्ही अन्नग्रहण तरी केलें पाहिजे." हें ऐकून, आज नाथांच्या घरीं महाप्रसादाचा यथेच्छ लाभ आपणास मिळणार या विचारानें चोरांस मोठें समाधान वाटलें. लागलीच नाथांनीं, उद्धव आणि गिरिजाबाई यांस उठवून पाकसिद्धि करण्यास सांगितलें. भोजन तयार झाल्यावर त्या चारी चोरांस नाथांनीं प्रेमपूर्वक पोटभर जेवूं घातलें व आपलेपणाच्या भावनेनें, एखाद्या आप्ताप्रमाणें त्यांचा सत्कार करून त्यांस विडे दिले. नाथांच्या घरचा अन्नप्रसाद पोटांत जातांच चोरांची पूर्ण तृप्ति होऊन त्यांस अत्यंत समाधान वाटलें व अवघी सृष्टि आनंदमय दिसूं लागली. नाथांस परमप्रेमानें वंदन करून ते म्हणाले, " महाराज, आज आमचा उद्धार झाला.

**" आम्ही पतित तुम्ही पावन। सत्य केला हा निज पण।**
**आम्ही दुराचरणी जन। विवेकसंपन्न त्वां केलें॥**
**अगाध तुमचें कृपाळूपण। पाहून द्रवलें आमुचें मन।**
**घडलें चरणां वंदन। भवभय दारुण निरसलें॥**
**काया वाचा आणि मनें। तुझ्या पायीं आलों शरण।**
**मुखीं तुझें नामस्मरण। जीवीं ध्यान चरणांचें॥ "**

अशा रीतीनें त्या चोरांची वृत्ति पालटलेली पाहून नाथ संतुष्ट होऊन म्हणाले, " तुमचा जसा भाव असेल तशी फलप्राप्ति तुम्हांस होईल." इतकें बोलून त्यांनीं त्या चोरांचा निरोप घेतला. " आपणासारिखे करिती तात्काळ " हें संतवचन अयथार्थ कसें होईल?

कोणी एक अंत्यज चौर्यकर्मावर आपली उपजीविका चालवीत असतां एके दिवशीं तो कोतवालाच्या हातीं सांपडला व त्यानें त्याच्या हातापायांत शृंखला घालून त्यास कारागृहांत ठेविलें. तेथें त्यानें कित्येक वर्षें अत्यंत हाल अपेष्टांत घालविलीं. पोटभर अन्नदेखील न मिळाल्याकारणानें तो अगदीं कृश होऊन आसन्नमरण झाला. अशा स्थितींत, त्याच्या हातापायांत बेड्या ठेवण्याची आतां कांहीं जरुरी नाहीं असें

पाहून त्याच्या वरील अधिकाऱ्यानें त्याच्या बेड्या काढविल्या व त्यास तुरुंगाबाहेरच्या मोकळ्या जागेंत आणून ठेवलें. तेथें तो विचारा कित्येक दिवस तसाच लोळत पडला होता. हा मरणोन्मुख झालेला कैदी पळून जाणें शक्य नाहीं या विचारानें पहारेकरी शिपाईही त्याजकडे दुर्लक्ष्य करूं लागले. तेव्हां एके रात्रीं त्या कैद्याच्या मनांत असा विचार आला कीं, आपल्यावर आतां कोणी पाहरा करीत नाहीं. तर येथून पळून जाण्यास कोणती हरकत ? मग, तो विचार लागलीच अमलांत आणावा म्हणून तो उठण्याचा प्रयत्न करूं लागला. परंतु दुर्बलतेमुळें त्यास बिलकुल हालचाल करितां येईना. तेव्हां निराश होऊन त्यानें देवाची करुणा भाकली कीं, ' हे भगवंता ! मी महान् अपराधी आहें खरा, परंतु या समयीं, कोणत्याही उपायानें, तूं माझें रक्षण कर. ' इतक्यांत, अकस्मात् हरिनामगजर त्याच्या कानीं पडला. जवळपास कोठें तरी कीर्तन चालू असावें, असें जाणून, उठत बसत कसें तरी आपण तेथवर जावें या विचारानें त्यानें बरीच धडपड करून, खरडत आणि सरपटत, जिकडून कीर्तनाचा ध्वनि येत होता, तें ठिकाण गांठलें. त्याचा दुःखभोग संपत आल्यामुळें, त्याच्या मनास एक प्रकारचें स्फुरण येऊन, तो कीर्तनांत येऊन बसला. नाथांच्या कीर्तनांत स्पृश्या-स्पृश्यता भेद नसल्यामुळें कोणी कोठेंही बसला तरी त्याला कोणी प्रतिबंध करीत नसे. त्यामुळें, तो अनामिक, अचेतन स्थितींत पडून, लक्ष्यपूर्वक नाथांचें कीर्तन श्रवण करूं लागला. कांहीं वेळानें कीर्तनसमाप्ति होऊन, आरती झाल्यावर श्रोतेजन आपापल्या घरीं निघून गेले. हा अनामिक तेथेंच निचेष्ट पडला होता, परंतु त्याजकडे कोणाचें लक्ष्य गेलें नाहीं. कांहीं वेळानें वाड्यांतील माणसेंही झोंपीं गेलीं. खुद्द नाथमहाराज मात्र आपल्या आसनावर स्वस्थ बसले होते. त्यांची दृष्टी सहज त्या अनामिकाकडे गेली. तेव्हां अत्यंत दयार्द्रचित्तानें ते त्याजपाशीं गेले व त्यास ह्मणाले, " बाबा, तुला कोणत्या गोष्टीची अपेक्षा आहे, हें कृपा करून सांग. " परंतु अगदीं आसन्नमरण झालेल्या त्या अनामिकास आपलें मनोगत बोलून दाखवितां येईना. आपण फार क्षुधित असून, आपणास अन्न पाहिजे, इतकें त्यानें नाथांस खुणेनें कळविलें. दीनदयाळू नाथांनीं गिरिजाबाईस तात्काळ जागृत केलें. त्या साध्वी-नेंही पतिचरणीं मस्तक ठेवून, ' काय आज्ञा आहे ?' ह्मणून विचारलें. आपल्या दारीं एक मनुष्य क्षुधेनें व्याकुळ होऊन पडला आहे, त्याला आतां भोजन दिलें पाहिजे असें नाथांनीं तिला सांगतांच, अत्यंत अल्पावकाशांत तिनें सुग्रास अन्न तयार केलें.

मग नाथ व गिरिजाबाई या उभयतांनीं तें अन्न एका पात्रांत घालून अंगणांत पडलेल्या त्या अनामिकापुढें ठेविलें. परंतु, हा फार दिवसांचा उपवासी असल्यामुळें, हा जर एकदम पुष्कळ अन्न खाईल तर ह्याच्या जीवास अपाय होईल, हें लक्ष्यांत घेऊन नाथांनीं त्याजकडून मिताहार करविला. ' अन्नमय प्राण ' ही म्हण प्रसिद्धच आहे. थोडेंसें अन्न पोटांत जातांच त्या अनामिकास हुषारी वाटून, तो म्हणाला, " महाराज, मरूं घातलेल्या मला आज आपण खरोखर जीव-दान दिलें. " इतकें बोलून आपला साद्यंत वृत्तांत नाथांस त्यानें निवेदन केला. नंतर नाथांनीं त्यास वस्त्रें देऊन, निद्रा करण्यास सांगितलें व तुझी अशक्तता जाऊन पूर्ववत् तुला शक्ति येईपर्यंत तूं येथेंच रहा अशी आज्ञा केली. दुसरे दिवशीं त्यांनीं, तुरुंगांतून निसटून आलेल्या त्या अनामिकास आपण आपल्या घरीं ठेवून घेतला असल्याचें वर्तमान तुरुंगावरील अधिकाऱ्यास कळविलें. अशा रीतीनें सर-कारच्या कायद्याचाही बोज राखून त्या गरीब अनामिकाचे प्राण नाथांनीं वांचविले. दया हें सर्व धर्माचें मूळ आहे आणि ' जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ॥ तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥ अशी साधुत्वाची व्याख्या तुकारामबुवांनीं दिली आहे. नाथमहाराज तर दयेचे मूर्तिमंत पुतळेच होते.

वरील गोष्ट घडल्यावर, दुसरे दिवशीं नाथ महाराज गंगेवर स्नानास जात असतां, वाटेंत एक मोठा अश्वत्थ वृक्ष होता, त्याची एक फांदी अकस्मात् मोडून खालीं पडली. नाथ उभे राहून हा प्रकार पाहत आहेत तोंच कोणी एक अक्राळ विक्राळ पुरुष नाथांपुढें येऊन उभा राहिला आणि त्यांस नमस्कार करून करुणस्वरानें म्हणाला, " मी ब्रम्हराक्षस असून, या अश्वत्थ वृक्षावर आज शंभर वर्षे रहात आहें. आज माझ्या सर्व पातकांचें क्षालन झालें असून आपली साधुमूर्ति या क्षणीं माझ्यासमोर उभी आहे. माझा उद्धारकाल अगदीं समीप आला आहे परंतु अद्याप थोड्याशा पुण्याची मला आवश्यकता आहे. तेवढें आपलें पुण्य जर आपण कृपा करून मला द्याल तर आतांच या पिशाच्चयोनींतून माझी मुक्तता होईल. " नाथांस त्याची दया येऊन ते म्हणाले, " माझ्या हातून कोणतें पापपुण्य घडलें आहे तें माझें मलाच ठाऊक नाहीं. तथापि, माझ्या पुण्यापैकीं कोणतें पुण्य मी तुम्हास दिलें असतां तुमची मुक्तता होईल तें सांगा, म्हणजे तें पुण्य मी तुम्हास देईन. " ब्रह्म-राक्षस म्हणाला, " तुम्ही आजपर्यंत जीं ब्राह्मणभोजनें घातलीं, त्यांच्यामुळें झालेलें पुण्य आणि कालें रात्रीं त्या गरीब अनामिकाचे प्राण आपण वांचविले तें

पुण्य, यांपैकीं कोणतें तरी एक पुण्य आपण मला द्यावें." नाथ तात्काल गंगोदक हातीं घेऊन, ब्रह्मराक्षसाच्या हातावर आपल्या पुण्याचा संकल्प सोडण्यास तयार झाले. ब्रह्मराक्षसानें शेवटीं, अनामिकाचे प्राण वांचविल्याचें पुण्यच नाथांपाशीं मागितलें व त्याप्रमाणें, त्या पुण्याचें संकल्पोदक नाथांनीं त्याच्या हातावर सोडतांच तो ब्रह्मराक्षस तात्काळ मुक्त झाला!

वरील कथेचें मर्म वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. रिकामटेकड्या हजारों ब्राह्मणांस फुकट खाऊं घातल्यानें जें पुण्य लागतें, त्याहून किती तरी अधिक पुण्य, एका गरीब अंत्यजास अन्नदान केल्यानें प्राप्त होतें, हें दाखविण्याचा मूळ ग्रंथकाराचा, नाथांचा किंवा त्या ब्रम्हराक्षसाचा उद्देश स्पष्ट दिसतो. असो.

याप्रमाणें, धर्म, नीति आणि समता यांच्या उपदेशाचें आणि प्रसाराचें कार्य करीत असतां, काव्यरचनेचा महत्त्वाचा आणि चिरपरिणामी उद्योगही नाथांनीं अव्याहत चालविला होता. नाथचरित्रकर्ते केशव यांनीं आपल्या ग्रंथाच्या २२ व्या अध्यायांत नाथांनीं लिहिलेल्या ग्रंथांची जी यादी दिली आहे ती अपुरी व अनिश्चित असल्यामुळें, नाथांच्या नांवावर आज कोण कोणते ग्रंथ प्रसिद्ध आहेत व त्यांतले, खरोखरच नाथांनीं लिहिलेले ग्रंथ कोणते, या विषयींची चर्चा यथाप्रसंग पुढें करूं.

# प्रकरण सहावें.

## काशीयात्रा, नाथभागवत–विजय.

नाथांनी भागवतलेखनास नुकताच प्रारंभ केला होता. फक्त दोनच अध्याय लिहून झाले होते. इतक्यांत, नाथांच्या परिचयाचा कोणी भाविक गृहस्थ काशीयात्रेस जाण्यास निघाला. तेव्हां त्यानें, सदर दोन अध्यायांची नक्कल करून ती बरोबर घेतली व कांहीं दिवसांनीं तो काशीस जाऊन पोंचला. तेथें एके दिवशीं, मणिकर्णिकेचें स्नान केल्यावर त्यानें आसन घातलें आणि नाथकृत प्राकृत भागवतपठनास आरंभ केला. इतक्यांत तेथील एका मठाधिकाऱ्याचे दोन शिष्य गंगेवर स्नानास चालले होते, त्यांनीं जेव्हां या गृहस्थास पाहिलें तेव्हां हा कोणी तरी मोठा पंडित असावा असें त्यांस वाटलें व आदरपूर्वक त्याच्या जवळ बसून, संस्कृत भाषेंत त्यांनीं त्यास विचारलें, " पंडित महाराज, आपण कोणत्या गांवचे रहिवासी ? आपलें नामाभिधान काय ? आणि आपलें अध्ययन किती झालें आहे ? " गृहस्थानें उत्तर दिलें, " मी पैठणचा रहिवासी; येथें तीर्थयात्रेस आलों आहें. हा श्रीमद्भागवताचा एकादश स्कंध मी पठन करित आहें. " मठाधिकाऱ्याचे शिष्य म्हणाले, " तुम्ही स्पष्ट उच्चार करून वाचाल तर आम्हास थोडाबहुत अर्थ समजेल. " " ठीक आहे " असें म्हणून गृहस्थानें आपलें वाचन पुढें सुरू केलें. तेव्हां, तो ग्रंथ प्राकृत भाषेंत आहे हें लक्ष्यांत येऊन, ते शिष्य क्रोधायमान होऊन म्हणाले, " हा ग्रंथ तर शुद्ध प्राकृत दिसतो. अशा या ग्रंथाचा प्रसार होऊन तो जर लोकप्रिय झाला तर संस्कृत ग्रंथांविषयींची लोकांची पूज्यबुद्धि दिवसेंदिवस कमी होत जाईल. श्रीमद्भागवतासारख्या संस्कृत वेदांतग्रंथावर महाराष्ट्रभाषेंत टीका लिहिणें हा मोठा अन्याय आहे. तस्मात् हा प्रकार स्वामीच्या कानावर घातलाच पाहिजे. " इतकें बोलून त्यांतला एक विद्यार्थी रागारागानें उठून मठपतींकडे गेला व 'संस्कृत विद्येचें माहेरघर जें काशीक्षेत्र तेथें कोणी एक दक्षिणी ब्राह्मण मराठी भागवताचें पठन करीत बसला आहे ' ही भयंकर वार्ता त्यानें त्यांस कळविली. गुरुजींस परमावधीचा क्रोध येऊन, त्यांनीं आपले पांचसात शिष्य त्या दक्षिणी ब्राह्मणास बोलावून आणण्यास पाठविले.

त्या शिष्यांनीं त्या गृहस्थापाशीं येऊन, " आमचे गुरुजी तुह्मास पाचारण करीत आहेत " असें जेव्हां त्यास सांगितलें तेव्हां त्या बिचाऱ्याचें धाबें धडाडलें. परंतु नाथमहाराजांवर त्याचा पूर्ण विश्वास होता. त्यांच्या नामाचा जप मनांतल्या मनांत त्यानें चालविला. पुढें त्या शिष्यांबरोबर मठांत गेल्यावर मठपतींस त्यानें नमस्कार केला, तेव्हां रागानें डोळे लाल करून मठपति त्यास म्हणाले, " तूं मोठा अपराधी आहेस. तूं ज्या मराठी भागवताचें पारायण करतोस, ती कोणत्या मूर्खाची बडबड आहे ? भागवतासारख्या परममान्य संस्कृत ग्रंथावर मराठी टीका लिहिणारा हा पाखांडी मनुष्य कोण आहे हें आम्हांस समजलेंच पाहिजे. बोल, ही टीका तूंच स्वतः लिहिली आहेस कीं दुसऱ्या कोणी लिहिली आहे ? " भयभीत झालेला दक्षिणी ब्राम्हण कांपऱ्या आवाजांत म्हणाला, " महाराज, माझ्या अंगीं कोठली येवढी विद्वत्ता ! दक्षिणेंत प्रतिष्ठान क्षेत्रीं श्रीएकनाथ महाराज नामक महान् सत्पुरुष वास्तव्य करीत आहेत, त्यांनीं संस्कृत भाषेंतलें गूढ ज्ञान प्राकृत जनांस सुलभ करून द्यावें या उदार हेतूनें, हा मराठी ग्रंथ आरंभिला आहे व त्याचे फक्त दोनच अध्याय लिहून झाले होते ते मी हें उतरून घेऊन बरोबर आणले आहेत. " ग्रंथकर्त्याचें नांव व पत्ता समजतांच मठाधिपतींनीं आपल्या दोन शिष्यांबरोबर पैठणच्या ब्राम्हणांस एक पत्र लिहून पाठविलें. त्यांत असें म्हटलें होतें कीं " पैठणांत संस्कृतविद्याविशारद असे अनेक समर्थ ब्राम्हण असतां, त्यांच्या डोळ्यांदेखत तेथें भागवतासारख्या संस्कृत ग्रंथावर मराठी टीका लिहिली जावी, ही गोष्ट सदर ब्राम्हणांस कमीपणा आणणारी आहे. तरी, सदर ब्राम्हणांनीं या पाखांडी प्राकृत टीकाकारास इकडे पाठवून द्यावें. तो येथें आल्यावर आम्ही त्यास योग्य शासन करून त्याचा बंदोबस्त करूं. तो इकडे येण्यास तयार नसेल, तर त्यास बहिष्कृत करावें. " अशा अर्थाचें तें आज्ञापत्र घेऊन, दक्षिणेंत नाथांनीं उभारलेलें प्राकृताचें बंड मोडण्यासाठीं ते दोन विद्यार्थी काशीहून निघाले ते कांहीं दिवसांनीं पैठणास येऊन पोंचले. तेथें येतांच तेथील धर्माधिकाऱ्यास भेटून, काशींतील मठाधिपतींचें आज्ञापत्र त्यास त्यांनीं दाखविलें. त्यांतील मजकूर वाचतांच, धर्माधिकाऱ्यास इतका आनंद झाला कीं तो गगनांत माईना. आधींच उल्हास, त्यांत फाल्गुन मास, अशी त्याची स्थिति झाली. नाथांचा नक्षा उतरविण्याची ही चांगली संधि आली आहे असें त्यास वाटलें. मग त्यानें गांवांतल्या सर्व ब्राम्हणांस बोलावून आणलें व काशीहून आज्ञापत्र घेऊन आलेल्या विद्या-

थोंशीं त्यांची ओळख करून देऊन आज्ञापत्रांतील मजकूर त्यांस निवेदन केला. धर्माधिकारी विद्यार्थ्यांस म्हणाला. " एकनाथाचें प्रस्थ येवढें माजलें आहे कीं त्यास आळा घालण्याचें सामर्थ्य आमच्या अंगीं नाहीं. आम्ही अनेक शास्त्रार्थ काढून आजवर त्याचा पुष्कळ प्रकारांनीं छळ केला, परंतु प्रत्येक वेळीं आम्हांसच माघार घ्यावी लागली. तरी आतां तुम्ही त्यास वाराणशीस घेऊन चला, म्हणजे तेथील विद्वान् ब्राम्हण त्याच्या वर्तनाची योग्य चौकशी करून त्यास यथायोग्य प्रायश्चित्त देतील. या बाबतींत आमच्याकडून जें साहाय्य तुम्हास होण्यासारखें असेल तें आम्ही मोठ्या आनंदानें करूं. "

मग आज्ञापत्राची हकीकत नाथांस कळविण्यासाठीं ते दोघे विद्यार्थी कांहीं ब्राम्हणांस बरोबर घेऊन नाथगृहीं जाण्यास निघाले. वरील हकीकत घडून आली तेवढ्या मुदतींत, नाथांनीं ग्रंथाचे चार अध्याय पुरे करून पांचव्या अध्यायांतील जनक-आर्षभ-संवाद संपवून, ते स्वस्थ बसले होते. उद्धवादि शिष्यवर्ग जवळ होता. इतक्यांत हे काशीकर विद्यार्थी तेथें जाऊन दाखल झाले. त्यांस वाड्यांत शिरतांना पाहून नाथ आसनावरून उठून त्यांस सामोरे गेले व नमस्कार करून आदरपूर्वक त्यांस त्यांनीं आसनावर बसविलें. नंतर नम्रतापूर्वक ते त्यांस म्हणाले, " महाराज, आपण कोठून आलांत ? आपलीं तोंडें श्रमानें कोमेजलेलीं आहेत, यावरून आपण फार दूरचा प्रवास करून आलेले दिसतां. तरी पहिल्यानें भोजन करून श्रमाचा परिहार करा व नंतर आपल्या आगमनाचा हेतु काय आहे हें सवडीप्रमाणें सांगा. " ते काशीकर विद्यार्थी नाथांकडे आले त्या वेळीं नाथांविषयीं त्यांच्या मनांत मोठा राग होता. परंतु नाथांची शांत मूर्ति दृष्टीस पडतांच त्यांचा राग कोठल्या कोठें नाहींसा होऊन ते निर्विकल्प झाले. नाथांच्या घरीं पाय टाकतांच कठोर शब्दांनीं त्यांची कानउघाडणी करावयाची हा त्यांचा पहिला उद्देश; व तसें करण्यास पैठणांतील ब्रह्मवृंदानेंही त्यांस पूर्ण उत्तेजन दिलें होतें. परंतु नाथांची शांत मुखचर्या आणि नम्रता पाहतांच तें सगळें पारडें फिरलें आणि ते अत्यंत विनयपूर्वक नाथांस ह्मणाले, " आह्मी काशी क्षेत्रींचे रहिवासी असून आमचे गुरुजी एक मठाधिपति आहेत. त्यांच्या आज्ञेवरून व येथील ब्राह्मणांस त्यांनीं दिलेलें आज्ञापत्र घेऊन आह्मी येथें आलों आहों. आमच्या गुरुजींनीं आपणांसही एक निराळें आज्ञापत्र दिलें आहे. तें आज्ञापत्र आपण मान्य केलें म्हणजे आह्मी भोजन करूं. " नाथांनीं त्यांजकडून तें आज्ञापत्र घेऊन मस्तकीं धारण केलें व आदरपूर्वक वाचून पाहिलें. आज्ञापत्राचा

भावार्थ ध्यानांत घेऊन ते म्हणाले, " आज माझें भाग्य उदयास आलें. या आज्ञापत्राच्या निमित्तानें श्रीकाशीविश्वेश्वरानेंच मला आपल्या दर्शनास बोलावलें असें मी समजतों. " हें भाषण ऐकतांच त्या विद्यार्थ्यांस व त्यांजबरोबर आलेल्या कुटाळ ब्राह्मणांस देखील आश्चर्य वाटलें. प्राकृत भाषेंत ग्रंथरचना करून संस्कृताविरुद्ध बंडाचा बावटा उभारणारा हा दक्षिणी ब्राह्मण काशीच्या मठाधिपतीचें आज्ञापत्र फेटाळून दिल्याशिवाय राहणार नाहीं ही त्यांची समजूत निखालस चुकीची ठरली. काशीकर विद्यार्थ्यांचा क्रोध नाहींसा होऊन ते शांत झाले हें त्यांजबरोबरच्या पैठणकर महाब्राह्मणांस रुचलें नाहीं. त्यांनीं आपल्यांतले कांहीं ब्राह्मण गांवांत पाठवून काशीकरांकडून एकनाथाची फजिती न होतां उलट काशीकरच मंदप्रभ होऊन स्वस्थ बसले हें वर्तमान इतर ब्राह्मणांस कळविलें.

इकडे नाथांनीं त्या दोन्ही विद्यार्थ्यांस स्नानास पाठवून भोजनाची तयारी केली व सर्वांचें यथासांग भोजन झाल्यावर, उद्धवास हांक मारून स्वतःच्या काशीयात्रेची तयारी करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें उद्धवानें सर्व तयारी केल्यावर नाथ एकटेच काशीस जाण्यास निघाले. बरोबर ते दोन विद्यार्थी मात्र होते. नाथ पैठणाहून काशीस गेल्यावर त्यांच्या सेवेसाठीं उद्धवानें दोन ब्राह्मण काशीस पाठविले. भागवताचे पांच अध्याय लिहून पुरे झाले होते ते नाथांनीं बरोबर घेतले होते. काशीस पोंचल्यावर मणिकर्णिका तीर्थ व तेथील एकंदर देखावा पाहून नाथांस मोठा संतोष वाटला. इकडे ते दोघे विद्यार्थी आपल्या गुरुजीपाशीं येऊन दाखल झाले त्या वेळीं ३०० संन्याशांसहवर्तमान ते यतिराज काशींत भिक्षाटनास निघाले होते. त्यांस एका गृहस्थानें आपल्या घरीं पुढीस ठेवून घेतलें. तेथें त्या विद्यार्थ्यांनीं गुरुवर्यांचें दर्शन घेऊन, आज्ञेप्रमाणें एकनाथांस काशीस घेऊन आल्याचें वर्तमान कळविलें व मठानजीक गंगातीरीं नाथ बसले आहेत असेंही कळविलें. तेव्हां त्या गर्विष्ठ यतीनें शिष्यांस आज्ञा केली कीं, " एकनाथास मठांत नेऊन बसवा. कांहीं वेळानें हे तीनशें यती तिकडे येतील व एकनाथाच्या अपराधाची चौकशी करून त्यास योग्य शासन देतील. " त्याप्रमाणें शिष्यांनीं नाथांस मठांत नेऊन बसविलें व ' आपण येथें बसून जें काय होईल तें अवलोकन करा ' असें त्यांस सांगितलें. इकडे मठपतीनें आपल्या बरोबरच्या तीनशें यतींस सांगितलें कीं, " तुम्ही मठांत जाऊन तेथें बसलेल्या अपराध्यास आपापल्या दंडाचे पांच पांच तडाखे लगावा व हे पंधराशें तडाखे सोसूनही तो जर जीवंत राहिला, तर त्याचा ' परामर्ष '

घेण्यास मी स्वतः येतों. " त्याप्रमाणें ते तीनशें यती मठांत आले व आपापसांत विचार करूं लागले कीं मठपतीनीं अंमलांत आणलेली ही शासनपद्धति अयुक्त आहे. पैठणाहून आणलेल्या अपराधी मनुष्याच्या अपराधाची कांहीं एक चौकशी न करितां किंवा त्याचें ज्ञान व अधिकार केवढा आहे हें न पाहतां अशा प्रकारची क्रूर शिक्षा त्यास करणें हा न्याय नव्हे/परंतु मठाधिपति आपले गुरु आहेत व त्यांची आज्ञा मोडणें योग्य नाहीं, यासाठीं आपण एकेक असामी एकनाथापाशीं जाऊन त्याचें लक्षण बारकाईनें पाहूं व आपल्या परीक्षणांत तो खरोखरीच अपराधी आहे असें जर आपणास आढळून आलें तर अपराधाच्या मानानें त्यास शिक्षा करूं. असा विचार ठरल्यावर, एकेक संन्यासी नाथांपाशीं जाऊन पाहूं लागला तों तेथें चतुर्भुज श्रीकृष्णमूर्ति बसलेली त्याच्या दृष्टीस पडली ! त्या भगवद्दर्शनाच्या योगानें मनांत सद्भाव उत्पन्न होऊन, ते नम्रतापूर्वक वंदन करून तटस्थ उभे राहिले. तीनशें संन्याशांची अशी स्थिति झाली. तो प्रकार पाहतांच मठाधिपतीचे शिष्य विस्मित होऊन धांवतच आपल्या गुरूपाशीं गेले आणि नाथदर्शनानें त्या तीनशें यतींची कशी स्थिति झाली हें त्यास त्यांनीं कळविलें. तें ऐकतांच तो अभिमानग्रस्त यति अत्यंत उद्विग्न झाला. नाना प्रकारचे तर्क वितर्क त्याच्या मनांत येऊं लागले. एकनाथापाशीं कांहीं तरी चेटूक असेल असेंही त्यास वाटलें. मग त्यानें असें ठरविलें कीं मठांत जाऊन अपराध्याची विद्वत्ता वगैरे कितपत आहे हें समक्ष पाहून, नंतर त्यास वादांत जिंकूं. परंतु एकनाथाचें दर्शन होतांच त्या तीनशें यतींसारखीच आपली स्थिति होईल कीं काय अशी शंका आल्यामुळें, तो त्या विद्यार्थ्यांस हांक मारून ह्मणाला, 'अरे, त्या पैठणच्या ब्राह्मणापाशीं कांहीं तरी जादू असावी अशी शंका मला आली आहे. यास्तव, त्या जादूचा मजवर प्रयोग करण्याची संधि त्यास मिळूं नये म्हणून, पडद्याच्या आड बसून त्याच्याशीं बोलण्याची युक्ति मी काढली आहे. तरी तुम्ही अगोदर मठांत जाऊन पडदा लावण्याची व्यवस्था करा. ' त्याप्रमाणें विद्यार्थ्यांनीं मठांत जाऊन पडदा लावल्यावर, तो विद्यामत्त यती मठांत गेला व पडद्याआड लपून बसला; व तेथून, आपल्या तीनशें शिष्यांची स्थिति कशी काय झाली आहे हें हळूच डोकावून पाहूं लागला. तेव्हां ते सगळे विदेही स्थितींत तटस्थ होऊन उभे आहेत, असें त्यास दिसून आलें; इतकेंच नव्हे तर " नाथमहाराज, आपल्या दर्शनानें आज आम्हीं उद्धरलों, " असेही त्यांचे उद्गार यतिवर्यांनीं ऐकले. मग स्वतः नाथांशीं भाषण करून ह्या कोड्याचा उलगडा करावा या उद्देशानें, मध्ये अंतःपट धरवून तो नाथां-

समोर येऊन बसला व त्यांस म्हणाला, " ह्या सर्व संन्याशांचा मी गुरु असून, तुझ्या कपटाचा स्फोट करण्यासाठीं मुद्दाम आलों आहें. " पण ह्या त्याच्या गर्वोक्तीनें नाथांची शांतवृत्ति तिळमात्र ढळली नाहीं. त्यांनीं शांतपणें उत्तर दिलें, " महाराज, तुमच्या चरणीं मीं माझें मस्तक नम्र करितों. मज गरिबावर आपली कृपा असावी. मला आपण इतक्या लांबून मुद्दाम दर्शनास बोलावलें व ती आपली आज्ञा शिरसावंद्य मानून मी येथें आलों. मग, आतां मनांत व्यर्थ वैषम्य धरून हा अंतःपट मध्यें आपण कशास ठेवला आहे ? मजकडून अन्याय घडला आहे असें जर आपणास वाटत असेल तर त्याबद्दल आपण मला क्षमा करावी. मी अल्पमति आणि अनिग्रही आहें. वेदशास्त्राचा अभ्यास मी कधीं केला नाहीं. माझ्या कवितेचा मला बिलकुल अभिमान नाहीं. आपल्यासारख्या समर्थांच्या पसंतीस जर माझा ग्रंथ उतरला नाहीं तर तो निरुपयोगीच समजला पाहिजे. आपण प्रत्यक्ष नारायणस्वरूप आहांत, आपली अवज्ञा करून माझा निभाव कसा लागेल ? सद्गुरुकृपेनें माझे संकल्पविकल्प मावळले असून माझ्या मनास पूर्ण शांतता प्राप्त झाली आहे. अशा स्थितींत, ग्रंथाचा अभिमान मला कोठून असणार ? तर आपण आतां आपला क्रोध आंवरा आणि आपलें दर्शन देऊन माझा उद्धार करा. माझ्या ग्रंथाचे आतांपर्यंत मी फक्त पांचच अध्याय लिहिले आहेत. हे आपण मणिकर्णिका तीर्थात खुशाल बुडवावे आणि कृतापराधाची मला क्षमा करावी. " नाथांचें हें उत्तर ऐकून व त्यांची शांतवृत्ति पाहून यतिराज अगदीं गारठून गेले व त्यांच्या अंतःकरणांत न्यायबुद्धि जागृत झाली. ' तृण नाहीं तेथें पडला दावाग्नि । जाय तो विझोनी आपोआप.' तद्वत् यतिवर्यांच्या क्रोधाग्नीस नाथांच्या भाषणांत कांहींच इंधन न सांपडल्यामुळें तो आपोआप थंड पडला. मठपतीच्या वृत्तींत झालेला हा बदल इतर संन्याश्यांच्या दृष्टोत्पत्तीस येतांच त्या सर्वांनीं त्यास विनंतिपूर्वक सांगितलें कीं, ' महाराज, हे साक्षात् भगवान् एकनाथरूपानें आपल्या मठांत आज प्रविष्ट झाले आहेत. तर आतां हा मधला पडदा काढून टाका आणि नाथांचें दर्शन घेऊन त्यांचा योग्य सत्कार करा. ' यतिवर्यांनीं ही विनंति तात्काळ मान्य केली व पडदा काढण्यास सांगितलें. तें मायापटल दूर होतांच नाथांच्या जागीं प्रत्यक्ष श्रीकृष्णमूर्ति बसली आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्या क्षणीं त्याचे अष्टभाव जागृत होऊन, नाथांस त्यानें साष्टांग प्रणिपात केला व म्हटलें, " महाराज, मी पातकी आहें, माझा उद्धार करा. " दयाळू नाथांनीं त्यास वर उचलून व त्याच्या चरणावर माथा ठेवून, नम्रतापूर्वक

त्यास म्हटलें, “ महाराज, मला आपण साष्टांग वंदन करावें हें उचित नाहीं. चतुर्थाश्रम हा सर्व आश्रमांत श्रेष्ठ आहे. आम्ही गृहस्थाश्रमी लोकांनीं केलेलें वंदन ग्रहण करण्याचा आपला अधिकार आहे.” पुढें नाथांच्या भागवतांतील एका श्लोकावरील ओवीबद्ध टीका यतिवर्यांनीं श्रवण केली व तिच्या यथार्थत्वाबद्दल पसंती दर्शविली; व आणखी कांहीं दिवस नाथांस त्यांनीं आदरपूर्वक आपल्या मठांत ठेवून घेतलें. इतकेंच नव्हे तर समग्र ग्रंथ पुरा होईपर्यंत तेथेंच राहाण्याचा नाथांस त्यांनीं आग्रह केला. त्याप्रमाणें, काशींत आणखी सहा महिने मुक्काम करून, नाथमहाराजांनीं भागवताच्या एकादशस्कंधावरील आपली विस्तीर्ण टीका पुरी केली. रोज जेवढा टीकेचा भाग लिहून होत असे त्यावर नित्य पुराण सांगण्याचा त्यांनीं क्रम ठेवला होता. ग्रंथ पुरा झालेला पाहून मठपतींस मोठा आनंद झाला व तत्प्रीत्यर्थ मोठा उत्सव करून ग्रंथाची मिरवणूक काढण्याचें त्यांनीं ठरविलें. वाराणशींतील समस्त शास्त्रीपंडितांत मठपतींस मोठा मान असे व तेही नित्य नाथांचें मराठी पुराण श्रवण करण्यास मठांत येत असत. परंतु सर्वच पंडितांस हा प्रकार पसंत होता असें नाहीं. काशीसारख्या महाक्षेत्रांत आणि संस्कृत विद्येच्या माहेरघरांत नाथांच्या प्राकृत ग्रंथाचें स्तोम माजलेलें पाहून कित्येक पंडितांस वैषम्य वाटे व ते परस्परांशीं याबद्दल प्रतिकूल उद्गारही काढीत. पुढें ग्रंथसमाप्तीच्या उत्सवाचें मठांतून जेव्हां त्यांस आमंत्रण आलें तेव्हां तर तो सगळा प्रकार त्यांस अगदीं विलक्षण आणि अप्रिय वाटला; व एका पंडिताच्या शिष्याबरोबर, “ प्राकृत ग्रंथाचें आपण येवढें स्तोम माजवावें हें उचित नाहीं, ” असा निरोप मठपतीस पाठविण्याचाही त्यांचा विचार होता. परंतु मठपतीचा त्यांस धाक वाटत असल्यामुळें तो विचार त्यांनीं रहित केला व आपण सर्वांनीं एक वेळ मठांत जाऊन, युक्तिप्रयुक्तीनें, मठपतींनीं योजिलेल्या कार्याची अयुक्तता त्यांस पटवून द्यावी व नाथांचा ग्रंथ गंगेंत बुडवावा, असें त्यांनीं ठरविलें व त्याप्रमाणें ते सगळे मठांत गेले. मग, मठपतींस एकीकडे बोलावून ते त्यांस म्हणाले, “ आपल्यासारख्या थोर आणि व्युत्पन्न पुरुषाच्या हातून असें वर्तन घडावें याचें खरोखरच आह्मांस आश्चर्य वाटतें. ज्या ‘ नीचवाणी’ चें श्रवण शास्त्रानें दूषणीय ठरविलें आहे, त्या वाणीचें आपण येवढें गौरव करावें आणि स्तोम माजवावें, हें भावी अनर्थाचें चिन्हच होय. आह्मी सर्व शास्त्री आणि पंडित आपणास गुरुस्थानीं मानतों; अशा स्थितींत आपण जर असा अन्याय करूं लागलां तर काशीक्षेत्राचें, संस्कृत भाषेचें आणि संस्कृत विद्येचें महत्त्व तें काय राहिलें ? ह्मणून, आमची येव-

ढीच विनंति आहे कीं या निंद्याचरणास आपली अनुमति आणि आपलें उत्तेजन असूं नये." पंडितांचा हा आग्रह पाहून मठपति ह्मणाले, "मीही पूर्वी तुमच्याच मताचा होतों. सत्पुरुषाचें माहात्म्य न जाणतां मीही एकनाथांशीं असेंच उद्धत वर्तन पूर्वी केलें आहे. पण, त्या शांतिजलधीपुढें माझा अभिमानाग्नि अगदींच थंडावला. नाथांच्या पारमार्थिक ऐश्वर्यास आणि शांतवृत्तीस त्रिभुवनांत तोड सांपडणार नाहीं, इतकेंच नव्हे तर साक्षात् श्रीकृष्णाचे ते पूर्णावतार आहेत असेंच मी समजतों. तुह्मी केवळ अभिमानानें त्यांचा छल करूं पाहतां, पण या योजनेस माझ्यानें अनुमोदन देववत नाहीं." मठपतींची ही स्वानुभवयुक्त स्पष्टोक्ति ऐकून पंडित क्षुभित झाले. मठांतली नाथभागवताची पोथी बलात्कारानें उचलून, तिला जलसमाधि देण्यासाठीं ते गंगेवर जाण्यास निघाले. नाथ, हा सर्व प्रकार अगदीं शांतचित्तानें पहात होते. पण प्रत्यक्ष आपल्या ग्रंथाची पोथी उचलून नेलेली पाहूनही त्यांच्या मनाची समता किंवा समाधानवृत्ति लेशमात्र ढळली नाहीं. मठपतींस याबद्दल मोठें आश्चर्य वाटलें. पण, त्यांच्या विद्वत्तेप्रमाणें त्यांची शांतवृत्ति गाढ नसल्यामुळें, घडलेला प्रकार पाहून त्यांस मोठी चिंता उत्पन्न झाली. परंतु, देव कांहीं तरी चमत्कार करून पंडितांचा गर्व हरण करील या विश्वासानें तेहि स्वस्थ राहिले.

इकडे तो शास्त्र्यांचा आणि पंडितांचा घोळका गंगेवर आला व त्यांनीं ती भागवताचा पोथी, अत्यंत तिरस्कारपूर्वक आणि तुच्छतापर्वक, गंगोदकांत झुगारून दिली. तेव्हां काय चमत्कार झाला ? नाथचरित्रकार केशव सांगतात, पोथी पाण्यांत पडण्यापूर्वींच भागारथी प्रत्यक्ष प्रगट होऊन तिनें आपल्या रत्नकंकणयुक्त हस्तांनीं ती पोथी वरचेवर झेलली ! पंडितांचे डोळ दिपून गेले आणि त्यांच्या गर्वाचें पाणी झालें. हा घडलेला प्रकार मठपतींस कळतांच ते गंगेवर धावून गेले व ती पोथी उचलून घेऊन त्यांनीं मस्तकीं धारण केली. ते पंडितांस म्हणाले, "आतां तरी तुम्ही अभिमान सोडून नाथमहाराजांस शरण जा आणि त्यांचा ग्रंथ मस्तकीं धारण करा." पंडितांनीं अधोमुख होऊन मौन धारण केलें. पूर्वपुण्याशिवाय संतचरणीं नम्र होण्याची बुद्धि या शब्दपंडितांस होणार नाहीं हें जाणून, मठपति, पोथी डोक्यावर घेऊन मठाकडे निघाले. ते मठासन्निध येतांच नाथही उठून त्यांस सामोरे गेले व अत्यंत नम्रतापूर्वक म्हणाले, "महाराज, आपण यति असल्यामुळें आपला अधिकार माझ्यापेक्षां फार मोठा आहे. तरी त्या अधिकारास न शोभेसें वर्तन आपण करूं नये." मठपति म्हणाले, "आग लागो माझ्या अधिकाराला आणि मोठेपणाला.

आपल्यासारख्या स्वानुभवी सत्पुरुषाच्या कृपेशिवाय आमचें पांडित्य व्यर्थ आहे." इतकें बोलून, त्यांनीं नाथांची हत्तीवरून मिरवणूक काढण्याचा बेत करून सर्व साहित्य जमाविलें. अंबारीचा हत्ती, नाना प्रकारचीं वाद्यें, नळे, चंद्रज्योती वगैरे दारूकाम, बुका, फुलांचे हार, षोडशोपचार पूजाद्रव्य वगैरे सामग्री सिद्ध झाल्यावर, मठपति पंडितांस ह्मणाले, तुह्मी आतां नाथांची प्रार्थना करून मोठ्या उत्साहानें त्यांचें पूजन करा. मठपतींच्या भिडेस्तव, पंडितांनीं, मोठ्या मिनतवारीनें नाथांची प्रार्थना केली. तेव्हां नाथ ह्मणाले, " मला विनंति करणें तुह्मांस उचित नाहीं. तुह्मी सर्व पंडित मला अत्यंत पूज्य आहांत. तरी माझें पूजन न करितां आपण ग्रंथाचें पूजन करूं." त्याप्रमाणें ग्रंथाचें षोडशोपचारें पूजन झाल्यावर तो ग्रंथ हत्तीवरील अंबारींत ठेविला व पंडितांसह, वाद्यघोषाच्या गजरांत त्याची मिरवणूक काढण्यांत आली. नाथांचा हात धरून मठपति चालत होते व भाविक वैष्णव पुढें भजन करीत नाचत चालले होते. बुक्याची आणि फुलांची तर सारखी वृष्टीच होत होती. हरिनामाच्या जयघोषानें सगळें काशीक्षेत्र दणाणून गेलें. रात्रौ अत्यंत प्रेक्षणीय असें दारूकाम सोडण्यांत आलें. ती मौज पाहण्यास नागरिक स्त्रीपुरुषांच्या झुंडीच्या झुंडी लोटल्या होत्या. याप्रमाणें सात रात्री आणि सात दिवस नाथभागवताची मिरवणूक मठपतींनीं काढली. शिवाय जे पंडित धनिक होते, त्यांपैकीं एकेका पंडिताकडून प्रत्येक दिवसाच्या उत्सवाचा खर्च मठपतीनीं करविला. असा सोहळा सात दिवस झाल्यावर आठवे दिवशीं, मठपतींनीं पंडितांपुढें नाथांचें कीर्तन करविलें. नाथवाणीचा महिमा काय वर्णन करावा ? जी वाणी आज तीनशें वर्षें सगळ्या महाराष्ट्रास सारखी झुलवीत आहे आणि कै. न्या. रानड्यांसारख्या समाजिस्टांसही ज्या वाणीनें वेड लावलें, ती, प्रत्यक्ष नाथांच्या तोंडची वाणी ऐकून काशींतील पंडित आश्चर्यचकित आणि हताभिमान झाले, इतकेंच नव्हे तर त्यांची वृत्ति पार बदलून गेली. पुढें मठपतींनीं पंडितांस सांगितलें कीं ह्या भागवताच्या प्रति अवलोकनार्थ करून ठेवाव्या. गलिताभिमान झालेले पंडित नम्रपणें म्हणाले, " ज्याला प्रत्यक्ष भगवान् साह्य आहे त्याला दूषण कोण लावील ? आमच्या हातून, अज्ञानामुळें, अमर्यादा घडली, त्याबद्दल आपण क्षमा केली पाहिजे." पंडितांचें हें भाषण ऐकून नाथांचें मन द्रवलें. त्यांनीं उठून सर्व पंडितांस आलिंगन दिलें आणि त्यांस सत्कारपूर्वक निरोप दिला. भागवताची टीका पूर्ण झाल्यावर, ' रुक्मिणीस्वयंवर ' हा ग्रंथही नाथांनीं काशींतच लिहिला. पुढें कांहीं दिवसांनीं, मठपतींचा निरोप घेऊन नाथ दक्षिणेंत प्रतिष्ठानीं आले.

नाथमहाराजांची काशींत मोठी कीर्ति होऊन ते परत पैठणास येत असतां, वाटेंत जोगाईचें आंबें हें गांव लागलें. तेव्हां, तेथील प्रसिद्ध संतकवि दासोपंत * यांचें दर्शन घ्यावें या उद्देशानें नाथ त्यांच्या घरीं गेले. नाथ आल्याचें समजतांच पंतांनीं सामोरे येऊन आलिंगनपूर्वक त्यांचें स्वागत केलें. दासोपंतांच्या प्रेमाग्रहामुळें नाथांनीं त्यांच्या घरीं कांहीं दिवस वास्तव्य केलें. तेवढा काल उभयतांनीं कीर्तन भजनादिकांत मोठ्या आनंदानें घालविला. नाथांची समाधानवृत्ति पाहून पंतांस आनंद झाला. त्यांचा निरोप घेऊन, नाथ पैठणास जाण्यास निघाले त्या वेळीं दासोपंतांनीं त्यांस, कांहीं द्रव्य व वाहनें बरोबर घेऊन जाण्यास सांगितलें. परंतु त्यांचा स्वीकार न करितां, " आपली कृपा असली म्हणजे पुरे, " इतकेंच उत्तर नाथांनीं दिलें व " जन्माष्टमीच्या उत्सवास आपण एकदां पैठणास अवश्य यावें " अशी पंतांस विनंति केली. पंतांनीं ती विनंति मान्य केली.

नाथ पैठणास गोदातीरीं येऊन प्रविष्ट झाल्याचें वर्तमान समजतांच, उद्धव मोठ्या समारंभानें त्यांस सामोरा गेला. नाथचरणीं उद्धवाचें प्रेम अगदीं अनन्य होतें. केशव म्हणतातः—

**दुरूनि श्रीनाथदर्शन । होतांचि आनंदलें मन ।**
**तेथून साष्टांग नमन । उद्धव आपण करीत आला ॥**
**श्रीनाथपायीं मस्तक । अति आवडी घडी एक ।**
**ठेवूनि निष्ठापूर्वक । प्रदक्षिणा देख करी तेव्हां ॥**
**हृदयीं श्रीनाथाचें प्रेम । मुखीं श्रीनाथाचें नाम ।**
**श्रीनाथसेवासंभ्रम । इंद्रियां विश्राम आलिंगनीं ॥**

पैठणांतले हजारों भाविक लोक नाथदर्शनार्थ गोदातीरीं लोटले होते व नाथही, जो भेटेल त्यास, प्रेमपूर्वक आलिंगन देत चालले होते. पुढें, कीर्तनादिकांचा सोहळा नाथांनीं पूर्ववत् सुरू केला. अशा रीतीनें दोन महिने गेल्यावर, श्रीकृष्ण-जयंती जवळ आली, तेव्हां वार्षिक उत्सवास आरंभ झाला. कबूल केल्याप्रमाणें, दासोपंतही आपल्या लवाजम्यानिशीं नाथगृहीं येऊन दाखल झाले. ते पालखींतून खालीं उतरून वाड्यांत शिरणार, तोंच नाथांच्या देवडीवर श्रीदत्तमूर्ति उभी असलेली त्यांच्या दृष्टीस पडली. पंतांनीं मोठ्या भक्तीनें प्रभुचरणाचें वंदन केलें. आपलें उपास्य दैवत नाथांच्या देवडीवर द्वारपालाचें काम करीत आहे हें पाहतांच,

* यांचें अल्पचरित्र महाराष्ट्रकविचारित्राच्या पहिल्या भागांत दिलें आहे.

पंतांच्या मनांत जो अल्पस्वल्प अहंभाव वास करीत होता त्याचा लय होऊन नाथांच्या पारमार्थिक अधिकाराविषयीं त्यांची पूर्ण खात्री झाली. " मला नाथांची भेट करवा " अशी विनंति त्यांनीं श्रीदत्तात्रेयांस केली तेव्हां त्यांनीं आंत जाऊन पंतांच्या आगमनाचें वर्तमान नाथांस कळविलें. तेव्हां उद्धवासह नाथ त्यांस सामोरे गेले. पंतांनीं नाथांस साष्टांग नमस्कार घातला, तेव्हां नाथांनीं त्यांस उठवून प्रेमानें आलिंगन दिलें. पुढें उत्सवाची समाप्ति होईपर्यंत पंत नाथगृहीं राहिले. उद्धवानें त्यांची उत्तम बडदास्त ठेवली होती. ' नमो एकनाथपंत संत साधु भला रे ' या प्रसिद्ध पद्याचे अखेरीस ' **दासोपंत** चोजविला रे ' असे शब्द असल्यामुळें, सदर पद्य दासोपंतानीं एकनाथांची स्तुति करण्यासाठीं रचिलें आहे, अशी रा. पांगारकरांची समजूत झालेली दिसते. परंतु दासोपंतांची जी कविता प्रसिद्ध आहे, तींत त्यांनीं ' दासोपंत ' या शब्दानें कोठेंही स्वनामनिर्देश केलेला नाहीं; ' दिगंबर ' किंवा ' दिगंबरानुचरु ' हींच नांवें त्यांनीं सर्वत्र उपयोजिलीं आहेत. असो.

एके दिवशीं नाथ गोदेवर स्नान करून घरीं येत असतां, वाटेंत कोणी उन्मत्त मनुष्य तंबाकू खाऊन थुंकला, ती थुंकी नाथांचे अंगावर उडाली. पण त्याबद्दल त्या सत्पुरुषास बिलकुल विषाद वाटला नाहीं. अत्यंत शांत चित्तानें परत गंगेवर जाऊन त्यांनीं पुनः स्नान केलें. पुढें घरीं जातांना, त्या गृहस्थास शुद्ध करावें या हेतूनें नाथ मुद्दाम त्याच्या घरीं गेले आणि त्यांनीं त्यास मोठ्या आदरानें नमस्कार केला. तो गृहस्थ ब्राम्हणेतर वर्गापैकीं असल्यामुळें, हा ब्राम्हण आपणास नमस्कार करतो हें पाहून तो लज्जित झाला. तेव्हां नाथ त्यास म्हणाले, " मी तुमच्याकडे अपराधाची क्षमा मागण्यास आलों आहें. तुम्हीं तंबाकू खाऊन रोज ज्या जागीं थुंकत असतां, त्या जागेवरून मी चाललों म्हणून आपली थुंकी माझ्या अंगावर पडली, तरी याबद्दल आपल्याकडे कांहीं दोष नसून, ही माझीच चुकी आहे, " नाथांचें हें भाषण ऐकतांच त्या मनुष्यास मोठा पश्चात्ताप झाला व फार वाईट वाटलें. हात जोडून आणि डोळ्यांत आंसवें आणून तो नाथांस म्हणाला, " महाराज, मीच मोठा पतित आहें. आपल्यासारख्या थोर पुरुषाच्या अंगावर मी उन्मत्तपणें थुंकलों, या घोर पातकाची निवृत्ति आतां कशी होणार ? " इतकें बोलून त्यानें नाथांपुढें लोटांगण घातलें. त्याच्या ठायीं सद्भाव उत्पन्न झाला; व त्यामुळें त्याचें अंतःकरण शुद्ध झालें. हा पालट नाथांच्या लक्ष्यांत येतांच नाथांनीं त्यास मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें व म्हटलें, " झाल्या

गोष्टीबद्दल आतां तुम्ही कांहीं खेद करूं नका. तुम्हास अनुताप झाला त्याच वेळीं तुमच्या पापाची निवृत्ति झाली." नाथांनीं आपणास आलिंगन दिलें हें पाहतांच तो मनुष्य अत्यंत हर्षभरित झाला. पुढें त्याच्या विनंतीवरून नाथांनीं त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेविला व ते स्वाश्रमीं आले.

पुढें एके दिवशीं नाथ गंगेवर स्नान करून परत येत असतां, एक अनामिक स्त्री घागर घेऊन, घाईघाईनें, गंगेवर पाण्यास गेली मागून तिचें लहान मूल रडत रडत येऊं लागलें. परंतु उन्हानें वाळू फार तापलेली असल्यामुळें त्याच्या पायास चटके बसूं लागल्यामुळें तें तेथेंच वाळूंत तळमळत पडलें. ती त्याची कारुण्यजनक स्थिति पाहून नाथांचें कोमल हृदय द्रवलें. धांवत जाऊन त्यांनीं त्या मुलास आपल्या खांद्यावर उचलून घेतलें व त्यास विचारलें " बाळ तूं कोणाचा ? तुझें घर कोठें आहे ? " त्या मुलानें खुणेनें आपलें घर दाखविलें, तेव्हां नाथ त्यास घेऊन तेथें गेले. त्याच्या घरीं गेल्यावर, त्यांच्या ध्यानांत आलें कीं हें पोर अनामिकाचें आहे. म्हणून ते परत गंगेवर गेले व तेथें त्यांनीं सचैल स्नान केलें व घरीं येऊन नित्यनैमित्तिक कर्म संपादिलें. हा प्रकार कोणाच्याहि अवलोकनांत आला नाहीं. पुढें अशीं मौज झाली कीं, कोणी एक कुष्टरोगी ब्राह्मण रोगपरिहारार्थ अनुष्ठान करण्यास त्र्यंबकेश्वरीं गेला व तेथें त्यानें त्र्यंबकेश्वराचें कडकडीत अनुष्ठान चालविलें. अशा रीतीनें, तेथें त्यानें एक तप घालविलें. तेव्हां, त्र्यंबकेश्वरानें त्यास स्वप्नांत दृष्टांत दिला कीं, पैठण येथें महाज्ञानी आणि समर्थ असा एकनाथ वास्तव्य करीत आहे, त्याजपाशीं तूं जा आणि त्यास नमस्कार कर. वाळूंत तडफडत पडलेलें अनामिकाचें पोर त्यानें खांद्यावर घेऊन घरीं पोंचविलें, ह्या सत्कृत्यामुळें झालेलें पुण्य जर एकनाथाकडून तुला मिळेल तर तुझा रोग बरा होईल." ब्राह्मणास मोठा आनंद झाला. कित्येक दिवस प्रवास करून तो पैठणास आला व नाथांच्या घरीं जाऊन त्यांच्या चरणावर त्यानें मस्तक ठेविलें. व दृष्टांताची हकीकत त्यांस निवेदन केली. "अनामिकाच्या मुलास खांद्यावर घेऊन आपण त्यास घरीं पोंचविलें तें पुण्य जर मला आपण कृपा करून द्याल तर माझें कुष्ट जाईल," ही त्याची विनंति ऐकून नाथांस आश्चर्य वाटलें. कारण वरील गोष्टीची त्यांस मुळींच आठवण नव्हती. ते ह्मणाले, "भटजी, पापपुण्याची कल्पना मला मुळींच नाहीं. यदृच्छेनें जें काय माझ्या हातून घडतें तें मी करितों. तथापि, त्र्यंबकेश्वर सर्वसाक्षी आहे आणि मजकडून कांहीं पुण्यकर्म घडलें आहे असें जर त्याचें ह्मणणें असेल, तर त्या पुण्याचें उदक, तुमच्या रोगपरिहारासाठीं, मी

तुमच्या हातावर या घटकेस सोडण्यास तयार आहें." इतकें बोलून त्यांनीं विप्राच्या हातावर उदक सोडलें. तें त्यानें आपल्या अंगास लावतांच त्याचें कुष्ट पार मावळलें व तो पूर्ण निरोगी झाला. अनेक लोकांनीं हा प्रकार पाहून मोठें आश्चर्य केलें. नाथांचे अनंत उपकार मानून तो ब्राह्मण आपल्या गांवीं गेला.

वरील गोष्ट खरोखर घडलेली असो वा दंतकथा असो, तिचें तात्पर्य फार महत्त्वाचें आहे. कोरड्या कर्माचरणापेक्षां भूतदयेचा ओलावा अधिक पुण्यकारक आहे हें दाखविण्याच्या उद्देशानेंच ही कथा अस्तित्वांत आणली गेली आहे. "भूतांची दया हें भांडवल संतां," "विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म" इत्यादि वचनांत चें भूतदयेचें माहात्म्य तुकारामबुवांनीं वर्णिलें आहे, त्याची यथार्थता स्पृश्यास्पृश्य भेदाच्या संकुचित क्षेत्रांत स्वतःचा कोंडमारा करून घेणाऱ्या आणि शुष्क कर्मकांडाच्या रुक्ष वातावरणांत ज्यांच्या भूतदयेचा आणि प्रेमळ हरिभक्तीचा झरा पार आटून गेला आहे, अशा सत्यधर्मपराङ्मुखांच्या लक्ष्यांत येणें जरी शक्य नाहीं, तरी 'दया धरमका मूल है' ह्या सिद्धांताच्या त्रिकालाबाधितत्वास हरताळ फासण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगांत नाहीं आणि म्हणूनच, ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम इत्यादि भागवतधर्मीय संतांपुढें या कर्मठांस शेवटीं हात टेकावें लागले. पैठणच्या ब्राम्हणांनीं 'संन्याशाचीं पोरें' म्हणून ज्या ज्ञानदेवादि भावंडांची हेटाळणी केली, त्यांस त्यांना शेवटीं शुद्धिपत्र द्यावें लागलें. एकनाथांचा छळ पैठणच्या ब्राम्हणांनीं कसा परोपरीनें केला हें याच चरित्रांत वाचकांनीं पाहिलें आहे, परंतु शेवटीं नाथांच्या भागवतधर्माचा जयजयकार व्हावयाचा तो झालाच आणि अद्याप होत असून पुढेंही होत राहणार. रामेश्वरभट्टांसारख्या पट्टीच्या विद्वान् ब्राम्हणानें तुकारामबुवांस काठीखालीं झोडपलें, पण शेवटीं बुवांचें शिष्यत्व त्यांस पतकरावें लागलें. तात्पर्य, आमच्या महाराष्ट्र संतानीं जर सर्वांत मोठी अशी एखादी कामगिरी केली असेल, तर दयाधर्माचा फैलाव, ही ती कामगिरी होय. वरील गोष्टीवरून आणखी एक तत्त्व सहज ध्यानांत येतें तें हें कीं, खुद्द भगवंतासदेखील, त्या कुष्टी ब्राह्मणाच्या बारा वर्षांच्या कडकडीत तपापेक्षां, नाथांनीं सहज एकदां एका महाराच्या मुलास खांद्यावर घेऊन घरीं पोचविलें होतें, ही गोष्ट अधिक पुण्याईची वाटली. सारांश, भूतदया आणि भक्ति यांची ज्या धर्माशीं फारकत झालेली असेल किंवा भूतदया दाखविण्यास आणि भक्ति करण्यास जो धर्म आडवा येत असेल, तो 'धर्म' या नांवास बिलकुल पात्र नसून, तो केवळ अधर्म होय, असें बेलाशक धरून चालण्यास हरकत नाहीं. अस्तु.

नाथांचें पुराण ऐकण्यास, साक्षात् गोदावरी, सुंदर तरुणीच्या रूपानें एका कोंपऱ्यांत, पण नाथांच्या दृष्टीसमोर, येऊन बसत असे; आणि एकाग्र चित्तानें पुराणश्रवण करीत असे. कांहीं दिवसांनीं, चवचाल स्त्रीपुरुषांच्या मनांत, चालू वहिवाटीप्रमाणें, अशी शंका उत्पन्न झाली कीं, यांत कांहीं तरी काळें बेरें असलें पाहिजे. ज्यांची स्त्रीपुरुषभावना पूर्ण नाहींशी झालेली त्या नाथांविषयीं असली शंका घेणें म्हणजे स्वतःची क्षुद्रमनस्कता व्यक्त करणें होय. परंतु शंकेखोरांची ही परंपरा फार जुनी असल्यामुळें, यांत कांहीं विशेष आहे असें मानण्याचें कारण नाहीं. असो. हळुहळू, त्या शंकेस वाचा फुटून लोकांत त्याविषयीं कुजबुज सुरू झाली व ती स्त्री येते कोठून याचा पत्ता लावण्याचा प्रयत्न कांहीं उपद्यापी लोक करूं लागले. एके दिवशीं, पुराणसमाप्तीनंतर, स्त्रीरूपधारी गोदा, नाथांस नमस्कार करून निघाली, तेव्हां तिच्या मागून हे लोक चालले. जातां जातां, ती स्त्री शेवटीं गोदातीरीं गेली आणि नदीच्या पात्रांत जाऊन गुप्त झाली. हा विचित्र प्रकार पाहून, तिच्या मागून चाललेल्या शंकेखोरांना अगदीं तोंडांत मारल्यासारखें झालें आणि थोडासा पश्चात्तापही झाला. ते परस्परांस म्हणाले, " अहो, ही तर साक्षात् गोदावरी ! ही नाथांचें पुराण ऐकण्यास येत असतां, तिजविषयीं आणि नाथांविषयीं आम्ही आपल्या मनांत विकल्प बाळगावा, हें केवढें पाप ! छे छे, आपण हा अगदींच मूर्खपणा केला " नंतर, दुसरे दिवशीं, गोदावरी पुराणास आली म्हणजे तिला शरण जाऊन या पापाची निष्कृति करावयाची असें त्यांनीं ठरविलें. परंतु दुर्दैव त्यांचें. दुसरे दिवशीं गंगा पुराणास आलीच नाहीं. नाथांच्या लक्ष्यांत हा सर्व प्रकार येऊन चुकला होता. म्हणून ते म्हणाले, " आज आमचा नेहमींचा श्रोता पुराणास आलेला दिसत नाहीं. कोणाच्या मनांत कांहीं तरी विकल्प उत्पन्न झाला असेल म्हणूनच ती आली नसावी असें वाटतें " हें ऐकतांच तिचा पत्ता लावण्याचा चंग बांधून, आदल्या दिवशीं तिच्या मागून गेलेल्या विकल्पी जनांनीं पश्चात्तापपूर्वक नाथांस वंदन करून म्हटलें, " महाराज, त्या स्त्रीचें वास्तविक स्वरूप आम्हांस ठाऊक नसल्यामुळें, भलतीच शंका घेऊन, तिचा पत्ता लावण्याच्या हेतूनें, काल आम्ही तिचा पाठलाग केला. पण शेवटीं ती नदीवर गेली आणि नदींत जाऊन गुप्त झाली ! केवळ अज्ञानामुळें ही भयंकर चुकी आमच्या हातून घडली, याबद्दल आपण कृपा करून आम्हांस क्षमा करावी. " नाथ त्यांस म्हणाले, " तुम्ही कांहीं वाईट वाटून घेऊं नका. उलट श्रीगोदावरीचें प्रत्यक्ष दर्शन तुम्हांस

घडलें, याबद्दल तुम्हास धन्यवाद दिला पाहिजे. तरी आतां मनाची उद्विग्नता काढून टाका आणि हरिभजनांत आनंदानें काळ घालवा. ”

नाथांच्या शेजारीं एक गृहस्थ राहत असे, पण त्यानें आपल्या सबंध आयुष्यांत नाथांच्या वाड्यांत कधीं पाय टाकला नव्हता. नाथांच्या घरीं रात्रंदिवस भजन-कीर्तनादि प्रकार होत असत आणि हजारों लोकांचा समुदाय तेथें नित्यशः जमत असे. परंतु हा गृहस्थ असला खप्पी कीं, एक वेळदेखील नाथांचें कीर्तन ऐकण्याची बुद्धि त्यास झाली नाहीं ! कमळाशेजारीं राहणाऱ्या बेडुकानें ज्याप्रमाणें कमलांतला मकरंद न सेवितां चिखलावरच हात मारावा त्याप्रमाणें, नाथसान्निध्यानें स्वतःची उन्नति करून न घेतां हा गृहस्थ संसारांत आणि विषयांतच नेहमीं रंगलेला असे. ही त्याची शोचनीय स्थिति पाहून नाथांस त्याची कींव आली. मग एके दिवशीं, नाथांच्या दारावरून तो जात असतां, नाथांनीं हाक मारून त्यास बोलाविलें आणि आदरपूर्वक जवळ बसवून, त्याची सर्व हकीकत विचारून घेतली. तो म्हणाला, “ मी एका व्यापाऱ्याचा नोकर असून, माझा वेळ या नोकरींतच जातो. माझा धनी मला जें वेतन देतो, तेवढ्यावर कुटुंबाचा निर्वाह चालवून मी काळ कंठीत आहें. जेवणापूर्वी दिवसांतून एकदां स्नान मात्र करितों. संध्या वगैरे कांहीं करीत नाहीं. ” मग, त्याच्या अधिकारानुरूप त्याला कांहीं तरी तरणोपाय सांगावा या उद्देशानें नाथ त्यास म्हणाले, “ वेळांत वेळ काढून रोज जर आमच्या येथें येऊन दोन घटका बसत जाल तर आम्हास मोठी धन्यता वाटेल. ” गृहस्थानें उत्तर दिलें, “ काय दोन घटका ? मला एक पळभरदेखील रिकामपण मिळत नाहीं तेथें दोन घटकांची फुरसत मला कशी मिळणार ? ” नाथ ह्मणाले, “ ठीक आहे. तुह्मी आपल्या घरून निघून धन्याच्या पेढीवर जातां, तेवढा तरी वेळ आह्मास द्याल कीं नाहीं ?” आपल्या उद्धारासाठीं हा सत्पुरुष इतकी आस्था दाखवितो, तरी आपण याचें ह्मणणें मान्य करावें, या विचारानें, घराहून पेढीवर व पेढीवरून घरीं जातांना व येतांना जो काल व्यतीत होतो तेवढा परमार्थाकडे लावण्याचें त्यानें कबूल केलें. मग, विष्णुसहस्रनामाचा एक श्लोक रोज पाठ करावा व पेढीवरून परत घरीं येताना तो आपणास ह्मणून दाखवावा, अशी कामगिरी नाथांनीं त्यास सांगितली. त्याप्रमाणें तो गृहस्थही, आस्थापूर्वक नित्य एक श्लोक पाठ करून तो नाथांस ह्मणून दाखवूं लागला. अशा रीतीनें, कांहीं दिवसांनीं संपूर्ण विष्णुसहस्रनामस्तोत्र त्यानें मुखोद्गत केलें व तेवढ्या अवधींत

त्याच्या वृत्तींतही थोडासा पालट झाला. एके दिवशीं, नाथांनीं त्याजकडून तें संपूर्ण स्तोत्र म्हणवून घेतलें व त्याचे शुद्ध उच्चार ऐकून त्यांस आनंद झाला. मग त्याचें अभिनंदन करून ते त्यास म्हणाले, यापुढें हें स्तोत्र रस्त्यांतून म्हणत जावें हें उचित नाहीं. म्हणून आतां मी तुम्हास एक नियम घालून देतों तो अखंड पाळीत जा. तुम्ही संध्याकाळीं पेढीवरून घरीं येतां तेव्हां पादरक्षा व अंगांतले कपडे काढून ठेवून स्नान करीत जा व स्नान केल्यावर धोतर नेसून होईपर्यंत जो काल जाईल तेवढ्यांत संपूर्ण स्तोत्राचें पारायण करून नंतर अन्नग्रहण करा." हा नियम त्या गृहस्थानें अगदीं बिनचूक पाळला. नित्य नोकरीवर जातेवेळीं नाथांचें दर्शन घेण्याचा क्रम त्यानें ठेविला होता. पुढें कालांतरानें त्याचा मृत्युकाल समीप आला. त्याला नवज्वराची व्यथा होऊन शुद्धि नाहींशी झाली व त्यामुळें नित्यनियमाचें उल्लंघन झालें. शेवटीं, हा आतां वांचत नाहीं असें पाहून, त्यास प्रायश्चित्त देण्यासाठीं ब्राह्मणांनीं मोरींत नेऊन आंघोळ घातली, तोंच त्यास एकदम स्फूर्ति होऊन, समग्र विष्णुसहस्रनाम स्तोत्र त्यानें घडाघड म्हटलें व नंतर प्राण सोडला. अशा रीतीनें तो गृहस्थ नाथांच्या कृपेनें शेवटीं विष्णुलोकास गेला.

नाथांच्या अढळ शांतवृत्तिविषयीं एक मनोरंजक गोष्ट एका हरिदासाच्या कीर्तनांत ऐकली, तिचा येथें संग्रह करितों. कोंकणचा एक गरीब ब्राह्मण आपल्या मुलाच्या मुंजीस मदत मिळविण्यासाठीं फिरत असतां पैठणांत आला. तेथें एका पिंपळाच्या पारावर गांवांतल्या कुटाळ लोकांचा अड्डा असून त्या अड्ड्यावर बरेच कुटाळ बसले होते. पिंपळाच्या पाराच्या दगडांवर बसलेल्या या दगडांस सज्जनावर दगड फेंकण्याशिवाय दुसरा कोणता उद्योग असणार? बहुतेक घरचे श्रीमंत असल्यामुळें, कांहीं एक उद्योग न करितां, खावें प्यावें, मजा करावी आणि करमणुकीदाखल अड्ड्यावर जमून, सज्जनांची निंदा आणि टवाळकी करावी हा त्यांचा उद्योग. या सर्व कुटाळांचा एकनाथांवर मोठा कटाक्ष असे. एकनाथांस साधु म्हणून सगळे लोक त्यांच्या भजनीं लागतात, हें त्यांस आवडत नसे; व संधि सांपडेल तेव्हां नाथांचा अपमान करण्याचा त्यांनीं अगदीं चंग बांधला होता. मशारनिल्हे कोंकणस्थ ब्राह्मण पैठणांत आला तो, त्याच्या सुदैवानें व कुटाळांच्या दुर्दैवानें, या कुटाळांच्या अड्ड्यावरच पहिल्यानें आला; व ही बाह्यतः प्रतिष्ठित मंडळी पाहून, त्यानें त्यांजपाशीं द्रव्याची याचना केली. तेव्हां त्या कुटाळमंडळाचा अध्यक्ष एक गर्भश्रीमंत तरुण होता, त्यानें त्यास

विचारलें, " भटजी, तुमच्या मुलाच्या मुंजीस केवढ्या रकमेची जरूरी आहे ? " ब्राह्मणानें सांगितलें ' दोनशें रुपयांची.' अध्यक्ष साहेब म्हणाले, " ठीक आहे. आम्हीं एक कामगिरी तुम्हांस सांगतों, ती जर तुम्ही करून दाखवाल तर ही दोनशें रुपयांची रकम आम्ही तुम्हांस देऊं. " एकदम दोनशें रुपये मिळणार हें ऐकतांच त्या दरिद्री ब्राह्मणाच्या तोंडास पाणी सुटलें. त्यानें अधीरपणें विचारलें, " अशी तुमची कोणती कामगिरी करावयाची आहे ? " अध्यक्ष म्हणाले, या गांवांत एक्या उर्फ एकनाथ या नांवाचा एक ढोंगी साधु राहतो. तो स्वतःस शांतीचा मोठा सागर म्हणवितो. एखाद्या गोष्टीबद्दल मनांत त्याला केवढाही राग आलेला असला तरी बाहेरून तो नेहमीं शांतच दिसतो; आणि यामुळेंच साधु साधु म्हणून भोळसट लोक त्याच्या नादीं लागतात. तरी, त्या एकनाथाकडे जाऊन, युक्ति प्रयुक्तीनें जर त्याला तुम्ही राग येईल असें कराल, तर आम्ही तुम्हास तावडतोब दोनशें रुपये देऊं. ब्राह्मणास वाटलें, ही कामगिरी अगदींच सोपी आहे. तो ह्मणाला, ' ठीक आहे. मला तुह्मी दुरून एकनाथाचें घर दाखवा म्हणजे थोड्याच वेळांत मी त्याला असा सतावून सोडतों कीं तो रागानें अगदीं लाल होऊन जाईल. " मग त्याप्रमाणें एका कुटाळानें त्या ब्राम्हणास नाथांचें घर दाखविलें. ब्राम्हण नाथांच्या घरीं गेला तेव्हां नाथ देवघरांत देवाची पूजा करण्यांत गुंतले होते. हें पाहून, तो ब्राम्हण पायांतल्या जोड्यासह एकदम त्यांच्या देवघरांत शिरून, ते ज्या पाटावर बसले होते, त्याच पाटावर बाजूस थोडीशी जागा होती तिजवर, त्यांना अगदीं खेटून बसला ! सोवळें नेसून देवपूजा करण्यांत गुंतलेल्या दुसऱ्या एखाद्या कर्मठ ब्राम्हणानें, ओंवळ्यानें शिवून असा भ्रष्टाकार केल्याबद्दल त्या कोंकणस्थ ब्राम्हणावर शिव्याशापांची लाखोली वाहिली असती आणि त्याचीं खवाटें धरून त्याला घराबाहेर काढून लावलें असतें. परंतु नाथ म्हणजे, पंतांच्या भाषेंत बोलावयाचें तर, ' शांतिजलधि ' ! ब्राह्मणानें केलेल्या अतिप्रसंगामुळें त्यांस राग तर आला नाहींच, पण उलट ते पाटावरून उठले आणि त्या ब्राह्मणापुढें साष्टांग नमस्कार घालून त्यास ह्मणाले, " महाराज, मी या धातूच्या देवाची पूजा करीत असतां, आपल्यासारख्या प्रत्यक्ष भूदेवानें येथें येऊन मला दर्शन द्यावें हें केवढें माझें भाग्य ! " इतकें बोलून, त्यांनीं ती देवाची मूर्ति बाजूस सारली आणि सगळें पूजासाहित्य ब्राह्मणास अर्पून त्याची यथासांग पूजा केली ! नाथांची ही शांतवृत्ति पाहून ब्राह्मण अगदीं चकित होऊन गेला. त्या मंडळीनें देऊं केलेले दोनशें रुपये आपणास बरेच महाग पडणार हें आतां त्याच्या लक्षांत येऊन चुकलें. परंतु द्रव्यलोभ मोठा विलक्षण

आहे. एकनाथ कितीही शांत असला तरी कोणत्या ना कोणत्या तरी उपायानें त्याला राग येईल असें आपण खात्रीनें करूं, असें त्याला वाटलें. इतक्यांत नाथांनी त्यास म्हटलें, "महाराज, घरांत भोजनाची सर्व सिद्धता आहे. आपल्या स्नानाचीच काय ती खोटी. आपण येथेंच स्नान करणार असाल तर पाणी तापलेलें आहे, गंगेवर जाणार असाल तर हा श्रीखंड्या आपणास वाट दाखविण्यास येईल." ब्राह्मणानें विचार केला, आपण गंगेवरच स्नानास जावें व तिकडेच पुष्कळ वेळ घालवावा. म्हणजे जेवणाची खोटी झाल्यामुळें एकनाथास राग येईल व सहजच आपलें काम होऊन जाईल. मग, श्रीखंड्यास बरोबर घेऊन तो गंगेवर गेला व गंगेंत स्नान करून तिकडेच लांबलचक संध्या करीत बसला. एक तास झाला, दोन तास झाले, तरी ब्राह्मण परत येत नाहीं हें पाहून नाथांस त्याच्याविषयीं चिंता वाटूं लागली. नदीची माहिती नसल्यामुळें, एखाद्या डोहांत ब्राह्मणानें जलसमाधि तर घेतली नसेल, असाही विचार त्यांच्या मनांत आला. मग, ब्राह्मणास नदीवर पोंचवून परत आलेल्या श्रीखंड्यास हांक मारून त्यांनीं सांगितलें, 'अरे, गंगेवर जा आणि ब्राह्मणाची काय हालहवाल आहे ती पाहून ये. तुमच्यामुळें जेवणाची खोटी झाली आहे, म्हणून नाथांनीं मला तुम्हास बोलावण्यास पाठविलें, असें मात्र त्यांस सांगूं नकोस.' त्याप्रमाणें श्रीखंड्या गंगेवर गेला. इकडे, नदीतीरीं, ब्राम्हणाच्या पोटांत भुकेचें काहूर उठलें होतें, तरी मुद्दाम उशीर करून, नाथांस राग आणावयाचा या निश्चयानें तो उगाच बसून राहिला होता. श्रीखंड्यास आपल्याकडे येतांना पाहून, मात्रा लागू पडली, या विचारानें त्याला आनंदाचें भरतें आलें. त्यानें श्रीखंड्यास विचारलें, काय हो, माझ्यामुळें जेवणाची खोटी झाली म्हणून तुमच्या यजमानास मोठा राग आला असेल, नाहीं? श्रीखंड्यानें उत्तर दिलें, नाहीं महाराज, आमच्या यजमानास राग कधींच येत नाहीं. आपण सुरक्षित आहांत कीं कसें, येवढेंच पाहून येण्यासाठीं त्यांनीं मला पाठविलें आहे. आपली संध्या अद्याप पुरी झाली नसल्यास आपण ती सावकाश पुरी करावी. आपण जरी जगाच्या अंतापर्यंत येथेंच नाक धरून बसलांत तरी तोंपर्यंत, बिलकुल न रागावतां, आमचे यजमान आपली वाट पहात बसतील. ब्राह्मणास अशी भयंकर भूक लागली होती कीं, त्यानंतर आणखी उशीर करणें त्यास शक्य नव्हतें. म्हणून तो श्रीखंड्याबरोबर नाथांच्या घरीं आला. गिरिजाबाईनीं लागलीच पानें वाढलीं व सर्व मंडळी जेवावयास बसली. नाथांनीं त्या ब्राह्मणास आदरपूर्वक आपल्या शेजारीं बसविलें होतें. जेवणाच्या

त्याटही वरा होता. परंतु, कांहीं तरी खुसपट काढून व तुसडेपणा करून नाथांस राग येईल असें करावयाचें येवढेंच ज्याचें ध्येय, त्या ब्राम्हणास तें सुग्रास अन्न गोड कसें लागणार? नाथांस, निदान गिरिजाबाईस तरी, राग यावा म्हणून, वरण अळणीच आहे, आमटी फार तिखटच झाली आहे, श्रीखंडांत साखरच अधिक पडली, भात कठिणच झाला असें म्हणून प्रत्येक जिनसास तो नांवें ठेवूं लागला. पण नाथांच्या किंवा गिरिजाबाईच्या मुखावर त्याला रागाचें चिन्ह मुळींच दिसेना. शेवटीं, अत्यंत मूर्खपणाचा पण आपल्या मतें अगदीं निर्वाणीचा असा एक उपाय करून पाहण्याचें त्यानें ठरविलें. मनुष्य कितीही शांत असला तरी त्याच्या देखत त्याच्या स्त्रीचा जर कोणी अपमान केला तर त्याला राग आलाच पाहिजे, या विचारानें त्या मूर्ख व द्रव्यलोभी ब्राह्मणानें, गिरिजाबाई वाढावयास आली असतां एकदम तिचा हात धरला. असला अतिप्रसंग कोणत्याही कुलस्त्रीस कसा सहन होईल? गिरिजाबाईनीं आपला हात सोडवून घेण्यासाठीं त्या ब्राह्मणाच्या हातास जोरानें हिसडा दिला, तेव्हां सहास्य मुद्रेनें व अत्यंत शांततापूर्वक नाथ तिला म्हणाले, गिरिजे, अशी कावरीबावरी कां झालीस? अग तो आपला हरिपंडित* आहे असें समज म्हणजे झालें. पतीचे हे शब्द ऐकतांच गिरिजाबाई शांतचित्तानें अगदीं स्वस्थ उभ्या राहिल्या. तो प्रकार पाहून, तो ब्राह्मण इतका निगरगट्ट खरा, पण त्याचीही वृत्ति तत्काळ पालटल्याशिवाय राहिली नाहीं. तो बाहेर जाऊन आंचवून आला आणि नाथ व गिरिजाबाई यांजपुढें साष्टांग नमस्कार घालून, सद्गदित होऊन ह्मणाला, 'नाथमहाराज मी आपला महान् अपराधी आहें. मला क्षमा करा.' असें म्हणून व नाथांचे पाय धरून तो स्फुंदस्फुंदून रडूं लागला. तेव्हां नाथांनीं त्याला आपल्या हातांनीं वर उठविलें व विचारलें, "महाराज, असें विलक्षण वर्तन आज आपण कां केलें?" यावर, त्या कुटाळमंडळानें आपल्याकडे ही कामगिरी कशी सोंपविली व मुलाच्या मुंजीसाठीं दोनशें रुपयांची रकम आपणास एकदम मिळणार या आशेनें आपण हा सगळा प्रकार मुद्दाम कसा केला वगैरे सर्व हकीकत त्या ब्राम्हणानें सांगितली. ती ऐकून नाथांस ब्राम्हणाची कींव आली. ते त्यास म्हणाले, 'मुलाच्या मुंजीसाठीं दोनशें रुपयांची आपणास जरूरी आहे असें जर अगोदरच आपण मला सांगितलें असतें तर मी आपणास ताबडतोब दोनशें रुपये दिले असते आणि आपला हा सगळा त्रास वांचला असता. आपणास विनाकारण येवढी तसदी

* नाथांचा मुलगा.

२७२६

पडली याचें मला फार वाईट वाटतें. ' इतकें बोलून, नाथांनीं उद्धवाकडून दोनशें रुपये आणवून ते ब्राम्हणापुढें ठेविले व त्यास म्हटलें, " भटजी, हे दोनशें रुपये घ्या पण याशिवाय त्या तुमच्या दोस्तांकडूनही तुम्हांला आणखी कांही तरी मदत मिळवून देण्याचा माझा विचार आहे. तर तुम्ही आतां त्या अड्ड्यावर जाऊन त्या मंडळीस असें सांगा कीं, " एकनाथास राग येतो याविषयीं मी आपली खात्री करून घेतली आहे; व त्याप्रमाणें मी त्याला राग आलेला तुम्हास दाखवितों. पण तसें केल्यानंतर, ठरावाप्रमाणें तुम्ही मला दोनशें रुपये द्यालच, याला प्रमाण काय ? मी परस्थ मनुष्य, तुम्ही सर्वांनीं जर मला धुडकावून दिलें तर मी काय करणार ? यासाठीं, तुम्ही कांहीं तरी तारण मला द्या. " मला राग येणें शक्य नाहीं अशी त्या मंडळीची आजपर्यंतच्या अनुभवामुळें खात्री असल्यानें ही तुमची अट बहुतकरून ते कबूल करतील. तुमच्या म्हणण्याप्रमाणें प्रत्यक्ष दोनशें रुपये किंवा दुसरी एखादी वस्तु तारणादाखल त्यांनीं तुह्मांस दिलीच तर ती घेऊन तुह्मी मजकडे या. मग मी, रागाचा नसता आविर्भाव आणून, व हातांत जोडा घेऊन शिव्या देत तुमच्या मागें लागेन. तुम्ही पुढें पळा, मागून मी शिव्या देत येतों. अशा रीतीनें आपण दोघेही पारावर तुमची वाट पहात बसलेल्या मंडळीसमोरून गांवाबाहेर जाऊं. तेथें एक आडवाट मी तुम्हास दाखवीन. त्या वाटेनें तुम्ही दुसऱ्या गांवचा रस्ता धरा. व मी तशाच शिव्या देत परत घरीं येईन. " ब्राम्हणानें ही गोष्ट कबूल केली. मग ते दोनशें रुपये आपल्या पडशींत घालून तो कुटाळांच्या अड्ड्यावर गेला व नाथांनीं पढविल्याप्रमाणें, कुटाळांपाशीं सोंगाची बतावणी त्यानें अगदीं बेमालूम केली. त्याचें भाषण आणि त्यानें घातलेली अट ऐकून कुटाळांनीं आपसांत विचार केला कीं, " ह्या ब्राम्हणानें जरी कितीही सांगितलें तरी एकनाथास राग आणणें शक्य नाहीं. अशा स्थितींत, तारण म्हणून एखादी वस्तु या ब्राम्हणास देण्यास काय हरकत ? हा राजापुरी ब्राम्हण आपल्या कचाटांतून पळून जाणार थोडाच ! " मग कुटाळांच्या अध्यक्षानें आपल्या हातांतलें दोनशें रुपये किंमतीचें सलकडें काढून त्या ब्राम्हणाच्या हातीं दिलें व त्यास नाथांकडे पाठविलें. तो नाथांच्या घरीं येतांच, पूर्वी ठरल्याप्रमाणें, नाथ हातांत जोडा घेऊन त्याच्या मागें लागले व तो ब्राम्हण पुढें पळूं लागला. अड्ड्यावरून जातांना तर नाथांनीं रागाचा असा आविर्भाव आणला व इतक्या शिव्या दिल्या कीं तो प्रकार पाहून, नाथांस कधींही रागावतांना ज्यानें पाहिलें नव्हतें, अशा त्या कुटाळमंडळास आश्चर्यातिरेकानें वेड लागण्याचा प्रसंग आला.

ते सगळे, भ्रमिष्टासारखे आ पसरून तो अभूतपूर्व देखावा अनिमिष नेत्रांनीं पहात राहिले. हां हां म्हणतां तो ब्राह्मण आणि नाथ गांवाबाहेर बरेच दूर गेले. तेथें गेल्यावर, नाथांनीं ब्राह्मणास एक आडवाट दाखविली व त्या वाटेनें रातोरात जेवढें दूर जातां येईल तेवढें जाण्यास सांगितलें. दोनशें रुपये रोख आणि दोनशें रुपयांचें सलकडें मिळाल्याच्या आनंदांत ब्राह्मण नुसता पळत सुटला! तो दृष्टिआड झाल्यावर नाथ मागें फिरले व जातांना परत तशाच शिव्या देत घराकडे गेले! इतकें होईपर्यंत बरीच रात्र झाली. आश्चर्यातिरेक बराच कमी झाल्यावर कुटाळ शुद्धीवर आले तेव्हां त्यांस, ब्राह्मणास दिलेल्या सलकड्याची आठवण झाली. पण आतां तो ब्राह्मण आहे कोठें? त्याचा पाठलाग करावा तर रात्रीचा वेळ. शेवटीं, एकनाथास राग आलेला दाखविला तर दोनशें रुपये देण्याचें आपण कबूल केलेंच होतें; तेव्हां त्या दोनशें रुपयांऐवजीं तेवढ्या किंमतीचें सलकडें ब्राह्मणानें नेलें तर त्याबद्दल कुरकुर करण्याचें काय कारण? असा पोक्त विचार करून ती मंडळी घरीं गेली. त्यानंतर, नाथांच्या शांततेची परीक्षा पाहण्याच्या भानगडींत ते पुनः कधीं पडले नाहींत, हें सांगावयास नकोच.

वर दिलेली गोष्ट म्हणजे एक हरिदासी नकल आहे. ती खरोखरच घडली असेल असें समजण्याचें अर्थातच कारण नाहीं.

# प्रकरण सातवें.

## हरिपंडिताचा राग, म्हातारीचें सहस्रभोजन, गावबा, नाथांची समाधि.

नाथांचा ज्येष्ठ पुत्र हरिपंडित हा मोठा कर्मठ परंतु विद्वान् होता. आपल्या विद्वत्तेचा त्यास थोडासा गर्व असल्यामुळें, आपल्या हरिभक्त वडिलांस तो फारसा मानीत नसे. आपले तीर्थरूप प्राकृत ग्रंथरचना करितात व भक्तिमार्गाचें स्तोम माजवितात, हा प्रकार त्यास न रुचल्यामुळें तो काशीस गेला. हरिपंडितास तीन मुलगे झाले, त्यांपैकीं धाकटा राघोबा ह्याची बाळपणापासूनच नाथांच्या ठायीं फार भक्ति असल्यामुळें, तो त्यांजपाशींच राहिला. बाकी दोन पुत्र व पत्नी यांसह हरिपंडित काशीस गेला व तेथेंच वाडा बांधून राहिला. त्याच्या विद्वत्तेमुळें काशींत त्याचा मोठा मान झाला. पुत्राच्या ह्या उद्धततेबद्दल नाथांस थोडासा विषाद वाटल्याशिवाय राहिला नाहीं. मुलगा ज्याच्या ताब्यांत नाहीं, तो लोकांचा उद्धार काय करणार, असें म्हणून लोक आपला उपहास करितील, या विचारानें, स्वतः वाराणशीस जाऊन, हरिपंडिताची समजूत घालून, त्यास घरीं घेऊन येण्याचें त्यांनीं ठरविलें व उद्धवाकडून सर्व तयारी करवून, ते काशीस गेले. निघण्यापूर्वी कांहीं दिवस, एका ब्राम्हणास त्यानीं काशीस पाठवून, आपल्या आगमनाचें वृत्त हरिपंडितास कळविलें होतें. नाथांचा भक्तिमार्ग कर्मठ हरिपंडितास जरी फारसा प्रिय नव्हता, तरी ते मुद्दाम आपणास भेटण्यासाठीं काशीस येत आहेत, हें ऐकून त्यास आनंदच झाला. तो मोठ्या आदरानें नाथांस सामोरा आला व त्यांस आपल्या घरीं घेऊन गेला. नाथ तेथें होते तोंपर्यंत त्यांची सेवा त्यानें मोठ्या भक्तीनें केली. पुढें एके दिवशीं नाथांनीं त्यास एकांतीं भेटून सांगितलें कीं, यापुढें तूं माझ्या जवळ रहावेंस, असें मला वाटूं लागलें आहे. आतां माझा मृत्युकाल समीप येत चालला असून शेष आयुष्य तुझ्या सान्निध्यांत घालविण्याची माझी इच्छा आहे. म्हणूनच, तुला घरीं नेण्यासाठीं मी काशीस आलों आहें. काशींतील वाडा वगैरे

मिळकत तूं आपल्या दोन पुत्रांच्या स्वाधीन कर म्हणजे ते तिची योग्य व्यवस्था ठेवतील. " वडिलांच्या या इच्छेस हरिपंडितानें मान दिला. तो म्हणाला, " वृद्धपणीं आपली सेवा माझ्या हातून व्हावी, यांत मला संतोषच आहे, परंतु, माझ्या दोन अटी आपण कृपा करून मान्य केल्या पाहिजेत. पहिली अट ही कीं, यापुढें महाराष्ट्र भाषेंत पुराण सांगण्याचें आपण सोडून द्यावें. मला संस्कृत येतें; मी स्वतः संस्कृतांत पुराण सांगेन तें आपण ऐकत जावें. व दुसरी अट अशी कीं, आपण यापुढें परान्नसेवन करूं नये. " नाथ म्हणाले " ठीक आहे. " नाथांनीं आपल्या म्हणण्याप्रमाणें वागण्याचें कबूल केलेलें पाहून हरिपंडित खूष झाला व बापाबरोबर दक्षिणेंत येण्यास निघाला. कांहीं दिवसांनीं ते दोघेही पैठणास आल्यावर, हरिपंडितास आश्वासन दिल्याप्रमाणें, नाथांनीं परान्नसेवन वर्ज्य केलें व स्वतः मराठींत पुराण सांगण्याचें बंद करून, हरिपंडिताचें संस्कृत पुराण ते ऐकूं लागले. दुसऱ्याच्या घरीं भोजनास जाण्याचें नाथांनीं बंद केलें हें ऐकतांच भाविक जनांस थोडीशी उद्विग्नता वाटली. ते नाथांच्या घरीं पुराणश्रवणासही येईनातसे झाले. यामुळें, परमार्थमार्गोपदेश हें जें नाथांचें मुख्य अवतारकार्य, त्यास व्यत्यय येऊं लागला. पुढें अशी गोष्ट घडली कीं, पैठणांत एक वृद्ध स्त्री होती, तिनें आपल्या वैभवकालीं सहस्रभोजन घालण्याचा संकल्प केला होता. पण, दुर्दैवानें तिला दारिद्र्य आल्यामुळें हा तिचा संकल्प पुरा न होतां, उलट तिला स्वतःलाच आपला निर्वाह भिक्षेवर चालविण्याची पाळी आली. आपला सहस्रभोजनाचा संकल्प आतां कांहीं पुरा होत नाहीं या विचारानें ती म्हातारी नेहमीं सचिंत असे. अशा स्थितींत, एके दिवशीं, एका सत्पात्र ब्राह्मणानें तिला असें सांगितलें कीं, एका ब्रह्मनिष्ठ पुरुषास जर तूं भोजन देशील तर अनंत ब्राह्मणांस भोजन घातल्याचें श्रेय तुला मिळेल; आणि प्रस्तुत कालीं, एकनाथ हा मोठा ब्रह्मनिष्ठ पुरुष आहे. त्यास तूं आपल्या घरीं बोलावून जेऊं घाल म्हणजे सहस्रभोजनाचा फार दिवसांचा तुझा संकल्प सहज पुरा होईल. त्या म्हातारीस हें सांगणें पटलें. मग तिनें सहा महिने खटपट करून, भोजनाचें सर्व साहित्य जमविलें व पूर्ण तयारी झाल्यावर, पुराणसमयीं नाथांचे पाय धरून आपल्या घरीं भोजनास येण्याची त्यांस तिनें विनंति केली. ती म्हणाली, "महाराज, मी एक अनाथ दरिद्री स्त्री आहें. मी आपला निर्वाह भिक्षेवर चालवितें. सहस्रभोजन घालण्याचा पुष्कळ दिवसांचा माझा संकल्प आहे आणि तो संकल्प, आपण माझ्या घरीं अन्नग्रहण केलें असतां पुरा होईल अशी माझी खात्री आहे. तरी

आपण कृपा करून आतां माझ्या घरीं चलावें. भोजनाची सर्व सिद्धता आहे. " हें तिचें भाषण ऐकून नाथांचें चित्त द्रवलें. परंतु, परान्नसेवन करणार नाहीं, ही हरिपंडिताची अट त्यांनीं मान्य केलेली असल्यामुळें, त्याच्या अनुमतीशिवाय तद्विरुद्ध आचरण करणें योग्य नाहीं हें लक्ष्यांत घेऊन ते हरिपंडितास ह्मणाले, " ह्या भाविक स्त्रीचा संकल्प पुरा व्हावा व तुझी अटही मोडूं नये, अशी एक युक्ति मी काढली आहे. ती युक्ति ही कीं, तूंही मजबरोबर हिच्या घरीं येऊन आपल्या हातानें वाटेल तें अन्न तयार करावें व तें अन्न आपण उभयतां सेवन करूं." हरिपंडितास ही युक्ति फारशी मानवली नाहीं, परंतु वडिलांची भीड मोडूं नये इतक्याचसाठीं या गोष्टीस तो कबूल झाला. ठरल्याप्रमाणें ते दोघे पितापुत्र त्या वृद्ध स्त्रीच्या घरीं गेले व तेथें हरिपंडितानें स्वहस्तानें सर्व स्वयंपाकाची सिद्धता केली. त्या बाईनेंही नाथांसाठीं, अनेक प्रकारचे पदार्थ मोठ्या प्रेमानें व कुशलतेनें तयार केले. सर्व सिद्धता झाल्यावर हरिपंडितानें दोन पात्रांत, स्वतः तयार केलेलें अन्न वाढलें व ते दोघेही जेवावयास बसले. मग नाथांनीं त्या बाईस सांगितलें कीं, तुह्मी जें अन्न तयार केलें असेल तें तुमच्या आवडीप्रमाणें माझ्या पात्रांत आणून वाढा. त्याप्रमाणें, तिनें अनेक पदार्थ आणून नाथांच्या पानांत वाढले. नाथांनीं हें उघड उघड परान्नग्रहण केलेलें पाहून हरिपंडिताच्या अंगाचा रागानें अगदीं भडका उडाला. परंतु तो राग त्यानें मोठ्या मुष्किलीनें आवरला. नाथ अत्यंत शांत चित्तानें जेवीत होते. शेवटीं दोघांचेंही जेवण झाल्यावर, नाथांनीं हरिपंडितास सांगितलें कीं, हीं उष्टीं आतां तूंच काढून टाक. त्याप्रमाणें, हरिपंडितानें प्रथमतः नाथांची पत्रावळ उचलली, तों तिच्याखालीं दुसरी पत्रावळ! तीही उचलली तों तिच्याखालीं तिसरी!! याप्रमाणें एकंदर हजार * पत्रावळी निघाल्या आणि त्या सगळ्या उचलतां उचलतां, विद्वत्तेच्या भारानें आधींच वांकलेल्या हरिपंडितास अगदीं पुरे पुरे झालें. म्हातारीस तर, तो चमत्कार पाहून अगदीं वेड लागल्यासारखें झालें; व त्या हजार पत्रावळी उचलतां उचलतां, नुसती विद्वत्ता आणि कर्मठपणा यांच्याहिपेक्षां भोळ्या भक्तिमार्गांत आणि भागवत धर्मांत कांहीं तरी विशेष असलें पाहिजे असा अप्रिय परंतु सत्य विचार हरिपंडिताच्याही मनांत आल्याशिवाय राहिला नसेल. संत हे बाह्यतः पंगु आणि कर्तृत्वशून्य दिसतात खरे, परंतु एक मोठी अदृश्य शक्ति त्यांच्या मागें नेहमीं उभी असून, प्रसंगविशेषीं

*याच नमुन्याचा एक चमत्कार ज्योतिपंत महाभागवतांच्या चरित्रांत वर्णिलेला आहे.

ती आपला पराक्रम दाखविल्याशिवाय राहात नाहीं, हें पूर्वयुगांतील प्रऱ्हाद, अंबरीष, द्रौपदी इत्यादिकांच्या व चालू युगांतील अनेक संतांच्या चरित्रांवरून सिद्ध होण्यासारखें आहे. नाथांनीं हारिपंडितास हा जो चमत्कार करून दाखविला तो स्वतःच्या अलौकिक सामर्थ्यदर्शनानें पुत्राचे डोळे दिपवून टाकावे म्हणून दाखविला नाहीं, तर तसें करण्यांत त्यांचा इतकाच हेतु होता कीं, आपल्या पुत्रास जो विद्वत्तेचा आणि कर्मठपणाचा अभिमान आहे तो नष्ट होऊन त्याच्या अंगीं नम्रता यावी व परान्नसेवनाच्या पातकापेक्षां, परेच्छातृप्तीचें पुण्य अधिक आहे हें त्याच्या लक्ष्यांत आणून द्यावें. आणि हा त्यांचा हेतु पूर्णपणें सिद्धीस गेला. हारिपंडितानें तात्काळ गलिताभिमान होऊन नाथांच्या चरणावर मस्तक ठेवून म्हटलें, "बाबा, तुम्ही केवळ परब्रह्ममूर्ति आहांत. तुमचें माहात्म्य आणि योग्यता न जाणतां मी आजवर केवळ अभिमानानें शब्दज्ञानाचीच टिमकी वाजवीत राहिलों, याबद्दल मला आतां मोठा पश्चात्ताप वाटतो." पुत्राची वृत्ति पालटलेली पाहून नाथांस मोठें समाधान वाटलें हें सांगावयास नकोच. असो. अशा रीतीनें, त्या गरीब वृद्ध स्त्रीचा, सहस्रभोजनाचा पुष्कळ दिवसांचा संकल्प पुरा करून पुत्रासह नाथ आपल्या घरीं आले.

हरिपंडिताविषयीं आणखी एक आख्यायिका प्रसिद्ध आहे ती अशी कीं, तो एकदां काशीहून गंगेची कावड घेऊन, ती रामेश्वरास नेऊन घालण्यासाठीं दक्षिणेंत आला असतां, वाटेंत पैठणास उतरला. तो पैठणांत येतांच गांवांतले पुष्कळ लोक त्यास सामोरे गेले. नाथमहाराजही त्या मंडळींत होते. गोदेच्या वाळवंटांत एक गाढव उन्हाच्या तापानें अगदीं मरणोन्मुख होऊन पडलें होतें. त्याची ती करुणाजनक स्थिति पाहून दयासिंधु नाथमहाराजांचें मन भडभडून आलें आणि, हरिपंडितानें, आपल्या खांद्यावरून आणलेली गंगेची कावड त्यांनीं त्या गाढवाच्या अंगावर नेऊन ओतली. नाथांचें हें कृत्य पाहून, त्यांच्या विक्षिप्तपणाबद्दल तेथें जमलेल्या सर्व ब्राम्हणांस मोठा राग आला, परंतु त्यांतल्या त्यांत, हरिपंडितास, तो प्रकार पाहून, जो विलक्षण संताप आला, त्याचें वर्णन करणें कठीण. त्याच्या अंगीं जर शाप देण्याचें सामर्थ्य असतें, तर त्या संतापाच्या भरांत नाथांस कदाचित् तो शाप देण्यासही चुकला नसता; परंतु, तशा सामर्थ्याच्या अभावीं, मनांतल्या मनांत पुटपुटत स्वस्थ बसण्याशिवाय त्यास गत्यंतर नव्हतें. पण ती गोष्ट त्याच्या मनास इतकी लागून राहिली कीं रात्रौ त्यास झोंप येईना. आपण येवढ्या परिश्रमानें काशीहून आणलेली गंगेची कावड गर्दभासारख्या अमं-

गल जनावरास आपल्या वडिलांनीं घालावी आणि अशा रीतीनें सर्व लोकांदेखत आपला मानभंग आणि मनोभंग करावा, हा विचार त्यास अत्यंत दुःसह वाटला. पुढें पहांटेस त्यास थोडीशी झोंप लागली तेव्हां प्रत्यक्ष रामेश्वरानें त्याच्या स्वप्नांत येऊन त्यास म्हटलें, " हरिपंडित, तूं आणलेली गंगेची कावड नाथांनीं गाढवास घातली याबद्दल तूं विलकुल खेद करूं नकोस; कारण अशा शंभर कावडी तूं मला आणून घातल्या असल्यास तर तुला जेवढें पुण्य लाभलें असतें, तेवढें पुण्य, नाथांनीं गाढवास घातलेल्या ह्या एका कावडीनें तुला लाभलें आहे. " हा दृष्टांत झाल्यापासून, हरिपंडिताची नाथांविषयींची वृत्ति पालटली व पुढें त्यानें नाथांच्या उपासनामार्गाविषयीं फारसा विरोध कधीं दाखविला नाहीं.

चतुःश्लोकी भागवत व भागवताचा एकादशस्कंध, यांवरील प्राकृत टीका व रुक्मिणीस्वयंवरादि अनेक लहान ग्रंथ लिहिल्यावर, नाथांनीं आपल्या आयुष्याच्या उत्तरकालांत 'भावार्थरामायण' हा प्रचंड ओवीबद्ध ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला. ह्या ग्रंथाची ओवीसंख्या सुमारें ४०,००० आहे, इतकें सांगितलें म्हणजे त्याच्या प्रंचडतेची कल्पना वाचकांस सहज होईल. जे जुने मराठी ग्रंथ आजवर छापून प्रसिद्ध झाले आहेत त्यांत, ग्रंथसंख्येच्या मानानें भावार्थरामायणाचा नंबर तिसरा* लागतो. या ग्रंथाच्या युद्धकांडाचे ४४ अध्याय पुरे झाल्यावर, नाथांनीं आपला निर्याणकाल समीप येऊन ठेपल्याचें वृत्त श्रोतेमंडळीस कळविलें. तेव्हां त्यांस मोठा खेद झाला. कृष्णदासमुद्गलाचें अकरा दिवस आयुष्य वाढवून, त्याजकडून नाथांनीं त्याचें युद्धकांड पूर्वीं पुरें करविलें होतें ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन, नाथवाणीनें मोहिलेल्या श्रोत्यांनीं नाथांस विनंति केली कीं, " महाराज, हें एवढें रामायण आपण पुरें करा आणि मग आपला अवतार समाप्त होऊं द्या. " तेव्हां नाथांनीं त्यांस सांगितलें कीं, आपल्या हातून ग्रंथसमाप्ति व्हावी येवढ्याचसाठीं कालाचा निग्रह करून आयुष्य लांबविणें योग्य नाहीं. तरी पण ग्रंथ पूर्ण व्हावा अशी तुमची इच्छाच असेल तर हा आमचा गावबा, उरलेला ग्रंथ पुरा करील.

ह्या गावबाची हकीकत अशी आहे कीं, गोदाकांठच्या एका खेड्यांत एक गरीब

* 'हरिवंश' हा ग्रंथ विस्ताराच्या मानानें पहिला असून कथाकल्पतरूचा नंबर दुसरा लागतो. दासोपंतांचा गीतार्णव, शिवकल्याणाची भागवताच्या दशमस्कंधावरील टीका व रामचंद्रबोवाकृत महाभारत हे ग्रंथ वरील दोन ग्रंथांपेक्षांही मोठे आहेत, परंतु ते साग्र छापून निघालेले नाहींत.

ब्राम्हण कुळकर्णी होता. त्यास पुष्कळ संतति झाली. शेवटच्या मुलाचें नांव 'गावोबा' असें ठेवण्यांत आलें. हा इतका मतिमंद होता कीं, मुंज केल्यावर त्यास धड गायत्री-मंत्रदेखील म्हणतां येईना. सगळा दिवस उनाडक्या करीत फिरावें आणि जेवणाच्या वेळीं घरीं यावें हा त्याचा नित्यक्रम असे. पुरणपोळीचें पक्वान्न त्याला फार प्रिय. पुरणपोळीसाठीं आईपाशीं त्यानें नेहमी हट्ट धरून बसावें. अर्थात्, असल्या अवलक्षणी मुलाविषयीं आईबापांस विशेष प्रेम कोठून वाटणार ? इतर मुलांच्या मानानें त्याची नेहमी हेळसांडच केली जात असे. एके दिवशीं जेवतेवेळीं पुरणपोळीसाठीं त्यानें इतका हट्ट घेतला कीं आईनें शेवटीं वैतागून त्याला मारलें. तरी तो अगदीं काकुळतीस येऊन पुनः पुनः पुरणपोळी मागूं लागला. अखेर आईचें हृदय द्रवलें. ती त्यास म्हणाली, पैठणांत एकनाथमहाराज आहेत, त्यांचे घरीं रोज पुरणपोळीचें जेवण होत असतें. तरी तूं त्यांजपाशीं जाऊन रहा, म्हणजे तुला नित्य पोटभर पुरणपोळ्या खावयास मिळतील. गावबास मोठा आनंद झाला. त्यानें तडक पैठणची वाट धरली व तेथें पोंचल्यावर, नाथांच्या वाड्यांत जाऊन तो स्तब्ध उभा राहिला ! हा लहान मुलगा आशाळभूतपणानें उभा राहिलेला पाहून, 'बाळ, तुला काय पाहिजे?' असें कृपाळू नाथमहाराजांनीं त्यास विचारलें. इतक्यांत, त्या मुलाची आई त्याच्या मागून निघाली होती, तिनें पुढें होऊन नाथांस सांगितलें कीं, 'महाराज, हा पुरणपोळीसाठीं आपले घरीं आला आहे. आमचे घरीं अठरा विश्वे दारिद्र्य, आम्ही याला रोज पुरणपोळी कोठून घालणार ? आपले घरीं नित्य पुरणपोळीचें जेवण होतें, असें मी यास सांगितलें. तें ऐकून हा आपल्यापाशीं आला आहे.' ही हकीकत ऐकून नाथांस त्या मुलाची फार दया आली. ते त्यास म्हणाले, 'बाळ, आमच्या घरीं राहून रोज पुरणपोळ्या खात जा.' मग त्यांनीं त्यास हातीं धरून स्वयंपाकगृहांत गिरिजाबाईपाशीं नेलें व तिला सांगितलें, "आपला स्वतःचा पुत्र आहे असें समजून याचें संगोपन कर. त्याचें कांहीं उणें पडूं देऊं नकोस. तो ज्या वेळीं ज्या प्रकारचें भोजन मागेल त्या वेळीं तसें भोजन त्याला देत जा." गिरिजाबाईनीं ही नाथाज्ञा शिरसावंद्य केली. गावबाची चैन झाली. त्यानें रोज नाथांकडे यथेच्छ पक्वान्नें झोडावीं आणि बिदींतल्या मुलांबरोबर खेळून काळ कंठावा. त्या मुलाची एकंदर स्थिति पाहून नाथांस त्याची कींव आली. त्याच्या जन्माचें जेणेंकरून सार्थक्य होईल असें कांहीं तरी शिक्षण त्यास देण्याचें त्यांनीं ठरविलें. मग त्याला हाक मारून त्यांनीं जवळ बोलाविलें व आपल्यापाशीं बसवून घेऊन,

त्याच्याच छंदानें, कांहीं शब्द त्याजकडून त्यांनीं उच्चारवून घेतले. पण ' एकनाथ ' या एका चतुराक्षरी शब्दाशिवाय दुसरा एकही शब्द त्याच्या स्मरणांत राहीना. पठणास येण्यापूर्वी त्याच्या आईनें, एकनाथांच्या घरीं रोज पुरणपोळ्या होतात असें त्यास सांगितलें होतें व त्यामुळें, तो एक शब्द त्याला पाठ झाला होता. हा इतका जडबुद्धि आहे कीं याजकडून कांहींच अध्ययन होणें शक्य नाहीं असें जेव्हां नाथांस आढळून आलें तेव्हां त्यांनीं ' एकनाथ ' ह्या एकाच शब्दाचा, प्रत्येक दिवशीं, अमुक वेळां जप करावा असें त्यास सांगितलें व त्याप्रमाणें तो करूं लागला. पुढें, अल्पावकाशांतच त्याची वुद्धि पालटली व खेळाकडचें लक्ष्य कमी होऊन, नाथांसन्निधच असावें असें त्यास वाटूं लागलें. नाथ रामायणावर मराठी टीका लिहीत होते ती त्यांजपाशीं बसून तो नियमानें ऐकूं लागला. पुढें कालांतरानें, भावार्थरामायणाच्या युद्धकांडाचा ४४ वा अध्याय पुरा झाल्यावर नाथांचा निधनकाल अगदीं जवळ येऊन ठेपला व ग्रंथाचा उर्वरित भाग गावबा पुरा करील असें त्यांनीं श्रोतेजनांस सांगितलें, हा कथा भाग पूर्वी येऊन गेलाच आहे.

' गावबा ग्रंथ पुरा करील ' हें नाथांचें भाषण ऐकून श्रोते आश्चर्यचकित झाले. ' एकनाथ ' या एका शब्दापलीकडे ज्याचें अध्ययन झालेलें नाहीं तो हा रेम्याडोक्या गावबा, रामायण कसें पुरें करणार, अशी शंका श्रोत्यांस येणें साहजिक होतें. श्रोत्यांच्या मनाची ही साशंकता नाथांच्या लक्ष्यांत येतांच त्यांनीं गावबास जवळ बोलावलें आणि आपला वरदहस्त त्याच्या मस्तकावर ठेवला; व आपली लेखणी त्याच्या हातीं देऊन त्यास सांगितलें कीं, " भावार्थरामायणाचा पुढील भाग तूं पूर्ण कर. " गावबानें नाथांस नमस्कार करून, तात्काळ ग्रंथलेखनास आरभ केला व आपल्या हातानें ग्रंथाचा एक अध्याय लिहून तयार केला. सगळे लोक चकित झाले. कांहीं दिवसांनीं गावबानें पुढील सगळे अध्याय लिहून भावार्थ रामायण ग्रंथ पुरा केला.

ग्रंथसमाप्तीची कामगिरी गावबाकडे सोंपवून, पूर्वी सांगितल्याप्रमाणें, नाथानीं तात्काळ देहत्याग केला. जिवंतपणीं त्या भागवताच्या मुखकमलावर जें दैवी तेज चमकत असे तेंच प्राणोत्क्रमणानंतरही चमकत होतें. नाथनिधनवार्ता कानीं पडतांच पैठणांतील सहस्रावधि लोक त्यांच्या अंत्यदर्शनार्थ त्यांच्या वाड्यांत जमा झाले. गांव आहे तेथें महारवाडा आहेच, या न्यायानें, त्यांत कांहीं कुटाळ लोकही होते ते म्हणूं

लागले, “ काय हो, इतर लोक जसे मरतात, तसा हाही मेला. मग यांत सत्पुरुषाचें वैशिष्ट्य तें काय ? ” हे शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडतांच, नाथ पुनः उठून बसले. नाथांचे प्राण परत आलेले पाहून, त्यांच्या भक्तांस परमावधीचा आनंद झाला. त्यांनीं मोठ्या प्रेमादरानें नाथचरणाचें वंदन केलें. वरील शंका उपस्थित करणारे कुटिलही, तो प्रकार पाहून, पश्चात्तप्त होत्साते नाथचरणीं विलीन झाले. नाथ त्यांस म्हणाले,—

**‘ सद्गुरु जनार्दन जनीं । प्रत्यक्ष तुम्हां पाहतो नयनीं ।**
**देवें मानूनि तुमची वाणी । अभिनव करणी दाविली हे ॥**
**भगवज्जनाचें मरण । केवीं होय सकळांसमान ।**
**म्हणोनि येवढें महिमान । देवें आपण प्रगटविलें ॥**

इतकें बोलून नाथांनीं उद्धवास दिंडी तयार करण्यास व आपल्या निर्याणाची बातमी आपल्या सर्व इष्टमित्रांस कळवून त्यांस बोलावून आणण्यास सांगितलें ती वार्ता हां हां म्हणतां सर्व पैठणभर व आसपासच्या गांवांत पसरतांच, हजारों लोक नाथांचें अखरचें दर्शन घेण्यास मोठ्या भक्तीनें जमा झाले. नाथमहाराज आतां आपणास सोडून जाणार या कल्पनेनें व्याकुल होऊन पुष्कळ स्त्रिया व पुरुषदेखील रडूं लागले. समाधीची सर्व तयारी झाल्यावर नाथांनीं गंगोदकानें स्नान केलें व तिलक लावून धूतवस्त्र परिधान केलें. नंतर खांद्यावर वीणा घेऊन त्यांनीं हरिकीर्तन आरंभिलें व सर्व लोकांकडून हरिनामाचा गजर करविला. नंतर ते दिंडीबरोबर रस्त्यांतून कीर्तन करीत चालले. वाटेंत शेंकडों भाविक लोकांनीं त्यांचें मोठ्या प्रेमानें पूजन केलें. कित्येकांनीं त्यांच्या गळ्यांत पुष्पमाळा, कित्येकांनीं तुलसीमाला घातल्या. बुक्याचा तर नुसता पाऊस पडत होता. आतां यापुढें या थोर सत्पुरुषाचें दर्शन आपणास होणार नाहीं, या विचारानें ते नाथांस अगदीं डोळे भरून पहात होते, जणूं काय नाथांचें सगुण स्वरूप ते आपल्या हृदयसंपुटांत सांठवीतच आहेत ! कित्येक तर दुःखानें इतके व्याकुल झाले होते कीं त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचा सारखा प्रवाह चालला होता. परंतु स्वतः नाथांची स्थिति विचाराल तर ती नेहमीप्रमाणें अगदीं निर्विकार होती. कारण ‘ आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां ’ असें म्हणण्याचा अधिकार त्यांस पूर्वींच प्राप्त होऊन चुकला होता. मग मृत्यूची भीति त्यांस कोठून वाटणार ? पण सामान्य जनांची गोष्ट निराळी होती; अर्थात् त्यांस वाईट वाटावें हें साहजिक आहे. केशव म्हणतातः—

' सप्रेमें पाहतां वदन । असुवें गळती लोचन ।
पुढें आम्हांसी दर्शन । दुर्लभ म्हणोन निरीक्षिती ॥
श्रीनाथनिजधामगमन । तेणें समाधिस्थ सकळ जन ।
देहगेहाची आठवण । नाहीं भान संसारींचें ॥
श्रीनाथस्वरूप चित्तीं । अंतर्बाह्य तेंचि क्षितीं ।
सद्भावें ऐसी स्थिति । जडली प्रीति नाथचरणीं ॥
श्रीनाथगुणाची आठवण । तेंचि वर्णन तेंचि श्रवण ।
नाथदर्शन अवलोकन । वारंवार निरीक्षून चालिले ॥
पुढत पुढती वंदन । पुढती देती आलिंगन ।
ऐसिया आवडीकरून । मिरवत आपण जातसे ॥

अशा रीतीनें ती मिरवणूक गोदातीरीं लक्ष्मीतीर्थाजवळ पोंचल्यावर, तेथील वाळवंटांत नाथांनीं सर्व लोकांस बसविलें. जनसमुदाय फारच मोठा होता आणि त्यांत स्त्रियाही पुष्कळ होत्या. नाथांनीं स्वतः कीर्तन केलें आणि तें त्यांचें अखेरचें कीर्तन सर्व लोकांनीं अगदीं तल्लीन होऊन ऐकलें. शेवटीं, कांहीं पुढारी गृहस्थांनीं नाथांस विचारलें, ' महाराज, पुनः आपलें अवतरण या भूमंडलावर कधीं होणार ? ' त्या वेळीं नाथांनीं पुढील अभंग म्हणून उत्तर दिलें:—

" आह्मी कां संसारा न येणें ।
करोनियां हरिभक्ति । रामनाम कीर्ति ।
जड जीव उद्धरणें ॥ ध्रु० ॥
साच असतां तरी । धाक धरितां चित्तीं ।
भवविभवप्राप्ति । समूळ मिथ्या ॥ १ ॥
जैं धर्माची वाट मोडे । अधर्माची शीग चढे ।
तैं आह्मा येणें पडे । संसारस्थिति ॥ २ ॥
नाना मतें पाखांड । कर्माठायीं अतिबंड ।
तयाचें ठेंचावें तोंड । हरिभजनें ॥ ३ ॥
जे जे लीला विचित्र । तें तें माझें चरित्र ।
देवभक्त एकत्र । भेद नाहीं ॥ ४ ॥

जो जो अवतार हरि धरी । तो तो मीच अवधारीं ।
हरिनामगजरीं । जगदोद्धारा ॥ ५ ॥
सर्वभूतीं भगवद्भावो । भक्तीचा निर्वाहो ।
धर्माचा अहंभावो । वाढवणें ॥ ६ ॥
सर्व भूतीं भगवद्भक्ति । प्रतिपादावी वेदोक्ति ।
हेंचि एक निश्चिति । करणें आम्हां ॥ ७ ॥
लीलाविग्रही भगवंत । तया ह्मणती नित्य मुक्त ।
आह्मी काय तेथें । वेगळे असों ॥ ८ ॥
विश्वरूप सृष्टि । अर्जुना दाविली दिठी ।
भिन्न भेदाची गोष्टी । बोलों नये ॥ ९ ॥
वत्सा हरणीचें चरित्र । वत्सें गोवळें स्वयें स्वतंत्र ।
पावे पायतणें कटिसूत्र । आपण जाला ॥ १० ॥
एका जनार्दनीं विश्वरूप गोविंद । भेद धरि तो
निंद्याहि अतिनिंद्य ॥ ११ ॥

हा अभंग केशवांनीं व महीपतीनीं आपल्या नाथचरित्रांत दिला आहे, पण तो एकनाथी गाथ्यांत सांपडत नाहीं. शिवाय या अभंगाचीं मधलीं आठ कडवीं स्वतंत्र ओव्या आहेत. दुसरें कडवें तर ज्ञानेश्वरींतली एक ओवी * आहे. अभंगाच्या शेवटीं **एका जनार्दनीं** हे शब्द आहेत खरे, पण सामग्र्येंकरून पाहतां, हा अभंग, अशाचा असा, खुद्द एकनाथ महाराजांचा असेल असें वाटत नाहीं.

नंतर नाथांनीं सर्व मंडळीचा प्रेमानें निरोप घेतला व गोदावरीच्या पात्रांत कंबर-भर पाण्यांत जाऊन देहत्याग केला. वस्तुतः जीवंतपणींच ब्रह्मरूप झालेल्या सत्पुरुषाचें मरण ह्मणजे, त्याच्या दृष्टीनें तो सुखसोहळाच होय. 'दिसणें हाचि जन्म योगियां ना दिसणें हा मृत्यु ह्मणा' अशी योग्याच्या जन्ममरणाची व्याख्या सोहिरोबांनीं केली आहे ती, महाराष्ट्रांत आजवर होऊन गेलेल्या बहुतेक सर्व प्रसिद्ध संतांच्या जन्म-मरणास सारखी लागू पडते. सामान्य प्रापंचिक मनुष्यास 'मरण' हा नुसता शब्द ऐकतांच, थरकांप उत्पन्न होतो. मुलें जशीं काळोखांत जाण्यास भितात, तशीं माणसें मृत्यूस भितात, असें बेकननें म्हटलें आहे. परंतु या नियमास संत हे अपवाद होत; आणि

* परित्राणाय साधूनां या गीताश्लोकावरील ज्ञानेश्वरी टीका पहा.

देहत्यागाचे वेळीं मनाची समता कायम ठेवणें हेंच संतत्वाचें प्रमुख लक्षण होय. असो. नाथचरित्रकार केशवांनीं दिलेल्या वरील हकीकतीवरून, नाथमहाराजांनीं जलसमाधि घेतली हें उघड दिसतें. पुढें नाथांच्या देहास यथाविधि अग्निसंस्कार करण्यांत आला व त्यांचा अंत्यविधि, क्रियाकर्म वगैरे हरिपंडितानें यथसांग रीतीनें केलें. इतकी कथा सांगून, नाथचरित्रकार केशव सद्गदित होऊन म्हणतातः—

परमार्थलीला विचित्र । दाउनी अद्भुत चरित्र ।
सद्भक्तिमार्ग पवित्र । स्थापिला स्वतंत्र जगदोद्धारा ॥
ऐसी करूनि ख्याति । स्वेच्छा आनंद स्थिति ।
श्रीएकनाथ परंज्योती । गेला निजधामाप्रति स्वलीला ।
षड्गुणैश्वर्यसंपन्न । दाऊनि अवतार पूर्णपण ।
भक्तिवैराग्यज्ञाननिपुण । यश परिपूर्ण विस्तारिलें ॥
ज्यांसी श्रीनाथाचें ध्यान । ज्यांसी श्रीएकनाथस्मरण ।
ज्यांसी घडलं चरणवंदन । तेही धन्य निजस्थिति ॥
ज्यांसी मैत्री श्रीनाथासी । श्रीनाथाचे सहवासी ।
श्रीनाथनिकटवासी । ते ते आम्हासी परमवंद्य ॥
ज्यांसी श्रीनाथाचें प्रेम । ज्यांसी श्रीनाथाचें दर्शन नेम ।
श्रीनाथचि ज्यांचें कर्म । ते ते परमपूज्य आम्हा ॥
भाव असो नसो मनीं । परि ज्यांसी दर्शन अनुदिनीं ।
ते ते जाण सर्व प्राणी । पावनपणीं वंद्य आम्हां ॥
श्रीनाथनिजात्मस्थिति । सद्गुरुकृपा ज्यांसी प्राप्ति ।
ते वंद्य गुरुमूर्ति । भाव निश्चिती हा माझा ॥
जेथें जेथें श्रीनाथकीर्ति । आदरें जे गुण वर्णिती ।
ते ते गुरुत्वें आम्हांप्रती । वंद्य होत निजभावें ॥
यापरी समस्त जन । श्रीनाथदर्शनें पावन ।
त्यांसी माझें लोटांगण । हें विनवणें केशवाचें ॥

नाथ महाराजांनीं पैठण येथें जलसमाधि घेतल्यावर, त्यांचें कलेवर पाण्यांतून काढून, लोकांनी त्याचें दहन केलें असावें व त्या जागीं वृंदावन बांधलें असावें असें वाटतें. कारण हल्लीं पैठण येथें जी नाथांची समाधि आहे, तिचा बहुतेक

अर्वाचीन लेखकांनीं ' समाधि ' या शब्दानें जरी उल्लेख केलेला आहे, तरी नाथांच्या पश्चात् पन्नास पाऊणशें वर्षांच्या आंत होऊन गेलेले, प्रसिद्ध हरिवरदाकार श्रीमत्कृष्णदयार्णव यांनीं वरील स्थलाचा उल्लेख ' वृंदावन ' या शब्दानें केला आहे:—

**प्लवंगाब्दीं प्रतिष्ठानीं । एकनाथीं वृंदावनीं ।**
**पुण्योत्साहीं सर्व सज्जनीं । आज्ञा केली ग्रंथाची ॥ ५३ ॥**

हरिवरदा, अध्याय १ ला.

महीपतीनीं तर स्पष्टच लिहिलें आहे कीं, " नाथांनीं गोदेच्या पात्रांत, कंबरभर पाण्यांत उभें राहून, देहत्याग केला. नंतर लोकांनीं त्यांच्या शवास अग्निसंस्कार केला. दुसरे दिवशीं हरिपंडितास घेऊन लोक राख भरावयास गेले तेव्हां चितास्थानीं पिंपळाचें एक रोपटें त्यांच्या दृष्टीस पडलें. मग हा पिंपळ मध्यें घालून, त्याच्या सभोंवतीं लोकांनीं वृंदावन बांधलें; व देवळांत नाथांच्या पादुका स्थापन केल्या. " तेथील एका चमत्काराचा उल्लेख महीपतीनीं पुढील ओवींत केला आहे:—

**भग्न होईल वृंदावन । यास्तव अश्वत्थ तितुकाचि लहान ।**
**श्रीनाथाचें लाघव पूर्ण । नेणवेचि जाण ब्रह्मादिकां ॥**

नाथांचा समाधिशक कोणता या मुद्द्याविषयी आजपर्यंत बराच वाद होऊन शके १५२१ हा त्यांचा समाधिशक आतां बहुतेक नक्की ठरला आहे. नाथचरित्रकार केशव, हरिवरदाकार कृष्णदयार्णव व राघव ह्या तिघांनीं हाच शक नमूद करून ठेवलेला असल्यामुळें, या संबंधानें संशय घेण्याचें आतां कांहीं कारण आहे असें वाटत नाहीं. शिवाय, रघुनाथकृत ' एकनाथनिर्याण'नामक एक ओवीबद्ध प्रकरण, कै. गो. का. चांदोरकर यांस पैठण येथें सांपडलें होतें त्यांतही नाथांचा निर्याणकाल हाच दिला आहे:–

**शके (१५२१) पंधराशें एकवीस। वर्षामाजी विकारी नांव त्यास।**
**मीनगृहीं संक्रांतीस । फाल्गुन वद्यास षष्ठी जे ॥**
**भानुवत्सर असुनि चंद्रमा । प्रहर दोन चारी घटिकेला ।**
**वज्र योग वनिज करण ते वेळां । असे प्रांजळा ते काळीं ॥**
**ज्ञाला पूर्वी षष्ठीपच पूर्वी । आतां जाली पद्म पर्वी ।**
**ऐसें महिमान नाहीं ऐकिलें पूर्वीं। पुढती नाहीं किज उर्वीमंडळामाजी**

शके १५२१ विकारी नाम संवत्सरे, फाल्गुन वद्य ६ रविवार या दिवशीं नाथानीं समाधि घेतली. ही नाथषष्ठी महाराष्ट्रांत प्रसिद्धच आहे. नाथांच्या समाधीच्या सन्मुख जें महाद्वार आहे, त्यावर श्लोकबद्ध असें नाथचरित्र कोरलेलें आहे. त्यांतले दोन श्लोक कै. चांदोरकर यांनीं प्रसिद्ध* केले आहेत ते असेः—

सप्रेमयुक्त घडली गुरुभक्ति साची ।
जाली कृपा सफळ साध्य जनार्दनाची ॥
ब्रम्हैव बोध समता निज निर्विकारी ।
श्रीएकनाथ विबुधाभरणावतारी ॥ १ ॥
वाराणसींत विबुधांप्रति मान्य जाली ।
एकादशावरि टिका सुगमार्थ केली ॥
ब्रम्ही स्वकर्म विनियोग जनोपकारी ।
श्रीएकनाथ विबुधाभरणावतारी ॥ २ ॥

कै. चांदोरकर म्हणतात, "असें हें एक अष्टक असून, शेवटीं एक ९ वा श्लोक दिलेला आहे. ही रचना जर पुरातन असेल, तर ती महत्त्वाची आह; कारण इच्यांत श्रीखंड्याचरित्र व नाथांचे ग्रंथ हें सर्व आलें आहे. रचना आधुनिक असल्यास, जनसमजुतीचा हा एक प्रकारें पुरावाच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं."

पैठणांत होणाऱ्या नाथषष्ठीच्या वार्षिकोत्सवाचे वेळीं, नाथांच्या वाड्यांतला पाण्याचा मोठा रांजण, देवाच्या हातची घागर आंत पडल्याशिवाय, अद्याप भरत नाहीं अशी आख्यायिका आहे. पैठण येथील नाथांच्या समाधीपाशीं बसून, तपश्चर्या करणाऱ्या अनेक लोकांस नाथांनीं दृष्टांत दिल्याचा दाखला आहे. नाथांच्या मागून १०० वर्षांनीं झालेले संतकवि कृष्णदयार्णव यांनीं आपल्या 'हरिवरदा' ग्रंथाच्या आरंभीं म्हटलें आहे:—

'कित्येक काळ शरीरश्रम । एकनाथ कृपाळू परम ।
तेणें केला रोगोपशम । देऊनि प्रेम निजभजनीं ॥
पूर्वी गोविंदें गयेमाझारी । कृपामृतें पाहोनि नेत्रीं ।

* भारत इतिहास संशोधक मंडळ, द्वितीय संमेलन वृत्त ( शके १८३६ )

**भाषाव्याख्यान दशमावरी । वरदोत्तरीं करविलें ॥**
**परंतु मानोनी अल्पमती । ग्रथनीं हांव नुपजे चित्तीं ।**
**पुढती तेंचि श्रीएकनाथीं । भेषजार्थीं अनुग्रहिलें ।**

\+ + + +

**हें सेवितां दिव्यौषध । तोडील विशेष रोगविरुद्ध ।**
**ऐसा प्रभूचा स्वप्नानुवाद । कथिला विशद संतांसी ॥**

श्रीमत्कृष्णदयार्णव यांस रक्तपितीची व्यथा जडली होती तेव्हां, नाथमहाराजानीं त्यांस स्वप्नांत दृष्टांत देऊन, " भागवताच्या दशमस्कंधावर मराठी टीका लिहा म्हणजे तुमची व्यथा दूर होईल " असें सांगितलें व त्याप्रमाणें कृष्णदयार्णव यांनीं आपला प्रचंड हरिवरदा ग्रंथ लिहिला. ग्रंथाचें पूर्वार्ध लिहून पुरें होतांच त्यांची रक्तपितीची व्यथा समूळ नाहींशी झाली. त्यानंतर, शंभर वर्षांनीं पुणें प्रांतीं ठाकुरदासबोवा* या नांवाचे एक सत्पुरुष होऊन गेले, त्यांसही नाथमहाराजांचा दृष्टांत झाला होता, असें बोवानीं केलेल्या तद्विषयक उल्लेखावरून दिसतें. असो. कृष्णदयार्णव यांनीं हरिवरदा ग्रंथाच्या रचनेस प्रारंभ केला त्या वेळीं जे श्रोते हजर होते त्यांत ' बाबजी जगन्नाथ रघुनाथ ' हे नाथांचे वंशजही होते व कृष्णदयार्णव यांनीं त्यांस ' संततिरूपी एकनाथ ' असें म्हटलें आहे. तथापि गेल्या तीनशें वर्षांत, एकनाथांच्या वंशजांत, विशेष प्रसिद्ध असा कोणी सत्पुरुष किंवा कवि झाला नाहीं; आणि बहुतेक सर्व संतांच्या बाबतींत हाच प्रकार दृष्टोत्पत्तीस येतो.

नाथांनंतर होऊन गेलेल्या अनेक सत्पुरुषांनीं नाथांचीं स्तुतिस्तोत्रें गायिलीं आहेत, तीं सर्व, प्रस्तुत ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणांत दिलींच आहेत. पण ह्या सर्व स्तुतिस्तोत्रांपेक्षां, प्रसिद्ध मराठी कवि वामनपंडित यांनीं, प्रत्यक्ष नामोल्लेख न करितां, नाथांस जे धन्यवाद दिले आहेत, त्यांचें महत्त्व विशेष आहे. वामनाचे समकालीन रामदास, रंगनाथ, शिवराम, केशवस्वामी, जयराम वगैरे अनेक प्रसिद्ध संत होते, परंतु आपल्या ' अनुभूतिलेश ' नामक संस्कृत ग्रंथांत **वामन** म्हणतातः–

* कविचरित्राच्या सहाव्या भागांत यांचें अल्पचरित्र दिलें आहे.

" आचार्यत्वाय बहवः सेविता भूतले मया ।
आत्मोपदेशसमये गुरुत्वेन न मानिताः ॥
प्राकृतग्रंथकर्तारो येतु वर्षशतात्पुरा ।
त्यक्तदेहास्*यैर्यथोक्तं न तथा ज्ञानिनोऽधुना ॥ "

यांतील ' प्राकृत ग्रंथकर्तारो ' हें वचन एकनाथांस कसें लागू पडतें, अशी शंका कोणी घेईल, तर त्याचें उत्तर स्पष्ट आहे, आणि तें हें कीं वामनांनीं आपला ' निगमसार ' ग्रंथ शके १५९५ त लिहिला आणि त्यापूर्वी बरोबर १०० वर्षें म्हणजे शके १४९५ ( विक्रम संवत् १६३० ) त नाथांनीं आपलें भागवत लिहून पुरें केलें होतें. तेव्हां " वर्षशताचिया पूर्वी प्राकृत ग्रंथकार जे । त्यक्तदेही जे यथोक्त न तैसे ज्ञानि प्रस्तुतीं " हा श्लोक वामनानीं नाथांसच अनुलक्षून लिहिला असला पाहिजे यांत संशय नाहीं; व यावरून आपल्या समकालीन संतांपेक्षां एकनाथ महाराजांस वामनपंडित विशेष मान देत असत हें स्पष्ट दिसतें. दासोपंत व शिवकल्याण हेही नाथकालीन दोन ग्रंथकार मोठे ज्ञानी होते व वामनांनीं, वरील श्लोकांत ज्या अर्थी अनेकवचन वापरलें आहे त्या अर्थी नाथांबरोबर यांचाही निर्देश ' ज्ञानी ' या शब्दानें त्यांनीं केला असण्याचा संभव आहे.

* गुरुत्वाकारणें म्यां या भूतळीं बहु सेविले ।
आत्मोपदेशसमयीं आचार्यत्वें न मानिले ॥
वर्षशताचिया पूर्वी प्राकृत ग्रंथकार जे ।
त्यक्तदेही जे यथोक्त न तैसे ज्ञानि प्रस्तुतीं ॥
( साम्राज्य वामनकृत भाषांतर )

# प्रकरण आठवें.

## नाथवाङ्मय.

**ग्रंथ श्रीभागवत श्रीरामायण करी सविस्तर ते।**
**जरि न रचिता दयानिधि केवळ जड जीव तरि कसे तरते॥**

मोरोपंत.

दासोपंतादि लहान मोठे पंधरा वीस कवि थोड्या फार अंतरानें नाथांचे समकालीन असतां व यापैकीं दासोपंत, शिवकल्याण वगैर कित्येक कवींची ग्रंथरचना नाथांच्या ग्रंथरचनेहून मोठी असतां, त्या कवींचे ग्रंथ मागें पडून नाथांचेच ग्रंथ विशेष लोकप्रिय झाल याचें कारण नाथांची लोकसंग्राहकबुद्धि होय. शुद्ध भागवतधर्माचा प्रसार नाथांनीं महाराष्ट्रांत केला तितका दुसऱ्या कोणत्याही संतकवीनें केला नाहीं. कर्मठपणाचें बंड मोडून, सगुग हरिभजनाचा राजमार्ग प्रत्यक्ष आपल्या आचरणानें व ग्रंथरचनेनें नाथानींच महाराष्ट्रांतील लोकांस पहिल्यानें दाखविला. ज्ञानेश्वरीच्या खालोखाल महाराष्ट्रांतील भागवतपंथी लोकांस जर एखादा ग्रंथ अत्यंत प्रिय असेल तर तो ग्रंथ नाथभागवतच होय. ज्ञानेश्वरी, नाथभागवत, व तुकारामबुवांचे अभंग यांचीं महाराष्ट्र वाङ्मयांत जीं स्थानें आहेत तीं अगदीं ध्रुवस्थानें आहेत. अत्यंत गाढ विद्वत्ता, असामान्य गुरुभक्ति, विलक्षण भूतदया, निश्चल शांतवृत्ति, उत्कृष्ट कवित्व आणि भक्तिज्ञानाचा समन्वय हे नाथांचे सर्व गुण इतके उत्कट होते कीं त्यांमुळेंच त्यांच्या ग्रंथांची जी छाप एकदां महाराष्ट्रावर बसली ती या घटकेपर्यंत कायम आहे व महाराष्ट्रानें जोंपर्यंत आपल्या धर्माचा, भाषेचा व संतांचा अभिमान सोडला नाहीं तोंपर्यंत ती तशीच कायम राहणार. ज्यांच्या वाणींत एक प्रकारचें दैवी तेज चमकतें असे संतकवि महाराष्ट्रांत पांचसहाच होऊन गेलेले आहेत, आणि त्यांतल्या प्रमुखांत नाथमहाराजांची गणना होते. संस्कृत भाषेंतलें अध्यात्मज्ञान किंवा पौराणिक कथा मराठींत नाथानींच पहिल्यानें आणल्या असें नाहीं, नाथांपूर्वी ज्ञानेश्वरी,

अमृतानुभव, योगवासिष्ठ, विवेकसिंधु, परमामृत हे अध्यात्मग्रंथ व भारत, दशमस्कंध भागवत वगैरे कथाग्रंथ मराठी भाषेंत लिहिले गेले होते. परंतु भागवताच्या एकादशस्कंधावरील पहिली मराठी टीका नाथांचीच होय व रामायणावरही ' भावार्थ रामायण ' हा पहिला मराठी ग्रंथ नाथांचाच होय. तुकाराम महाराजांनीं नाथ भागवताचा उल्लेख, आपल्या पुढील अभंगांत केला आहेः—

**शरण शरण एकनाथा । पायीं माथा ठेविला ॥ १ ॥**
**नका पाहूं गुणदोष । जालों दास पायांचा ॥ २ ॥**
**उपेक्षितां मज । तरी लाज कवणासी ॥ ३ ॥**
**तुका म्हणे भागवत । केलें श्रुत सकळां ॥ ४ ॥**

कविवर्य **अमृतराय** यानींही आपल्या एका पदांत * " वाचा एकोवाचा **भागवत अध्या** " असा उपदेश लोकांस केला आहे.

आकाशांत जशा निरनिराळ्या अनेक ग्रहमाला आहेत व त्या प्रत्येक ग्रहमालेचा सूर्य वेगवेगळा आहे, त्याप्रमाणें महाराष्ट्र वाङ्मयांतही निरनिराळीं कविमंडळें असून त्यांतील प्रत्येक मंडळांत एक मुख्य कवि आहे व उपग्रहांप्रमाणें, त्याचे अनुयायी दुसरे अनेक कवि आहेत. अशा कविमंडळांपैकीं, पहिलें कविमंडळ ज्ञानेश्वरांचें, दुसरें एकनाथांचें, तिसरें तुकारामबुवांचें, चौथें रामदासांचें, पांचवें वामनाचें व सहावें मोरोपंतांचें. एकनाथांच्या वंशजांत जरी कोणी नांव घेण्यासारखा कवि झाला नाहीं तरी त्यांच्या शिष्यपरंपरेंत–किंवा संप्रदायांत म्हणा–हरिवरदाकारांसारखे मोठे कवि होऊन गेलेले आहेत. नाथांच्याच परंपरेंत मुक्तेश्वरांचीही गणना करण्यास हरकत नाहीं. शिवाय, भावार्थरामायणाच्या युद्धकांडाच्या ४४ व्या अध्यायापासून सदर ग्रंथाचा पुढील सर्व भाग गावबानें रचिला ही आख्यायिका जर खरी असेल तर गावबाची ही ग्रंथरचना कांहीं थोडी नाहीं. शिवाय, त्याची वाणी फार गोड असून भाषाप्रभुत्वही वाखाणण्यासारखें आहे. ह्यांशिवाय दुसरे अनेक लहान कवि नाथांच्या परंपरेंत होऊन गेले आहेत.

आतां नाथमहाराजांच्या ग्रंथरचनेकडे वळूं. नाथांचे बहुतेक सर्व ग्रंथ व लहानसहान कविता देखील आज तीनशें वर्षें महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहेत. ' ओंवाळूं आरती मदनगोपाळा ' आणि ' संत सनकादिक भक्त मिळाले अनेक ' ह्या त्यांच्या दोन

* " अखंड हरि हरि वदा रे बापांनो " हें रायजींचें प्रसिद्ध पद पहा.

आरत्या म्हटल्या गेल्याशिवाय महाराष्ट्रांतील कोणताही देवकार्योत्सव बहुधा पुरा होत नाहीं. तथापि, नाथांच्या नांवावर प्रसिद्ध असलेले सर्वच ग्रंथ वस्तुतः त्यांचेच आहेत कीं काय व प्रसिद्ध असलेल्या ग्रंथांशिवाय आणखी त्यांची कांहीं कविता अप्रकाशित आहेत कीं काय, या मुद्द्याचा विचार आजपर्यंत कोणी केलेला दिसत नाहीं. नाथांचे जे ग्रंथ प्रसिद्ध आहेत ते येणेंप्रमाणें:—

| | |
|---|---|
| १ चतुःश्लोकी भागवत टीका | ७ गीतासार |
| २ एकनाथी भागवत | ८ आनंदानुभव |
| ३ रुक्मिणीस्वयंवर | ९ हस्तामलक |
| ४ भावार्थ रामायण | १० स्वात्मसुख |
| ५ शुकाष्टकावर टीका | ११ प्रऱ्हादविजय |
| ६ आनंदलहरी | १२ एकनाथी गाथा ( पदें, अभंग वगैरे ) |

यांशिवाय, 'केसरी' पत्राच्या ता. ११ नोव्हेंबर १९२४ च्या अंकांत रा.रा. श्रीनिवास नारायण बनहट्टी एम्. ए. यांचा 'मोरोपंती भागवतरचना' हा लेख प्रसिद्ध झाला आहे त्यांत एकनाथकृत 'प्राकृत दशमस्कंध' उपलब्ध झालें असल्याचा उल्लेख केला आहे. परंतु, नाथांनीं भागवताच्या दशमस्कंधावर मराठी टीका केल्याचा निर्देश कोणत्याही जुन्या ग्रंथांत आढळत नाहीं. आतां कै. गोविंद काशीनाथ चांदोरकर यांस, 'बालक्रीडा' या नांवाचें एक ओवीबद्ध प्रकरण ( दशमस्कंधाचा एक भाग ) उपलब्ध झालेलें होतें व त्यांत कवीनें स्वतःचा उल्लेख 'एकनाथ,' 'जनार्दनाचा एका' इत्यादि शब्दांनीं केलेला आहे ही गोष्ट खरी, परंतु हा पैठणकर एकनाथ नसून 'दुसराच कोणी तरी नामधारी महानुभाव पंथी तोतया एकनाथ' असावा हें कै. चांदोरकर यांनीं उपरिनिर्दिष्ट प्रकरणांतील अंतर्गत पुराव्यावरून भारत-इतिहास संशोधक मंडळाच्या एका वार्षिक अहवालांत पूर्णपणें सिद्ध केलेलें आहे. अशा स्थितींत, रा. बनहट्टी यानीं उल्लेखिलेलें एकनाथी दशमस्कंध जर हेंच असेल तर चुकीच्या समजुतीमुळें, दुसऱ्याच एका लेखकाचा ग्रंथ ते नाथांच्या गळ्यांत अडकवीत आहेत असें म्हणणें भाग पडेल. अस्तु.

नाथांच्या प्रसिद्ध ग्रंथांची जी यादी पूर्वीं दिली आहे, त्या ग्रंथांची एकंदर पद्यसंख्या सुमारें ६०००० होईल ! वरील ग्रंथांपैकीं, 'अनुभवानंद' हा ग्रंथ नाथांचा नव्हे असें मला वाटतें. कारण एक तर नाथांच्या इतर ग्रंथांतील ओव्यांच्या

रचनेहून या ग्रंथांतील ओव्यांची रचना भिन्न आहे; व दुसरी गोष्ट ही कीं, ग्रंथाच्या शेवटीं ' एका जनार्दनीं ' हा नाथांचा नेहमींचा नामोल्लेख नसून नुसताच 'एकनाथ' असा कविनामनिर्देश आहे. ह्या ओव्या येणेंप्रमाणें:—

**हे वाक्पुष्पपूजा । घडो श्रीगुरुराजा ।**
**एकनाथ म्हणे तुझा । गुरुपुत्र हो ॥**
**जंव तुमची कृपा न घडे । तंव स्वानुभवज्ञान केंवि घडे ।**
**तुमचे कृपेनें ज्ञान अनुभव उजेडे । म्हणे एकनाथ ॥**

अशा रीतीनें, नुसत्या ' एकनाथ ' शब्दानें, नाथांनीं स्वतःचा निर्देश इतरत्र कोठेंही केलेला आढळणार नाहीं. असो.

**चतुःश्लोकी भागवतः**—चतुःश्लोकी भागवतावरील ओवीबद्ध मराठी टीका हा नाथांचा पाहिला ग्रंथ होय. हा ग्रंथ नाथांनीं आपल्या तरुण वयांत लिहिलेला असतांही त्याची एकंदर रचना भारदस्त, भाषासरणी गंभीर आणि विवेचनशैली अधिकारयुक्त आहे. नमुन्यासाठीं पुढील थोड्याशा ओव्या पहाः—

**जो ॐ काराचा तरुवर । स्वानंदसुखाचा आगर ।**
**सत्यसंकल्प सर्वेश्वर । तो परात्पर स्वमुखें बोले ॥**
**शास्त्रव्युत्पत्ति व्याख्यान । जालिया वेदांत श्रवण ।**
**त्यावरी उठी जाणपण । त्या नांव ज्ञान शास्त्रार्थु ॥**
**विषयवासनेवीण । वृत्तीसी जें विवेकस्फुरण ।**
**त्या नांव बोलिजे ज्ञान । सत्य जाण स्वयंभु ॥**
**चिद्वृत्तीचें स्फुरण । ते जाणिव बोलिजे ज्ञान ।**
**तेचि स्वय होइजे आपण । या नांव विज्ञान विधातया ॥**
**हृदयींचें जें मीपण । तें स्वयें होइजे आपण ।**
**तेथ हरपे देहाचें स्फुरण । तें सत्य विज्ञान विरंचि ॥**
**जळीं मिनलिया लवण । सर्वांगीं विरे संपूर्ण ।**
**जळींच हारपे क्षारपण । यापरी विज्ञान वस्तुत्वाचें ॥**
**देहींचें जावोनि अहंपण । ब्रह्माहमस्मि स्फुरे स्फुरण ।**
**ते स्फूर्ति विरे संपूर्ण । त्या नांव विज्ञान पूर्णत्वाचें ॥**

हे पावावया पूर्ण प्राप्ति । भावें करावी भगवद्भक्ति ।
तेचि भक्तीची निजस्फूर्ति । ऐक तुजप्रती सांगेन ॥
भगवद्भाव सर्वां भूतीं । या नांव माझी मुख्य भक्ति ।
हेंचि भजन ज्या अनंहकृति । विज्ञानप्राप्ति ते त्यासी ॥
हेचि भक्ति करी निजांगें । विज्ञान त्याच्या पायां लागे ।
ते भक्ति उपजे जेणें योगें । ते भक्तिचि अंगें हरि सांगे ॥
माझें नाम माझें स्मरण । माझी कथा माझें कीर्तन ।
माझ्या चरित्राचें पठण । गुणवर्णन नित्य माझें ॥
नित्य करितां माझें चिंतन । माझा जप माझें ध्यान ।
माझी पूजा माझें स्तवन । विषयध्यान विसरोनी ॥
भक्ताचें विषयसेवन । तेंही करावें मदर्पण ।
या नांव मद्भक्तीचीं अंगें जाण । स्वयें नारायण ब्रम्हया सांगे ।
ज्ञान विज्ञान उत्तम भक्ति । सांग सांगेन तुजप्रती ।
कृपेनें तुष्टला निजमूर्ति । धन्य प्रजापति भाग्याचा ॥

जेथें जेथें भक्तीचें श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याची संधि सांपडली तेथें तेथें नाथांनीं सगुणभक्तीचें माहात्म्य पुनः पुनः वर्णिलें आहे. 'भगवद्भाव सर्वां भूतीं' हें भक्तीचें मुख्य लक्षण त्यानीं सांगितलें आहे; आणि 'विज्ञान भक्ताच्या पायांस लागतें' या शब्दांनीं, ज्ञानी आणि भक्त यांचा अभेद वर्णिला आहे. **वामन**पंडितांस नाथां-विषयीं विशेष पूज्यता वाटत होती, याचें कारण, तेही भक्तियोगाचे मोठे पुरस्कर्ते होते, हें होय. असो.

**एकनाथी भागवत**—नाथ महाराजांचा विशेष महत्त्वाचा ग्रंथ 'एकनाथी भागवत' हा होय. या ग्रंथाच्या ओव्या २०,००० आहेत. नाथांची जाडी विद्वत्ता, थोर पारमार्थिक अधिकार, विलक्षण भाषाप्रभुत्व आणि गहन विषय सुलभ करून सांगण्याची अलौकिक शैली हे गुण या ग्रंथांत आरंभापासून अखेरपर्यंत अखंडपणें दृग्गोचर होतात. वर्ण्य विषयांत काव्यप्रदर्शनास जरी फारसा वाव मिळण्यासारखा नाहीं, तरी अत्यंत हृदयंगम असें काव्यही, या ग्रंथांत ठिकठिकाणीं वाचावयास

मिळतें. वर्ण्य विषय सामान्य जनांच्या गळीं उतरवून देण्याच्या कळकळीमुळें नाथांनीं उपमांचाही उपयोग जरी मुक्तहस्तानें केलेला आहे, तरी ग्रंथाचा भारदस्तपणा कायम ठेविला आहे. ग्रंथाची भाषा ज्ञानेश्वरीच्या मानानें जरी पुष्कळच सुलभ आहे तरी ज्ञानेश्वरींतले जुने शब्द ग्रंथांत बरेच आढळतात. या ग्रंथांतले उतारे द्यावयाचें काम फार बिकट आहे, कारण समग्र ग्रंथच फार रसाळ आणि प्रेमळ असल्यामुळें, बऱ्या वाईट भागाची निवड करण्यास जागाच नाहीं; आणि नाथांच्या या एकादश स्कंधावरील टीकेची अद्वितीयता इतर मराठी कवींनींही निमूटपणें मान्य केलेली दिसते; कारण भागवताच्या दशमस्कंधावर जरी शिवकल्याण, बहिरा जातवेद, जयराम, कृष्णदयार्णव इत्यादि अनेक कवींनीं मराठी टीका केलेल्या आहेत, तरी एकादशस्कंधावर नाथांशिवाय दुसऱ्या कोणत्याही कवीची विस्तृत टीका प्रसिद्ध नाहीं. असो.

योग्याचें आचरण कसें असतें हें नाथमहाराज सांगतात:—

**सर्प सांघातू न साहे । एकाकी सुखें विचरत जाये ।**
**सदा सावधान राहे । श्वासू वाये जावों नेदी ॥**
**तैसीच योगियांची गति । न साहे द्वैताची संगति ।**
**एकाकी वसे एकांतीं । जनांप्रती अलक्ष्य ॥**
**विषमाचा संग न करी । परी समाचाही संग न धरी ।**
**निघे देहसंगाबाहेरी । त्वचेचे परी सर्पाचे ॥**
**सदा सावधानबुद्धि । लवनिमेष+ वायां जावों नेदी ।**
**अनुसंधान त्रिशुद्धि । तुटों नेदी सर्वथा ॥**
**सर्प बिळामाजी रिघे बळें । मार्गीं मागू देखती सकळें ।**
**घाला भुकेला हें त्यां नकळे । गेला कळे सर्वांसी ॥**
**तैसाचि योगियाही योगबळें । न राहे जनामाजी जनमेळें**
**गुहेमाजी पडिला लोळे । एकला खेळे एकपणीं ॥**

+ 'विवेकसिंधु' कर्ते मुकुंदराज यांनीं, सदर ग्रंथाच्या शेवटीं, 'मज श्वासोन्मेषाचा भ्रम । तेथ कायसा ग्रंथाचा उद्यम ।' अशी स्वस्थिति वर्णिली आहे. कारण ते योगी होते.

हो कां योगियाचा आचार । करितां देखती लहानथोर ।
सविकल्पनिर्विकल्पविचार । न कळे साचार कोणासी ।
एक म्हणती कर्मठ । एक म्हणती कर्मभ्रष्ट ।
एक म्हणती आत्मनिष्ठ । कळेना स्पष्ट कोणासी ॥
सर्पास बोलणेंचि नाहीं । बोले तरी अल्प कांहीं ।
तैसाच योगिया पाहीं । वाग्वादीं नाहीं सादर ॥
आंतुले कृपेचेनि बळें । बोले मृदुमंजुळ कोंवळें ।
श्रवणासि दोंदें एक वेळे । तेणें वचनमेळें निघालीं ॥
बोलणें तरी अति अल्प । परी छेदी संकल्प विकल्प ।
त्याच्या बोलाचें स्वरूप । सत्यसंकल्प जाणती ॥
जो एकाकी उदास । ज्याचें परमार्थी मानस ।
तेणें गृहारंभाची आस । वृथा प्रयास न करावे ॥

श्रीगुरु दत्तात्रेयानीं चौविस गुरु केले, त्यासंबंधाची कथा भागवताच्या एकादश-स्कंधांत त्यांनींच स्वतः सांगितली आहे, त्यांत सर्पापासून आपण काय शिकलों हें ज्या श्लोकांत त्यांनीं सांगितलें आहे त्या श्लोकावर नाथांनीं वरील टीका केली आहे. उदास आणि परमार्थप्रवण मनुष्यानें गृहारंभ करूं नये असें वर सांगितलें, त्याचें कारण काय ? तर—

गृहारम्भोति दुःखाय विफलश्चाध्रुवात्मनः
सर्पः परकृतं वेश्म प्रविश्य सुखमेधते ॥
मुळीं गृहारंभ तें दुःख । कष्ट करितां दुःखकारक ।
निपजविलें त्रिमाळिक । तें अध्रुव देख सर्वथा ॥
जेथें संसारचि नाशवंत । देह प्रत्यक्षाकारें असंत ।
तेथींचें गृह काय शाश्वत । मूर्ख मानित सत्यवें ॥
जें गर्भींच निमालें । तें उपजतां जातक केलें ।
मृताचें जन्मनांव ठेविलें । तैसें गृह केलें असंत ॥
तोही असंतु आरंभ कुडा । मृत्तिकेसाठीं लावी झगडा ।
भांडवी दगडासाठीं लांकुडा । सुहृदभिडा सांडोनी ॥
वोळंबा घर करी सायासें । त्यामाजी सर्प राहे सावकाशें ।
न शिणतां अप्रयासें । परघरवासें संतुष्ट ॥

तैसाचि योगियाही जाण । न धरी देहगेह अभिमान ।
परगृहीं वसे निरभिमान । सुखसंपन्न सर्वदा ॥
एकही गृह न करावें । हें सत्य मानिलें जीवें ।
येवढी सृष्टि केली देवें । बांधूं न पवे त्या केवीं ॥

भृंगीकीटन्यायानें, ध्याता ध्येयाशीं एकरूप कसा होतो, याचें वर्णनः—

भिंगुरटी कीटकीतें धरी । कोंडी भिंतीमाजिले घरीं ।
ते मरणभयें ध्यान करी । निरंतरीं भ्रमरीचें ॥
तेणें तीव्रध्यानें ती कीटी । होऊनि ठाके भिंगुरटी ।
गगना चढे उठाउठी । प्रत्यक्ष दृष्टी देखिजे ॥
भिंगुरटी जड असंत । मूढ कीटी तिचें ध्यान करीत ।
तेणें तद्रूपता प्राप्त । तैसा भगवंत तंव नव्हे ॥
तो अज चिद्रूप सुखदाता । ज्ञाता अधिकारी ध्यान करिता ।
तेथ तद्रूपता पावतां । विलंबू सर्वथा पैं नाहीं ॥
कीटकास भ्रमरत्व जोडे । हें तीव्रध्यानें न घडावें तें घडे ।
विचारितां दोन्ही मूढें । जड जडें वेधिलें ॥
भगवद्ध्यान नव्हे तैसें । ध्याता भगवद्रूपाचि असे ।
ध्यानें भ्रम मात्र नासे । अनायासें तद्रूप ॥
येणें देहें याचि वृत्ती । आपुली आपण न जाणे मुक्ति ।
नेघवे भगत्पदप्राप्ति । तैं वृथा व्युत्पत्ति नरदेहीं ॥
वृथा त्याचें ज्ञान ध्यान । वृथा त्याचें यजन याजन ।
वृथा त्याचें धर्माचरण । चैतन्यघन जरी नोहे ॥

"भागवताची पुरणपोळी ही अलीकडे बनविण्यांत आली आहे," अशा अर्थाचे क्षुद्रताव्यंजक उद्गार ज्या भागवताविषयीं कांहीं अर्वाचीन विद्वानांनीं काढले आहेत त्या भागवतास एकनाथ, जयराम, वामन, मुक्तेश्वर, शिवकल्याण, पिसा बहिरा, श्रीधर, कृष्ण दयार्णव इत्यादि जुन्या विद्वान् संतकवींनीं जें इतकें महत्त्व दिलें त्याचें कारण, ही पुरणपोळी त्यांस फार गोड लागली, हेंच असावें असें वाटतें. ह्या वेडगळ संतांस रचनेच्या अर्वाचीनत्वामुळें ग्रंथास पुराणपोळीचें स्वरूप येतें, या महासिद्धांताची कल्पनाहि नव्हती. एक संत म्हणतो, माझी रक्तापितीची व्यथा भागवतावर

टीका केल्यानें दूर झाली, तर दुसरा म्हणतो ' भागवताच्या अध्ययनानें मी महाभागवत या पदवीस पात्र झालों. ' अर्वाचीन ग्रंथाच्या अंगीं असलें सामर्थ्य कसें असूं शकेल, हें अध्ययनाच्या पाश्चिमात्य पद्धतीशीं अपरिचित असलेल्या या जुन्या भोळ्या कवींस समजलें नाहीं, ह्यांत आश्चर्य तें काय ? ही पाश्चिमात्य ज्ञानदृष्टि, आम्हां पौर्वात्यांच्या सुदैवानें अलीकडे आम्हांस प्राप्त झाली आहे म्हणून बरें, नाहीं तर ह्या अर्वाचीन ' पुरणपोळ्या ' खातां खातां अजीर्ण होऊन आम्ही खरोखर मेलोंच असतों. एक अर्वाच्य विद्वान् उठतो आणि बेधडक विधान ठोकून देतो कीं, ' सबंध ज्ञानेश्वरींत भागवताचा उल्लेख नाहीं ! ' दुसरा एक विद्वान् शिल्पशास्त्री विविधज्ञानविस्तारांत भागवताच्या दशमस्कंधांतील बहुतेक कथांवर ' पोरकट ' अशा शेरा ठोकून मोकळा होतो ! पण ज्ञानेश्वरींत[1] भागवताचा उल्लेख आहे इतकेंच नव्हे तर, मत्स्यपुराणांत[2], पद्मपुराणांत[3] आणि नारदपुराणांतही[4] आहे. आणि याच भागवताच्या अध्ययनानें आणि श्रवणानें शेंकडों जड जीवांचा उद्धार झालेला आहे. शिवाय, या अर्वाच्य विद्वांनाच्या खटाटोपानें श्रीमद्भागवत हा ग्रंथ जरी अगदीं अर्वाचीन–शें दोनशें वर्षांतला–ठरला तरी तेवढ्यासाठींच जर त्याचें महत्त्व कमी मानावयाचें तर गीतारहस्यासारख्या अर्वाचीनतम ग्रंथांची काय वाट ? असो. तर नाथमहाराजांनीं, भक्तिमार्गाचा मुख्य ग्रंथ जो भागवत त्याच्या अकराव्या स्कंधावर विस्तृत टीका लिहून, त्या मार्गाचा महाराष्ट्रांत प्रसार केला आणि रुक्ष कर्मकांडाचें स्तोम मोडून काढलें, ही त्यांची कामगिरी सर्व धार्मिक लोकांस अत्यंत महत्त्वाची वाटून, ज्ञानेश्वरीच्या खालोखाल नाथभागवतास त्यांनीं महत्त्व द्यावें ह्यांत कांहीं आश्चय नाहीं.

यज्ञयागादि कर्मकांडाचा ज्ञानदेवमहाराजांनीं आपल्या ज्ञानेश्वरींत जसा उपहास केला आहे तद्वतच नाथांनींही केला आहे. पुढील ओव्या पहा:—

**पावोनि कर्मभूमि उत्तम । वर्णवरिष्ठ ब्राम्हणजन्म ।**
**ज्योतिष्टोमादिक करिती कर्म । नित्य काम्य अग्निहोत्र ॥**

---

१ " तें म्या भागवतामिषें ब्रह्मया । पूर्वींच कथिलें ॥ " ( ज्ञानेश्वरी )

२ " यत्राधिकृत्य गायत्रीं वर्ण्यते धर्मविस्तरः । वृत्रासुरवधोपेतं तद्भागवतमुच्यते ॥ " ( मत्स्यपुराण ) ३ पुराणेषुच सर्वेषु श्रीमद्भागवतं परम् । यत्र प्रतिपदं कृष्णो गायते बहुदर्शिभिः ॥ ३ ॥ ( पद्मपुराण; उत्तरखंड, अध्याय १८९ ) ४ मरीचे शृणु वक्ष्यामि वेदव्यासेन यत्कृतम् । श्रीमद्भागवतं नाम पुराणं ब्रह्मसम्मितम् ॥ " ( नारदपुराण )

त्रयी विद्या जाणती सकळ । कर्मकलापीं अतिकुशळ ।
ऐसे सज्ञान मूर्ख केवळ । स्वर्गफळ वांच्छिती ॥
जेणें पुण्यें मी न जोडें । तें पुण्य म्हणतां वाचा रडे ।
याज्ञिक विषयासक्त गाढे । स्वर्गभोगाकडे धाविन्नले ॥
यजूनि इंद्रादि देवांसी । जेणें अंतर पडे मजसी ।
त्या पावले स्वर्गलोकासी । दिविभोगासी भोगावया ॥
बहुतीं चघुळिलें जुनें हाड । तें श्वान स्वलीला करी गोड ।
तैसें याज्ञिकां स्वर्गकोड । स्वपुण्यें गोड करिताती ॥
कां स्मशानबळीचें अन्न । कलहें श्वानशेष खाय श्वान ।
तैसाचि स्वर्गभोग जाण । शेषभोजन बहुतांचें ॥
गांठीचें वेंचून शुद्ध सुकृत । उच्छिष्ट भोग विकत घेत ।
याज्ञिक पवित्र म्हणवित । मोलें सेवित बहुशेष ॥
केवळ वायसाचें मांस । तेंही श्वानमुखींचें शेष ।
मोलें न मिळेचि बहुवस । तैसी रसकस याज्ञिकां ॥
स्वर्ग उच्छिष्ट बहुतांचें । त्या मोल वेंचे अतिकष्टाचें ।
तेंही न मिळेचि धणीचें । भय पतनाचें अहर्निशीं ॥
स्वर्गभोग भोगिती देव । तेही म्हणताती आम्ही निर्दैव ।
याज्ञिकां ठायीं थोर हांव । दिव्य वैभवभोगार्थ ॥
एवं झालिया स्वर्गप्राप्ति । तेथ जे जे भोग भोगिती ।
ते मी सांगेन तुजप्रती । ऐक निश्चिती उद्धवा ॥

नाममहिमाः—

येवोनियां नरदेहासी । अविकळ वाचा असे त्यासी ।
जो नुच्चारी हरिनामासी । पाप त्यापाशीं संचलें ।
पुरिले लोहां[1] माती खाये । तें उपेगा नये वायां जाये ।
तैसी नामेंवीण वाचा पाहें । वृथा जाये सर्वथा ॥

---

१ ही उपमा ज्ञानेश्वरींतली आहे "अहो निदैवाच्या परिवरीं । लोह्या रुतलिया आहातीं सहस्रवरी । तेथ बसोनि उपवास करी । दरिद्री जिये" हा ओवी पहा. ज्ञानेश्वरींतल्या अशा अनेक उपमा नाथभागवतांत आढळतात.

आसन ध्यान परिश्रम । न करूनि म्हणे जो राम राम ।
तेणें कोटिजन्मांचा हरे श्रम । उत्तमोत्तम ते वाणी ॥
जो नित्य जपे रामनाम । तो जाणावा मजचि सम ।
तेणेंचि केले सकळही नेम । पुरुषीं पुरुषोत्तम तो जाणा ॥
चतुर्वर्णामाजी जो कोणी । अविश्रमू राम जपे वाणी ।
तोचि पढियंता मजलागूनि । आन त्रिभुवनीं नावडे ॥
ऐसें रामनाम नावडे ज्यासी । तें पाप मुखरोग आला मुखासी ।
तो स्वयें मुकला निजसुखासी । आपआपणासी घातक ॥
रामनामेंवीण जें तोंड । तें जाणावें चर्मकुण्ड ।
भीतरी जिव्हा तें चामखण्ड । असत्य कांटेड कांटली ॥
हो कां हरिनामेंवीण जे वाणी । ते गलितकुष्ठें जाली कुष्ठिणी ।
असत्यकुष्ठाचें गेलें पाणी । उठी पोहाणी निंदेची ॥
ऐसिया वाचेसी रोकडे । पडती अधर्माचे किडे ।
चुळबुळती चहूंकडे । मागें पुढें वळवळती ॥
ते वाचा होय ज्या समोर । देखे तो पाठिमोरा ठाके नर ।
नाक झांकूनि म्हणे हर हर । लहान थोर थुंकती ॥

× × × ×

हो कां वेदशास्त्रसंपन्न वाणी । करूनि निंदकू नामसंकीर्तनीं ।
तो पापी महापाप्याहुनी । त्याचेनि अवनी अतिदुःखी ॥

उद्धवानें भगवंतास प्रश्न केला कीं, हे देवा, विद्याविद्यातीत असा जो तूं परब्रह्म परमेश्वर, त्या तुझ्या गुणरूपाचें कीर्तन कसें करावें ? तेव्हां भगवान् म्हणाले:—

उद्धवा हें मनीं न धरीं । मी स्वलीला स्वमायें करीं ।
नाना अवतारांतें धरीं । न करूनि करीं स्थित्यन्त ॥
त्रिगुण गुणी गुणावतार । ब्रह्मा आणि हरिहर ।
तिहीं रूपीं मीच साचार । चराचर करीं हरीं ॥

× × × ×

अवतारांमाजी उत्तमोत्तम । श्रीरामकृष्णादि जन्मकर्म ।
नाना चरित्रें सम्भ्रम । अविश्रम जे गाती ॥

× × × ×

हीं अवतारचरित्रें वर्णितां । चोरटा वाल्मीक झाला सरता ।
व्यास जारपुत्र सर्वथा । केला सरता तिहीं लोकीं ॥
या देहीं अवतारांची पदवी । वर्णितां दोन्ही झाले महाकवि ।
व्यास वाल्मीकि वंदिजे देवीं । कीर्तिगौरवीं गौरविले ॥
त्या महाकवींची कवित्वकथा । शेष नेत्रद्वारें श्रवण करितां ।
दोन सहस्र नयनीं आइकतां । धणी सर्वथा बाणेना ॥

याप्रमाणें सगुण हरिभजनाचा महिमा नाथांनीं सर्वत्र वर्णिला आहे; किंबहुना सर्व परमार्थसाधनांत सगुण हरिभजनासच त्यांनीं श्रेष्ठत्व दिलें आहे. त्यांच्या या सर्व उपदेशाचें रहस्य पुढील प्रसिद्ध पदांत समाविष्ट झालेलें वाचकांस आढळेल.

सगुण चरित्रें परम पवित्रें सादर वर्णावीं ।
सज्जनवृंद मनाभावें आधीं वंदावीं ॥ ध्रु० ॥
भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतरा न करावया ।
संतांसंगें वैराग्याच्या युक्ति विवराव्या ॥ १ ॥
जेणेंकरोनी मूर्ति ठसावी अंतरिं श्रीहरिची ।
ऐसी कीर्तनमर्यादा हे संतांचे घरची ॥ २ ॥
अद्वय भजनें अखंड स्मरणें वाजवि करटाळी ।
एका जनार्दनीं मुक्ति होय तात्काळीं ॥ ३ ॥

नाथांनीं, एकादश स्कंधावरील ही आपली टीका संस्कृत श्रीधरी टीकेच्या आधारानें लिहिली आहे व या गोष्टीचा त्यानीं स्पष्ट उल्लेखही केला आहे:—

तैसें हें श्रीभागवत जाण । मुळीं बोलिला श्रीनारायण ।
तेंचि श्रीव्यासें आपण । दश लक्षण वर्णिलें ॥
ते दशलक्षण परवडी । श्रीशुकमुखें चढली गोडी ।
तेथील कठिण पदबंधमोडी । टीका चोखडी श्रीधरी ॥
तें श्रीधरीचें व्याख्यान । भावार्थदीपिका जाण ।
त्या भावार्थाची ये सद्भाव खूण । केली निरूपण देशभाषा ॥

भक्ताचें भगवंताशीं साधर्म्य होऊं लागलें म्हणजे त्याच्या मार्गांत सिद्धि येऊन अडथळा करितात. या सिद्धींचें वर्णन नाथांनीं येणेंप्रमाणें केलें आहे:—

जीवाच्या जीवामाजी माझा वास । जीव मजमाजी सावकाश ।
माझें स्वरूप गा असमसहस । गुणमायेस अनावृत ॥

जेंवी घटाची वस्ती आकाशीं । आकाश सबाह्य घटासी ।
तेवीं मी जीवमात्रासी । सबाह्य हृषीकेशी परिपूर्ण ॥
जैशीं महाभूतें भौतिकांसी । सबाह्य असती सर्वांसी ।
तेवीं मी सकळ जगासी । सबाह्य हृषीकेशी परिपूर्ण ॥
मज पूर्णाची पूर्ण प्राप्ति । निकट येत येतां हातीं ।
ते संधी सिद्धि नागविती । भोग संपत्ति उपचारें ॥
ज्याचें रायापाशीं चलन । त्याचे हाता ये लांच संपूर्ण ।
तेणेंचि तो पावे मरण । तैशा सिद्धि जाण घातका ॥
ये अध्यायींचें निरूपण । सांगावया हेंचि गा कारण ।
माझे प्राप्तीस सिद्धि विघ्न । उद्धवा जाण निश्चितीं ॥
एकाग्र भजनें माझी प्राप्ति । होतां ते संधीसि सिद्धि येती ।
त्या भुलवोनियां भोगासक्तीं । नागविती साधकां ॥
जे नेणती माझें निजसुख । ऐसे जे कां केवळ मूर्ख ।
त्यांसीच सिद्धींचें कौतुक । अलौकिक भोगलिप्सा ॥
जैसे वेश्येचे हावभाव । तैसें सिद्धींचें वैभव ।
हें त्यागावया गा सर्व । देवें हा अध्यावो निरूपिला ॥
ज्यासि प्राप्त माझें निज सुख । त्यासि सिद्धि तुच्छ तृणप्राय देख ।
न देखती जन्ममरणाचें मुख । माझा पूर्ण हरिख कोंदाटे ॥
सेवितां सद्गुरुचरण । कोंदाटे ब्रह्म परिपूर्ण ।
तेथ सिद्धींसि पुसे कोण । हे जाणती खूण हरिभक्त ॥
हरिभक्तीसि विकिला भावो । भजनें फिटला अहंभावो ।
तेथ सिद्धींचा भोगसंदेहो । नुपजे पहा हो सर्वथा ।
भुक्तिमुक्ति ऋद्धिसिद्धि । सद्गुरुचरणीं गा त्रिशुद्धि ।
हें नेणती जे मंदबुद्धि । ते नाना सिद्धि वांच्छिती ॥
सकळ सिद्धींचें साधन । निरपेक्षता सत्य जाण ।
निरपेक्षाचें अंगण । सिद्धि संपूर्ण वोळंगती ॥
सिद्धींची अपेक्षता ज्यांचे चित्तीं । सिद्धि त्यांकडे न थुंकती ।
निरपेक्षाचे पायींची माती । सिद्धि वंदिती सर्वदा ॥

ज्ञान वैराग्य भक्तीचे माथां । सत्य जाण पां निरपेक्षता ।
ते निरपेक्षता आलिया हाता । मुक्ति सायुज्यता पायां लागे ॥
निरपेक्षतेपाशीं सिद्धि । निरपेक्षतेपाशीं विधि ।
निरपेक्षतेपाशीं सुबुद्धि । चरण वंदिती अहर्निशीं ॥
निरपेक्षता तेथ निर्वाहो । निरपेक्षता तेथ सद्भावो ।
निरपेक्षतेपाशीं भगवद्भावो । यथार्थ पहा हो तिष्ठतु ॥

भूतमात्राच्या ठायीं ईश्वराचें अस्तित्व पाहणें आणि भूतमात्राचे ठायीं एकरूप होणें ही भगवद्भक्तीची उच्चतम पायरी होय. नाथ म्हणतातः—

पूर्ण प्राप्तीचा मुख्य ठावो । सर्वभूतीं भगवद्भावो ।
हाहि भक्तीचा पूर्ण गौरवो । तोचि अभिप्रावो हरि सांगे ॥
सर्व भूतीं मी भगवंत । सर्व भूतें तीं मज आंत ।
भूतें भूतात्मा मीचि समस्त । मीच मी येथ परमात्मा ॥
ऐसें जें पूर्णत्वाचें मीपण । तेणें वाढे आत्माभिमान ॥
सहज निज निरभिमान । तें शुद्ध लक्षण ऐक राया ॥
शुद्ध भक्तांचें निज लक्षण । चौथेही न धरिती मीपण ।
तेंही मानुनियां गौण । भावना पूर्ण त्यांची ऐसी ॥
सर्व भूतीं भगवंत । भूतें भगवंतीं वर्तत ।
भूतें भूतात्मा तोचि समस्त । मी म्हणतें तेथें मीपणा नेय ॥
सर्व भूतीं भगवंत पाही । भूतें भगवंताचे ठायीं ।
हें अवघें जो स्वदेहीं । स्वस्वरूपें पाही स्वयें होय ॥
तो भक्तांमाजी श्रेष्ठ । तो भागवतांमाजी वरिष्ठ ।
त्यासि उत्तमत्वाचा पट । अवतार श्रेष्ठ मानिती ॥
तो योगियांमाजी अग्रगणी । तो सिद्धांमाजी मुगुटमणि ।
तो ज्ञानियांचा शिरोमणि । हें चक्रपाणि बोलिला ॥

मूर्तिपूजेचें रहस्य आणि फल यांविषयीं नाथांनीं दिलेला स्वतःचा अभिप्राय—

पूजासंभार सिद्ध करून । समस्त शंखतोयें प्रोक्षून ।
निजासनीं सावधान । एकाग्र जाण बैसावें ॥
ज्यासी ध्यानीं मूर्ति नये संपूर्ण । तेणें प्रतिमामूर्ति अधिष्ठान ।
तेथेंचि करावें पूजन । लब्धोपचारें जाण आगमोक्त ॥

ज्यासि ध्याना नये मूर्ति अति संकटीं। तेणें बाह्योपचार आटाआटी।
सांडूनियां ध्यानदृष्टीं । करावी गोमटी मानसपूजा ॥
ज्याचे हृदयींचें न विकरे ध्यान । बाह्यमूर्तिपूजेसि सावधान ।
तेणें उभय पूजन । करावें संपूर्ण आगमोक्त ॥
सकळ पूजासंभार । निकट ठेऊनि उपचार ।
मग मूर्तीसि न्यासप्रकार । उक्तशास्त्रें करावा ॥
जैसे न्यास आपणास । तैसेचि करावे मूर्तीस ।
हा आगमोक्त गुरुसौरस । मूळमंत्रें न्यास मूर्तीसी ॥
आगमोक्त कारितां न्यास । अंगप्रत्यंगीं विन्यास ।
तेणें करितां होय हृषीकेश । हा अर्थ सौरस दृढ करावा ॥
दृढ करोनि अनुसंधान । मूळमंत्रें मूर्तिपूजन ।
हृदयीं आणी प्रतिमेसि जाण । पूजाविधान दोहीं ठायीं ॥
करचरणादि अव्यंग । मूर्ति चिंतावी सुंदर सांग ।
श्याम मनोहर श्रीरंग । उल्हासें चांग निजध्यानीं ॥
मूर्ति चतुर्भुज वेल्हाळ । शंख चक्र गदा कमळ ।
सुनदादि पार्षदमेळ । चिंतावे सकळ सायुधादिक ॥
यथोक्त मधुपर्कविधान । अर्घ्यपाद्यादि आचमन ।
पुरुषसूक्त मंत्रें जाण । करावें स्नान निर्मळ जळें ॥
मुकुट कुंडलें कटीं मेखळा । कांसे मिरवे सोनसळा ।
आपाद रुळे वनमाळा । कौतुभ तेजाळा कंठीं झळके ॥
पाद पद्मांकित सकुमार । ऊर्ध्वरेखा ध्वज वज्र ।
वांकी अंदुवांचा गजर । चरणीं तोडर गर्जत ॥
निढळीं शुद्ध श्यामकळा । तिळकु रेखिला पिंवळा ।
त्यावरी अक्षता सोज्वळा । आरक्त तेजाळा कुंकुमांकित ॥
सुमनें गुंफिलीं वीरगुंठीं । त्यावरी मधुकरांची घरटी ।
तुळसी कमळमाळा कंठीं । चंदनाची उटी श्यामांगीं शोभे ॥
धूप दीप उपाहार । तांबुल अर्पावा सकर्पूर ।
निरंजनें जयजयकार । मंत्रस्वरें अर्पावा ॥

स्तुति करावी वेदोक्तमंत्रें । कां पुराणोक्त नाना स्तोत्रें ।
अथवा प्राकृत नामोच्चारें । नानाप्रकारें गद्यपद्यें ॥
स्तवनें संतोष अधोक्षजा । ऐसें भावावें महाराजा ।
मग साष्टांगें अतिवोजा । गरुडध्वजा नमस्कारावें ॥
द्वैतभावें भजनविधि । ते जाणावी स्थूलबुद्धि ।
भजनाची भजनसिद्धि । जाण त्रिशुद्धी तन्मय होणें ॥
मूर्तिध्यानें तन्मयस्थिति । ऐक्यत्वें राहे निश्चळ वृत्ति ।
याचि नांव मुख्य भक्ति । उठलिया पुढती नमावें हरी ॥
ऐसी पूजा करूनि हरि । शेष प्रसाद धरोनि शिरीं ।
मग देवो आपणिया भीतरीं । हृदयमंदिरीं निजविजे ॥
एवं पूजेचें उद्वासन । ध्यानमूर्ति हृदयीं शयन ।
प्रतिमा पर्यंकीं निजवून । विधिविधान समाप्ति ॥
जाहलिया पूजाविसर्जन । विसर्जूं नये अनुसंधान ।
अखंड हरीचें स्मरण । सर्वस्वें आपण सदा किजे ॥

श्रीसमर्थ रामदासस्वामीच्या सगुण हरिभक्तीचें मूळ नाथांच्या या शिकवणुकींत सांपडेल; नाथांच्या शिकवणुकीचा विस्तार समर्थांनीं मोठ्या प्रमाणावर केला इतकेंच.

एकनाथी भागवताच्या १७ व्या अध्यायाचे शेवटीं नाथ मोठ्या कळकळीनें सांगतात—

एका जनार्दनाची विनंति । येऊनि मनुष्यदेहाप्रती ॥
करोनियां भगवद्भक्ति । निजात्मप्राप्ति साधावी ॥

याप्रमाणें, नाथांच्या एकादशस्कंधावरील टीकेंतले हे थोडेसे उतारे दिले आहेत. तेवढ्यावरून नाथांच्या काव्यवाणीची ओळख वाचकांस होईल; परंतु ग्रंथाच्या महत्त्वाची यथार्थ कल्पना होण्यास, तो समग्र ग्रंथच लक्ष्यपूर्वक वाचला पाहिजे, हें विसरतां कामा नये. एकनाथी भागवतांत मुख्य वर्ण्य विषयाशिवाय, सत्य, धर्म, यज्ञयाग, हिंसा–अहिंसा, गृहस्थधर्म, भूतदया इत्यादि अनेक विषयांवर नाथांनीं स्वतःचे जे विचार व्यक्त केले आहेत, ते पाहिले म्हणजे नाथांच्या चारित्र्याची बरीचशी यथार्थ कल्पना झाल्याशिवाय राहात नाहीं. प्रेमळ सगुण हरिभक्ति आणि भुतदया या दोन विषयांच्या उपदेशांत आणि ते दोन विषय स्वतः आचरून

दाखविण्यांत नाथांनीं आपलें बहुतेक आयुष्य वेंचिलें आणि या त्यांच्या आचरणाचें स्पष्ट प्रतिबिंब त्यांच्या भागवतांत सर्वत्र पडलेलें आढळतें. जुन्या मराठी वाङ्मयांत जे चार *मुख्य ग्रंथ प्रमाणभूत मानले गेले आहेत, त्यांत नाथ भागवताचा दुसरा नंबर लागतो. या अमूल्य ग्रंथाचें वाचन आणि मनन गेल्या ३०० वर्षांत लक्षावधि लोकांनीं श्रद्धापूर्वक केलें आहे आणि मराठी भाषा जोंपर्यंत अस्तित्वांत राहील तोंपर्यंत आणखी लक्षावधि लोक त्याचें वाचन मनन असेंच श्रद्धापूर्वक करितील, यांत तिलप्राय संदेह नाहीं.

**भावार्थ रामायणः**—नाथांचा दुसरा फार मोठा आणि महत्त्वाचा ग्रंथ म्हटला म्हणजे भावार्थ रामायण हा होय. या ग्रंथाची ओवीसंख्या पूर्वीं दिली आहे, त्यावरून त्याच्या विस्तृततेची कल्पना वाचकांस होईल. या महाग्रंथाच्या युद्धकांडाचा कांहीं भाग व संपूर्ण उत्तरकांड गावबाकृत आहे, हें पुष्कळांस ऐकून तरी ठाऊक असेल, परंतु नाथ व गावबा या दोघांशिवाय आणखी एका तिसऱ्या कवीनें लिहिलेले कांहीं अध्याय ह्या ग्रंथांत आहेत, हें क्वचितच कोणास माहीत असेल. आजपर्यंत जीं एकदोन एकनाथचरित्रें छापलीं गेलीं आहेत, त्यांतदेखील त्यांच्या लेखकांनीं या गोष्टीचा उल्लेख केलेला कोठें आढळला नाहीं. हा तिसरा कवि 'जयरामसुत' होय. हा नाथांहून बराच अर्वाचीन कवि असून, याची एक संतमालिका व कांहीं फुटकळ पदें इतकी कविता आजपर्यंत छापली गेली आहे. याशिवाय, श्रीमद्भगवद्गीतेवर यानें रचिलेली सुमारें दोन अडीचशें श्लोकांची एक टीका सुमारें ५० वर्षांपूर्वीं शिळाछापावर कोणी छापविली होती, तिची एक प्रत माझे संग्रहीं आहे. 'निजवदनीं हरिनाम वसावें। न लगे त्यासि वनांत बसावें' हें प्रसिद्ध व लोकप्रिय पद्य याच कवीचें होय. भावार्थ रामायणाच्या मूळ युद्धकांडांत 'अहिमह्याख्यान' नव्हतें तें या कवीनें स्वतः रचून त्यांत समाविष्ट केलें आहे.

भागवतापेक्षां भावार्थ रामायणांत नाथांचें कवित्व अधिक उज्वलतेनें चमकलेलें आढळतें. एखाद्या प्रचंड नदीच्या जलौघाप्रमाणें या ग्रंथांतील कथानकाचा ओघ संथ व गंभीर दिसतो. आधींच श्रीरामकथा फार पवित्र आणि गोड, त्यांत नाथांच्या काव्यप्रतिभेची आणि प्रेमळपणाची भर पडल्यामुळें एकंदर ग्रंथ फार सुरस आणि हृदयंगम उतरला आहे. संस्कृत भाषेंतील पौराणिक कथाभाग मराठींत आणण्याचा उपक्रम महानुभावपंथी लोकांनीं जरी पूर्वींच केला होता, तरी त्यांचे

* ज्ञानेश्वरी, नाथभागवत, तुकारामाचे अभंग आणि दासबोध.

ग्रंथ विशिष्ट सांप्रदायी लोकांकरितांच लिहिलेले असल्यामुळें, ज्ञानदेव, एकनाथ वगैरे कवींच्या ग्रंथांइतकें सार्वत्रिक महत्त्व, त्या ग्रंथांस कधीं प्राप्त झालें नाहीं. तात्पर्य, सर्वमान्य अशी पौराणिक मराठी ग्रंथरचना पहिल्यानेंच करण्याचा मान एकनाथांसच दिला पाहिजे, कारण त्यांच्या पूर्वीच्या कोणी कवीनें पौराणिक कथेवर लिहिलेला सर्वमान्य मराठी ग्रंथ प्रसिद्ध नाहीं. विष्णुदास नामाकृत महाभारताकडे कोणी बोट दाखवील तर ज्ञानदेवसमकालीन नामदेव आणि हा विष्णुदास नामा एक नव्हत हें त्यानें लक्ष्यांत ठेवावें. नाथांचा समकालीन कवि कृष्णदास मुद्गल यानें मात्र रामायणाच्या युद्धकांडावर मराठी ग्रंथ लिहिला आहे, परंतु समग्र रामायणावर, मूळ वाल्मीकिरामायणापेक्षांही मोठा असा ग्रंथ नाथांनींच पहिल्यानें लिहिला यांत संशय नाहीं.

रुक्मिणीस्वयंवराचें रम्य कथानक जसें नाथांनीं अध्यात्मपर लाविलें आहे तसेंच हें भावार्थ रामायणही अध्यात्मपरच आहे. हें रामायण लिहितांना एकट्या वाल्मीकि रामायणाचाच आधार घेतलेला नसून, इतर रामायणें व पुराणग्रंथ यांचाही उपयोग केलेला आहे. आतां या प्रचंड ग्रंथांतले कांहीं उतारे दिल्याशिवाय त्याच्या सुरसतेची यथार्थ कल्पना वाचकांस होणार नाहीं म्हणून थोडेसे उतारे येथें देऊन, मग नाथांच्या इतर ग्रंथांकडे वळूं.

## कथारंभ—श्रावणाख्यान.

अजापासोनि उत्पत्तिहेतु । दशेंद्रियें अतिसमर्थु ।
जन्मला राजा दशरथु । अतिविख्यातु तिहीं लोकीं ॥
मूळचें अजत्व लक्षोनि दृष्टी । अजन्मा राम जन्मेल पोटीं ।
हे रामायणींची मूळ गोष्टी । शास्त्र परिपाटी परमार्थु ॥
रावणाचे नित्यांकित । सुरवर जाले जी समस्त ।
ब्रम्हादिकां चिंता अद्भुत । तिहीं रमानाथ प्रार्थिला ॥
करावया राक्षसांचा घातु । मी अवतरेन रघुनाथु ।
रमा मुख्य कलहा हेतु । इचेनि अंतु निशाचरां ॥
तुम्ही सकळही सुरवर । वेगीं व्हावें वानर ।
आम्ही दोघे धरोनि अवतार । सत्य साचार वचनार्थु ॥

फेडावया देवांचीं सांकडीं । स्वधर्म वाढवावया वाढी ।
नामें मोक्षाची उभवावया गुढी । सूर्यवंशा गाढी दशा आली॥
ते सूर्यवंशीं अजाचा सुतु । अहमात्मा जन्मला दशरथु ।
ऐका त्याचा वृत्तांतु । धर्मयुक्त स्वधर्मी ॥
त्यासी तिघी राणिया प्रबुद्धा । लोकोत्तर अतिप्रसिद्धा ।
धर्मपत्न्याही विशुद्धा । नामानुवादा अवधारा ॥
ज्येष्ठ कौसल्या ते सद्विद्या । सुमित्रा ते शुद्ध मेधा ।
कैकेयी ते अविद्या । मंथरा कुविद्या तीपाशीं ॥
उदरा येईल आदिमूर्ति । त्या आधीं नव्हत्या संतति ।
अपुत्रपणें नृपति । पुत्रार्थी उद्यतु ॥
सुख नेदी राजभुवन । सुख नेदी सिंहासन ।
सुख नेदी भोगस्थान । मान सन्मान सुख नेदी ॥
सुख नेदी अलंकार वस्त्र । सुख नेदी भोग कलत्र ।
सुख नेदी छत्रचामर । स्तुतिस्तोत्र सुख नेदी ॥
राजा पोटांतून भोगीं विरक्तु । यालागीं पोटीं येईल रघुनाथु ।
जो अत्यंत विषयासक्तु । त्यासी भगवंतु स्पर्शेना ॥
जेंवि आंधळें न देखे पिता । तेंवि विषयी नेणती भगवंता ।
तोच त्यांचा प्रतिपाळिता । देखणी अवस्था त्यां नाहीं ॥
दशरथा न गमे जनस्थानीं । निघाला पारधीलागीं वनीं ।
विचरे एकाकी होऊनी । आवडे विजनीं रहिवासु ॥
दुसरियाचा सहसा घातु । सर्वथा न मानी दशरथु ।
हृदयीं कळवळला रघुनाथु । जाला विरक्तु सर्वार्थी ॥
वनीं एकाकी विहार । करी वनफळांचा आहार ।
नावडे राजोपभोग उपचार । पुत्रार्थी थोर साक्षेपी ॥
होणारासारिखी बुद्धि । मांडली निशि अवस्था पारधी ।
अंधारीं श्रावणातें वधी । मातापिता खांदीं कावडीसी ॥
लौकिकाची लोकवार्ता । श्रावणें पितरें कावडी ठेवितां ।
हे तंव समूळ अबद्ध कथा । तो माता पिता न विसंबे ॥
अंधारीं अंध मातापिता । झाडा ठेवी हे मिथ्या वार्ता ।
खांदी घेवोनि तत्त्वता । जीवनार्थ तो आला ॥

बुडबुड कमंडलूच्या शब्दीं । ध्वनी उठली जळसन्निधीं ।
दशरथ केवळ शब्दवेधी । बाण वेधीं विंधिला ॥
घाव लागतां संपूर्ण । काय बोलिला श्रावण ।
कोणा सभाग्याचा बाण । रामस्मरणेंसी आला ॥
श्रावणासी बाण लागतां । नाठवेचि मातापिता ।
नाठवेच देहममता । राम स्मरतां देह त्यागी ॥
अंतरीं श्रीरामस्मरण । परम भाग्य हें कल्याण ।
बाण नव्हे तो ब्रह्म पूर्ण । स्मरणेंसि प्राण त्यागिला ॥
दशरथ बोलिला आपण । कोण्या साधूचें हें वचन ।
माझ्या पापाचें निर्दळण । केलें संपूर्ण रामनामें ॥
श्रीरामनाम स्वयें ऐकतां । रायासी न बाधे ब्रह्महत्या ।
रामस्मरणें देह त्यागितां । नित्यमुक्तता श्रावणासी ॥
रामनामें नित्य निर्धूत । एक मुक्त एक पापातीत ।
ब्रह्महत्येसी दशरथ । अति अलिप्त रामनामें ॥
दशरथ जंव येवोनि पाहे । तंव श्रावणु बाणें विंधिला आहे ।
त्याच्या पितरीं पुत्रमोहें । राजा लवलाहें शापिला ॥
आह्मांसि दिधलें पुत्रदुःख । तूंही पावसी पुत्रशोक ।
शापें रायासि परम हरिख । मी पुत्रमुख देखेन ॥

कौसल्या गर्भवती असतां, राजा दशरथ तिच्या मंदिरांत जाऊन, तिला होणाऱ्या डोहळ्यांविषयीं चौकशी करूं लागला तेव्हां ती म्हणाली:—

येरी म्हणे मी अवघा राम । मजमाजी तंव कैंचा भ्रम ।
अवतरलों पुरुषोत्तम । देवांचे श्रम फेडावया ॥
ऐकोनि शंकिजे रायें । म्हणे इशी जाहलें तरी काय ।
आप आपणियातें पाहें । सावधान होय प्रिये तूं ॥
येरी म्हणे मी नव्हें स्त्रीपुरुष । नर वानर ना राक्षस ।
ईशाचा जो निज ईश । परम पुरुष श्रीराम ॥
राजा म्हणे तन्वंगी । काय जालें तुजलागीं ।
कैंचा भ्रम भरला अंगीं । पाहें वेगीं मी कोण ॥
येरी म्हणे माझ्या ठायीं । मी तूं ऐसें उरलें नाहीं ।
अधिष्ठान जो विदेही । आत्मा पाहीं श्रीराम ॥

दशरथ म्हणे कौसल्ये । माझें तुझें जें लग्न झालें ।
तें रावणें अतिविघ्न केलें । तें विसरलीस कैसेनी ॥
नांव ऐकोनि रावण । येरी म्हणे दे धनुष्यबाण ।
करूं लंकेचें निर्वाण । मारूं दारुण राक्षस ॥
पाचारा वनींचे वनचर । मुकुट कुंडलें द्या अलंकार ।
राज्य देवोनि धरा छत्र । वानरभार चालवा ॥
केउता गेला रे हनुमंत । अंगद सुग्रीव जांबवंत ।
अझूनि रावणाची मात । जगाआंत उरलीसे ॥
अहो वज्रदेही निजगडा । पुच्छें घालोनियां वेढा ।
लंका जाळा रे भडभडां । पाडा तडतडा राक्षस ॥
अमित पाचारा वानर । शिळीं बुजा रे सागर ।
पाडा पाडा रे नगर । निशाचरवस्ती जे ॥
केउते गेले रे जुत्पती । लंका उलथा रे हातोहातीं ।
पाडा पाडा-चारी भिंती । दुर्ग किती आह्मासी ॥
आगड भेदा रे सुभटा । पाडूं लंकेच्या त्रिकूटा ।
मारूं रावणा अतिदुष्टा । स्वधर्म वाटा रूंधित ॥
बाण घेवोनि स्वांगें । छेदूं कुंभकर्णाचें टांगें ।
भेदूं रावणाचीं सर्वांगें । भिडतां मागें मी न सरें ॥
राक्षसांच्या शिरःकमळीं । लंकेपुढें चेंडूफळी ।
राक्षसरुधिराच्या कल्लोळीं । तृप्ति कंकाळी करूं आजी ॥
तोडा नवग्रहांची बेडी । सोडा देवांची बांधवडी ।
उभवा रामराज्याची गुढी । आज्ञा धडफुडी तिहीं लोकीं ॥
पाचारा बिभीषण पवित्र । करा राज्याभिषेक धरा छत्र ।
लंका दिधली स्वतंत्र । यावच्चंद्रसूर्यपर्यंत ॥
नाशा रे जगाचीं दुःखें । त्रैलोक्य भरा रे हरिखें ।
दुमदुमित विश्व सुखें । परमपुरुषें श्रीरामें ॥
नामें कळिकाळासी शिक । यमदूतां न घाली भीक ।
दो अक्षरीं लाविला धाक । यमप्रमुख कांपती ॥
जो उच्चारी रामनाम । त्याचे पुरवावे सकळ काम ।
हरावें मरण जन्म । सहज सम करावें ॥

**श्रीरामस्वरूपवर्णनः—**

स्वप्रकाशें स्वलीला । निजतेजें अति सोज्वळा ।
घवघवित घनसांवळा । देखे डोळां कौसल्या ॥
तेणें निजतेजविलासें । मीतूंपणाचा ठावचि पुसे ।
जग आत्मत्वें प्रकाशे । सोहाळा उल्लासें परमानंदें ॥
ज्या तेजाचे निजनिर्धारें । अहं सोहं समूळ विरे ।
त्रैलोक्य ब्रह्मत्वें अवतरे । सर्वांगीं भरे स्वानंद ॥
ज्या तेजाचे निजनिष्ठे । विषयांचें विषयत्व आटे ।
बंधमोक्षाचें बिरडें फिटे । स्वयें कोंदाटे परब्रह्म ॥
ज्या तेजाचिये दीप्ति । रवि चंद्र हे स्वयें हरपती ।
तें तेज प्रकाशे ब्रह्मस्फूर्ति । निर्विषयस्थिति सुख कोंदे ॥
ऐसें स्वाभाविक सहज । तेजाचें जें निजतेज ।
त्याची मूर्ति चतुर्भुज । देखतसे चोज कौसल्या ॥
देखे ठकाराचें निजठाण । दो हातीं धनुष्यबाण ।
करावया राक्षसनिर्दळण । ओढी काढोनि विन्यासें ॥
करावया बंदिमोचन । सुरग्रहां अभयदान ।
अभयहस्तें संपूर्ण । विराजमान रघुवीर ॥
करितां रामनामस्मरण । जीवांस करावया ब्रह्म पूर्ण ।
स्वयें कृपाळु आपण । वरदहस्तें पूर्ण आश्वासीत ॥
चरणातळीं आरक्तशोभा । लोपित बाळसूर्याची प्रभा ।
जगातें भुलवी जगदंबा । तीही चरणगंगा भूलली ॥
माया अतर्क्य सर्वांसी । वेदशास्त्रीं प्रसिद्धि ऐसी ।
तीही भुलली चरणासी । जाली दासी सर्वदा ॥
सनकादिक अतिविरक्त । तेही चरणारविंदीं आसक्त ।
भ्रमर होवोनियां सेवित । आमोद घेत स्वानंदें ॥
चरणाचिया सामुद्रिका । न वर्णवे वेद शेषादिकां ।
ध्वजवज्रांकुश ऊर्ध्वरेखा । पायीं पद्मरेखा यवांकित ॥
चरणातळीं आरक्त शोभा । बरवंटी शुद्ध श्यामप्रभा ।
इंद्रधनुष्य मिरवे नभा । तैसी शोभा शोभत ॥

उपासकां यंत्र पूर्ण । तैसी घोंटी पैं त्रिकोण ।
दोहीं पायीं नीळवर्ण । विराजमान शोभती ॥

अहल्योद्धाराच्या कथानकांतील पुढील ओंव्या वाचनीय आहेत—

ब्रम्हा सांगे गौतमासी । इंद्र अभिलाषी अहल्येसी ।
तरी तुम्ही अहर्निशी । अति यत्नेंसी राखावी ॥
गौतम तपें तेजोराशि । अहल्या आणिली आश्रमासी ।
इंद्र कष्टतां वर्षानुवर्षीं । अहल्या त्यासी अप्राप्त ॥
पूर्ण खग्रासें सूर्यग्रहण । अहल्येसहित गंगास्नान ।
करावया गौतम आपण । अति सावधान इंद्रार्थीं ॥
जालें ग्रहण विधिविधान । अहल्या करोनि मुक्तिस्नान ।
आश्रमा आली आपण । द्विजभोजनपाकार्थ ॥
गौतम स्वधर्मसंपन्न । करावया राहिला दानतर्पण ।
ते संधि साधोनि पूर्ण । इंद्र आपण संचरला ॥
गौतमाच्या स्वरूपस्थिति । इंद्र आला अहल्येप्रती ।
तिसी नेवोनि एकांतीं । सवेग रति स्वयें मागे ॥
ते म्हणे नवलगति । दिवसा कैंवी मागां रति ।
आजि पर्वकाळ.पितृतिथि । काम सर्वार्थीं निषिद्ध ॥
भलतैसें पतीचें वचन । पाळिती पतिव्रता पूर्ण ।
पतिवचनालागीं दूषण । अधःपतन तें स्त्रियेसी ॥
पतीच्या वचनार्था । अनुसरावें सर्वथा ।
हे मर्यादा वेदशास्त्रार्था । दोष सर्वथा देखों नये ॥
पतिवाक्या दोषदर्शन । देखे तिसी अधःपतन ।
आतां तूं जाहलीस सज्ञान । पतिवचन न मानिसी ॥
जें जें माझें विरुद्धाचरण । तें तें आपुलेनि तपें मी आपण ।
तत्काळ करीन निर्दळण । येथें तुज कोण संदेह ॥
संकोचली स्वधर्मता । कांहीं न बोलवे सर्वथा ।
मग जावोनियां एकांता । रत्यर्था अनुसरली ॥
इंद्र अहल्या सेजेवरी । तंव गौतम आला बाहेरी ।
परपुरुष रतली नारी । जाणोनि द्वारीं गुप्त राहे ॥

अहल्या म्हणे एकांतवासीं । घेवोनि भ्रताररूपासी।
तू कोण येथें आलासी । कपटें भोगिसी परदारा ॥
अहल्यें इंद्र धरिला हातीं । घेवोनि भ्रताररूपाची बुंथी।
तूं कोण पापमूर्ति । छळोनि रति मागितली ॥
तो म्हणे मी अमरपति । येरी म्हणे पूर्ण जाली रति ।
आतां तूं जाईं शीघ्रगती । दोघांची उपहति ऋषि करील ॥
मर मर पापिष्ठा चांडाळा । नाहीं पापाचा कंटाळा ।
विटाळविलें दोहीं कुळां । दुष्टा दुःशीळा नीघ वेगीं ॥
जळो तुझें महिमान । निंद्य कर्म काळें वदन ।
येथोनि शीघ्र करीं गमन । देखिल्या दहन ऋषि करील ॥
जो देवांचा देवाधिपति । तो तूं परदारकामासक्ति ।
अचुक गेलासी अधोगती । निंद्या मागुतीं मुख न दाखवीं ॥
लाजा इंद्र निघे बाहेरी । तंव गौतम देखिला द्वारीं ।
भयें कांपोनि जिव्हारीं । इंद्र गोपाकारीं पळों गेला ॥
तंव गौतमें खुंटविली गति । जावों न शके निजशक्ति ।
अद्यापि इंद्रगोपाप्रती । शीघ्र गति असेना ॥
जेणें करिसी परदाररमण । ते झडती तुझे वृषण ।
परभगीं आसक्त मन । भगें सर्वांगीं संपूर्ण होतीं ॥
इंद्र शापिला यापरी । गौतम पाहे भीतरीं ।
तंव अहल्या वस्त्रें सांवरी । म्हणे दुराचारीं रमलीस केंवी ॥
स्मृति वेदांत वेदोक्ति । धीर धरूं न शके सती ।
परपुरुषें प्रार्थिल्या एकांतीं । पतिरूपोक्ति छळिलें मज ॥
तुमचिया स्वरूपस्थिती । तेणें मज मागितली रति ।
मी रमलें या तुम्हांप्रती । कपट निश्चितीं मी नेणें ॥
तुमचिया वचनार्था । ना न म्हणवे तत्वता ।
याच्या कपटाची वार्ता । मी सर्वथा जाणेना ॥
स्वामीच्या वचना उल्लंघन । तेंचि मज अधःपतन ।
येणें भयें मी आपण । स्वधर्माचरण विचरलें ॥
इंद्र अहल्या एकांतवार्ता । गौतमें ऐकिल्या निज गुप्ता ।
तेंचि सांगतसे तत्वता । तूं निजकामार्था रमलीसी ॥

संभोगीं परपुरुष जाणतां । जरी तूं उठतीस हाणोनि लाथा ।
तरी मी मानतों पतिव्रता । तूं पूर्णकामता रमलीसी ॥
ओळखोनि परपुरुषता । तूं बोलिलीसी भोग भोगितां ।
तुझी जाली पूर्णकामता । ऋषि न येतां तूं जाय ॥
जाणोनि परपुरुषाचें ज्ञान । भोगीं कंटाळेना तुझें मन ।
ते तूं होसी पाषाण । शिळा जाण जडत्वें ॥
परपुरुषीं कामाचा सोहळा । ते तूं होसी महाशिळा ।
तुज कोणी न देखे डोळां । भूतें विटाळा मानिती तुझ्या ॥
वृक्ष फुला फळा न येती । छायेसि नव्हे विश्रांति ।
आश्रमीं प्राणी न वसती । पापोपहति भोगिसी ॥
येरी बोलली आपण । पतिभ्रमें लागलें दूषण ।
स्वामीनें कृपा करावी पूर्ण । शापमोचन वदावें ॥
ऐकोनि तिचें दीन वचन । कृपेनें कळवळला संपूर्ण ।
म्हणे लागल्या श्रीरामचरण । तैं तूं जाण उद्धरसी ॥
जंव भेटती रामचरण । तंव करावें रामस्मरण ।
रामनामापरतें आन । प्रायश्चित्त जाण असेना ॥
रामनामाची आवृत्ति । जळती पापांचिया पंक्ति ।
शिळारूपें तुझी लोपेल मति । तरी राम चित्तीं न विसंबें ॥
ऋषि पाठिमोरा जाला । तंव अहल्या जाली शिळा ।
आश्रम पावला अवकळा । प्राणी तत्काळ पळाले ॥
शाप देवोनि कोपदृष्टि । गौतमें सांडिली पर्णकुटी ।
सवेंचि अनुताप जाला पोटीं।म्हणे क्रोधें उठाउठी जिंकिलें मज॥
अहल्या इंद्र अतिप्रीती । सुखभोग भोगितां एकांतीं ।
तेव्हां कां नुपजे शांति । स्त्रीकामनावृत्ति नाडिलें क्रोधें ॥
रतिसंभोग एकांतवासीं । इंद्र असतां अहल्येपाशीं ।
अनुद्वेगें त्यागोनि त्यासी । मीं कां तापसी न वचेंचि ॥
सर्वांतरात्मा भोक्ता एक । ऐसा जाणता जो मी एक ।
त्या मज इंद्रसंभोगाचें दुःख । ज्ञानेसीं विवेक गिळिला क्रोधें॥

भावार्थ रामायण हा ग्रंथ फारच मोठा असल्यामुळें, त्यांतील कवितांचे कितीही वेंचे दिले तरी त्यावरून समग्र ग्रंथाच्या सौरस्याची यथार्थ कल्पना होणें कठीण आहे, म्हणून, ज्याला सवड असेल त्यानें तो समग्र ग्रंथ एकवार अवश्य वाचावा अशी शिफारस करून, नाथमहाराजांचा दुसरा सुप्रसिद्ध ग्रंथ 'रुक्मिणीस्वयंवर' याजकडे वळतों.

**रुक्मिणीस्वयंवर**—नाथांचा 'रुक्मिणीस्वयंवर' हा ग्रंथही महाराष्ट्रांत फार लोकप्रिय असून, गुरुचरित्राप्रमाणें, कांहीं लोक त्याचें नित्य पारायणहि करितात. रुक्मिणीस्वयंवराच्या कथानकावर, चित्रकवि विठ्ठल, सामराज व वीरेश्वर या कवींनीं श्लोकबद्ध रचना केली आहे, परंतु एकनाथी रुक्मिणीस्वयंवराइतकी लोकप्रियता त्यांच्या ग्रंथांस प्राप्त झाली नाहीं. रुक्मिणीस्वयंवराच्या रचनेविषयीं अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे कीं, नाथांच्या घरीं श्रीखंड्या नांव धारण करून श्रीकृष्णांनीं बारा वर्षें वास्तव्य केलें. पुढें द्वारका येथें श्रीकृष्णप्राप्तिस्तव खडतर तप करणाऱ्या एका गृहस्थास असा दृष्टांत झाला कीं, "तूं पैठण येथें एकनाथाच्या घरीं जा. तेथें श्रीखंड्या नांवानें मी वास्तव्य करीत आहें." त्याप्रमाणें, पैठणास नाथांच्या घरीं येऊन श्रीखंड्यारूपी भगवंताचें त्यानें दर्शन घेतलें. आपलें खरें स्वरूप व्यक्त झाल्यामुळें, नाथांची आज्ञा घेऊन भगवान् अंतर्धान पावणार, इतक्यांत नाथ त्यांस म्हणाले, 'तुमचें लग्न करून द्यावें अशी माझी फार इच्छा होती. पण ती आतां अपूर्ण राहणार." भगवंतानीं सांगितलें, "तुह्मास वाईट वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. भागवतांत रुक्मिणीस्वयंवराची कथा आहे, तिजवर तुम्ही प्राकृत ग्रंथरचना करा म्हणजे माझ्या विवाहाचें श्रेय तुम्हांस मिळेल." "आज्ञा" म्हणून नाथांनीं आपला रुक्मिणीस्वयंवर ग्रंथ लिहिला.

हा ग्रंथ लक्ष्यपूर्वक वाचला असतां एक गोष्ट तात्काळ ध्यानांत येते ती ही कीं, ग्रंथ लिहीत असतांना कवीचें वर्ण्यविषयाशीं अगदीं पूर्ण तादात्म्य झालें होतें. एखादा मोठा लग्नसमारंभ पार पाडण्याची जबाबदारी शिरावर घेतलेला मनुष्य, ज्याप्रमाणें, समारंभांतील बारीकसारीक गोष्टींवरदेखील सारखी नजर ठेवतो त्याप्रमाणें नाथांनीं रुक्मिणीस्वयंवरांतील प्रत्येक गोष्ट अगदीं मनोभावेंकरून रंगविली आहे. आपलें सर्व काव्यकौशल, सगळी प्रतिभा, सगळी वर्णनशैली, आणि सगळें भाषाप्रभुत्व हीं नाथांनीं या रुक्मिणीस्वयंवरांत मुक्तहस्तानें ओतलेलीं दिसतात. आणि, असला ग्रंथ रचतांना नाथांसारख्या प्रेमळ कवीच्या वाणीस असें विलक्षण

स्फुरण यावें हेंही साहजिकच होय. प्रत्यक्ष श्रीकृष्णासारखा सर्वगुणसंपन्न वर आणि आदिमाया रुक्मिणीसारखी त्रैलोक्यसुंदरी वधू, तेव्हां त्यांच्या लग्नसमारंभाचें वर्णन करतांना नाथांसारख्या कृष्णभक्ताचें हृदय आनंदोर्मीनीं उचंबळून आल्याशिवाय कसें राहील ? आणि यामुळें, मूळ भागवतांतल्या रुक्मिणीस्वयंवरकथेचा नाथांनीं आपल्या ग्रंथांत पुष्कळच विस्तार केलेला आहे. 'हरिवरदा' ग्रंथाचे कर्ते कृष्णदयार्णव यांनीं नाथांचें रुक्मिणीस्वयंवर आपल्या 'हरिवरदा' ग्रंथांत उद्धृत केलें असल्याचा उल्लेख पूर्वी केलाच आहे. एका मोठ्या कवीनें दुसऱ्या एका मोठ्या कवीचा समग्र ग्रंथ आपल्या ग्रंथांत समाविष्ट केल्याचें असलें उदाहरण, महाराष्ट्र वाङ्मयांत दुसरें क्वचितच सांपडेल असें मला वाटतें. हरिवरदा ग्रंथाच्या उत्तरार्धांत रुक्मिणीस्वयंवरकथावर्णनप्रसंगीं कृष्णदयार्णव म्हणतातः—

**दशमस्कंध वाखाणिता । प्रसंगें रुक्मिणीस्वयंवरकथा ।**
**उपावली ते वर्णू जातां । धिंवसा चित्ता नुपलभे ॥**

कारण काय तर श्रीएकनाथांनीं लिहिलेलें रुक्मिणीस्वयंवर फार उत्तम आहे व तसें आपणास लिहितां येणार नाहीं. असें म्हणून कृष्णदयार्णवांनीं नाथांचें रुक्मिणीस्वयंवर बहुतेक जशाचें तसें उतरून घेतलें आहे. आरंभीं नाथांचें अल्प चरित्र देऊन, कृष्णदयार्णव म्हणतातः—

**ऐसा महिमा अगाध ज्यांचा । तिहीं रुक्मिणीस्वयंवर वाचा ।**
**वाखाणिलें त्या ग्रंथाचा । विचित्र महिमा जग जाणे ॥**

तर अशा या सुप्रसिद्ध व सर्वोत्कृष्ट ग्रंथांतला, प्रसिद्ध रुक्मिणीपत्रिकेचा एकच उतारा येथें देतोंः—

**ऐकें त्रैलोक्यसुंदरा । सकळ सौंदर्यवैरागरा ।**
**तुझेनि सौंदर्यें सुरनरां । सुंदरत्व वर्णिजे ॥**
**तुझी सुधाकार कीर्ति । श्रवणें श्रवणां प्रकाशती ।**
**त्रिविध ताप अस्त पावती । जेवीं गभस्ती खद्योत ॥**
**ऐशियाची स्वरूपप्राप्ति । चारी मुक्ति दासी होती ।**
**सकळ स्वार्थ पायां लागती । जे देखती त्यां निजलाभ ॥**
**क्षय नाहीं गा निश्चित । यालागीं नामें तूं अच्युत ।**
**तुझिया ठायीं निर्लज्ज चित्त । अतिसुरत कृष्णसुखा ॥**

मनविश्रांतीचा निजबोधु । म्हणवूनि नामें तूं मुकुंदु ।
सकळ सुखाचा आनंदकंदु । तुज कोण वधू वरीना ॥
कुळशीळ धन रूप । विद्या वयसा अतिस्वरूप ।
शांति कांति तेज अमूप । करिती तप तुजलागीं ॥
ऐशी लावण्यगुणसंपत्ति । धीरवती आणि सती ।
त्याही तुजसमान वरा न पावती । तेथें मी किती वराक ॥
ऐकें नरवीरपंचानना । प्राप्त काळीं पाणिग्रहणा ।
तुज कोण वरीना अंगना । मनमोहना श्रीकृष्णा ॥
म्हणसी मी सोयरा अतिकाळा । कां बोलाविसी विवाहमेळा ।
तरी पाणिग्रहण जी शिशुपाळा । तो काळ अतिकाळा मजलागीं ॥
ते काळीं त्वां नुपेक्षावें । हेंचि मागें जिवें भावें ।
मज दीनातें उद्धरावें । धांवें पावें लग्नासी ॥
मनें वाचा काया । निर्धारेंसी तुझी जाया ।
मी झालेंसें यदुराया । विधि विवाह तुवां कीजे ॥
तूं तंव पर गा प्रकृति । नावडे स्त्रियांची संगति ।
उपेक्षिसी माझी विनंति । थोर अपकीर्ति तुज तेव्हां ॥
मी तंव तुझें अर्धांग । केविं शिशुपाळ शिवेल माझें अंग ।
तूं शिरावरी असतां श्रीरंग । मी वीरभाग यदुवीरा ॥
कृष्णकेसरीची संपत्ति । चैद्यजंबुक जैं गा नेती ।
कमळनयना कमळापति । थोर अपकीर्ति तुज तेव्हां ॥
तरीच साधेल हें लग्न । जरी म्यां केलें असेल भगवद्भजन ।
ब्रह्मभावें ब्राह्मणपूजन । देवतार्चन हरीचें ॥
इष्ट जे कां यागादिक । वापी कूप आराम देख ।
गोभूरत्नदानादिक । त्याहून अधिक अन्नदान ॥
व्रत जें कां एकादशी । पूजाविधान जागरणेंशीं ।
ब्राह्मणभोजन द्वादशी । भगवंतासी वल्लभ ॥
सकळ धर्मांचा पैं धर्म । गुरु तोचि परब्रह्म ।
ऐसा केला असेल नेम । तरी पुरुषोत्तम मज पावो ॥
व्रत तप यज्ञ दान । त्याहून अधिक हरीचें ध्यान ।
निमिषामाजी समाधान । अमना मन होऊनि ठाके ॥

ऐसेनि साधनें साधिला बोधु। तरी गद जयाचा धाकुटा बंधु।
वेगीं येऊनि गोविंदु। पाणिग्रहण मज करो ॥
परादि वाचा नाहीं सौरस। यालागिं नामें तूं परेश।
भीमकीलिखितें हृषीकेश। तटस्थ होऊनि पैं ठेला ॥
मज कृष्णें नेलिया पाठीं। मागें शिशुपाळाचिया पाठीं।
बैसेल अवकळा गोमटी। दोघां गांठी एकचि ॥
पत्रिका पहावी सावधान। विलंब न करावा व्यवधान।
प्रातःकाळीं आहे लग्न। ऐशिया समयीं पावावें ॥
देखोनि लिखिताची तांतडी। एकला येऊनि घालिशी उडी।
तेव्हां मज म्हणशील कुडी। बुद्धि धडफुडी ऐकावी ॥
तुझिया निजबोधाची सेना। प्रत्यावृत्ति पाहोनि नयना।
स्वानुभवाचेनि भारें जाणा। सावधान होऊनि यावें ॥
स्वरूपतेचिया मदगजा। गुढार घालावें जी वोजा।
प्राणापान जिणती पैजा। तैसे वारू पालाणीं ॥
जिणोनि जाती मनोरथ। तैसे संजोगावे रथ।
चक्रवाटातळीं पर्वत। पीठ होती कर्माचे ॥
तुझिया निजबोधाचे गाढे। द्वैत जिणोनी वेगाढे।
तेचि याद्व करूनी पुढें। सबळबळेंशीं त्वां यावें ॥
बाह्यदृष्टी जरी तूं येशी। तरी तर्क पडेल लोकांसी।
कळों नेदितां दुजियासी। गुप्त रूपेंशीं प्रगटावें ॥
कृष्णासी शिकविते बुद्धि। म्हणाल चतुर तूं अनादि।
हृदयशून्य कृष्ण त्रिशुद्धि। वर्तणें बुद्धि माझेनी ॥

रुक्मिणीपत्रिकेवरील टीकेच्या अशा एकंदर ६३ ओंव्या आहेत, त्यांतल्या फक्त ३३ ओंव्या येथें दिल्या आहेत. रुक्मिणीस्वयंवर म्हणजे प्रकृतिपुरुषाचें लग्न व हा लग्नसमारंभ नाथांनीं आपल्या शब्दसाहित्यानें फार उत्तम प्रकारें साजरा केला आहे. शस्त्रास्त्रांचे खणखणाट, वाद्यांचा गजर, मिरवणुकीचा थाट, मानपानाच्या कटकटी, पक्वान्नाचा घमघमाट, दागदागिन्यांचा आणि भरजरी वस्त्रांचा चकचकाट वगैरे गडबडींत हरिभजनाचें विस्मरण नाथांस झालेलें नाहीं हें वरील उताऱ्यांतील

**‘ व्रत तप यज्ञ दान । त्याहून अधिक हरीचें ध्यान ।**
**निमिषामाजी समाधान । अमना मन होऊनि ठाके ॥**

या ओंवीवरून वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलेंच असेल. नाथांच्या या रुक्मिणी-स्वयंवराशीं तुलना करण्यासारखा दुसरा एकच ग्रंथ मराठींत आहे, तो **वे**णाबाईकृत **सीता**स्वयंवर होय.

**आनंदलहरी** या प्रकरणाच्या १५४ ओंव्या असून, त्यांत सद्गुरुकृपेनें प्राप्त झालेल्या ब्रह्मानंदाचें वर्णन आहे. **स्वात्मसुख** ( ओंव्या ५११ ), **हस्तामलक** ( ओव्या ६७४ ), **शुकाष्टक** ( ४५८ ) हीं सर्व प्रकरणें अध्यात्मपर आहेत. ह्या चारी प्रकरणांतील नाथांच्या ओव्या, त्यांच्या भागवती ओव्यांहून आटोपशीर आहेत. **प्रल्हादविजय** या नांवाचें, नाथकृत एक प्रकरण असल्याचा उल्लेख मागें केला आहे. कै तुकाराम तात्या यांनीं प्रसिद्ध केलेल्या एकनाथी गाथ्यांत ‘ नृसिंहजन्म ’ या नांवाचें एक प्रकरण छापलेलें असून तें ओंव्या व अभंग या दोन वृत्तांत आहे. प्रत्येक अध्यायाचे किंवा कडव्याचे शेवटीं ‘ इति श्रीप्रल्हादचरित्र ’ असें म्हटलें आहे. तेव्हां ‘ प्रल्हादविजय ’ ग्रंथ तो हाच असावा असें म्हणण्यास आतां हरकत नाहीं. याच प्रल्हादचरित्रांत चिलयाचेंही चरित्र नाथांनीं प्रल्हादमुखानें वदविलें आहे. या प्रकरणांत करुणरस अगदीं ओतप्रोत भरून राहिलेला असून, क्वचित् प्रसंगीं रौद्र व भयानक या रसांचीही छटा उमटलेली आहे.

चिलयाचें शिर उखळांत घालून कांडीत असतांना त्याची माता चांगुणा गीत म्हणते:—

**मजहुनी वेगळा । केउता जासी बाळा ।**
**निजीं निज कळवळा । मीच जाणें ॥**
**अतीत आधीं जेऊ । मग मी देइन जीऊ ।**
**साक्ष सदाशिवु । तुज मज ॥**
**चिल्लो माझा वाणिया । भरीं भाव केणिया ।**
**जातसे पेणिया । ब्रह्म सांते ॥**
**तुझिये संगती । होइल माझी गती ।**
**म्हणोनि काकुळती । येत असें ॥**
**तूं सांडुनियां जीव । होसी सदाशिव ।**
**तुझा निजभाव । कळला मज ॥**

तुजवीण सर्वथा । केवीं राहूं आतां ।
तुझ्या निजपंथा । दावीं मज ॥
तुझिया निजपंथीं । निजभावो सांगाती ।
सहाय उमापति । सदाशिव ॥
शिव शिव म्हणतां । देह होय विदेही ।
जिणें मरणें नाहीं । निजभक्तासी ॥
जेंवी जळावेगळी । तळमळी मासोळी ।
तेंवी तुजवेगळी । पुत्रराया ॥
तुज मज भेटी । होइल वा वैकुंठीं ।
जीवींच्या गुह्य गोष्टी । सांगेन तुज ॥

प्रऱ्हादानें राजसभेंत जाऊन हरिभजनानें सगळी राजसभा जेव्हां दणाणून टाकली तेव्हां हिरण्यकशिपूच्या अंगाचा अगदीं तिळपापड झालाः—

प्रऱ्हाद राजसभे आंतु । निःशंक हरिनाम गर्जतु ।
राजा जाला विस्मितु । नाहीं भीतु कळिकाळा ॥
प्रऱ्हादाच्या कीर्तनें । तुटलीं कर्माकर्मबंधनें ।
जप तप ध्यानें । लाजियेलीं ॥
यमलोकु पडला रे ओसु । तिळाइतका न मिळे दोषु ।
यमलोकीं घेतला त्रासु । कासाविसु विधि वाद ॥
येथुनी जावें वैकुंठासी । वैकुंठ आलें तयापाशीं ।
वैकुंठींचा हृषीकेशी । भक्तांपाशीं डुल्लतु ॥
सांडूनियां शेषशयन । तेथें पातला नारायण ।
देखोनि हरिनामकीर्तन । त्रिनयन नाचतु ॥
हरुषें करितां हरिकीर्तन । चहूं वेदां पडिलें मौन ।
शास्त्रें बुझावलीं पूर्ण । बाणली खूण मतिवादा ॥
दैत्यपुत्रही सकळ । जाले हरिभक्त केवळ ।
वाजविती टाळघोळ । अतिविव्हळ हरिप्रेमें ॥
नयनीं आनंद अश्रुधारा । रोमांचित ते स्वेद वरा ।
हरुषें कांपती थरथरां । अभ्यंतरा हरि आला ॥
हृदयीं न संडे स्वानंदु । कंठीं बाष्प अंगीं स्पंदु ।
असुरपुत्रासी आल्हादु । परमानंदु दैत्यांसी ॥

**निवडी विकल्पाचे भेद । छेदी अविद्येचे कंद ।**
**भक्त प्रल्हादा अगाध । निजानंद कीर्तनीं ॥**
**प्राण पांगुळला जेथिचा तेथें । राजसभा जी तटस्थ ।**
**लोकपाळही समस्त । द्रविताचित्त ते जाले ॥**

तेव्हां हिरण्यकशिपूनें काय केलें ?

**अतिकोपें कांपतु । दांत करकरा पैं खातु ।**
**यासी घाला रे अग्निआंतु । धरा समस्त अतिवेगें ॥**

परंतु ज्यानें भगवन्नामस्मरणाची अभेद्य ढाल आपल्या हातांत घेतली होती त्या प्रऱ्हादास अग्नि जाळूं शकला नाहीं, पाणी बुडवूं शकलें नाहीं आणि विषदेखील निर्विघ्न होऊन बसलें ! नाथ म्हणतातः—

**हरीचे पवाडे । गर्जे वाडेकोडें ।**
**हरिभक्तांपुढें । मरण कैंचें ॥**
**हरिप्रेमसुखें । हरिभक्त लाडिके ।**
**त्यासी काय दुःखें । बाधिजेल ॥**
**हरिनाम निधडे । यमु काळु पायां पडे ।**
**हरिभक्ता चहुंकडे । हरि रक्षी ॥**

नाथांच्या मुख्य मुख्य ग्रंथांचें अल्प निरीक्षण येथवर झालें. आतां आपण त्यांच्या स्फुट कवितेकडे वळूं. निरनिराळ्या प्रकाशकांनीं प्रसिद्ध केलेल्या ‘ एकनाथी गाथ्यांत ’ नाथांची बहुतेक सगळी स्फुट कविता प्रकाशित झालेली आहे. ‘ बहुतेक सगळी ’ म्हणण्याचें कारण, गाथ्यांत ज्यांचा समावेश झालेला नाहीं, अशीं कांहीं पद्यें कोठें कोठें आढळतात व ऐकूं येतात. नाथ कीर्तन करीत असत हें त्यांच्या चरित्रावरून सिद्ध झालेंच आहे. त्यामुळें त्यांचीं बहुतेक पदें कीर्तनप्रसंगीं उपयोगांत आणण्याकरितांच रचलीं गेलीं असलीं पाहिजेत, असें त्या पदांच्या स्वरूपावरून दिसतें. उदाहरणार्थ “ आहा रे दैवा काय हें करविसी । मातेच्या हस्तें बाळ मारविसी ” हें पद्य प्रऱ्हादाख्यानांत म्हणण्यासाठींच मुद्दाम रचलेलें आहे. त्याचप्रमाणें, ‘ मजला वरिल सुभद्रा काय । कोणि तरि सांगा हो ’ हें हरिदास लोकांच्या तोंडून जोगी रागांत अद्याप ऐकूं येणारें पद्य, नाथांनीं, सुभद्राहरणाच्या आख्यानांत म्हणण्यासाठींच मुद्दाम रचलें असलें पाहिजे. आणखी एक पुढील पद पहाः—

**क्षुधित वनीं गोविंद । अहो बाई क्षुधित वनीं गोविंद ॥ ध्रु० ॥**
**रवितनयेतटीं शिशुसह साग्रज । चारितो गोधनवृंद ॥ १ ॥**
**यज्ञपतिप्रिय भोजन वांच्छित । नेणति द्विजवर मंद ॥ २ ॥**
**ऋषिपत्न्या तुम्हि प्रेमळ सात्विक । तोषवा आजि मुकुंद ॥ ३ ॥**
**एका जनार्दनीं अन्न समर्पुनि । पावति परमानंद ॥ ४ ॥**

हें पद्य ऋषिपत्न्याख्यानांत हरिदास लोक अद्याप म्हणतात. अशीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील. 'तें मन निष्ठुर कां केलें' हें गोड पद्यही याच नमुन्याचें आहे. असो.

'झालि संध्या संदेह माझा गेला', 'मन रामीं रंगलें अवघें मनचि राम झालें' वगैरे पद्यें नाथांच्या पारमार्थिक मनःस्थितीचीं निदर्शक आहेत. नाथांच्या आरत्या तर प्रसिद्धच आहेत. 'ओवाळूं आरति मदनगोपाळा' 'संत सनकादिक भक्त मिळाले अनेक' व 'त्रिगुणात्मक त्रैमूर्ति दत्त हा जाणा' ह्या लोकप्रिय आरत्या महाराष्ट्रांत गणेशचतुर्थीच्या वेळीं व इतर उत्सवप्रसंगीं मोठ्या प्रेमानें गायिल्या जातात. नाथमहाराजांचे अभंगही पुष्कळ आहेत व त्यांतील कांहीं अभंगांवरून, धार्मिक बाबतींत त्यांचीं काय मतें होतीं हें उघड दिसतें. कांहीं अभंगांत, मूर्तिपूजा व नवस यांचा त्यांनीं निषेध केला आहे. आतां नमुन्यासाठीं नाथांचीं थोडींशीं निवडक पदें व अभंग येथें उतरून घेतों.

### पद १.

**ऐक ऐक सखयेबाई । नवल मी सांगूं काई ।**
**त्रैलोक्याचा धणी तो हा यशोदेसी म्हणतो आई ॥ ध्रु० ॥**
**देवकीनें वाहिला । यशोदेनें पाळिला ।**
**पांडवांचा बंदीजन होउनियां राहिला ॥ १ ॥**
**ब्रह्मांडाची सांठवण । योगीयांचें निजधन ।**
**चोरी केली म्हणऊनि उखळासी बंधन ॥ २ ॥**
**सकळ तीर्थें ज्याचे चरणीं । दुर्लभ हा चक्रपाणि ।**
**राधिकेसी म्हणतो तुझी करीन मी वेणीफणी ॥ ३ ॥**
**शरण एका जनार्दनीं । कैवल्याचा मोक्षदानी ।**
**गाई गोप गोपीबाळा मेळविले आपुलेपणीं ॥ ४ ॥**

२

झाली संध्या संदेह माझा गेला ।
आत्माराम हृदय शेजे* आला ॥ ध्रु० ॥
गुरुकृपा निर्मळ भागीरथी ।
शांति क्षमा यमुना सरस्वती ॥
असिपदीं एकत्र जेथ होती ।
स्वानुभव स्नान हे गुप्तस्थिति ॥ १ ॥
सद्बुद्धीचें घातलें शुद्धासन ।
वरी दया सद्गुरूची कृपा पूर्ण ।
शमदम अंगीं विभूति चर्चिली जाण ।
मुखीं उच्चारी केशव नारायण ॥ २ ॥
बोधपुत्र निर्माण झाला जेव्हां ।
ममता म्हातारी मरोनि गेली तेव्हां ।
भक्ति बहीण धांवोनि आली गांवा ।
आतां संध्या करूं मी कैंचि केव्हां ॥ ३ ॥
सहज कर्म तीं झालीं कृष्णार्पण ।
ऐसें ऐकतां निवती साधुजन ।
जन नव्हे अवघाचि जनार्दन ।
एका जनार्दनीं बाणली हेचि खूण ॥ ४ ॥

३

मन रामीं रंगलें अवघें मनचि राम झालें ।
सबाह्य अभ्यंतरीं अवघें रामरूप कोंदलें ॥ ध्रु० ॥
आत्मया रामाचें ध्यान लागलें मज कैसें ।
क्रिया कर्म धर्म अवघें तेणेंचि प्रकाशे ।
सत्य मिथ्या प्रकृति पुरुष रामचि अवघा भासे ॥ १ ॥
चित्तचि हरपलें अवघें चैतन्य जाहलें ।
देखतां देखतां अवघें विश्व मावळलें ।
पाहतां पाहतेपणा हरिला सर्वस्वें ठकाविलें ॥ २ ॥

---

* ‘ हृदयीं प्रकाशला ’ असाही पाठ आहे.

भक्तिज्ञान वैराग्य लाधे आत्मस्थिति ।
निर्धारितां न कळे रामरूपीं जडली प्रीति ।
एका जनार्दनीं अवघा रामचि आदी अंतीं ॥ ३ ॥

४

धांव रे धांव आतां । दीनवत्सला रामा ॥
संसारसंगें दोषी नित्य गुंतलों कामा ॥ ध्रु० ॥
तारुण्य अभिमान । देहीं भरला ताठा ॥
वैभव संपत्तीचा । देहीं फुटला फांटा ॥ १ ॥
विषय सेवितां हे । वय वेंचलें माझें ॥
स्वहित आठवेना । ध्यान चुकलें तुझें ॥ २ ॥
विषय मोकलोनी । शरण तुज मी आलों ॥
एका जनार्दनीं । दास तुझा मी झालों ॥ ३ ॥

नाथांनीं कांहीं पदें हिंदी भाषेंतही केलीं आहेत. नमुना पहा—

५

गुरुकृपांजन पायो मेरे भाई ।
रामबिना कछु जानत नाहीं ॥ ध्रु० ॥
अंदर राम बाहिर राम ।
जहां देखों वहां पूरनकाम ॥ १ ॥
जागत राम सोवत राम ।
सपनेमे देखे राजाहि राम ॥ २ ॥
एका जनार्दनीं अनुभव नीका ।
जहां देखों वहां राम सरीखा ॥ ३ ॥

नाथांचे अभंगही पुष्कळ आहेत; पण ते नामदेव तुकारामाच्या अभंगांइतके प्रसिद्ध नाहींत. त्यांतले फक्त दहा अभंग येथें देतों:—

१ संतवचनें देव जोडे । सायुज्यमुक्ति पायां पडे ।
संतवचनीं सांकडें । नुरेचि कांहीं ॥ १ ॥
धन्य धन्य संतसंग । उभा तेथें श्रीरंग ।
लक्ष्मीसहित अभंग । तिष्ठे सदां ॥ २ ॥

संतवचनें कर्म झडे । संतवचनें मोक्ष जोडे ।
संतवचनीं तीर्थ घडे । धन्य संग संतांचा ॥ ३ ॥
संतवचनें तुटे उपाधि । संतवचनें सरे आधिव्याधि ।
संतवचनें भवनदी । प्राणी तरती ॥ ४ ॥
संतवचनीं धरा भाव । तेणें सर्व निरसे भव ।
एका जनार्दनीं देव । प्रत्यक्ष भेटे ॥ ५ ॥

२ विठ्ठल हृदयकमळींचा आमोद ।
तो सेवितां जीव झाला षट्पद ॥ १ ॥
कांहीं केलिया निवडितां न निवडे ।
जीवीं जीव विगुंतला वाडेंकोडें ॥ २ ॥
लवणाची करूनियां घागरी ।
भरुनि काढितां विराली ते सागरीं ॥ ३ ॥
एका एक गेलिया नुरे कांहीं ।
एका जनार्दन देह विदेही ॥ ४ ॥

३ जेथें जावें तेथें देवचि सांगातें ।
ऐसें केलें नाथें पंढरीच्या ॥ १ ॥
अंतरीं बाहेरी एकमय झालें ।
अवघें कोंदाटलें परब्रह्म ॥ २ ॥
शब्द तेथ झाला समूळचि वाव ।
गेला देहभाव हारपोनी ॥ ३ ॥
एका जनार्दनीं ऐसी झाली वृत्ति ।
वृत्तीची निवृत्ति चिदानंदीं ॥ ४ ॥

नाथांच्या ओवीबद्ध ग्रंथांत पंढरीच्या विठोबाचा उल्लेख कोठेंही आढळत नाहीं, परंतु पांडुरंगावर व पंढरपुरावर त्यांचे बरेच अभंग आहेत. नाथ पंढरीचे वारकरी होते व अद्याप त्यांची पालखी पैठणहून पंढरीस दरवर्षी नियमानें जात असते.

४ माझ्या वडिलांचें दैवत । कृपाळू हा पंढरिनाथ ॥ १ ॥
पंढरीसी जाऊं चला । भेटूं रखुमाई विठ्ठला ॥ २ ॥

पुंडलीकें बरवें केलें । कैसें भक्तीनें गोविलें ॥ ३ ॥
एका जनार्दनीं नीट । पायीं जडलीसे वीट ॥ ४ ॥

५ जन्मांतर सुखें घेऊं । श्रीविठ्ठलनाम आठवूं ॥ १ ॥
नाहीं त्याचें आम्हां कोडें । विठ्ठल उभा मागें पुढें ॥ २ ॥
कळिकाळाचें भय तें किती । पाय यमधर्म वंदिती ॥ ३ ॥
एका जनार्दनीं सिद्धि । नामें तुटती उपाधि ॥ ४ ॥

## नाममहिमा

६ नाम जपे सर्व काळ । त्यासि भयभीत काळ ॥ १ ॥
लीन ज्याची वृत्ति । त्याच्या दासी चारी मुक्ति ॥ २ ॥
रामनामीं जिव्हा रंगे । तोचि परब्रह्म अंगें ॥ ३ ॥
म्हणे एका जनार्दनीं । राम दिसे जनीं वनीं ॥ ४ ॥

७ आनंदें करोनि संसारीं असावें ।
नाम आठवावें श्रीरामाचें ॥ १ ॥
नामाचिया योगें संसार तो चांग ।
येरव्हीं तें अंग व्यर्थ जाय ॥ २ ॥
ऋषि मुनि सिद्ध संत महानुभाव ।
रामनामें भव सुखें केला ॥ ३ ॥
नामें होय सुख नामें निरसे दुःख ।
रामनाम एक हृदयीं धरा ॥ ४ ॥
एका जनार्दनीं नामाचा आठव ।
सुखदुःख भाव दुराविला ॥ ५ ॥

८ सकळ साधनांचें फळ । रामनामचि केवळ ॥ १ ॥
जप तप अनुष्ठान । अंतीं नामाचें प्रमाण ॥ २ ॥
नाना मंत्र यंत्रावळी । सोडवीना अंतकाळीं ॥ ३ ॥
महापातकी पतित । नामें तरले असंख्यात ॥ ४ ॥
नाम साराचें हें सार । एका जनार्दनीं निर्धार ॥ ५ ॥

## अनेकदेवतानिषेध

९ कलिमाजी दैवतें उघड दिसती फार।
नारळ आणि शेंदुर यांचा भडिमार ॥ १ ॥
लटिका देव लटिका भक्त लटिकें सर्व वाव।
सात धान्याचे धपाटे मागती काय त्यांचा बडिवार ॥ २ ॥
तेल रांधा मागती मलिदा वरती काजळ कुंकूं।
फजितखोर ऐसे देव तयांचे तोंडावर थुंकूं ॥ ३ ॥
एका जनार्दनीं सर्व भावें सोपा पंढरिराव।
तया सांडोनि कोण पुसे या देवांची कायसी माव ॥ ४ ॥

१० म्हणती देव मोठे मोठे। पूजिताति दगड गोटे ॥ १ ॥
कष्ट नेणती भोगिती। वहा दगडातें म्हणती ॥ २ ॥
जीत जीवा करूनि वध। दगडा दाविती नैवेद्य ॥ ३ ॥
रांडा पोरें मेळ जाला। एक म्हणती देव आला ॥ ४ ॥
नाक घांसुनी गव्हार। देवा म्हणती गुन्हेगार ॥ ५ ॥
एका जनार्दनीं म्हणे। जन भुलले मूर्खपणें ॥ ६ ॥

अशा प्रकारचा स्पष्टवादीपणा नाथांनीं आपल्या कवितेंत अनेक स्थळीं दाखविला आहे. मूर्तिपूजा, हिंसा, कर्मठपणाचें ढोंग इत्यादिकांवर अत्यंत कडक शब्दांनीं त्यांनीं जो ताशेरा झाडला आहे तो पाहिला ह्मणजे त्यांच्या धार्मिक व सामाजिक मतांचें सहज आकलन होतें.

नाथांचें संस्कृत ग्रंथावलोकन फार मोठें होतें. भारत, वाल्मीकिरामायण, भागवत इत्यादि प्रमुख संस्कृत ग्रंथ तर त्यांनीं वाचलेच होत, परंतु प्रसन्नराघव नाटक, ब्रम्होत्तरखंड, शिवरामायण, पंचतंत्र, हितोपदेश, उन्मत्तराघव नाटक इत्यादि अनेक प्राचीन व अर्वाचीन ग्रंथही त्यांनीं लक्ष्यपूर्वक वाचले होत असें, त्या त्या ग्रंथांतील जे श्लोक आणि सुभाषितें आपल्या भावार्थ रामायणांत त्यांनीं उद्धृत केलीं आहेत, त्यांवरून स्पष्ट दिसतें.

वर निर्दिष्ट केलेल्या नाथांच्या कवितेशिवाय 'भारूड' या नांवानें त्यांनीं जी स्फुट कविता लिहिली आहे तिचाही उल्लेख येथें केला पाहिजे. हें 'एकनाथी भारूड' वरेंच

विस्तृत आहे. हमामा, कोल्हाटी, यलमा, भांड, थाक, कबूलपत्र, झाडणी, अर्जदास्त, अभयपत्र, सौरी वगैरे अनेक प्रकार या भारुडाचे आहेत. ही बहुतेक कविता उपरोधात्मक आहे. एकनाथांचा समाधिशक शोधकांनीं शके १५२१ हा दिला आहे परंतु या एकनाथी भारुडांत एक गद्य अभयपत्र आहे, त्याच्या आरंभीं " स्वस्ति श्रीनृप शालिवाहन शके १५२५ आषाढ वद्य ५ गुरुवासरे " असा कालनिर्देश आहे. ज्या दिवशीं नाथांनीं हें अभयपत्र लिहिलें त्याच दिवसाचा जर हा उल्लेख असेल तर शके १५२१ च्या पुढें–शके १५२५ च्या आषाढांत–नाथ विद्यमान होते असें म्हणणें भाग पडेल; कारण शके १५२१ त समाधिस्थ झालेला मनुष्य आपल्या कवितारचनेचा काल शके १५२५ हा देईल ही गोष्ट बिलकुल संभवनीय नाहीं. तरी संशोधकांनीं या मुद्द्याचा अवश्य विचार करावा.

मंगळवेढ्याचे ठाणेदार दामाजीपंत यांची रसद श्रीपांडुरंगानें विठू महाराच्या रूपानें बादशहाकडे नेऊन पोंचविली अशी कथा आज सुमारें तीनशें वर्षें महाराष्ट्रांत प्रसिद्ध असून, महीपतींसारख्या संतचरित्रकारांनींही ती आपल्या ग्रंथांत नमूद केलेली आहे. परंतु इतिहाससंशोधक रा. राजवाडे यांनीं आतां एका जुन्या कागदाच्या आधारानें असा शोध लावला आहे कीं, दामाजीपंतासाठीं पांडुरंगानें विठू महाराचें सोंग घेतलें ही गोष्ट खोटी असून, मंगळवेढें येथें त्या वेळीं विठू या नांवाचा एक श्रीमंत महार खरोखरच होता व त्यानें बादशहास पैसे भरून दामाजीपंतास सोडविलें ! परंतु सव्वातीनशें वर्षांपूर्वीं होऊन गेलेल्या नाथमहाराजांची साक्ष रा. राजवाडे यांच्या या नवीन शोधाच्या अगदीं विरुद्ध आहे. दामाजीपंतांनीं बादशाही धान्याचें कोठार लुटविलें त्या वेळीं महाराष्ट्रांत मोठा दुष्काळ पडला होता व तो दुर्गादेवीचा किंवा दुर्गाडीचा दुष्काळ या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे. हा दुष्काळ शालिवाहन शकाच्या चौदाव्या शतकाच्या अखेरीस ( इ. स. १३९६ ) पडला होता. त्यानंतर सुमारें शें सव्वाशें वर्षांनीं नाथमहाराजांचा जन्म झाला. अर्थात् त्यांच्या कालीं दामाजीपंतांची गोष्ट लोकांच्या स्मरणांत अगदीं ताजी असली पाहिजे. ' जोहार ' या नांवाचीं कांहीं पद्यें नाथांनीं रचिलीं आहेत, त्यांपैकीं एका पद्यांत ते म्हणतात:—

**जोहार मायबाप जोहार । मी दामाजीचा लेकवळा महार ॥ माझें नांव विठू साचार । सारा झाड फेडीचा कारभार । मी करतों कीं जी मायबाप ॥ १ ॥ मंगळवेढें**

ठाणें जाण। दामाजीस ठेविलें कारभारी नेमून गांवचा वसूल सारा करून। मज नफरा पाठविलें कीं० ॥ २ ॥ जोहार जी जोहार। मी लेंकवळा विठू महार। दामाजीचा मजवर प्यार। आहे कीं० ॥ ३ ॥ दुष्काळ पडला जाणोन। शिलक पेवें दामाजीनें विकून। चिठ्ठी पैका घेउनि जाण। आलों कीं जी० ॥ ४ ॥ दामाजी परम स्नेहाळु। त्यांचा मज कळवळु। चिठ्ठी घेउनि उतावेळु। आलों जवळ कीं जी० ॥ ५ ॥ जादा वसूल खतावणी। जमा करा वसूल घेउनी। बाकी शून्य घालुनी। जाब द्यावा कीं जी मायबाप ॥ ६ ॥ वसूल सारा मेळवा। मज लेंकवळ्या जाब द्यावा। पै बाकी न ठेवा। दामाजीकडे कीं जी० ॥ ७ ॥ मी विठुनाक महार। राहतों पंढरी निरंतर। पहावया आपुलें नगर। येथवर आलों कीं जी ॥ ८ ॥ पैका पोंचल्याची रसद। लेहुन द्यावी त्वरित। मी जातों जी हतनं कीं० ॥ ९ ॥ म्हणोनि केला जोहार। निघाला विठुनाक महार। इकडे दामाजीचा विचार। ऐका कीं जी० ॥ १० ॥ प्यादे येउनि जाण। दामाजीस धरिती येऊन। बेदरा नेती लगबगें करून। तों नवल जालें कीं जी० ॥ ११ ॥ स्नान करूनि जाण। दामाजी बैसला देवतार्चन। नित्यनेम वाचितां जाण। रसद आंत देखिली कीं जी० ॥१२॥ रसद पाहतां ते वेळीं। बादशहाची मुद्रा देखिली। विठू महारासवें रसद पाठविली। बाकी शून्य जाली कीं जी० ॥ १३ ॥ एका जनार्दनीं केला जोहार। मोडिला अविद्येचा थार। स्थापुनियां चराचर। भजनीं सादर असावें कीं जी मायबाप ॥ १४ ॥

दामाजीपंतांचें चरित्र आजवर जसें प्रसिद्ध होतें व हल्लीं आहे तसेंच तें नाथांनीं वरील पद्यांत वर्णिलें आहे. आतां रा. राजवाडे म्हणतात कीं हें चरित्र बनावट

आहे. यावर आमचा प्रश्न येवढाच आहे कीं दामाजीपंतांच्या[१] कालापासून हा कालपावेतों म्हणजे आज सुमारें ४०० वर्षें ही बनावट गोष्ट सगळ्या महाराष्ट्रानें—एकनाथ, ब्रह्मगिरी, महीपति इत्यादि सत्पुरुषांनीं देखील—खरी कशी मानली ? अस्तु. नाथ महाराजांस मराठीप्रमाणेंच उर्दु व हिंदी या भाषाही चांगल्या अवगत होत्या हें त्या भाषांतील त्यांच्या कवितेवरून सिद्ध होतें. त्यांच्या भारुडासारख्या स्फुट कवितें-तही उर्दू शब्दांचा भरणा बराच आहे, परंतु भागवत रामायणासारख्या त्यांच्या मोठ्या व प्रसिद्ध ग्रंथांत उर्दू शब्द फारसे सांपडत नाहींत, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे.

पदें, अभंग, भारूड. इत्यादि स्फुट कवितांप्रमाणें नाथमहाराजांनीं अनेक आरत्या व भूपाळ्याही रचिल्या आहेत. नाथचरित्रांत त्यांच्या ज्या उद्धव नामक शिष्याचा उल्लेख आला आहे, त्याचे वंशज नाशिकच्या बाजूस राहत असून, त्यांच्या संग्रहीं नाथांची बरीच कविता आहे असें समजतें. एकनाथी भारुडांपैकीं कांहीं पद्यें नमुन्यादाखल येथें देतों. या भारुडांत, गौळणी, जोहार, हमामा, पिंगा, विटी दांडू, एकीबेकी, जोगवा, चेंडूफळी, फुगडी, हुतुतू, अर्जदास्त, पिंगळा, भोंवरा, खेळिया, वगैरे अनेक प्रकार असल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे.

## जोहार.

**जोहार मायबाप जोहार। मी तो एकनाथ महार। लहानसा महाराचा पोर। माझे बोलण्याचा विचार। दुसरा नाहीं कीं जी मायबाप ॥ १ ॥ माझ्या बोला ऐकिजे। मोठेमोठे उमराव राजे। तुह्मीच कां जिवाजी न जाणतां। वेव्हेस संदेह धरितां कीं जी मायबाप ॥ २ ॥ चैतन्य चावडीचा पहारा। कीं मी मिराशी महार। जेव्हां नव्हता गांवाचा आवार। मज ओळख नाहीं कीं जी मायबाप ॥ ३ ॥ कायापुरचा अचाट पाया। यमाजी जाले बेहयां। त्यापुढें पाहती पळाया। मनाजीसंगें मिळाले खाया। परि नाहीं वाट कीं जी मायबाप ॥ ४ ॥**

१ "हर हर विठ्ठल जगदुद्धार। जाहला महार मजसाठीं॥" असें खुद्द दामाजीपंतांचें-हीएक पद प्रसिद्ध आहे.

दहा गुरें बाहेर दिसती । पांच गुरें अंतरिं असती । इतुकीं आवरीं अवचितीं । नाहीं तरी खोडां पडसी कीं जी मायबाप ॥ ५ ॥ बारा जणें फुगावितिल गाल । शेवटीं तुह्मीच बांधिले जाल । तुमचे होतील बेहाल । तेव्हां तुह्मास कोण सोडवील कीं जी मायबाप ॥ ६ ॥ सारे कडेचे पोहणारे । दहा आणि पांच पोरें । एकनाथ करितो जोहार । अक्कल धरा कीं जी मायबाप ॥ ७ ॥

## जोशी.

येथून पुढें वरें होईल । भक्तिसुखें दोंद वाढेल ।
फेरा चौऱ्याशींचा चुकेल । धन मोकाशी ॥ १ ॥
मी आलों रायाचा जोशी । होरा ऐका दादानों ॥ ध्रु० ॥
मनाजी पाटिल देहगांवचा । विश्वास नका धरूं त्याचा ।
घात करील नेमाचा । पाडिल फांशीं ॥ २ ॥
वासना बायको शेजारिण । झगडा करिल मोठी दारुण ।
तिच्या पायीं नागवण । घर बुडविसी ॥ ३ ॥
एका जनार्दन कंगाल जोशी । होरा सांगतो लोकांसी ।
जा शरण सद्गुरुसी । फेरा चुकवावा चौऱ्याशीं ॥ ४ ॥

## एडका.

एडका मदन । तो केवळ पंचानन ॥ ध्रु० ॥
धडक मारिली शंकरा । केला ब्रम्हयाचा मातेरा ।
इंद्र चंद्रा धाक दरारा । लाविला जेणें ॥ तो केवळ० ॥ १ ॥
धडक मारिली नारदा । केला रावणाचा चेंदा ।
दुर्योधना मारिली गदा । घेतला प्राण ॥ २ ॥
भस्मासुर मुकला प्राणासी । तीच गति झाली वाळिसी ।
तिसरा विश्वामित्र ऋषि । नाडिला ज्याणें ॥ ३ ॥
शुकदेवानें ध्यान धरूनि । एडका आणिला आकळोनी ।
एका जनार्दनाचे चरणीं । लाविला ज्याणें ॥ ४ ॥

## भूत.

भूत जबर मोठें ग बाई । झालि झडपण करूं गत काई ॥ १ ॥
सूप चाटुचे केले देवऋषि । या भुतानें धरिलें केशीं ॥ २ ॥
लिंबू नारळ कोंबडा उतारा । या भुतानें धरिला थारा ॥ ३ ॥
भूत लागलें नारदाला । साठ पोरें झालीं त्याला ॥ ४ ॥
भूत लागलें ध्रुवबाळाला । उभा अरण्यांत ठेला ॥ ५ ॥
एका जनार्दनीं भूत । सर्वां ठायीं सदोदित ॥ ६ ॥

## जोगवा.

अनादि निर्गुण प्रगटली भवानी । मोह महिषासुरमर्दनालागुनी ।
त्रिविध तापाची करावया झाडणी । भक्तांलागीं तूं पावसी निर्वाणीं॥१
आईचा जोगवा जोगवा मागेन । द्वैत सारुनी माळ मी घालिन ।
हातीं बोधाचा झेंडा मी घेईन । भेदरहित वारीसी जाईन ॥ २ ॥
नवविध भक्तीच्या मांडुनी नवरात्रा । करूनि पोटीं मागेन ज्ञानपुत्रा ।
धरीन सद्भाव अंतरींच्या मित्रा । दंभ सासुऱ्या सोडीन कुपात्रा ॥३॥
पूर्ण बोधाची घेईन परडी । आशा तृष्णेच्या पाडीन दरडी ।
मनोविकार करीन कुर्वंडी । अद्‌भुत रसाची भरीन दुरडी ॥ ४ ॥
ऐसा जोगवा मागुनी ठेविला । जाउनि महाद्वारीं नवस फेडिला ।
एकीं एकपणें जनार्दन देखिला । जन्ममरणाचा फेरा चुकविला ॥ ५ ॥

हें भारुड म्हणजे नाथांच्या काव्यमंदिरांतलें एक मोठें सुंदर दालन आहे व तें येवढें मोठें आहे कीं तें सगळें लक्ष्यपूर्वक पाहण्यास कित्येक दिवस त्यांत फिरावें लागेल. नाथांचें ' गीतासार ' या नांवाचें त्यांचें एक प्रकरण भारत–इतिहास संशोधक मंडळानें प्रसिद्ध केलेल्या ' महाराष्ट्रीय सारस्वत, ग्रंथ तिसरा ' यांत आलें आहे. त्याच्या ओंव्या ४५० आहेत. शेवटच्या कविनिर्देशावरून हें प्रकरण नाथांचेंच आहे, याविषयीं संदेह नाहीं. या शेवटच्या ओंव्या पुढीलप्रमाणें:–

ऐसें बोलिले श्रीकृष्णनाथ । तेणें सुखिया जाला पार्थ ।
तें गीतासार निजमथितार्थ । बोलिला व्यास मुनि ॥
ते प्रसादें गुरूचेनि । मी बोलिलों माऱ्हाटी वाणी ।
प्रीती पावो चक्रपाणी । एका जनार्दनीं निजबोध ॥

ऐसा गीतासार संपूर्ण । एका जनार्दनीं निजध्यान ।
वाणी महाष्ट्र केलें कथन । परब्रह्म ब्रह्मज्ञान पैं ॥
लिंगदेहाची ग्रंथी भेदुनी । जनार्दनुचि प्रगटला जनीं वनीं ।
एका शरण जनार्दनीं । अनुसधानीं लागुनियां ॥

ज्या मूळ हस्तलिखित प्रतीवरून भारत–इतिहास–संशोधक मंडळानें हें प्रकरण छापलें त्या प्रतींतलीं सगळीं अशुद्धें संपादकांनीं जशाचीं तशीं कायम ठेवलीं आहेत !

रुक्मिणीस्वयंवराची कथा नाथांची फार आवडती असावी असें वाटतें, कारण, ओंवीबद्ध रुक्मिणीस्वयंवराशिवाय, एक लहानसें अभंगात्मक रुक्मिणीस्वयंवरही त्यानीं लिहिलेलें आहे, त्यांतला शेवटचा अभंग येथें देतोः—

अष्टभाव गुढिया उभवूनि अंगें ।
वार्तिकार वेगें सांगों आले ॥
सुख सांगती दूत परम अद्भुत ।
रुक्मिणी अच्युत घेउनि आला ॥
काम जरासंध निजघायेंसी त्रासिला ।
सक्रोध रुक्मिया कृष्णें विटंबिला ॥
अहंकार शिशुपाळ नाडिला ।
हरि हातींची नोवरी घेउनि गेला ॥
अहं दमघोष अपमानला पळे ।
यापरी परसैन्य त्रासिलें गोपाळें ॥
एका जनार्दनीं एकल्या धाडी ।
परापर नोवरी श्रीकृष्ण काढी ॥

अग्निहोत्र आणि सोमयाग यांजवर नाथांनीं कसा भयंकर ताशेरा झाडला आहे पहाः—

भजन चालिलें उफराटें । कोण जाणे खरें खोटें ॥
अग्निहोत्राचा सुकाळ । वडापिंपळासी काळ ॥
तीन्ही देव पिंपळांत । अग्निहोत्रीं केला घात ॥
म्हणती सोमयाग करा । मुख धरूनि मेंढा मारा ॥
शेंदूर माखुनियां धोंडा । चाळविती पोरें रांडा ॥
एका जनार्दनीं नेम । सर्वां ठायीं पुरुषोत्तम ॥

सर्व भूतांच्या ठायीं परमेश्वराचें अस्तित्व एकदां मानल्यावर यज्ञयागाच्या निमित्तानें केलेला पशुवध देखील हिंसेच्याच सदरांत येणार हें उघड असतां, आमच्यांतले जे कांहीं विद्वान् शास्त्री आणि सोमयागी यज्ञांतील मेषवधाची अद्याप तरफदारी करीत आहेत, त्यांनीं, वेदधर्मावर पूर्ण निष्ठा ठेवणारा एकनाथासारखा थोर सत्पुरुष या विषयासंबंधानें काय म्हणत आहे, याचा अवश्य विचार करावा.

ब्राम्हणाचें कर्तव्यकर्म नाथांनीं पुढील अभंगांत सांगितलें आहे:—

**ब्राम्हणा स्वधर्म नित्य नैमित्तिक । व्हावें उपासक वेदालागीं ॥**
**स्नान संध्या वंदन हेंचि नित्यकर्म । तैसेंचि हें वर्म पितृतृप्ति ॥**
**ब्रम्हयज्ञ आणि अग्नीची ते पूजा । तेणें अधोक्षजा पाविजेती ॥**
**अतिथि आलिया तया अन्नदान । करावें तर्पण द्रव्ययोगें ॥**
**भूतदया गाई पशूंतें पाळावें । मुखीं उच्चारावें रामनाम ॥**
**एका जनार्दनीं हेंचि नित्य कर्म । तेणें परब्रम्ह हाता चढे ॥**

भक्तिपूर्वक हरिनामस्मरण करण्यांत काळ घालविणाऱ्या मनुष्याची योग्यता, तुलनात्मक रीतीनें, एका अभंगांत नाथमहाराजांनीं वर्णिली आहे. हें कोष्टक मोठें गमतीचें वाटल्यावरून तें येथें देत आहें:—खेडेगावांतल्या सहस्र ब्राह्मणांस भोजन दिल्यानें जें पुण्य लाभतें तेंचे पुण्य, पुण्यक्षेत्रांतल्या एका ब्राह्मणास भोजन दिल्यानें मिळतें—

१००० गांवढे ब्राह्मण=१ क्षेत्रस्थ ब्राह्मण.
१००० क्षेत्रस्थ ब्राह्मण=१ वेदपाठक.
१००० वेदपाठक=१ पंडित.
१००० पंडित=१ संन्यासी.
१००० संन्यासी=१ परमहंस.
१००० परमहंस=१ तत्त्ववेत्ता.
असंख्य तत्त्ववेत्ते=१ नामधारक.

'गंगागौरीचें भांडण' या नांवाचें नाथकृत एक प्रकरण आहे त्यांतील विनोद फार बहारीचा आहे. गौरी गंगेस म्हणते—

**अगे तुजमाजी खळाळ । तेणें तूं गर्जसी सबळ ।**
**शिवं सोसिजे खळखळ । माझें कपाळ उठिलें ॥**

गंगा उत्तर देतेः—

माझे लागतां खळाळ । तरले सुरनर सकळ ।
तुझेंचि कठीण कपाळ । उद्वेषें छळ करितेसी ॥

त्या दोघींचा हा कलह नारदमुनींनीं लावून दिला होता व जसजसें त्यांचें भांडण विकोपास जाऊन त्या एकमेकींची वर्मे काढूं लागल्या तसतसें नारद-मुनीचें हांसता हांसता पोट दुखूं लागलें. त्यांतल्या त्यांत आनंदाची गोष्ट येवढीच कीं, या भांडणाचा शेवट फार गोड झालाः—

ऐकतां गंगेचें वचन । गिरिजे चालिलें स्फुंदन ।
धावुनि दिधलें आलिंगन । समाधान पैं झालें ॥
ते वेळीं मीनलें मना मन । उपनिषदां पडिलें मौन ।
देखणें ठेलें भिन्नाभिन्न । शिवचैतन्य अनुभवीं ॥
शिव तो निजरूप सकळ । गंगा चिच्छक्ति निर्मळ ।
येरी अविद्या चपळ । नारदु केवळ निजबोधु ॥

बालक्रीडेवर नाथांचे पुष्कळ अभंग असून, त्यांतील कांहीं अभंगांचीं कडवीं २०० हून अधिक आहेत. श्रीकृष्णाच्या बाललीलांचें वर्णन या अभंगांत फार सुंदर रीतीनें केलें आहे. त्यांतला एकच गोड अभंग येथें देतोंः—

भिंगाचें भिंगुलें खांद्यावर अंगुलें । नाचत तान्हुलें यशोदेचें ॥
येती गवळणी करिती बुझावणी । लागती चरणीं कान्होबाच्या ॥
गोविंद बाळिया वाजविती टाळिया । आमुचा कान्हया देवराव ॥
कडदोरा बिंदलीं वाघनखें साजिरीं । नाचत श्रीहरी यशोदेचा ॥
पायीं घागरिया वांकया साजरिया । कानींच्या बाळिया ढाळ देती ॥
एका जनार्दनीं एकत्वें शरण । जीवें निंबलोण उतरिती ॥

चिरंजीवपद या नांवाचें एक एकनाथी प्रकरण आहे, त्यांत साधकाला नाथांनीं केलेला उपदेश फारच महत्त्वाचा आहे. या प्रकरणाचा कोणताही भाग गाळण्या-सारखा नसल्यामुळें, तें समग्रच येथें उतरून घेतोंः—

## चिरंजीव पद.

( ओंव्या. )

चिरंजीवपद पावावयासी । अधिकार कैसा साधकासी ।
किंचित् बोलूं निश्चय निश्चयेंसी । कळावयासी साधकां ॥ १ ॥
येथें मुख्य पाहिजे अनुताप । त्या अनुतापाचें कैसें रूप ।
नित्य मरण जाणे समीप । न मनी अल्प देहसुख ॥ २ ॥
म्हणे नरदेह किमर्थ निर्मिला । तो मी विषयस्वार्थीं लाविला ।
थिता परमार्थ हातिंचा गेला । करी वहिला विचार हा ॥ ३ ॥
ऐसा अनुताप नित्य वाहतां । तंव वैराग्य ये तयाच्या हाता ।
त्या वैराग्याची कथा । ऐक आतां सांगेन ॥ ४ ॥
तें वैराग्य बहुतां परी । आहे आहे गा अवधारीं ।
सात्विक राजस तामस त्रिप्रकारीं । योगीश्वरीं बोलिजे ॥ ५ ॥
नाहीं वेदविधि आचार । नेणे सत्कर्म साचार ।
कर्मधर्मीं भ्रष्टाकार । तो अपवित्र तामस ॥ ६ ॥
त्याग केला पूज्यते कारणें । सत्संग सोडूनि पूजा घेणें ।
शिष्यममता धरोनि राहणें । तें जाणणें राजस ॥ ७ ॥
हें वैराग्य राजस तामस । तें नमनेच संतांस ।
त्यास न भेटे कृष्ण परेश । अनर्थास मूळ तें ॥ ८ ॥
आतां वैराग्य शुद्ध सात्विक । जें मी जगद्वंद्य मानी यदुनायक ।
तें तूं साविस्तर ऐक । मनीं निष्टंक बैसावया ॥ ९ ॥
भोगेच्छा विषयिक । ते तो सांडी सकळिक ।
प्रारब्धें प्राप्त होतां देख । तेथोनि निष्टंक मन काढी ॥ १० ॥
कां जे विषय पांच आहेती । ते अवश्य साधकां नाडिती ।
म्हणोनि लागों नेदी प्रीति । कवण रीती ऐक पां ॥ ११ ॥
जेणें धरिला शुद्ध परमार्थ । त्यासी जनमान हा अनर्थ ।
तेणें वाढे विषयस्वार्थ । ऐक नेमस्त विचार हा ॥ १२ ॥
विरागी पुरुष देखोनी । त्याची स्तुति करिती जनीं ।
एक सन्मानें करोनी । पूजेलागोनि पैं नेती ॥ १३ ॥

त्यांचें वैराग्य कोमळ कंटक । नेट न धरीच निष्टंक ।
देखोनि मान स्तुति अलौलिक । भुलला देख पैं तेथें ॥ १४ ॥
जनस्तुति लागे मधुर । म्हणती उद्धरावया हा हरीचा अवतार ।
आम्हालागीं जाहला स्थिर । तेणें तो धरी फार शब्दगोडी १५
हा पांच विषयांमाजी प्रथम । शब्द विषय संभ्रम ।
मग स्पर्श विषय सुगम । उपक्रम तो ऐसा ॥ १६ ॥
नाना मृदु आसनें घालिती । विचित्र पर्यंक निद्रेप्रती ।
नरनारी शुश्रूषा करिती । तेणें धरी प्रीति स्पर्शाची ॥ १७ ॥
रूप विषय कैसा गोंवी । वस्त्रें भूषणें देती बरवीं ।
तेणें सौंदर्य करी जीवीं । देहभावीं श्लाघ्यता ॥ १८ ॥
रूप विषय ऐसा जडला । रस विषय कैसा झोंबला ।
जें जें आवडे तयाला । त्या त्या पदार्थाला अर्पिती ॥ १९ ॥
ते रसगोडीकारितां । घडी न विसंबे धरी ममता ।
मग गंध विषय ओढिता । होय तत्त्वतां त्या कैसा ॥ २० ॥
आवडे सुमन चंदन । बुका केशरविलेपन ।
ऐसे पांचही विषय जाण । जडले संपूर्ण सन्मानें ॥ २१ ॥
मग जे जे जन वंदिती । तेचि त्याची निंदा करिती ।
परि अनुताप नुपजे चित्तीं । ममता निश्चिती पूजकांची ॥ २२ ॥
म्हणाल विवेकी जो आहे । त्यासी जनमान करील काये ।
हें बोलणें मूर्खांचें पाहें । तया चाड आहे मानाची ॥ २३ ॥
ज्ञात्यासी प्रारब्धगति । मान झाला तरी नेघों न म्हणती ।
परि तेथेंचि गुंतोनि न राहती । उदास होती तात्काळ ॥ २४ ॥
यापरी साधकाच्या चित्ता । मानगोडी न संडे सर्वथा ।
जरी कृपा उपजेल भगवंता । तरीच मागुता होय विरक्त ॥२५॥
तो विरक्त कैसा म्हणाल । जो मानलें सांडी स्थळ ।
सत्संगीं राहे निश्चळ । न करी तळमळ मानाची ॥ २६ ॥
मांडीना स्वतंत्र फड । म्हणे अंगा येईल अहंता वाड ।
धरूनि जीविकेचि चाड । न बोले गोड मनधरणी ॥ २७ ॥

नावडे प्रपंच जनीं बैसणें । नावडे कोणासी बोलणें ।
नावडे योग्यता मिरवणें । वरवें खाणें नावडे ॥ २८ ॥
नावडे लौकीक परवडी । नावडती लेणीं लुगडीं ।
नावडे परान्नगोडी । द्रव्यजोडी नावडे ॥ २९ ॥
नावडे स्त्रियांत बैसणें । नावडे स्त्रियांचें पाहणें ।
नावडे स्त्रियांचें रगडणें । त्यांचें बोलणें नावडे ॥ ३० ॥
नको नको स्त्रियांचा सांगात । नको नको स्त्रियांचा एकांत ।
नको नको स्त्रियांचा परमार्थ । करिती आघात पुरुषासी ॥ ३१ ॥
म्हणसी गृहस्थ साधकें । स्त्री सांडोन जावें कें ।
येच अर्थी उत्तर निक । ऐक आतां सांगेन ॥ ३२ ॥
स्वस्त्रियेवांचोनी । नातळावी अन्य कामिनी ।
कोणे स्त्रियेसी सन्निध वाणी । आश्रयो क्षणीं न द्यावा ॥ ३३ ॥
स्वस्त्रीसही कार्यापुरतें । पाचारावें स्पर्शावें निरुतें ।
परी आसक्त होऊनियां तेथें । सर्वथा चित्त नसावें ॥ ३४ ॥
नरनारी शुश्रूषा करिती । भक्ति ममता उपजविती ।
परी शुद्ध जो परमार्थी । तो स्त्रियांचे संगती न बैसे ॥ ३५ ॥
अखंड एकांतीं बैसणें । प्रमदासंगें न राहणें ।
जो निःसंग निरभिमानें । त्या पैं बैसणें सर्वदा ॥ ३६ ॥
कुटुंब आहारांकारणें । अकल्पित न मिळे तरी कोरान्न करणें ।
ऐसे स्थिती जें वर्तणें । तें जाणणें शुद्ध वैराग्य ॥ ३७ ॥
ऐसी स्थिति नाहीं ज्यासी । तंव कृष्णप्राप्ति कैंची त्यासी ।
यालागीं कृष्णभक्तांसी । ऐसी स्थिति असावी ॥ ३८ ॥
या स्थितीवेगळा जाण । कृष्णीं मिळूं पाहे तो अज्ञान ।
तो सकळ मूर्खांचें अधिष्ठान । लटिकें तरी आण देवाची ॥ ३९ ॥
हें बोलणें माझिये मतीचें । नव्हे नव्हेचि गा साचें ।
कृष्णें सांगितलें उद्धवा हिताचें । तें मी साचें बोलिलों ॥ ४० ॥
साच न मानी ज्याचें मन । तो विकल्पें न पवे कृष्णचरण ।
माझें काय जाईल जाण । मी तों बोलोन उतराई ॥ ४१ ॥
साधावया वैराग्य ज्ञान । मनुष्यदेहीं करावा प्रयत्न ।
सांगे एका जनार्दन । आणीक यत्न असेना ॥ ४२ ॥

**भावार्थ**—नाथ म्हणतात, " चिरंजीवपदाची प्राप्ति करून घेण्यासाठीं साधकानें काय केलें पाहिजे हें मी थोडक्यांत सांगतों. पहिल्यानें, अनुताप उत्पन्न झाला पाहिजे; मृत्यु केव्हां उडी घालील याचा नेम नाहीं असें जाणून देहविषयक सुखलालसा निःशेष सोडली पाहिजे. देवानें हा उत्कृष्ट नरदेह मला दिला असतां विषयसेवनाकडे मी त्याचा दुरुपयोग केला आणि हातचा परमार्थ घालवून बसलों, या विचारानें पश्चात्ताप होतांच वैराग्य प्राप्त होतें. या वैराग्याचे तीन प्रकार आहेत; तामस, राजस आणि सात्विक. वेदविधि, आचारविचार, सत्कर्म यांचा त्याग करून, भ्रष्टाकार करणें हें अपवित्र तामस वैराग्य होय. लोकांनीं आपल्या नादीं लागून आपली पूजा करावी या हेतूनें, सत्संग सोडून, बाह्यतः संसाराचा त्याग करणें, लोकांकडून पूजा करून घेणें व शिष्यलोभ धारण करणें हें राजस वैराग्य होय. हीं दोन्ही वैराग्यें कृष्णप्राप्तीस तर प्रतिकूल आहेतच, पण उलट आणखी अनर्थकारक आहेत. आतां सात्विक वैराग्याचें लक्षण सांगतों. सात्विक वैराग्यशील मनुष्य सर्व प्रकारच्या वैषयिक भोगेच्छेचा त्याग करितो व प्रारब्धयोगानें विषयप्राप्ति कदाचित् झालीच तर तेथेंच लिप्त होऊन रहात नाहीं. शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे जे पंचविषय आहेत ते परमार्थास विघ्नकारक असल्यामुळें साधकानें त्यांचा त्याग केला पाहिजे. हे पंचविषय साधकाच्या मार्गांत कसे अडथळे आणतात पहा. एखादा वैराग्यशील मनुष्य पाहिला म्हणजे लोक त्याची स्तुति करितात व कांहीं लोक त्याची पूजा करण्यासाठीं सन्मानपूर्वक त्याला आपल्या घरीं नेतात. त्याचें वैराग्य जर कोंवळें असेल तर असल्या स्तुतीच्या आणि मानसन्मानाच्या ठिकाणीं तो तात्काल लुब्ध होतो. लोक तरी बेटे काय कमी आहेत ? " हा प्रत्यक्ष ईश्वराचा अवतार, आमच्या उद्धारासाठीं हा या ठिकाणीं राहिला आहे " अशा प्रकारच्या स्तुतिस्तोत्रांचा त्याजवर मारा करितात व या गोड शब्दांस तो बिचारा भाळतो आणि त्याच स्थितींत आनंद मानूं लागतो. येथें शब्द विषयास तो बळी पडला. पुढें, त्याला बसावयास मृदु मृदु आसनें, निजावयास पलंग देतात आणि त्याच्या नादीं लागलेले स्त्रीपुरुष पादसंवाहनादि त्याची सेवा करितात. या स्पर्शविषयांत तो गुंतला म्हणजे सुंदर सुंदर वस्त्रें, उंची दागिने वगैरे वस्तु रूपविषयांत त्याला ओढून घेण्यास तयारच असतात. मग त्याच्या भोजनाचा थाट सुरू होतो. गोड गोड पक्कान्नें, उत्कृष्ट फळें इत्यादिकांच्या सेवनानें त्याचें जिव्हालौल्य वाढत गेल्यावर रसविषयाची आवड लागण्यास काय उशीर ? आणि शेवटीं जेव्हां, सुवासिक पुष्पमाला, चंदन, बुका,

केशर वगैरे सुगंधी पदार्थ त्याला अर्पण करण्यांत येतात तेव्हां गंधविषयांत तो पूर्णपणें गुरफटून जातो. अशा रीतीनें पंचविषयांच्या ठायीं तो पुनः लिप्त झाला म्हणजे तेच लोक त्याची निंदा करूं लागतात. परंतु, नाना प्रकारचीं सौख्यें भोगण्याची एकदां लालुच लागल्यावर, ती कांहीं एकाएकीं सुटत नाहीं आणि, तीं सौख्यें तशींच पुढें चालू रहावीं म्हणून शिष्यवर्गाच्या निंदावादाकडे तो दुर्लक्ष्य करूं लागतो. ही सामान्य मनुष्याची गोष्ट झाली. आतां ज्ञानी जो आहे, त्याला जर प्रारब्धयोगानें मानसन्मानाची आणि सुखोपभोगाची प्राप्ति झाली तर तो त्यांचा क्षणभर स्वीकार करील, पण तेथेंच गुंतून न राहतां, तावडतोब उदास वृत्ति धारण करील. तात्पर्य, साधकानें, मानसन्मानाची अपेक्षा बिलकुल करितां कामा नये, तरच त्याची पारमार्थिक प्रगति होईल आणि असें होण्यास भगवंताची कृपा पाहिजे. ही कृपा झाली म्हणजे अनुतापयोगानें, त्याची वृत्ति विरक्त होऊं लागते. मग तो कोणत्याही स्थलाची ममता धारण करीत नाहीं, मानसन्मानाची अपेक्षा करीत नाहीं आणि निश्चल मनानें सत्समागमांत राहतो. अभिमान उत्पन्न होईल या भीतीनें तो मठ किंवा संप्रदाय[1] स्थापन करीत नाहीं, आणि चरितार्थासाठीं लोकांची खुशामत करीत नाहीं. प्रापंचिक जनांत वसणें, त्यांच्याशीं बोलणें चालणें, स्वतःची योग्यता मिरवणें, चांगलें अन्न खाणें, वस्त्राभरणांचा उपयोग करणें, परान्न सेवन करणें, द्रव्यसंग्रह करणें, स्त्रियांत बसणें उठणें, स्त्रियांकडे पाहणें, स्त्रियांकडून संवाहनादि सेवा करून घेणें, त्यांच्याशीं बोलणें, स्त्रियांची संगति धरणें किंवा त्यांच्याशीं एकांत करणें वगैरे गोष्टी त्याला बिलकुल आवडत नाहींत. एखादा साधक गृहस्थ असेल तर त्यानें स्त्री सोडून कसें जावें, अशी कोणी शंका घेईल तर नाथमहाराज सांगतात, " गृहस्थ साधकानें स्वस्त्रीशिवाय अन्य स्त्रीशीं बिलकुल संबंध ठेवूं नये;[2] आणि स्वस्त्रीशींही संबंध ठेवावयाचा तो अगदीं कारणापुरताच ठेवावा, लिप्त होऊं नये. प्रमदांचें सान्निध्य सोडून अखंड एकांतांत बसावें व जो निःसंग आणि निरभिमान पुरुष असेल त्याचा समागम करावा. अयाचित वृत्तीनें कुटुंबपोषण होत असेल तर ठीकच, होत नसेल तर खुशाल कोरान्न[3] भिक्षा

१ खुद्द एकनाथ महाराजांनीं मठ-संप्रदायस्थापना केली नाहीं हें प्रसिद्धच आहे. तुकारामबुवांचाही संप्रदाय नाहीं. २ "स्वस्त्री असो कीं परस्त्री असो भुलणें हाचि अपाय." सोहिरोबा. ३ " स्वेच्छ असणें यास्तव घरघर भिक्षा मागुनि जेव. " सोहिरोबा.

मागावी. अशा प्रकारचें जें वर्तन तेंच शुद्ध वैराग्य होय. ज्याची अशी वृत्ति झाली नाहीं त्याला कृष्णप्राप्ति कधीं होणार नाहीं. अशा प्रकारची वैराग्यवृत्ति धारण न करितां जो भगवंत्प्राप्तीची अपेक्षा करील तो सर्व मूर्खांचा शिरोमणिच समजावा." नाथमहाराज म्हणततात, "हें मी आपल्या पदरचें सांगत नाहीं, तर भगवंतानें उद्धवास जें सांगितलें तेंच सांगत आहे. हें ज्याला खरें वाटणार नाहीं त्या विकल्पी मनुष्याला कृष्णचरणप्राप्ति कधीं होणार नाहीं. सांगण्याचें काम माझें होतें तें मी केलें आहे. ऐकणें न ऐकणें तुमच्याकडे आहे." साधकासाठीं थोडक्यांत नाथांनीं जो हा वैराग्यमार्ग दाखविला आहे तो मुमुक्षूंस फार उपयुक्त आहे. कारण हे अनुभवाचे बोल आहेत, आणि नुसत्या शब्दपांडित्यापेक्षां प्रत्यक्ष करून दाखविलेल्या मनुष्याच्या शब्दांचें महत्त्व केव्हांही अधिक असणार.

यज्ञहिंसेविषयीं नाथांचा अभिप्राय पूर्वी दिलाच आहे, परंतु यज्ञांत पशुहिंसेचा समावेश वेदानें कोणत्या हेतूनें केला, याचा जो खुलासा नाथमहाराजांनीं आपल्या भागवतांत केला आहे तो फारच महत्त्वाचा आहे:—

**ते मे मतमविज्ञाय परोक्षं विषयात्मकाः ॥**
**हिंसायां यदि रागः स्याद्यज्ञ एव न चोदना ॥ १९ ॥**

**टीकाः–माझ्या वेदाचा अगम्य भावो। न कळोनि गूढ अभिप्रावो।**
**तेणें सकामासी उत्साहो। स्वर्गातें पहा हो मानिती सत्य ॥**
**रोचनार्थ स्वर्ग बोले वेद। तो प्रकटार्थ मानूनि शुद्ध।**
**मग स्वर्गसाधनें विविध। कामलुब्ध आचरती ॥**
**तेथ यज्ञ हें मिष मात्र जाण। स्वयें करावया मांसभक्षण।**
**अविधि करिती पशुहनन। अतिसक्त जाण कामार्थी ॥**
**त्यांसि त्याचि पैं गा देहांती। मारिले पशु मारावया येती।**
**हातीं घेऊनि खड्ग काती। सूड घेती यमद्वारीं ॥**
**तेथ कैंचें स्वर्गसुख। अवघीं साधनें महामूर्ख।**
**पावले गा अघोर नरक। सकामें देख नाडले ॥**
**यथेष्ट करावया मांसभक्षण। स्वेच्छा जें कां पशुहनन।**
**त्यांसी वेदें केलें निर्बंधन। पशुहनन यज्ञार्थ ॥**
**तेथही अर्गळा घातली जाण। देश काळ आणि वर्तमान।**
**मंत्र तंत्र विधि विधान। धन संपूर्ण अतिशुद्ध ॥**

शक्त सज्ञान धनवंत । ऐसा कर्ता पाहिजे येथ ।
मुष्टिघातें करावया पशुघात । पडे प्रायश्चित्त मेमातां ॥
ऐशी वेदाज्ञा नाना अवघड । घातलीं प्रायश्चित्तें अति गूढ ।
सकाम जे महामूढ । ते धांवती दृढ पशुहनना ॥
ऐसें झाल्या पशुहनन । विभागा येईल कवण प्रमाण ।
तेंचि करावें भक्षण । दांतांसी जाण न लागतां ॥
विभाग भक्षितां आपण । जो करी रसस्वादन ।
त्यासिही प्रायश्चित्त जाण । हेंही निर्बंधन वेदें केलें ॥
करावें मांसभक्षण । हे वेदाज्ञा नाहीं जाण ।
त्याचें करावया निराकरण । लाविलें विधान यज्ञाचें ॥
स्वेच्छा पशु न मारावया जाण । यज्ञीं नेमिल पशुहनन ।
करावया मांसभक्षण । नेमिला प्रमाण यज्ञभाग ॥
हेंही वेदाचें बोलणें । मूर्खप्रलोभा कारणें ।
येऱ्हवीं पशुहिंसा न करणें । मांस न भक्षणें हें वेदगुह्य ॥

हिंसा विहाराह्यालब्धैः पशुभिस्वसुखेच्छया ।
यजंते देवता यज्ञैः पितृभूतपतीन्खलाः ॥ ३० ॥

न मानूनि वेदविधानासी । पशुहननीं क्रीडा ज्यांसी ।
अविधि मारूनि पशूंसी । मिरविती श्लाघेसी याज्ञिकत्व ॥
अविधी करूनि जीवहनन । तेणें पशूनें करिती यज्ञ ।
पितृ देव भूतगण । करिती यज्ञ सुखेच्छा ॥
बावडें बीज पेरिल्या शेतीं । पिकास नाडती निश्चितीं ।
शेखीं निजबीजा नागवती । राजे दंडूनि घेती करभार ॥
तैशी अविधी याज्ञिक गति । स्वर्ग स्वप्नींही न देखती ।
थित्या नरदेहा नागवती । शेखीं दुःख भोगिती यमदंडें ॥
वृथा पशूंस दुःख देती । तेणें दुःखें स्वयें दुःखी होती ।
ऐशी याज्ञिकांची गति । आश्चर्यें श्रीपति सांगत ॥

--एकनाथी भागवत, अध्याय २१ वा.

यज्ञांत हिंसा करण्यास वेदानें जी अनुज्ञा दिली आहे तिचें रहस्य इतक्या खुलासेवार रीतीनें सांगितलेलें इतरत्र क्वचितच आढळेल. एका काळीं लोक अत्यंत मांस-भक्षणलोलुप होते, त्यावेळीं हिंसेस आळा घालण्यासाठीं, वेदानें ही सोमयागाची युक्ति काढली व यज्ञांत मात्र पशुहिंसा करण्यास परवानगी दिली. परंतु या यज्ञहिंसेसही श्रुतीनें इतके निर्बंध घालून ठेवले आहेत कीं, त्यांचा सूक्ष्म रीतीनें विचार केल्यास, अहिंसा हेंच श्रुतीचें मुख्य उद्दिष्ट आहे व होतां होईल तों मनुष्यानें कोणत्याही प्रकारची हिंसा करूं नये असाच तिचा हेतु आहे हें विचारी मनुष्याच्या लक्ष्यांत आल्याशिवाय राहणार नाहीं. देश काल वर्तमान लक्ष्यांत घेऊन, सशक्त आणि धनवान् मनुष्यानें पशुयज्ञ करावा. मुष्टिघातानें पशूस बुकलून मारतांना त्यानें जर ' मेमे ' असा शब्द केला तर याज्ञिकानें प्रायश्चित्त घेतलें पाहिजे. पुढें हविर्भाग जाऊन शेष राहिलेल्या मांसाचा जो भाग ज्याच्या वांट्यास येईल तो त्यानें दांतांस न लावतां व चव न घेतां, गिळला पाहिजे. चव घेतल्यास प्रायश्चित्त घ्यावें लागेल. अशा प्रकारचे जे अनेक निर्बंध वेदानें घातले आहेत त्यांचा उद्देश यज्ञनिमित्तानेंही लोकांनीं पशुहिंसा करूं नये, हाच आहे. पण हें जें वेदरहस्य आमच्या साधुसंतांस कळतें तें आमच्या शास्त्री पंडितांस कळत नाहीं व यामुळेंच संतांचे आणि त्यांचे नेहमीं खटके उडतात असो.

# प्रकरण नववें.

## नाथांचा वंशविस्तार मुक्तेश्वर, हरिपंडित, पुंडोजी.

गिरिजाबाई सुक्षेत्र जाण । प्रथम प्रसवली कन्यारत्न ।
गोदूबाई नामाभिधान । तिजकारणें ठेविलें ॥ ३६ ॥
तिचे पाठीवर पुत्र जाहला । हरि नाम ठेविलें तयाला ।
थोर होतांचि व्रतबंध केला । पढों लागला ब्रह्मशाळे ॥ ३७ ॥
तयाचे पाठीवर कन्या पाहीं । तिचें नाम गंगाबाई ।
दिधली असे कवणे ठायीं । वृत्तांत तोही अवधारा ॥ ३८ ॥
एक चिंतोपंत नामें निर्धारीं । गृहस्थ होता प्रतिष्ठान क्षेत्रीं ।
गोदूबाई ज्येष्ठ कुमरी । तयाचे घरीं दीधली ॥ ३९ ॥
आणिक कर्नाटक देशांत । जुना सोयरा नांदे गृहस्थ ।
गंगाबाई त्याच्या पुत्रातें । देवोनि त्वरित लग्न केलें ॥ ४० ॥
गंगाबाईस पुत्र जाण । पुंडाजी त्याचें नामाभिधान ।
तोही करित विष्णुभजन । निजप्रीतीनें आपुल्या ॥ ४१ ॥

भक्तलीलामृत, अध्याय २३ वा.

वरील ओव्यांत दिलेल्या माहितीवरून स्पष्ट दिसतें कीं, नाथांस हरिपंडित या नांवाचा एक मुलगा व गोदूबाई आणि गंगाबाई या नांवाच्या दोन मुली, अशीं तीन अपत्यें होतीं. यांपैकीं हरिपंडिताची माहिती पूर्वी दिलीच आहे. नाथांची ज्येष्ठ कन्या गोदूबाई ही पैठणांतच, चिंतोपंत नामक एका गृहस्थास दिली होती. प्रसिद्ध महाराष्ट्र कवि मुक्तेश्वर हा याच गोदूबाईचा मुलगा होय. मुक्तेश्वरांची जी वंशावळ प्रसिद्ध झाली आहे ती येणेंप्रमाणें:—

१ भुजंगपंत ( गोत्र अत्री )
|
२ चिंतोपंत ( विश्वंभर गोसावी ) + गोदा ( गंगा )
|
३ मुक्तेश्वर ( प्रसिद्ध कवि )
|
४ निरंजन
|
५ अक्काण्णा गोसावी
|
६ मुक्तेश्वर ( गवई व तेरवाड ग्रामसंपादक, इ. स. १७२७ )
|
७ निरंजन ( वकवाई कन्या )

'चिंतामणि भूदेवकुमर' या शब्दांनीं मुक्तेश्वरांनीं स्वतःचा निर्देश, आपल्या कवितेंत अनेक ठिकाणीं केला आहे, त्यावरून, गोदूबाई व चिंतोपंत यांचेच चिरंजीव मुक्तेश्वर हें निश्चित मानण्यास हरकत नाहीं. मुक्तेश्वरांच्या कवितेंत 'लीलाविश्वंभर' हें नांवही अनेक ठिकाणीं आलें आहे व त्यामुळें कांहीं लेखक बुचकळ्यांत पडल्यासारखे दिसतात, परंतु मुक्तेश्वरांची जी वंशावळ वर दिली आहे, तींत, मुक्तेश्वरांचे वडील चिंतोपंत यांचें दुसरें नांव 'विश्वंभर' होतें असा स्पष्ट उल्लेख आहे व खुद्द मुक्तेश्वरांनींही आपल्या रामायणांतील "**विश्वंभर श्रीगुरुच्या प्रसादें। आनंदवाचा वदलों विनोदें**" या श्लोकार्धांत आपल्या गुरूचें नांव 'विश्वंभर' असें दिलें आहे. तेव्हां चिंतोपंत ऊर्फ विश्वंभर गोसावी हेच मुक्तेश्वरांचे वडील व गुरूही होते ही गोष्ट अगदीं सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट होत आहे. मुक्तेश्वरांचें आडनांव मुद्गल. त्यांच्या वंशजांस कोल्हापूर संस्थानांतला तेरवाड नामक गांव, कोल्हापुरचे छत्रपति संभाजी महाराज यांनीं शके १६४९ त इनाम दिला, तो त्यांजकडे अद्याप चालत आहे. हा गांव मुक्तेश्वरांचे पणतू दुसरे मुक्तेश्वर यांनीं संपादन केला. त्यांस मिळालेली सनद येणेंप्रमाणें:—

श्री.

**प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता।**
**शंभु छत्रपत्रेर्मुद्रा रामसूनोर्विराजते॥**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५४ प्लवंग नाम संवत्सरे श्रावण शुद्ध १३ सौम्यवत्सरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभु छत्रपति स्वामी याणीं राजेश्री मुक्तेश्वर गोसावी बिन्न आकाण्णा गोसावी गोत्र अत्री वास्तव्य मौजे कुरुंदवाड यांस दिल्हें इनामपत्र ऐसें जे–तुम्हीं धारूरचे मुकामीं स्वामीसन्निध येऊन विदित केलें कीं, आपण कुटुंबवत्सल आहों, योगक्षेमास कांहीं उपजीविका नाहीं. आपले पणजे राजेश्री थोरले मुक्तेश्वर गोसावी हे श्रीएकनाथ स्वामीची कन्या गंगाबाईचे पुत्र. यांचें वृंदावन मौजे तेरवाड प्रांत रायबाग येथें आहे. तेथील पूजा उत्साह, ब्राह्मण–संतर्पणाची उपजीविका होय सारिखें करण्यासी महाराज धर्मपरायण आहेत म्हणून तुम्ही विदित केलें त्यावरून मनास आणितां तुम्ही बहुत भले भगवद्भक्त गायनविद्येमध्यें अतिनिपुण, तुमचे कुटुंबाचा योगक्षेम चाले व थोरले मुक्तेश्वर गोसावी यांचा वृंदावनमहोत्सव होय ऐसें केल्यानें स्वामीस परमश्रेयस्कर पाहोन स्वामीनीं यास मौजे तेरवाड प्रांत रायबाग सुभा प्रांत कोल्हापुर हा गांव पेशजीच्या मुकाशियाकडून दूर करून इनाम कुलबाव कुलकानु हालीपट्टी व पेस्तरपट्टी जलतरुतृणपाषाणनिधिनिक्षेपसहित खेरीज इनामदार व हक्कदार करून सर्वमान्य करून दिल्हा असे. येविशीं देशाधिकारी यांस व ग्रामाधिकारी यांस व वरकडांस अलाहिदा पत्रें सादर केलीं आहेत. तरी मौजे मजकूर पूर्वील यादीप्रमाणें स्वाधीन करून घेणें आणि इनाम गांव तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवून आपला योगक्षेम व वृंदावनीं महोत्सव ब्राह्मणसंतर्पणादिक सांग चालवून स्वामीचें व स्वामीच्या राज्याचें अभीष्ट चिंतून भगवद्भजन करून सुखरूप राहणें जाणिजे. निदेश समक्ष मोर्तब रुजू विस्त सुद बार ता. ११ जिल्हेज सुरुसन समान अशरीन मया व अलफ. ”

गोदूबाइचें सासरचें नांव गंगाबाई होतें हें वरील सनदेवरून उघड होत आहे. मुक्तेश्वरांनीं आपलें रामायण पैठणांत लिहिलें हें सदर ग्रंथांतील पुढील श्लोकांत त्यानींच सांगितलें आहेः––

सुचिर सहज वासें गौतमीच्या तटाकीं ।
अतुट भजनपंथें पंथ टाकीत टाकी ॥
द्विजवर कवि नामा मुद्गल् अत्रिगोत्री ।
विमळ वचनमुक्तें लेववी संतश्रोत्रीं ॥

**महाराष्ट्र जे सर्व राष्ट्रांसि राजे ।**
**जयाच्या भयें व्यापिले देव लाजे ॥**
**सदाचार भंगे पळाली प्रतिष्ठा ।**
**प्रतिष्ठान त्या नाभिकारींत श्रेष्ठा ॥**

यावरून मुक्तेश्वरांचें पूर्ववय पैठणांतच गेलें व पुढें वडील चिंतोपंत वारल्यावर ते पैठण सोडून कुरुंदवाडच्या बाजूस येऊन राहिले असावेत व कुरुंदवाडजवळील तेरवाड गांवीं त्यांचें देहावसान झालें असावें असें वाटतें. सोनारीचा बहिरोबा व कोल्हापुरची महालक्ष्मी हीं त्यांचीं कुलदैवतें होत. मुक्तेश्वर हे जन्मतः मुके असून, एकनाथ महाराजांच्या कृपेनें त्यांस वाचा फुटली अशी आख्यायिका आहे.

ज्ञानेश्वर, एकनाथादि संतकवींशीं मुक्तेश्वरांची तुलना करणें योग्य नाहीं, परंतु इतर सर्व कवींपेक्षां प्रतिभासंपन्नतेच्या बाबतींत मुक्तेश्वरच श्रेष्ठ ठरतील यांत संशय नाहीं. यांची कविता अत्यंत प्रसन्न, परम रमणीय आणि नितांत रसवती आहे. महाभारताचीं आदि, सभा, वन, विराट आणि सौप्तिक हीं पांच पर्वें, श्लोकबद्ध रामायण, हरिश्चंद्राख्यान, शुकरंभाख्यान, शतमुखरावणाख्यान, मूर्खांचीं लक्षणें व कांहीं पदें आणि आरत्या इतकी यांची कविता उपलब्ध आहे. यांनीं समग्र महाभारत व भागवत मराठी भाषेंत रचिलें अशी प्रसिद्धि आहे, परंतु महाभारताचीं तेरा पर्वें व भागवत हीं उपलब्ध नाहींत व यापुढें तीं उपलब्ध होण्याची फारशी आशाही नाहीं. मुक्तेश्वरांनीं, आपले पूज्य पितामह श्रीएकनाथ यांचा उल्लेख आपल्या भारतांत मोठ्या अभिमानानें केला आहे.

नाथांची दुसरी मुलगी गंगाबाई ही कर्नाटकांत, नाथांचा एक जुना नातेवाईक होता, त्याजकडे दिली होती. हिला पुंडाजी नामक पुत्र झाला, तोही मोठा हरिभक्त होता.

रामदासकालीन प्रसिद्ध संतकवि शिवराम स्वामी कल्याणीकर हे एकनाथांचे नातू होते, अशी माहिती भारत-इतिहास-संशोधक मंडळाच्या एका अहवालांत एका संशोधकानें दिली आहे. परंतु जुन्या ग्रंथांत किंवा खुद्द शिवरामस्वामीच्या ग्रंथांत या माहितीस कांहीं आधार नाहीं.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या शके १८३७ च्या इतिवृत्तांत ‘ श्रीएकनाथांचा वंशवृक्ष ’ या मथळ्याखालीं कै. पां. न. पटवर्धन या शोधक गृहस्थांनीं जी माहिती दिली आहे ती महत्त्वाची व नाथचरित्रपूरक असल्यामुळें, ती येथें देतों.

" निजाम सरकारचे हद्दींत ज्या कांहीं मोठ्या जहागिरी आहेत, त्यांत पैठणची जहागीर बरीच मोठी आहे. नाथ संस्थानास पहिली देणगी नाथांचे निपणतु रामचंद्र-बोवा यांचे दुसरे चिरंजीव छय्याबोवा यांनीं मिळविली. माळापुरी, जि. बीड, हा गांव व अड्रूळ, अखतवडें व पिंपरखेडें या तीन गांवचे मोकासे त्यांनीं मिळविले. छय्याबोवांचे चुलतबंधु काशीनाथ जगन्नाथ यांनीं ढोरकीन* व बाहेगांव ता. पैठण या गांवांचा मोकासा व कांहीं इनाम जमिनी मिळविल्या. छय्याबोवांचा नातू रामचंद्र कुशाबा यांनीं तोंडोळी, करजगांव, तागडगांव आणि खानापूर असे चार गांव मिळविले. रामचंद्राचा मुलगा बाळकृष्ण यांनींही पिंपळवाडी, सामनगांव आणि पास्त असे तीन गांव मिळविले. विद्यमान पांडुरंग बुवा यांचे वडील माधवबुवा यांनीं वाघुंडी, ता. पैठण व ब्रह्मगांव, ता. पैठण हे दोन गांव निजामांकडून* जहागीर मिळविले. "

" नाथांचे पुत्र हरिपंडित यांचे निपणतू रघुनाथ केशव यांच्या पत्नी जानकीबाई यांनीं दर आषाढीस पैठणहून पंढरीस पालखी नेण्याचा क्रम सुरू केला. तेव्हांपासून त्या शाखेस ' पालखीवाले ' असें टोपणनांव मिळालें. "

" पैठण संस्थानचे मालक अज्ञान भानुदास महाराज व श्री. गं. वेणूबाईसाहेब ( रंगनाथ बाळकृष्ण यांची पत्नी ) यांची कन्या श्री. सौ. कृष्णाबाई यांमध्यें संस्थानच्या मालकीसंबंधानें चालू असलेल्या कज्जाचा नुक्ताच निकाल लागला, " असेंही कै. पटवर्धन यांनीं आपल्या उपरिनिर्दिष्ट लेखाचे शेवटीं लिहिलें आहे. एकंदरींत, निरनिराळ्या मठांच्या शंकराचार्यांप्रमाणें, नाथांसारख्या परम थोर पुरुषांचे वंशजही मिळकतीच्या मालकीसाठीं कोर्टांत खेटे घालूं लागले आहेत !

## नाथांची वंशावळ.

श्रीभानुदास–चक्रपाणी–सूर्यकांत–श्रीएकनाथ–हरिपंडित. हरिपंडितास पुत्र तीनः–
१ प्रल्हाद, २ मेघःशाम, ३ राघोपंत.
( २ ) · ( २ ) ( ३ )

* एका हिंदुधर्मीय सत्पुरुषाच्या वंशजांस निजामसरकारानें इतके गांव जहागीर द्यावे, हे त्या सरकारास मोठें भूषण असून, त्याच्या परधर्मसहिष्णुतेचें द्योतक आहे. त्याचप्रमाणें, द्रव्य विषवत् मानणाऱ्या एकनाथ, रामदास, तुकारामादि संतांच्या नांवांवर, मागाहून त्यांच्या वंशजांनीं इनाम गांव संपादून चैन करावी हाही प्रकार तितकाच लज्जास्पद आहे. मिळविलेल्या संपत्तीचा व्यय, या सत्पुरुषकुलोत्पन्नांनीं, त्या सत्पुरुषांच्या ग्रंथोद्धाराकडे अल्पांशानें तरी केला असता तर त्यांचें हें वर्तन क्षम्य मानतां आलें असतें, परंतु तसेंही उदाहरण कोठें आढळत नाहीं.

१ प्रल्हाद–रंगोबा–रामजी–बाबाजी-दादोबोवा*

२ मेघःशाम–प्रल्हाद*–शामजी*–नारायण–कृष्ण
(४) (२०)

४ नारायण–(१) पांडुरंग*. (२) रामचंद्र
(५)

५ रामचंद्र–(१) मग्याबोवा* (२) छय्याबोवा
( ६ )

६ छय्याबोवा–( १ ) बाळाजी ( २ ) कुशाबा ( ३ ) नारायण
( ७ ) ( ८ ) ( ९ )

७ बाळाजी–गोविंद
( १० )

८ कुशाबा–रामचंद्र–बाळकृष्ण–रंगनाथ+वेणूबाई–नारायण+लक्ष्मी*
( १९ )

९ नारायण–एकनाथ
( १६ )

१० गोविंद–१ हरिहर २ विठोबा* ३ माधव ४ दाजी*
( ११ ) ( १४ )

११ हरिहर–१ तुकाराम २ शामराव
( १२ ) ( १३ )

१२ तुकाराम–१ दामोदर २ सांवळेराम ३ जनार्दन

१३ शामराव–१ भानुदास २ दत्तात्रय ( दत्तक )

१४ माधव–१ पांडुरंग २ नारायण*
( १५ )

१५ पांडुरंग–दत्तात्रय ( हा शामरावास दत्तक गेला )

१६ एकनाथ–१श्रीराम २ लक्ष्मण
( १७ ) ( १८ )

१७ श्रीराम–केशव–१ विनायक २ भानुदास ( हा रंगनाथास (१९) दत्तक होऊन संस्थानचा मालक झाला आहे ).

* निर्वंश झाला.

१८ लक्ष्मण—१ वामन २ दीनानाथ* ३ पंढरीनाथ
|
जगन्नाथ

२० कृष्ण—जगन्नाथ—काशीनाथ—१ बापू* २ विठोबा—एकनाथ
(२१)

२१ एकनाथ—१ रामकृष्ण २ वासुदेव ३ जनार्दन*
(२२) (२३)

२२ रामकृष्ण—विश्वनाथ*

२३ वासुदेव—कृष्णाजी ऊर्फ दादाबोवा
(२४)

२४ कृष्णाजी—१ रंगनाथ २ दत्तात्रय ३ वैजनाथ ४ भागवत
|
एकनाथ

३ राघोपंत—१ नागुबोवा* २ त्र्यंबक—१ वासुदेव* २ माधव ३ यादव ४ विश्वनाथ
(२५) (२६) (२८)

२५ माधव—राघोबा—१ महादेव* २ वासुदेव—बाळाजी—एकनाथ—भानुदास*

२६ यादव—परशराम—१ दीनानाथ* २ प्राणनाथ* ३ बाळाजी
(२७)

२७ बाळाजी—१ त्र्यंबक २ मनोहर
| |
सूर्यकांत* सीताराम*

२८ विश्वनाथ—केशव—१ बापू* २ रघुनाथ
(२९)

२९ रघुनाथ—१ भागवत २ गोपाळ
| |
त्र्यंबक १ हरि २ नारायण*
(३०)

३० हरि—१ नारायण २ नाथ—

---

* निर्वंश झाला.

# प्रकरण दहावें.

## नाथांचे समकालीन कवि.

ज्ञानदेव–नामदेवांच्या कालापासून एकनाथांपर्यंतच्या ३०० वर्षांच्या कालांत महाराष्ट्रांतील हिंदुपदपादशाही नामशेष होऊन, बहुतेक सगळी दक्षिण मुसलमानांनीं व्यापली. या परवशतेच्या अंधकारांत, पिसा बहिरा, चोंभा, भानुदास वगैरे थोडेसे संतकवि मधून मधून चमकले, परंतु ज्ञानदेवांसारखा सर्वमान्य व सर्वप्रसिद्ध असा एकही कवि वरील काळांत झाला नाहीं. परंतु पुढें एकनाथांपासून पुनः जी संत-कविपरंपरा सुरू झाली ती मोरोपंत विठोबाअण्णापर्यंत अगदीं अव्याहत चालू राहिली. बहुतेक सर्व प्रसिद्ध व लोकप्रिय मराठी कवि याच दोन अडीचशें वर्षांत होऊन गेले. एकनाथ, मुक्तेश्वर, वामन, रामदास, तुकाराम, श्रीधर, मोरोपंत व महीपति यांच्या ग्रंथांमुळें महाराष्ट्र वाङ्मयांत मोठीच महत्वाची भर पडली यांत संशय नाहीं.

आतां खुद्द एकनाथमहाराजांचे समकालीन कवि कोण कोण होते व त्यांनीं काय काय ग्रंथरचना केली आहे हें थोडक्यांत पाहूं.

( १ ) नाथांचे गुरु जनार्दनस्वामी हे जरी कवि म्हणून फारसे प्रसिद्ध नाहींत, तरी त्यांचे कांहीं अभंग छापिलेले आढळतात. जनार्दन स्वामींचे, नाथांशिवाय आणखी, ( २ ) रामा जनार्दन व ( ३ ) जनी जनार्दन या नांवाचे दोन शिष्य होते अशी समजूत आहे. परंतु या दोघांच्याहि नांवांपुढें ' जनार्दन ' हें नांव येतें, या पलीकडे या समजूतीस कांहीं आधार नाहीं. " आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा " ही प्रसिद्ध आरती रामाजनार्दनकृत असून, जनी जनार्दनाचा ' उद्धवबोध ' ह्या नांवाचा एक लहानसा ओवीबद्ध ग्रंथ व कांहीं फुटकळ कविता उपलब्ध आहे. ह्या दोन्ही संतकवींचा उल्लेख महीपतिकृत संतचरित्रविषयक ग्रंथांत आढळत नाहीं. जनी जनार्दन हे बालेघांटीं बीड शहराच्या बाजूस होऊन गेले व त्यांचे वंशज अद्याप तिकडे आहेत. यांचें आडनांव गोसावी. जनीजनार्दनाचें अल्पचरित्र

महाराष्ट्र कविचरित्राच्या तिसऱ्या भागांत मी दिलें आहे, तें जिज्ञासूंनीं तेथें पहावें. जनीजनार्दन शके १५२३ श्रावण वद्य ७ रोजीं समाविस्थ झाले. (४) *दासोपंत हे प्रसिद्ध कवि नाथांचे समकालीन असून त्यांचा व नाथांचा चांगला परिचय होता. हे जोगाईचें आंबें येथील रहिवासी. यांच्यासारखी अवाढव्य ग्रंथरचना दुसऱ्या कोणत्याही मराठी कवीनें केली नाहीं. यांच्या एकट्या 'गीतार्णव' नामक ग्रंथाची ओंवीसंख्या सव्वा लाख आहे असें ह्मणतात. आजपर्यंत यांची फारच थोडी कविता प्रकाशित झाली आहे व बाकी कविता प्रसिद्ध होण्याची तूर्त तरी आशा नाहीं. (५) 'भोजलिंग' या कवीचा 'महात्मसार' नामक ग्रंथ आहे. (६) मृत्युंजयस्वामी ‡ यांचे अनुभवसार, अमृतसार, गुरुलीला, अद्वैतप्रकाश, सीताबोध, पंचीकरण, वगैरे ग्रंथ आहेत. (७) विठ्ठलनंदन याचा 'सप्तशती चंडिका' हा ग्रंथ उपलब्ध आहे. (८) माधवदास यांचे, भगवद्गीता टीका व योगवासिष्ठसार हे दोन ग्रंथ उपलब्ध आहेत. (९) त्र्यंबक या कवीचा 'बालबोध' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. 'एकनाथी भागवत' व त्र्यंबकाचा 'बालबोध' हे दोन्ही ग्रंथ एकाच वेळीं लिहिले जात होते. एकनाथांच्या भागवताचा समाप्तिकाल शके १४९५ कार्तिक शुद्ध १५ मंगळवार हा असून बालबोधाच्या रचनेचा प्रारंभ शके १४९४ फाल्गुन शुद्ध ५ मीस झाला आहे. + त्र्यंबकाचा बालबोध ग्रंथ एका संन्याश्यानें चोरून नेला. त्यामुळें त्र्यंबकास तो पुनः रचावा लागला. हा ग्रंथ जुन्या मराठी वाङ्मयांतल्या उत्तम ग्रंथांपैकीं एक असतां, त्याची विशेष प्रसिद्धि झाली नाहीं, याचें आश्चर्य वाटतें. (१०) नामा पाठक (हाच कदाचित् महाभारतकर्ता विष्णुदास नामा असावा.) केंदूर नामक गांवीं हे पाठक रहात असत. नामा पाठकापूर्वी कान्हो पाठक या नांवाचा प्रसिद्ध संत या घराण्यांत होऊन गेला. नामा पाठक याचा 'अश्वमेध' नामक एक ओवीबद्ध ग्रंथ उपलब्ध आहे, परंतु तो अद्याप अप्रकाशित आहे. (११) सिद्धपाल केसरी या कवीचा मल्लारि-माहात्म्य हा ओवीबद्ध ग्रंथ प्रसिद्ध आहे. (१२) कृष्णदास मुद्गल ऊर्फ कृष्णदास लोळ्या. याचा उल्लेख नाथचरित्रांत पूर्वी येऊन गेला आहे. याचें युद्धकांड रामायण प्रसिद्ध आहे. रचना बऱ्यापैकीं आहे. स्वराज्यकालीं याच्या युद्धकांडानें योद्ध्यांच्या अंगांत वीरश्री

* महाराष्ट्र कविचरित्र, भाग पहिला पहा. ‡मुंतोजी ब्राह्मणी या नांवानें महीपतीनीं उल्लेखिलेला सत्पुरुष हाच असावा असें वाटतें.

+ रा. भावेकृत 'महाराष्ट्र सारस्वत' पृष्ठ १३३ पहा.

उत्पन्न केली. महाराष्ट्रांतील बहुतेक किल्ल्यांत या युद्धकांडाच्या पोथ्या त्या कालीं असत. ( १३ ) कृष्णदास याचा ' बालक्रीडा ' नामक लहान ग्रंथ उपलब्ध आहे. ( १४ ) कृष्ण याज्ञवल्कि यांचा ' कथाकल्पतरु ' हा प्रचंड ग्रंथ प्रसिद्ध आहे. यांचा मुलगा गोपाळ याज्ञवल्कि याच्या सांगण्यावरून शिवकल्याण यांनीं अमृतानुभवावरील आपली नित्यानंदैकदीपिका ही टीका लिहिली, असें म्हणतात. कथाकल्पतरु-शिवाय, जैमिनी अश्वमेध नामक ग्रंथही कृष्ण याज्ञवल्कि यांनीं लिहिला आहे. ( १५ ) मोगरेकर रंगनाथ. रामदास पंचायतनांतील रंगनाथस्वामी निगडीकरांहून हे रंगनाथ निराळे. भगवद्गीतेवर चित्सदानंदलहरी नामक विस्तीर्ण ओवीबद्ध टीका, योगवासिष्ठ व पंचरत्न हे यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. ( १६ ) मेरु कवि. याची अवधूत गीतेवर टीका आहे. ( १७ ) आनंदतनय हा शहाजीचा गुरु होता ही आख्यायिका जर खरी असेल तर तो नाथांचा समकालीन असलाच पाहिजे. विविध वृत्तांत पहिल्यानेंच मराठी कविता रचणाऱ्या कवींपैकीं हा एक होय. याचीं श्लोकबद्ध प्रकरणें व पदें फार रसभरित आहेत. याची बहुतेक सर्व कविता छापून प्रसिद्ध झालेली आहे. ( १८ ) निरंजन हा कऱ्हाड येथील प्रसिद्ध गाणपत्य. गणेशगीतेवर याची टीका आहे. ( १९ ) कळपुरकर विठ्ठल याचें ' रासक्रीडा ' हें श्लोकबद्ध प्रकरण उपलब्ध आहे. ( २० ) शिवकल्याण. याची भागवताच्या दशमस्कंधावर ओवीबद्ध टीका आहे. तिची ग्रंथसंख्या सुमारें ९०००० होईल असें म्हणतात. या ग्रंथाचे कांहीं अध्याय प्रसिद्ध झालेले आहेत. अमृतानुभवावरील याच्या ' नित्यानंदैकदीपिका ' नामक टीकेचा उल्लेख पूर्वीं आलाच आहे. महाभारतावर याचा एक मोठा ग्रंथ आहे असें म्हणतात, परंतु तो अद्याप उपलब्ध झालेला नाहीं. ( २१ ) विठा रेणुकानंदन याचीं कांहीं पदें मात्र प्रसिद्ध आहेत.

वरील कवींशिवाय, आणखी पुष्कळ लहान कवि नाथांच्या कालीं होऊन गेले असतील. या कालांतील कवींचा अध्यात्मावर भर फार; व या कालांत झालेली ग्रंथसंख्याही फार मोठी आहे. एकट्या दासोपंतांची कविता सुमारें दोन लक्ष असून शिवकल्याण, एकनाथ, कृष्ण याज्ञवल्कि या प्रत्येकाची कविता ६०००० हून अधिक आहे.

# प्रकरण अकरावें.

## एकाजनार्दनाचा जयजयकार.

महाराष्ट्रांतील अनेक जुन्या कवींनीं जनार्दनस्वामी व एकनाथ यांच्या चरणीं पद्यपुष्पांजलि वाहून, त्यांजविषयींचा आपला प्रेमादरभाव व्यक्त केला आहे. या सर्व पद्यपुष्पांची सुंदर माला गुंफून, ती नाथांचा प्रसाद म्हणून, एकाजनार्दन-भक्तांस येथें आदरपूर्वक अर्पण करितों.

### उत्तमश्लोक–जनार्दनस्तोत्र ( श्लोक )

पूर्णावतार गुणकार्य विलिप्त अंगें ।
मायामयारहित अद्वय वेद सांगे ॥
तोडील पाश भवजन्य कृपाप्रभावें ।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ १ ॥
जे साधनें शमदमादिक साधिताती ।
षट्चक्र भेदुनि जिवा स्वपदासि नेती ॥
ते प्राप्ति गौण मग त्यां सुख नित्य फावे ।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ २ ॥
कित्येक काळवरि घालुनि अन्नसत्रा ।
होतां प्रसन्न मुनिसत्तम अत्रिपुत्रा ॥
लाहोनि चित्सुखघना सुजनासि पावे ।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ ३ ॥
केला प्रबोध मग ठेवुनि हस्त माथां ।
तारावया जड जिवांप्रति एकनाथा ॥
ज्याचे घरीं करि निरंतर कृष्ण सेवे ।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ ४ ॥

विश्वेश्वर प्रकट तारक मंत्र बोधी।
काशींत मृत्युसमयीं तरि मोक्षसिद्धि ॥
येथोंचि सद्य करितो निजगुह्य ठावें।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ ५ ॥
जें दुर्घट भ्रम करी विषयार्थ लोकां ।
ब्रह्मादिकांसहित लाउनि मोहशोका ॥
तें दुर्निवार मन चंचळ आवरावें।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ ६ ॥
ब्रह्मांडिंचा सकळ तीर्थसमूह किंवा।
यज्ञादि योग तप दान सुपुण्य ठेवा ॥
आला फळासि मज सर्वहि शुद्ध दैवें।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ ७ ॥
वाचील भक्तिपर सांडुनि सर्व कामें।
श्लोकोत्तम स्तवन अष्टक नित्य नेमें ॥
तेणें चतुर्विधहि अर्थ सुखें वरावे।
ध्यातां जनार्दन गुरु प्रभुवर्य भावें ॥ ८ ॥

मुक्तेश्वर—नाथस्तुति ( पद. )

भजा भजा हो माझ्या एकनाथासी।
त्रिकाळीं श्रीदत्तात्रेयदर्शन ज्यासी ॥ ध्रु० ॥
एकनाथा शरण जातां चुके भवभय।
एकावांचुनि न दिसे कांहीं अवघें अद्वय।
एका भावें भजतां त्यासी लाधे निजसोय।
एवढा महिमा ज्याचा वाचे वर्णितां नये ॥ १ ॥
करुणेचा अवतार तो हा विश्वतारक।
कळेना स्वामीचें सहजीं सहज कौतुक।
कर्ज फेडी त्याचे घरिंचें कमळानायक।
करी देव दास्य ज्याचें आज्ञाधारक ॥ २ ॥
नाम एकोबाचें गोड आवडे मना।
नामामृत सेवितां भेटी झाली चिद्घना।

नावडे आणिक कांहीं मज त्याविना ।
नाठवे देहभाव प्रेमें करितां कीर्तना ॥ ३ ॥
थरथर कांपे काळ स्वामी स्मरतां समर्थ ।
थक्कित होउनि जन बहु हर्षें पाहति परमार्थ ।
थकलें चित्त माझें पुरले मानिंचे मनोरथ ।
थय थय नाचत मुक्तेश्वर म्हणे झालों कृतार्थ ॥ ४ ॥

मुक्तेश्वरांनीं आपल्या आदिपर्वाच्या आरंभीं आपल्यापूर्वी होऊन गेलेल्या ज्या प्राकृत कवींस वंदन केलें आहे त्यांत नाथाचा उल्लेख आहे:—

प्राकृत कवीश्वराचार्य । ज्ञानदेव ज्ञानैकवर्य ।
जयाचे बुद्धीचें गांभीर्य । अगाध सिंधूसारिखें ॥
त्याचे चरण चिंतिले मनीं । तेणें पावन झालों जनीं ।
मातृजनक जनार्दनीं । एकनाथ नमियेला ॥

## आरती.

जयदेव जयदेव जय एकनाथा । निर्विकार ब्रह्म तूंचि तत्वता ॥ नामें भवकुंजर ताडुनी लाथा । भक्तप्रतिपाळक कळिकाळ माथां ॥ ध्रु० ॥ नानारूपीं चाळक व्यापक तूं एक । म्हणुनी 'एका' नामें पाचारिति लोक ॥ ज्याचे नामें न चले विषयाचा पंक । जनार्दनाजवळी कीर्तीचा जनक ॥ १ ॥ निर्मळ गोदातटीं मुनिराज हंस । निर्गुण प्रतिष्ठानीं केला राहिवास ॥ लोकत्रयीं मिरवी कीर्तीचा घोष । आचार विचार निर्मळ निर्दोष ॥ २ ॥ अपरभानुकुळीं उगवला भानु । सूर्याचाही सूर्य देदीप्यमानु ॥ कामक्रोध लोभ मद मत्सर मानू । कृपादृष्टी करुनी तारिसि रजरेणू ॥ ३ ॥ भगवद्भावें करुनी सकळांसी मैत्री । म्हणुनी जन्म विश्वामित्राचे गोत्रीं ॥ विश्व तरलें हरिहर नामाचे मंत्रीं । पाहूं न शके जवळ कळिकाळ नेत्रीं ॥ ४ ॥ ब्राह्मणतीर्थी पूजा नामाचा महिमा । सत्कर्में लोटली मोक्षाची सीमा ॥ नाना मतांचिया वंदूनी गरिमा । मुक्तेश्वरें तेथें धरियेला प्रेमा ॥ ५ ॥

आरती.

जयदेव जयदेव जय एकनाथा ।
सज्जनवृंदामाजी देखों अधिकता ॥ ध्रु० ॥
बाळपणीं कोणा डंखों आला काळ ।
तो काळचि कोणा झाला कृपाळ ।
जन्मारंभीं कोणाचें वैराग्य प्रबळ ।
कोणाचें वैराग्य राहिलें अढळ ॥ १ ॥
क्षालन सद्गुरुपदपंकजिचें नीर ।
कोण त्याला मानुनि साराहुनि सार ॥
कोण गुरुभक्तीसी जाहला तत्पर ।
सर्वां गुरुभक्तीसी एक आधार ॥ २ ॥
करतळामळ कोणी एकादश केला ।
विश्वव्यापक ग्रंथ कोणाचा झाला ॥
अनंत कोटि ब्रह्मांड ज्यासी अवलीला ।
त्यासी अनुभवसार कोण पैं वदला ॥ ३ ॥
भूसुरमहिमा कोणी वाढविला ।
षट् कर्मांचा महिमा अंगीं दाखविला ॥
........................................ ।
........................................ ॥ ४ ॥
कोणाचें ऋण जाउनि कमलापति फेडी ।
कोणाचें हरिदास स्वयें अंगण झाडी ॥
अनंत ब्रह्मांडाच्या करितो घडामोडी ।
कोणाचे घरिं खांद्या वाहे कावडी ॥ ५ ॥
कोण मुक्या हातीं रामायण वदवी ।
समुद्रवलयांकित श्री कोणाची झाली ॥
ऐसा अगम्य महिमा जाणति अनुभवी ।
भावें मुक्तेश्वर वांच्छित पदपदवी ॥ ६ ॥

वरील आरती रा. पांगारकृत एकनाथचरित्रांतून घेतली आहे. तींत दोन चरण कमी आहेत. पहिल्या चरणाच्या पहिल्या आणि दुसऱ्या ओळींतील बहुतेक शब्द, ' आम्हां डंखूं आला काळ । तंव तो काळचि झाला कृपाळ ' ह्या नाथांच्या अभंगांतून मुक्तेश्वरांनीं जशाचे तसे उतरून घेतलेले दिसतात. मूर्ख गावबाकडून नाथानीं भावार्थ-रामायण लिहविलें या दंतकथेस या आरतींत आधार सांपडतो. असो.

" शरण शरण एकनाथा । पायीं माथा ठेविला " हा तुकारामबुवांचा अभंग पूर्वी दिलेला असल्यामुळें त्याची पुनरावृत्ति येथें करीत नाहीं, परंतु ' टिपरीचे अभंग ' या नांवाचें बुवांचें एक प्रकरण आहे त्यांतील ''एके घाई खेळतां न पडसी डाई ' या अभंगांत त्यांनीं नाथांचा उल्लेख केला आहे तो असाः—

**" ब्राम्हणाचा पोर खेळिया एका भला ।**
**तेणें जन खेळकर केला रे ॥**
**जनार्दन बसवंत करूनियां तेणें ।**
**वैष्णवांचा मेळ मेळविला रे ॥**
**एकचि घाई खेळतां खेळतां ।**
**आपणचि बसवंत जाला रे ॥**

## अनाम कवि—पद*

**नमूं एकनाथपंत संत साधु भला रे ॥ ध्रु० ॥**
**प्रतिष्ठान अधिष्ठान । दयाभूत अनुष्ठान ।**
**उतरती इतर पितर पितृश्राद्धपर्वणिला रे ॥ १ ॥**
**आवडिनें कावडिनें । सांवडिल्या पत्रावळि ।**
**गंधचंदनासि घांसि नंदनंदन राबविला रे ॥ २ ॥**
**दत्तात्रय धरुनि दार । रक्षि होउनि चोपदार ।**
**चमत्कार हाचि फार दासोपंत चोजविला रे ॥ ३ ॥**

* ह्या पदाच्या शेवटीं ' दासोपंत ' हें नांव असल्यामुळें तें दासोपंतकृत पद आहे अशी लोकांची समजूत झालेली दिसते. रा. पांगारकर यानीही हें पद दासोपंतांचें म्हणून दिलें आहे. परंतु, दासोपंत हे आपल्या कवितेंत ' दासोपंत ' या शब्दानें स्वतःचा नामनिर्देश कोठेंही करीत नाहींत. यावरून हें पद अपूर्ण असावें किंवा कवीनें स्वनामनिर्देश केला नसावा असें वाटतें.

## निळोबा—अभंग.

धन्य धन्य एकनाथा । तुमचे चरणीं माझा माथा ॥ १ ॥
दासोपंताचा अभिमान । गेला होतांचि दर्शन ॥ २ ॥
दत्तात्रेय चोपदार । तेथें उभे काठीकर ॥ ३ ॥
यवन अंगावरि थुंकला । प्रसाद देउनि मुक्त केला ॥ ४ ॥
निळा शरण तुमच्या पायां । अनन्यभावें नाथराया ॥ ५ ॥

## देवीदास—ओंवी.

उद्धवाचें रूप धरून । एकनाथाचें फेडिलें ऋण ।
ऐसा उदार धीर सर्वज्ञ । तूंचि एक गोविंदा ॥

—संतमालिका.

## कृष्णदयार्णव—ओंव्या.

म्हणाल येथ कोण विचारू । तरी श्रीएकनाथ परमेष्टी गुरु ।
भानुकुळीं अपरभास्करु । अज्ञानतिमिर परिहर्ता ॥
सकळ सद्‌गुणीं परिपूर्ण । प्रतिष्ठानीं अवतरून ।
कलिमलमग्ना ब्रम्हज्ञान । प्रबोधून उद्धर्ता ॥
अभेद गुरुभजनाची मागी । प्रगट आचरोनि दाविली जगीं ।
गुरुदास्याच्या ऐश्वर्ययोगीं । समता अंगीं शोभविली ॥
अद्वैतबोधीं एकात्मता । पूर्णपणें बाणली असतां ।
ते पहावया हरि हर धाता । अवधूतवेषें पातले ॥
यशोदानंदात्मज आवडी । धर्मालयीं उच्छिष्टें काढी ।
अर्जुनाचीं धुतलीं घोडीं । येथ कावडी जळ वाहे ॥
अन्न गंधादि धूप दीप । अर्पणीं सादर नित्य समीप ।
यावेगळे क्लेश अमूप । करितां अल्प श्रम न मानी ॥
ऐसा महिमा अगाध ज्यांचा । तिहीं रुक्मिणीस्वयंवर वाचा ।
वाखाणिलें त्या ग्रंथाचा । विचित्र महिमा जग जाणे ॥

—श्रीहरिवरदा

### अमृतराय—पद.

सज्जनमन सुमेरू गुणनिधि एकनाथ।
परम पुरुख परम भागवत अवतरे ॥ ध्रु० ॥
नगरमनपट्टन तीरथमन गोदा-।
पुलिनपनघनतटनिकट निवास करे ॥ १ ॥
घन ब्रिंद्रावन घन तरुवर कलपवृच्छ।
धन यन चरण न सोजी अजि अरति धरे ॥ २ ॥
होत पुरानश्रवण कीर्तन सुखविचार।
सुख उपजत मुखतान अमृत वचन झरे ॥ ३ ॥

### एकेश्वर अवधूत—ओंव्या.

प्रत्यक्ष भानूनें उपदेशिला। त्याला पांडुरंग गळांच्या माळा।
अंकुर फुटले कोरडे शूळा। त्या भानुदासचरणकमळा नमस्कार ॥
भानुवंशभूषण श्रीरघुनाथ। तैसा भानुकुळटिळक श्रीएकनाथ।
जो व्यास-अवतार साक्षात। जगदुद्धारार्थ अवतरला ॥
जो सद्गुरुभक्तीचा शृंगार। जो ज्ञान वैराग्याचें भांडार।
जो सच्चिदानंद एकाकार। त्या एकनाथा नमस्कार एकपणें ॥
जो जनार्दनस्वामीचा लाडका। जेणें भवसमुद्रीं भागवत नौका।
घालोनि तारिलें भाविकां। जो परमसखा संतांचा ॥

—संतमालिका.

### आत्माराम रामदासी—अभंग.*

धन्य एकनाथस्वामी गुरुभक्त। साह्य भगवंत सदा ज्यासी ॥ १ ॥
जेवीं रामायण हरिवंश भारत। तेंवि वाड चरित गाती भक्त ॥ २ ॥
श्रीगंध उगाळी पाणी आणी देव। पडलें काम सर्व संपादित ॥ ३ ॥
**रुसतां स्त्रीवरी देव जाला दारा। उठविली त्वरा मेली गाय ॥ ४ ॥**
**प्रायश्चित्तीं पीडितां धांवला त्र्यंबक। मारितां चाबूक गर्भ गर्जे॥५॥**

---

* या अभंगांतील जाड्या अक्षरांत दिलेल्या चरणांतील चमत्कारांची माहिती केशव व महीपति यांच्या ग्रंथांत आढळत नाहीं.

भागीरथीतीर्थं पाजिलें खरासी । श्राद्धीं अंत्यजांसी अन्न दिलें ॥ ६ ॥
रामायण लिही वदे वायुसुत । करवी भागवत विश्वेश्वर ॥ ७ ॥
ग्रंथवाक्यें ज्याचीं मान्य हो समस्तां । क्रिया दासोपंता साक्षी आली ॥ ८ ॥
मढें नेतां बाई हांसोनी बोलतां । कथा केली स्वतां उठोनियां ॥९॥
प्रत्यक्ष प्रगटोनी श्रीरामदासाला । परामर्ष केला यथास्थित ॥ १० ॥
धन्य ज्याची लीळा धन्य ज्याचें नाम । सखा आत्माराम जाला ज्याला ॥ ११ ॥

## केशव—श्लोक.

अधिष्ठानवासी प्रतिष्ठान ग्रामीं । लिलाविग्रही जन्मला पुण्यभूमीं ॥
महाराज श्रीएकनाथाभिधानी । नमूं पादपद्मा जपूं नामवाणी ॥

—एकनाथचरित्र.

## श्रीधर—ओंवी.

जो भानुदासकुळभूषण । प्रतिष्ठानवासी परिपूर्ण ।
त्या एकनाथें ग्रंथ संपूर्ण । बहुसाल कथियेले ॥

—रामविजय.

## अनंत गोपाळदास—आरती.

आरती एकनाथा । महाराजा समर्था ।
त्रिभुवनीं तूंचि थोर । जगद्गुरु जगन्नाथा ॥ ध्रु० ॥
एकनाथ नामसार । वेदशास्त्रांचें गुज ।
संसारदुःख नासे । महामंत्राचें बीज ॥ १ ॥
एकनाथ नाम घेतां । सुख वाटलें चित्ता ।
अनंत गोपाळदासा । धणी न पुरे गातां ॥ २ ॥

## विठ्ठल—आरती.

भवसागर हा अतिदुस्तर जाणुनि शरण आलों ।
कृपाकटाक्षें हस्त ठेवुनी परपार उतरलों ॥ १ ॥
एक नाम हा ब्रम्हसंकेत होउनि तोचि अवतरला ।
मंदमति अतिमूढ जीवां थोर उपकारू केला ॥ २ ॥
जन वन हें समसमान ऐसा निश्चय झाला ।
गुरुप्रसादें मीपण जाउनि विठ्ठल तन्मय ठेला ॥ ३ ॥

## महीपति—ओव्या.

जैसें बिंब प्रतिबिंब दिसे । दोघांत भेद किंचित् नसे ।
पांडुरंग आणि एकनाथास । द्वैत नसेचि सर्वथा ॥
तीर्थ जळ नामें दोन । परी ऐक्यतेसी नसती भिन्न ।
कीं वासरमणि आणि प्रकाश जाण। निवडील कोण तयांसी ॥
नभीं नीळिमा जया रीती । पुष्प मकरंद एक असती ।
तेंवी एकनाथ आणि पांडुरंगमूर्ति । एकचि आकृति जाणिजे ॥

—भक्तलीलामृत.

## अवधूत—आरती.

अज अव्यय चिद्घन तो तूं निर्गुण ।
इच्छा लीलेस्तव दाविलें सगुण ।
एका जनार्दन हें धरिलें नाम ।
गोदातीरीं वास पूर्ण प्रतिष्ठान ॥ १ ॥
जयदेव जयदेव जय एकनाथा ।
नामरूपातीता अखंड अद्वैता ।
तेथें आरति करावया कैंची योग्यता ।
तुजविण अणुभरी ठावो नाहिं रिता ॥ २ ॥
भक्ति ज्ञान वैराग्य पूर्ण आत्मत्व ।
यालागीं व्याख्यान केलें भागवत ।
करतळामळ करुनी सुखि केले संत ।
तो हा श्रीएकनाथ वत जनांत ॥ ३ ॥
गुरुत्वें तुझें नाम घेतां संपूर्ण ।
जीव शिव तात्काळ जाय मिळोन ।
देह होय विदेह प्रताप गहन ।
अवधूत नित्यत्वें ध्याय तुजलागून ॥ ४ ॥

## मोरोपंत—आर्या.

नमिला शमिलास्यप्रद शांतिजलधि एकनाथ तो भावें ।
शोभावें ज्याचें यश विश्वीं ज्या देववृंद लोभावें ॥

भूतदया संसारीं एकोपंतास निरुपमा घडली ।
जडली अंगासीच क्षांति सदा शांति तों गळां पडली ॥
अत्यद्भुत यश हरिचें जेंवि तसें एकनाथपंताचें ।
तें तें साचें जें जें वर्णितसें चारित वृंद संतांचें ॥
एकोपंत जनार्दनपंताचें भजनही असीम करी ।
याची गति गुरुचरणीं, भक्ष्यीं घालिन मिठी असी मकरी ॥
श्रीज्ञानेश्वर भेटे एकोबाला तसाचि अत्रिज गा ।
हें किति ? दास्य करि प्रभु-ज्याहुनि आधार अन्य न त्रिजगा ॥
ग्रंथ श्रीभागवत श्रीरामायण करी सुविस्तर ते ।
जरि न रचिता दयानिधि केवळ जडजीव तरि कसे तरते ? ॥
विश्वेश्वर अविमुक्तीं, विठ्ठल पंढरपुरीं प्रतिष्ठानीं ।
प्रभु एकनाथ, वरिला सर्वमहितदैवतप्रतिष्ठांनीं ॥
ज्या पैठणांत षष्ठी, तो संसारीं कधीं नव्हे कष्टी ।
हे स्वस्थाना नेते, रक्षुनि अंधावळा, जशी यष्टी ॥
मातेचे पाय जसे छळ करित्याचे तसेचि जो पाहे ।
साधु निवे, नच कोपे, न दुरुक्तक्षोभ मानसीं राहे ॥
जों जों प्रायश्चित्त ब्राह्मण आग्रह करूनियां देती ।
तों तों साधुमनांत प्रीति, न चतुराननींहि नांदे ती ॥
हस्तीं धन आलें जें तें देवब्राह्मणांसि अर्पावें ।
स्वापत्य तसें प्रेमें अन्नार्थि प्राणिजात तर्पावें ॥
भक्तवश त्यक्तप्रभुभाव नव्हे पांडुरंग देव कसा ? ।
बारा वर्षे बसला एकोबाच्या गृहांत सेवकसा ! ॥
प्रभुरूप प्रभुभक्त स्पष्ट म्हणुनि एकनाथ हा भावें ।
स्तविला भक्तमयूरें कीं येणें सर्व इष्ट लाभावें ॥

## तुका विप्र—श्लोक

श्रीमद्विठ्ठलभक्ति कारण कुळीं तो भानुदास स्वयें ।
ज्याचा आत्मज चक्रपाणि भजनें तारी जडा निश्चयें ॥

झाला त्यासि सुपुत्र सूर्य मन हें तत्पादकंजीं रमो ।
त्यापासूनि जगद्गुरु प्रगटला त्या एकनाथा नमो ॥ १ ॥
अधिष्ठान जें तें प्रतिष्ठान देखा । तिथें जन्मला तो गुणातीत एका ॥
तयाचेनि नामें चुके जन्म वेथा । नमस्कार माझा सद्गुरु एकनाथा ॥ २ ॥
नदी दिव्य गोदातटींचा निवासी । सदा प्रीय जो सज्जनां वैष्णवांसी ॥
जया वर्णितां प्रेम आल्हाद चित्ता । नमस्कार माझा० ॥ ३ ॥
स्वयें भानु जो भानु आराधियेला । तयाचे कुळीं दीपकू दिव्य झाला ॥
हरीभक्ति लावूनि तारी समस्तां । नमस्कार० ॥ ४ ॥
चरित्रें विचित्रें पवित्रें अपारें । पुढें पामरें तारिलीं सूविचारें ॥
जयाचे कृपेनें समाधान चित्ता । नमस्कार०॥ ५ ॥
लिलाविग्रहीं सर्वही निर्मियेलें । जिवीं जीवना साधना योग्य केलें ॥
अनन्य युक्ति भक्ति जो मुक्तिदाता । नमस्कार०॥ ६ ॥
जयाची जगीं कीर्ति विस्तारिलीसे । जयाचेनि नामें महादुःख नासे ॥
जयाचेनि योगें घडे सर्व सत्ता । नमस्कार०॥ ७ ॥
जेणें अर्चिलें द्विजदेवांसि नेमें । जेणें तारिलें विश्व हें रामनामें ॥
सदा सेवि जो सद्गुरू मोक्षदाता । नमस्कार० ॥ ८ ॥
जया नाम ना रूप ना गूण कांहीं । जया देहवीदेहता भास नाहीं ॥
बहू तारिले हस्त ठेवूनि माथां । नमस्कार ० ॥ ९ ॥
जगीं एकला सद्गुरू एकनाथू । ऐसी बोलती सर्वही विश्व मातु ॥
जया ऊपमा हो नये एक देतां । नमस्कार० ॥ १० ॥
कवीनायकू दायकू सौख्यराशी । महाज्ञानसिंधू असे नाम ज्यासी ॥
जयाची जगीं वर्णितां कीर्ति गातां । नमस्कार ० ॥ ११ ॥
अनंतां गुणांचा नये वर्णितां हो । सदा दास तो श्यामवर्णी पहा हो॥
जयाचें मुखीं नाम रूचे समस्तां । नमस्कार ० ॥ १२ ॥
महासंत साधू प्रतिष्ठानवासी । स्मरा एकनाथा पदीं मुक्तिराशी ॥
जयाचे गृहीं कृष्णजी कार्यकर्ता । नमस्कार० ॥ १३ ॥
सद्भानुवंशीं कुलदीपयोगी । जनार्दनाचें निजसौख्य भोगी ॥
तया एकनाथा स्मर एकभावें । होशी जगीं पावन तूं स्वभावें॥१४॥

श्रीएकनाथा घरिं आवडीनें । पाणी आणी श्रीहरी कावडीनें ॥
धोत्रें धुतो गंध उगाळुनियां । पाणी आणी श्रीहरि गाळुनियां ॥ १५ ॥
श्रीभानुदासाकुलिं एकनाथ । ही विष्णुमूर्ती उघडी कलींत ॥
दिसे जनां मानव शुद्ध भोळा । वंदे तुका विप्र अभंग लीला ॥१६॥

## ठाकुरदास बावा—ओंवी.

जडमूढ जे कां अज्ञान । त्यांसी तारावयालागीं पूर्ण ।
श्रीएकनाथ नामाभिधान । प्रगट जाण झालेंसे ॥

—सहजबोध

## आरती.

वोवाळूं जगद्गुरु एकनाथा स्वामी एकनाथा ।
करिसी सनाथ स्मरणेंचि अनाथा ॥ ध्रु० ॥
अहं धूप जाळूनि सोहं तेजें वोवाळूं ।
नित्यानंद तप्त जळें प्रेमें प्रक्षाळूं ॥ १ ॥
मुखशुद्धि बुद्धि चिद्रत्न हे दक्षणा ।
फिरोनियां जेथिली तेथें हे प्रदक्षणा ॥ २ ॥
ठाकुरदासपणें दंडवत नमन ।
करितां अभय पूर्ण वाणे उन्मन ॥ ३ ॥

## बाळाजीपंत पराडकर—आर्या.

शुक भवनिधि तरले परि योगालाबू धरूनियां पोटीं ।
एकोबाही तरले भवप्रस्तर दृढ धरूनियां पोटीं ॥ १ ॥
शुकसम जेणें केले विकाररिपु हे अनाथ संतत सा ।
भवसिंधुसेतु तो कां न ध्यावा एकनाथ संत कसा ? ॥२ ॥
श्रीएकनाथसदनीं माधवजी सर्व काम हें करितो ।
स्वकरें चंदन घांसी, गंगेचें पाणि कावडी भरितो ॥ ३ ॥

शेवटीं, ज्या थोर पुरुषानें आपल्या प्रत्यक्ष चारित्र्यानें ज्ञानेश्वर नामदेवांनंतर लुप्तप्राय होत चाललेल्या भागवत धर्मास पुनः चालन दिलें, कर्ममार्गाचें अवडंबर बाजूस सारून शुद्ध भक्तिमार्ग आणि सगुण हरिभजन यांचा ध्वज फडकविला, भूत-दया आणि अहिंसा यांचें माहात्म्य प्रत्यक्ष आचरणानें लोकांच्या मनावर ठसविलें, ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार करून ज्ञानेश्वरीचें संशोधन केलें, आणि भागवतरामायणासारखे विस्तृत मराठी ग्रंथ लिहून संस्कृतांतील ज्ञान आणि कथा सर्वसामान्य जनतेस सुलभ करून दिल्या त्या श्रीएकनाथमहाराजांस अनन्यभावें प्रणाम करून आणि प्रस्तुत ग्रंथलेखनाच्या निमित्तानें नाथवाङमयावलोकनांत जो अल्पकाल व्यतीत झाला, तो सार्थकीं लागला असें मानून, हा ग्रंथ येथें पुरा करितों.

शाखा

# सार्थ–श्रीदासबोध.

संपादक व भाषांतरकार.

ह. भ. प. **लक्ष्मण रामचंद्र पांगारकर** बी. ए. मुमुक्षुकर्ते पुणें.

श्रीसमर्थ **रामदास** स्वामींच्या दासबोध ग्रंथाची योग्यता लोकविश्रुतच आहे. **परमार्थ, प्रपंच,** व **राजकारण** यांची सांगड घालून ज्या महापुरुषानें महाराष्ट्राचा सर्व प्रकारें उद्धार केला त्याची ही **दिव्यवाणी** आहे. दासबोध ग्रंथ समजण्यास अति बिकट आहे म्हणून तो सर्वांस कळण्यास साह्य व्हावें या हेतूनें रा. रा. **लक्ष्मणराव पांगारकर,** मुमुक्षुकर्ते पुणें, यांनीं दासबोधाची प्रत शुद्ध करून त्यांचें मराठी सुबोध भाषांतरही केलें आहे. प्रत्येक पृष्ठावर वर मूळ व खालीं सरळ भाषांतर असा हा ग्रंथ तयार आहे. डोमगांवची **कल्याणस्वामींची** प्रत धुळेकरांनीं प्रसिद्ध केलीच आहे. कल्याणस्वामींचे बंधु **शिरगांवमठाचे** अधिपति **दत्तात्रय स्वामी** यांच्या हातची शके १६०६ च्या भाद्रपद मासांत लिहून तयार झालेली प्रत ग्वाल्हेरीस जाऊन अक्षरशः तपासून घेऊन व दोन्ही प्रतींचा मेळ पाहून रा. **पांगारकर** यांनीं ही प्रत तयार केली आहे. ग्रंथाचा प्रस्तावनेंत त्यांनीं दोन्हीं प्रतींचा मेळ घातला आहे. व १५० ठळक पाठभेद, ५० लेखनभेद दिले आहेत. ‘ सांप्रदायिक **मंगलाचरण** ’ ही दिलें आहे. असा हा बहुमोल व परिश्रमपूर्वक तयार केलेला ग्रंथ मराठी वाचक प्रेमानें स्वीकारतील अशी आशा आहे. पृ. सं. ७५० सुंदर सोनेरी बाईंडिंग किंमत ४ रु. व्ही. पी. खर्च ॥१० आणे.

**केशव भिकाजी ढवळे, बुकसेलर,**

**ठाकुरद्वार–मुंबई नं. ४.**

एकनाथमहाराजकृत

# श्रीरुक्मिणीस्वयंवर.

हा सुप्रसिद्ध नित्यपाठाचा ग्रंथ बुकसाईजमध्यें मोठ्या अक्षरानें प्रत्येक अध्यायाचे आरंभीं सुंदर चित्र घालून छापला आहे. आरंभीं श्री. आजगांवकर यांनीं प्रस्तावना व कथा तात्पर्य फारच उत्तम लिहिलें आहे. असें सुन्दर पुस्तक प्रत्येक भक्तानें अवश्य घ्यावें. कागद ग्लेज किंमत १ रुपाया, रफ ०१२ आणे. सुंदर १८ चित्रें, व्ही. पी. खर्च ०४ आणे.

---

**डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनें बक्षिस दिलेला व मुंबई सरकारनें शाळांतील मुलांस बक्षिसाकरितां व लायब्ऱ्याकरितां मंजुर केलेला निबंध.**

# तुकाराम बोवा.

लेखकः—**बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.**

( आवृत्ति तिसरी )

यांत तुकाराम महाराज यांचें सर्व चरित्र गोष्टीरूपानें व त्यांचे अभंगांतील उतारे देऊन फार प्रेमळपणानें लिहिलेलें आहे. सदर पुस्तक **विद्यार्थ्यांस** तर फारच उपयोगी आहे. शिवाय इतर भावीक स्त्रिया, पुरुषमंडळीसही तें नित्य पाठानें वाचण्यासारखें झालें आहे. पृष्ठें १०० किंमत ०८ आणे.

**केशव भिकाजी ढवळे, बुकसेलर,**
**ठाकुरद्वार–मुंबई नं. ४.**

श्रीसमर्थ रामदासस्वामिकृत

# सार्थ–श्रीमनाचे श्लोक.

लेखक,

भा. शं. देवस्थळी.

पृष्ठें २४०

किंमत ६ आणे. व्ही. पी. खर्च ०४ आणे.

केशव भिकाजी ढवळे, बुकसेलर, ठाकुरद्वार—मुंबई नं. ४

---

# भक्तिमणिमाला.

लेखक—ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर,
बी. ए. मुमुक्षुकर्ते.

भागवत हा भक्तिशास्त्रावरचा एक अद्वितीय ग्रंथ सकल संतमान्य व सर्वजनप्रिय आहे. भक्तिप्रेमाचीं रहस्यें–अमृत–मधुर वाणीनें जनांस सांगणारा भागवताच्या बरोबरीचा दुसरा ग्रंथ नाहीं. भागवतांतील उत्तमोत्तम अशा ५५० श्लोकांची निवड करून प्रायः त्यांचा कथा संदर्भ देऊन साधुसंतांच्या वचना धारें ही भक्तिमणिमाला तयार केली आहे. भागवती श्लोकाबरोबरच महाराष्ट्रीय सत्कविविचारांचाहि यांत समावेश केल्यामुळें ही माला " मराठी ग्रंथ " या दृष्टीनें केवळ अद्वितीय आहे. असो माझ्या आवडीची ही मणिमाला हरिप्रिय संत प्रेमानें स्वीकारतील अशी आशा आहे. पृष्ठें २५० किंमत १॥ रु. व्ही. पी. खर्च ०४ आणे.

केशव भिकाजी ढवळे, बुकसेलर, ठाकुरद्वार—मुंबई नं. ४.

विक्रीस तयार ॥ श्री ॥ विक्रीस तयार.

भारत वर्षातील प्राचीन महाकवि व विद्वान् राजा भर्तृहरीची स्वानुभविक तीन दृश्यें. "केसरी" चे संपादक रा. ज. स. करंदीकर यांनीं प्रस्तावना लिहिलेलें

किंमत सव्वा रुपया. ) **सार्थ शतकत्रय** ( टपाल खर्च निराळा.

**शृंगार, वैराग्य, नीति.**

ज्यावेळीं तुह्मीं आनंदांत असाल त्यावेळीं शृंगारशतक वाचा, व त्यांतील शृंगार रस वीभत्स नव्हे ) भरपूर व मनसोक्त लुटा ! परंतु ज्या वेळीं तुम्हीं संसारांत दुःखी, निराश व् उदासीन असाल, त्यावेळीं "वैराग्य" व "नीति" हीं दोन शतकें वाचा. तुमच्या दुःखी मनाला हीं दोन शतकें म्हणजे स्वर्गीय अमृत अगर कुशल वैद्यानें बनविलेलें अद्भुत रसायनच होय. ह्या दोन्हीं शतकांना "केसरी" चे संपादक रा. ज. स. करंदीकर यांनीं प्रस्तावना लिहून त्यांत, "भर्तृहरि राजा कीं कवि", त्याची योग्यता, त्याच्या पत्नीवरील व्यभिचाराचा आरोप खरा कीं खोटा, भर्तृहरि व कालीदास, महाराष्ट्रभाषेंतील जाडें प्रस्थ व विद्वान कवी वामनपंडित आणि भर्तृहरि यांची तुलना, भर्तृहरीचा काल, वगैरे विषय रा. करंदीकरांनीं थोडक्यांत, पण चटकदार भाषेंत सप्रमाण लिहिले आहेत. जगाच्या संसारांतील बहुतेक प्रसंगांचें चटकदार व प्रत्येकाच्या मनाला पटेल असें वर्णन भर्तृहरीच्या शतकांत असल्यामुळें भर्तृहरीचे एकेक श्लोक-म्हणजे एकेक लाख रुपये किंमतीचे होत; हें शतक वाचीत असतां तुम्हांला आढळून येईल. महाराष्ट्रिय प्रत्येक संसारी मनुष्यानें हें पुस्तक एकवार तरी अवश्य वाचावें. भर्तृहरीचा श्लोक, त्याचे खालीं वामनी टीका ( समश्लोकी ) व नंतर सविस्तर भाषांतर, अशा प्रकारें पुस्तकाची तिहेरी रचना असून पुस्तकाचा कागद ग्लेज, सुबक छपाई व मजबूत जाड पुठ्यांचें बाइंडींग आहे.

**केशव भिकाजी ढवळे, बुकसेलर,**
**ठाकुरद्वार-मुंबई नं. ४.**

२८२६
REFBK-0002726

# नवीन ग्रंथ.

## समर्थांचें सामर्थ्य.

किंवा

# श्रीरामदासस्वामींचा लीलानुग्रह.

लेखक,

" महाराष्ट्रभाषाचित्रमयूर"

**कृष्णाजी नारायण आठल्ये.**

भक्ति, मुक्ति, युक्ति आणि विरक्ति हा चतुर्बीज मंत्रात्मक ग्रंथ आम्हीं मुद्दाम श्री आठल्ये यांजकडून लिहविला आहे इतकें सांगितलें म्हणजे त्यांतील भाषा व विचार कसे आहेत तें निराळें सांगण्याची गरजच नाहीं. कारण आठल्ये यांची लोकसेवा सर्व विश्रुतच आहे. या ग्रंथाचे ' पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग केले आहेत. पूर्वार्धांत समर्थांच्या अद्भुत लीलेंतील शक्याशक्यतेबद्दल अद्भुत पुरावे, नंतर त्यांच्या सर्व लीला व चरित्र दिलें आहे व उत्तरार्धांत **समर्थांस गोसावी व दासबोधास** ' चिटोरें ' ह्मणणारे वगैरे आक्षेपकारांचा विचार करून नंतर ' दासबोध ' **जुना दासबोध**, '**आत्माराम**' ' मनाचे श्लोक ' वगैरे त्यांच्या प्रत्येक ग्रथांतील सारभूत विचार, स्थळें, कूटें, वगैरे निवडक वेचें ग्रंथित केले आहेत. ह्यामुळें समर्थांचें चरित्र लीला, व ग्रंथावलोकन हें सर्व एकत्रच पहावयास मिळतें. आणखी सर्वांत विशेष हें कीं, ह्या चरित्राचा हल्लींच्या ' **स्वराज्य** जागृतीच्या कामीं कसा उपयोग करून घेतां येण्याजोगा आहे आणि त्यांत विशेषें करून ब्राह्मणांनींच पुढारी होऊन आपण समर्थ कसें बनावें ही तर शेवटची गुरुकिल्ली आहे.

ह्यामुळें हा ग्रंथ सर्वांगसुंदर झाला आहे. प्रापंचिकाला व पारमार्थिकाला, जुन्यांना व नव्यांना, बायकानां व मुलांना, सर्वांना सारखाच जसा मनोरंजक तसाच बोधपर झाला आहे. कागद ग्लेज पृष्ठें ७५० बाईंडिंग सोनेरी असून एवढ्या मोठ्या व सुंदर ग्रंथाची किंमत किती ? तरः— अवघी २॥ रुपये व्ही. पी. खर्च ०८ आणे.

**केशव भिकाजी ढवळे**, बुकसेलर,

ठाकुरद्वार—मुंबई, नं. ४.